महादजी शिंदे आणि मराठी सत्ताः एक नवीन दृष्टिक्षेप

(Mahadaji Shinde and Maratha Power: A New Perspective)

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विषयाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक

श्री.हवालदार तानाजी रामचंद्र
एम.ए., एम.फिल., ICHR-JRF

मार्गदर्शक

डॉ. (श्रीमती) एन.डी.पारेकर
एम.ए., पीएच.डी.

सहयोगी प्राध्यापक,
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६००४

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डिसेंबर – २०१०

अनुक्रमणिका

ग्रंथ नामाच्या संक्षेपाची स्पष्टता

१) अ.शि.घ.इ. – अलिजाबहाद्दर शिंदे घराण्याचा इतिहास, संरजामे ज.प्र.

२) अ.म.मा.शि.च.का. – अलिजाबहाद्दर महाराज माधवराव उर्फ महादजी शिंदे चरित्र व कार्य, नातू वि.र.

३) ॲ.म.रि. – ॲग्लों मराठा रिलेशन, सेन एस.एन.

४) अ.यो. – अधिकार योग, खरे वा.वा.

५) इ.स.ऐ.टि. – इतिहास संग्रह ऐतिहासिक टिपणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

६) इ.स.इ. – इचलकरंजी संस्थानचा इतिहास, खरे वा.वा.

७) ऐ.प.या. – एतिहासिक पत्रे यादी

८) ऐ.ले.सं. – ऐतिहासिक लेख संग्रह, खरे वा.वा.

९) कॅ.ऑ.प.क. –कॅलेंडर ऑफ परशियन करस्पॉन्डस

१०) क.रि. – करवीर रियासत, गर्गे स. मा.

११) क.स.कै. – करवीर सरदारांच्या कैफियती, गायकवाड ख.आ.

१२) क.छ.घ.इ.सा. – करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, गुजर मा.वि.

१३) का.से.घो.घ.का. – कापसीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे, वर्टीकर श.अ.

१४) का.प.या. – काव्ये पत्रे यादी

१५) कै.या.व. – कैफियती यादी वगैरे, वाड ग.चि.

१६) गु.द. – गुलगुले दप्तर, अप्रकाशित कागदपत्रे, श्री नटनागर शोध संस्थान सीतामऊ, माळवा

१७) ग्रँड डफ – हिस्ट्री ऑफ द मराठाज

१८) चं.द. – चंद्रचुड दप्तर, आपटे द.वि.

१९) जि.ब.च. – जिवबादादा बक्षीचे चरित्र, राजाध्यक्ष एन.व्ही.

२०) थो.शा.म.च. – थोरले शाहू महाराज चरित्र, चिटणीस एम.आर.

२१) थो.रा.म.च. – थोरले राजाराम महाराज चरित्र

२२) द.म. – द मराठाज्, कुलकर्णी अ. रा.

२३) दि.ये.म.रा. – दिल्ली येथील मराठयांची राजकारणे, पारसनिस द.बा.

२४) न.म.शि. – नरवीर महादजी शिंदे, मावळकर बा.रा.

२५) ना.फ.च. – नाना फडणविसाचे चरित्र, देवधर वाय.एन.

२६) ना.भो.ब., – नागपूरकर भोसल्याची बखर, गुप्ता का.रा.

२७) ना.फ.श. – नाना फडणविस शकावली, जोशी श.ना.

२८) न्यू.हि.ऑ.म. – न्यू हिस्ट्री ऑफ मराठाज्, सरदेसाई जी.एस्.

२९) पे.ब. – पेशवा बखर, हेरवाडकर र.वि.

३०) पे.द. – पेठे दप्तर, चितळे वि.सि.

३१) पे.द.– पेशवा दप्तर

३२) पु.रे.कॉ. – पुना रेसिडेन्सी करस्पॉन्डटस

३३) पु.द. – पुरंदरे दप्तर, पुरंदरे कृ.वा.

३४) पु.अ. – पुना अखबारात, केंद्रिय अभिलेख कार्यालय, हैदराबाद

३५) फॉ.ऑ.मु.ए. – फॉल ऑफ मुगल एम्पायर, सरकार जदुनाथ

३६) बा.बा.रो. – बाळाजी बाजीराव रोजनिशी, पारसनिस द.ब.

३७) भा.ब. – भाऊसाहेबाची बखर, जोशी श.ना.

३८) भा.इ.स.म.त्रै. – भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक

३९) म.शि.का. – महादजी शिंदे यांची कागदपत्रे, सरदेसाई गो.स.

४०) म.रि. – मराठी रियासत, सरदेसाई गो.स.

४१) म.शि.रा. – महादजी शिंदे हयाजकडील राजकारणे, पारसनिस द.बा.

४२) म.व इ. – मराठे व इंग्रज, केळकर न.चि.

४३) म.इ. – मराठयांचा इतिहास, कुलकर्णी अ.रा., खरे जी.एच. (संपा.)

४४) म.द.बा. – महेश्वर दरबारची बातमीपत्रे, पारसनिस द.बा.

४५) म.शि. – महादजी शिंदे, दांडेकर वि.

४६) म.प.इ. – महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास, ओतुरकर आर.व्ही.

४७) म.शि.ना.फ.तु. – महादजी शिंदे आणि नाना फडणविस तुलना, नवलकर ह.ना.

४८) म.रि.म.वि. – मराठी रियासत मध्य विभाग, सरदेसाई गो.स.

४९) म.रि.उ.वि. – मराठी रियासत उत्तर विभाग, सरदेसाई गो.स.

५०) म.इ.सा. – मराठयांच्या इतिहासाची साधने, राजवाडे वि.का.

५१) मि.सि.ऑ.म. – मिलिटरी सिस्टीम ऑफ मराठाज्, मॅकफरसन जी.बी.

५२) म.इ.सा.प. – मराठयांचा इतिहास साधन परिचय, कुलकर्णी अ.रा., कुलकर्णी म.रा., कंटक म.रा.

५३) म.आ.म. – महाराष्ट्र आणि मराठे, पगडी सेतू माधवराव

५४) रि.बि.फ्रे.अॅ.म. – रिलेशन बिटविन फ्रेंच अॅन्ड मराठाज्, हताळकर व्ही.जी.

५५) रू.इ.मा.सि. – रूलर्स ऑफ इंडिया माधवराव सिंधीया, किन एच.जी.

५६) वि.घ.इ. – विचुंरकर घराण्याचा इतिहास

५७) शा.म.रो. – शाहू महाराज यांची रोजनिशी, पारसनिस द.ब.

५८) शि.रा. – शिंदेशाहीचे राजकारणे, डिस्काळकर द. बा.

५९) शा.द., – शाहू दप्तर, अप्रकाशित कागदपत्रे पुणे पुराभिलेख, पुणे

६०) शि.इ.सा. – शिंदेशाही इतिहासाची साधने, फाळके अ.भा.

६१) स.मा.रो. – सवाई माधवराव रोजनिशी,

६२) सि.ॲ.पॉ.डि.डा. – सिक्रेट ॲन्ड पॉलिटिकल डिपार्टमेंट डायरी, अप्रकाशित कागदपत्रे, मुंबई पुराभिलेख, मुंबई

६३) सि.फ्रॉ.पे.द. – सिलेक्श फ्राम पेशवा दप्तर, सरदेसाई गो.स.

६४) हो.इ.सा. – होळकरशाही इतिहासाची साधने, भागवत अ.ना.

६५) हो.कै. – होळकराची कैफियत, भागवत अ. ना.

६६) हि.द. – हिंगणे दप्तर, आठवले सदाशिव, खरे वा.वा.

६७) हि.पे.रि.म.शि. – हिस्टॉरिकल पेपर रिलेटेड टू महादजी शिंदे, पारसनिस द.बा.

६८) हि.ऑ.म.पि. – हिस्ट्री ऑफ मराठा पिपल, किकेंड, पारसनिस

इतर संक्षेपाची स्पष्टता

१) प.क्र. – पत्र क्रमांक

२) पु.क्र. – पुडका क्रमांक

३) पृ. – पृष्ठ क्रमांक

४) द.क्र. – दप्तर क्रमांक

५) ले. लेख क्रमांक

६) त्रै. – त्रैमासिक

——————))((——————

प्रकरण पहिले – प्रस्तावना व संशोधन पध्दती

प्रस्तावना (**Introduction**)

विषयाची निवड (**Selection of Topic**)

विषयाचे महत्व, स्वरूप व व्याप्ती

(Importance of Subject, Nature and Scope)

अभ्यासाची उद्दिष्टे **(Objectives of the Study)**

गृहितके **(Hypothesis)**

संशोधन पध्दती **(Research Methodology)**

प्रबंधाचे आधार (संदर्भ साधने) **(Available Source Material)**

प्रकरण रचना **(Chapter scheme)**

तथ्ये (साधने) गोळा करण्याचे तंत्र :–

उपलब्ध तथ्ये / संदर्भ साधने :–

प्रस्तावना :–

१८ व्या शतकामध्ये मराठी सत्ता ही एक प्रबळ सत्ता म्हणून ओळखली जात होती. मात्र तिस–या पानिपत[१] युध्दामध्ये (१४ जानेवारी १७६१) मराठयांचा पराभव झाला[२] व मराठी सत्तेला मोठा हादरा बसला. उत्तरेमध्ये निर्माण झालेले मराठयांचे वर्चस्व काहीसे कमी झाले. मराठा साम्राज्याचे आधारस्तंभ दत्ताजी शिंदे हे पानिपतयुध्दाअगोदरच्या 'बरारीघाट – शुक्रतालच्या' (जानेवारी १७६०) लढाईत मरण पावले.[३] सदाशिव भाऊ, विश्वासराव हे पानिपतच्या रणांगणावर मृत्यू पावले. काही कालावधीतच नानासाहेब पेशवे यांचा युध्दातील पराभवाच्या धक्क्याने मृत्यू (२३ जून १७६१) झाला. यशाच्या शिखरावर पोहचलेले मराठा साम्राज्य कोसळले व मराठा साम्राज्यातील कर्त्या पुरूषांची एक पिढीच रणागंणावर खपली गेली. यामुळे मराठा साम्राज्याच्या राजकीय पटलावर नेतृत्वाअभावी एक पोकळी निर्माण झाली. मराठा साम्राज्य कमकुवत झाले याचा फायदा मोगल सरदार व इतर मराठयांचे शत्रू घेवू लागले ते स्वतंत्रपणे आपआपल्या जाहागिरीची वाढ करू लागले. आपण स्वतंत्र आहोत कोणाचेही आपल्यावर बंधन नाही या अविर्भावात ते वागू लागले. परिणामतः त्यांच्यावरील मराठयांचा वचक नाहीसा झाला. मराठा साम्राज्यात आपला गेलेला प्रदेश परत मिळवण्याच्या दृष्टिने ते प्रयत्न करू लागले.[४]

मराठा साम्राज्य कमकुवत झाल्याचा फायदा परकीय सत्ता देखील घेवू लागल्या. इंग्रज, फ्रेंच या सत्ता व्यापाराबरोबरच राजकारणातही हस्तक्षेप करू

---

[१] पानिपत सध्या दिल्ली पासून ९० कि.मी. अंतरावर हरियाणामध्ये जिल्हयाचे ठिकाण आहे. याचे पुरातन नाव पंडुप्रस्थान असून पांडवानी स्थापन केले असे म्हटले जाते. http://en.wikipedia.org/wiki/panipat

[२] म.रि, खंड.०२, पेशवा बाळाजी बाजीराव, पृ. ४०१

[३] भा.ब., पृ.७१, ७२

[४] भा.इ.स.म.त्रै, वर्ष ७९–८०, पृ.६३

लागल्या. या परकीय सत्ता स्वतःची फौज बाळगून आपले वर्चस्व भारतामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न करू लागल्या.[५]

प्रभावहीन झालेल्या मराठा साम्राज्याचे पुनरूज्जीवन करण्याची जबाबदारी पेशवा बनलेल्या माधवराव यांच्यावर आली व पेशवा माधवराव यांनी ती यशस्वीपणे पार पाडली. पेशवा माधवराव यांनी विस्कटलेली मराठा साम्राज्याची घडी नीट तर केलीच परंतु नव्या दमाचे नवीन शिंदे, होळकर, पवार यासारखे सरदार निर्माण केले. शिंदे व होळकर यांनी उत्तर हिंदुस्थानामध्ये मराठा साम्राज्य पुनः निर्माण करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली.[६] या मराठा सरदारांनी पानिपतच्या युध्दानंतर उत्तरहिदुंस्थानामध्ये पुन्हा मराठयांचे वर्चस्व निर्माण करून मोगल बादशहासही आपल्या वर्चस्वाखाली आणले. पेशवा माधवराव यांच्या मृत्यूनंतर नारायणराव हे पेशवा बनले. मात्र राघोबादादाने सत्तेच्या व पेशवा पदाच्या हव्यासापोटी पेशवा नारायणरावाचा गारदयाकरवी खूनघडवून आणला.[७] पेशवा नारायणराव यांच्या खुनानंतर बारभाईचे कारस्थान घडून आले. यामध्ये सवाई माधवराव यास गादीवर बसवण्यात आले.[८] या बारभाई कारस्थानामध्ये सरदार महादजी शिंदे व पेशव्यांचा कारभारी नाना फडणविस यांनी महत्वाची भूमिका बजावली.

सरदार शिंदे :–

पानिपतच्या रणसंग्रामानंतर निर्माण झालेल्या नवीन मराठा सरदारापैकी शिंदे सरदारांनी प्रामाणिकपणे नोकरी केल्याचे व आपले वर्चस्व वाढवल्याचे दिसते. राणोजी शिंदे, जयाप्पा शिंदे, दत्ताजी शिंदे, महादजी शिंदे, दालतराव शिंदे या शिंदे कुटुंबातील कर्त्या पुरूषांनी मराठा साम्राज्याच्या हितासाठी,

---

[५] म.रि., खंड.०५, पृ.१२३

[६] शि.इ.सा., भाग.०२, प.क्र.–७४

[७] म.प.इ., ले.१६६, पृ.१६५–१६७, ऐ.प.या. पृ. ४६३, दि. ३० ऑगस्ट १७७३ रोजी शनिवार वाडा, पुणे येथे नारायणरावाचा खून झाला.

[८] न.फ.ब., पृ. ३२

संवर्धनासाठी व वाढीसाठी महत्वाची कामगिरी बजावली. विशेषतः महादजी शिंदे यांचे कार्य अतुलनीय असल्याचे दिसून येते.

महादजी शिंदे हा सुभेदार राणोजी शिंदे याचा मुलगा होय. वयाच्या दहाव्या वर्षापासून महादजी युध्दाच्या रणागंणावर आपल्या वडिलांच्या बरोबर जात होता. वयाच्या दहाव्या वर्षी 'वरात' येथील युध्दामध्ये त्यांने सहभाग घेतल्याचे दिसून येते. सुभेदार राणोजी शिंदे यांचा मृत्यू 'शुजापूर' (१७४५) येथील लढाईमध्ये झाला.[९] राणोजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मोठा मुलगा जयाप्पा शिंदे हा मराठा साम्राज्याचा कारभार पाहू लागला. जयाप्पा शिंदे यांनी अनेक मोठया लढाया जिकंल्या. जयाप्पा शिंदे यांचा 'नागोर' च्या लढाईत २५ जुलै १७५५ या दिवशी विश्वासघाताने खून झाला.[१०] तद्‌नंतर जयाजीचा वडील मुलगा जनकोजी शिंदे यांच्याकडे शिंदे दौलतीचा कारभार देण्यात आला मात्र ख–या अर्थाने दत्ताजी शिंदे हे शिंदे दौलतीचा कारभार पाहू लागले. दत्ताजी शिंदे हे शूर पराक्रमी होते. पानिपत युध्दास कारणोभूत ठरलेल्या नजीबखानाचा बंदोबस्त करत असताना त्यांचा 'बरारीघाट – शुक्रतालच्या' (जानेवारी १७६०) च्या लढाईत मृत्यू झाला.[११] तसेच जनकोजी शिंदे पानिपतयुध्दामध्ये शत्रूच्या हाती सापडले. नजीबखानाने अंतर्गत कटकारस्थाने केली याचा परिणाम म्हणजे ज्या सरदारांने जनकोजी शिंदे यास पकडून ठेवले होते त्यांने त्यास ठार मारले.[१२] जोतिबा शिंदे हे पानिपत युध्दाअगोद वोडसा येथे खंडण्या गोळा करत असताना मृत्यूमुखी पडले.[१३]

---

[९] गु.द., न.०१, पृ.४२ दि.२१–०७–१७४५ चे पत्र (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोधसंस्थान, सीतामऊ, माळवा), शि.इ.सा., पृ.३७ (मौजे मिरजापुर प्रांत सुज्यावलपूर येथे तीर्थरूपास कैलासवास झाला..........)

[१०] भा.ब., पृ. १३

[११] भा.ब., पृ.७१, ७२

[१२] अ.शि.घ.इ., पृ. ८०,८१

[१३] म.इ.सा., खंड.०६, पृ. १७०, शि.इ.सा., भाग.०१, पृ. ०३

अशाप्रकारे राणोजीचे पुत्र जयाप्पा शिंदे, दत्ताजी शिंदे, जोतिबा शिंदे व जयाप्पाचे पुत्र जनकोजी हे युध्दामध्ये कामी आले.

राणोजीचे पुत्र युध्दामध्ये कामी आल्यानंतर शिंदे दौलतीचा कारभार कोणाकडे दयावा याबाबत पेशवा दरबारामध्ये विचारमंथन चालू झाले. त्यावेळी एकूण तीन विचार प्रवाह पुढे आले ते म्हणजे –

१) राणोजी शिंदे यांचा खरा वंश संपूर्णतः युध्दामध्ये कामी आला असल्याने शिंदयाची दौलत खालसा करून ती सरकारदप्तरी जमा करावी.

२) राणोजी शिंदे यांचा खरा वंश युध्दामध्ये कामी आला असला तरी त्यांचे अनौरसपुत्र महादजी शिंदे व तुकोजी शिंदे हे जिवंत होते त्यांच्यापकी कोणाकडे तरी शिंदे दौलतीचा कारभार देण्यात यावा.

३) शिंदे वंशातील मानाजी शिंदे–फाकडा[१४] याच्याकडे शिंदे दौलतीचां कारभार दयावा.

वरील प्रकारे पेशवा दरबारामध्ये विचारमंथन चालू झाल्यानंतर शेवटी बरीच कारस्थाने होऊन महादजी शिंदे हे पराक्रमी आहेत व त्यांच्याकडे शिंदे दौलतीचा कारभार सोपवणे योग्य राहील असे ठरले गेले. यामध्ये रघुनाथराव पेशवे यांचा महादजी शिंदे यांना पूर्णतः विरोध होता. मात्र शेवटी मल्हारराव होळकर यांनी मध्यस्ती केल्यानंतर ते महादजी शिंदे यांच्याकडे शिंदे दौलतीचा कारभार देण्यास तयार झाले.

महादजी शिंदे यांच्याकडे शिंदे दौलतीचा कारभार आल्यानंतर त्यांनी १७६९ ते १७९२ या कालखंडामध्ये यशस्वीपणे उत्तरहिदुंस्थानामध्ये मोहिमा

---

[१४] युध्दामध्ये अतुलनिय कामगिरी करणा–यास फाकडा ही पदवी दिली जात असे. इतिहासामध्ये एकूण तिन फाकडे आहेत. १) मानाजी शिंदे फाकडा २) इष्टूर फाकडा (जनरल स्टुअर्ट), ३) कोन्हेरू फाकडा (कोन्हेरराव पटवर्धन)

आखून शिंदयांचे स्वतंत्र असे अस्तित्व निर्माण केले. पानिपत युध्दामध्ये गेलेली मराठयांची प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करून मोघल बादशहास आपल्या वर्चस्वाखाली आणले. एकूणच उत्तरेतील आपल्या वास्तव्याच्या काळात महादजी शिंदे यांनी आपला पर्यायाने मराठयांचा दबदबा पुन्हा उत्तरेत निर्माण केला.

रघुनाथराव पेशवे यांनी उत्तरेमध्ये अटकेपार झेंडा रोवला असे म्हटले जाते. मात्र रघुनाथ पेशवे माघारी फिरल्याबरोबर स्थानिक सत्ताधिशांनी पुन्हा गेलेला प्रदेश काबीज केल्याचे दिसून येते. महादजी शिंदे यांनी मात्र उत्तरेमध्येच आपला तळ ठोकला होता. म्हणूनच महादजी शिंदे हा उत्तरतील मराठा सत्तेचा निर्माता होता असे म्हटले जाते. महादजी हा फक्त शूर सरदार, तलवार बहाद्दुर होता असे नाही तर तो एक मुत्सद्दी व हुशार व्यक्ती म्हणूनही पुढे आला. बादशहा शहाआलम (दुसरा) पूर्णतः महादजीचा अंकित बनला होता. बादशहाने महादजीस 'वकिल– ए– मुतालिक' सह इतर अनेक मानाच्या पदव्या व मानाची वस्त्रे बहाल केली.[१५]

महादजी शिंदे याने स्वकीय शत्रूचा प्रतिकार यशस्वीपणे केलाच पण त्याचबरोबर त्याने परकीय सत्ताधिशाबरोबरचे धोरणही सावधरितीने आखल्याचे दिसते. इंग्रजाबरोबरच्या संघर्षामध्ये त्याने नहमीच वर्चस्वाची भूमिका बजावली. इंग्रजही महादजीची लष्करी ताकद ओळखून होते. इंग्रजाबरोबर झालेल्या सालबाईच्या (इ.स. १७८२)[१६] च्या तहामध्ये महादजी शिंदे यांची भूमिका महत्वपूर्ण होती.

महादजी शिंदे मराठी, हिंदी, पर्शियन, संस्कृत भाषा जाणकार होत तसेच ते अभ्यासू होते जेंव्हा त्यांना मोकळा वेळ मिळे त्या त्या वेळी ते वाचन

---

[१५] १ मे १७८५ रोजी बादशहाने मोठा दरबार भरवून महादजीस पदव्या बहाल केल्या. – म.रि. उ.वि.,भाग.०२, पृ.९७

[१६] सि.ॲ.पॉ.डि.डा., खंड.२६, ले.४३, पृ.४४५ (अप्रकाशित पत्र, मुंबई पुराभिलेख)

व लेखन करत असत. महादजी शिंदे यांनी अनेक कविता व अभंग लिहलेल्या आढळून येतात. त्यांच्या ब–याच कविता 'माधवदासी' या ग्रंथात दिसून येतात. संत मल्लाप्पा वास्कर, संत दत्तनाथ महाराव (उज्जैन) आणि संत नरहरी नाथ हे त्यांचे आद्यात्मिक गुरू होते.[१७]

अशा या विविध पैलू असणा–या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण आभ्यास झालेला दिसून येत नाही तो होणे गरजेचे वाटते आणि तोच दृष्टिकोण पुढे ठेवून सदर विषय आभ्यासाकरीता निवडला आहे.

☐ विषयाची निवड :–

मराठयांचा इतिहास हा ज्वलंत, तेजस्वी व स्पुर्तीदायक असा आहे. छ. शिवाजी महाराज यांनी मराठा साम्राज्याची निर्मिती केली. पुढे छत्रपतीकडून पेशव्यांकडे मराठा साम्राज्याची धुरा आल्यानंतर बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे, माधवराव पेशव यांनी साम्राज्य वाढविण्यासाठी प्रयत्न केले. माधवराव पेशव्यांच्यानंतर सत्ता विस्तारामध्ये मराठा सरदारांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

मराठयांच्या इतिहासामध्ये पेशवाईच्या उत्तरार्धात उत्तरेतील सत्ता विस्ताराचे धोरण व बादशहाही धोरणास जे विशिष्ट रूप प्राप्त झाले त्याची जबाबदारी मुख्यत्वेकरून शिंदे घराण्याकडे होती. नानासाहेबांच्या कारकिर्दीत जयाजी, दत्ताजी व जनकोजी यांनी दिल्लीचा कारभार मराठयांच्या हाती आणण्यासाठी आपले प्राण खर्ची घालवले. पानिपत युध्दानंतर या मराठा साम्राज्याचे पतन होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. मात्र पानिपतच्या रणागंणातून घायाळ होऊन परत आलेल्या नाना फडणविस व महादजी शिंदे या दोन व्यक्तीनी मराठी सत्तेच्या पुनरूज्जीवन व जडणघडणीमध्ये ठसा उठविला. महादजी शिंदे यांनी निर्विवादपणे उत्तरेत आपले वर्चस्व निर्माण केले. प्रसिध्द तलवार बहाद्दूर, मुत्सद्दी, हुशार, कवी

[१७] चित्राव सिध्देश्वर शास्त्री, *भारतीय मध्ययुगीन चरित्रकोश,* पृ.६०५

असे विविध गुण अंगी असणा–या महादजी शिंदे यांच्यावर सर्वांगीण संशोधन होणे गरजेचे आहे असू वाटू लागले. या विषयावरील उपलब्ध संदर्भ साधनांचा शोध घेतला असता प्राथमिक मोडी, मराठी व इंग्रजी संदर्भ साधने उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले. या साधनावर प्रकाश टाकणे गरजेचे आहे असे वाटू लागले व त्यातूनच या विषयाची संशोधनासाठी निवड केली.

☐ विषयाचे महत्व, स्वरूप व व्याप्ती :–

पानिपत युध्दानंतर (१७६१) उत्तरेतील मराठी सत्तेला मोठा हादरा बसला मराठी सत्ता लयास जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली अशा परिस्थितीमध्ये पेशवा माधवराव यांच्या नेतृत्वाखाली शिंदे, होळकर, पवार यासारखे नवीन मराठा सरदार निर्माण झाले. या सरदारांनी उत्तरेत पुन्हा मराठयांची सत्ता निर्माण करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावली. या मराठा सरदारापैकी महादजी शिंदे यांनी महत्वाची भूमिका बाजवली होती. मध्य भारत तसेच उत्तर भारतात मराठयांची सत्ता पुन्हा निर्माण करण्यामध्ये महादजी शिंदे यांचे योगदान महत्वपूर्ण असे होते. मराठा राजकारणामध्ये एक हुशार तलवार बहाददर व मुत्सद्दी योध्दा म्हणून महादजी शिंदे यांना ओळखले जाते. दिल्लीचा बादशहा कोण असावा याबाबतचा निर्णय महादजी घेत असे इतके सामर्थ्य महादजी शिंदे यांच्यामध्ये होते.

महादजी शिंदे यांनी उत्तरेबरोबरच दक्षिणच्या राजकारबारातही महत्वाची भूमिका बजावली. बारभाईच्या राजकारणामध्ये नाना फडणविस व महादजी यांचीच महत्वाची भूमिका होती. नाना व महादजी यांचे ब–याचवेळा संघर्ष व मैत्री असे संबध निर्माण झाल्याचे दिसते. दक्षिणेकडील राजकारणामध्ये राघोबादादाचा बंदोबस्त, करवीरकरांचा बंदोबस्त, मारोबा फडणविसाच्या बंडाचा बिमोड, तसेच नानास कारभारी पदावर बसवण्याकरीता महादजीची भूमिका महत्वपूर्ण ठरली. इंग्रज, फ्रेंच या परकीय सत्तांबरोबरच

रजपूत, जाठ, रोहिला–पठाण, शीख यांच्याबरोबर महादजीने युध्दे व तह करत असताना आपले व मराठा साम्राज्याचे वर्चस्व सिध्द केले. मराठयांच्या सरदारापैकी होळकर व शिंदे यांची जहागिरी उत्तरेमध्ये जवळ जवळ असल्याने ब–याच वेळा या दोन सरदारमध्ये मैत्री बरोबरच संघर्षही झाल्याचे दिसून येते. महादजी शिंदे यांनी मुत्सद्दीपणाबरोबरच आपल्या सैन्य रचनेमध्ये कालानुरूप बदल केला होता. महादजीने 'डि–बॉय' या फ्रेंच अधिका–यास आपल्या पदरी ठेवून नवीन प्रशिक्षित असे लष्कर उभारले. या लष्कराच्या जोरावर महादजीने अनेक लढाया जिंकल्याचे दिसते. सॅगस्टर या अधिका–याच्या नियत्रंणाखाली आग्रा येथे शस्त्राचा कारखाना उभारला. महादजी शिंदे हे स्वतःचे वर्चस्व सिध्द करत असतानाच मराठा साम्राज्याचीही वाढही करत होते मात्र पेशव्यांच्या जरीपटक्याखाली राहूनच हे महत्वाचे होय.

महादजीचे पेशव्यांच्या बरोबर असणारे संबध हे चांगले होते मात्र रघुनाथराव पेशव्याचे व महादजीचे सख्य फारसे जमल्याचे दिसून येत नाही. महादजी राणोजीच्या अस्सल वंशापैकी नाही तेंव्हा महादजीच्या हाती शिंदे दौलतीचा कारभार देवू नये, तो शिंदे वंशातील मानाजी शिंदे – फाकडे याच्याकडे दयावा असा घाट राघोबादादाने घातला होता. मात्र अखेरीस माधवराव पेशवे यांच्याकडे पेशवाईचा कारभार आल्यानंतर महादजीस सरदारकी मिळाली. अशाप्रकारे या सर्व बाबींचा आभ्यास झाल्यास मराठा इतिहासामध्ये मोलाची भर पडेल व इतिहास संशोधकासाठी उपयुक्त ठरेल असे वाटते.

☐ **अभ्यासाची उद्दिष्टे** :–

सदरचे संशोधन कार्य करत असताना खालील उद्दीष्टे समोर ठेवून विषयाची मांडणी करण्यात आली आहे.

१) शिंदे घराण्याने मराठा सत्ता वाढीसाठी व संवर्धनासाठीचे पानिपतपूर्व व पानिपतोत्तर दिलेले योगदान अभ्यासणे.

२) दिल्लीच्या राजकारणातील महादजी शिंदे यांनी बजावलेली भूमिका अभ्यासणे.

३) महादजी शिंदे यांनी इंग्रज व फ्रेंच यांच्या बरोबर केलेली युध्दे, तह व राजनिती याचा अभ्यास करणे.

४) महादजी शिंदे व नाना फडणविस यांच्यामध्ये वेळोवेळी बदलत गेलेल्या संबधाचा अभ्यास करणे.

५) महादजी शिंदे व मोगल, जाठ, रोहिला, रजपूत यांचे संबधावर प्रकाश टकणे.

६) महादजी शिंदे व पेशवा (विशेषतः पेशवा माधवराव व पेशवा रघुनाथराव) यांच्या संबधावर प्रकाश टाकणे.

७) महादजी शिंदे व कोल्हापूर यांच्यातील संबधावर व झालेल्या युध्दावर प्रकाश टाकणे.

८) महादजी शिंदे उत्तर हिंदुस्थानामधून दक्षिणमध्ये (१७९२) आले त्यानंतर दक्षिणेतील राजकारणामध्ये घडून आलेले बदल, विविध मतमतातंरे यांचा अभ्यास करणे.

☐ **गृहितके** :-

संशोधन कार्य करत असताना उद्दिष्टाबरोबरच गृहितकेही महत्वाची असतात. संशोधन कार्य पूर्णत्वास येथे त्यावेळी त्यातील काही गृहितके सबळ पुराव्याअभावी चुकीचीही निघू शकतात. प्रस्तुत संशोधन करत असताना खालील गृहितके गृहीत धरण्यात आली होती.

१) शिंदे घराण्यातील राणोजी शिंदे हे साधे हुज-याच्या पदावरून अंगच्या गुणावर व स्वकर्तुत्वावर उच्चपदावर पोहचले. राणोजी शिंदे यांचे सर्वच

पाच पुत्र पराक्रमी होते व त्यातील जयाप्पा व दत्ताजी यांनी पानिपत युध्दाअगोदर तर जनकोजी यांनी पानिपत युध्दामध्ये मराठा साम्राज्याच्या वाढीसाठी व संवर्धनासाठी प्राणाची आहुती दिली.

२) महादजी शिंदे यांच्याकडे शिंदे दौलतीचा कारभार देण्याविषयी रघुनाथराव पेशवे यांचा विरोध होता.

३) महादजी शिंदे यांनी पानिपत युध्दानंतर मराठा साम्राज्य वाढविण्यामध्ये व संवर्धनामध्ये महत्वाची भूमिका बजावली.

४) महादजी शिंदे यांनी दिल्लीच्या राजकारणामध्ये आपला दबदबा निर्माण केला व स्वतःच काही दिवस किंगमेकरची भूमिका बजावली. त्यांनी 'वकिल–ए–मुतलिक' व मानाची वस्त्रे मिळवली व पुढे ती सन्मानपूर्वक पेशव्यांच्याकडे सुपूर्त केली.

५) नाना फडणविस व महादजी शिंदे यांचे संबध मैत्री व संघर्ष या दोन्हीही प्रकारचे होते.

६) महादजी शिंदे यांनी पारंपारिक सैन्य व्यवस्थेमध्ये बदल करून कवायती फौज उभारून त्यामध्ये अमुलाग्र सुधारणा घडवून आणली व परकीय सत्तांवर (इंग्रज, फ्रेंच) आपला वचक ठेवला.

७) करवीरच्या युध्दामध्ये महादजी शिंदे यांनी स्वतःच्या मागण्या पेशव्याकडून अगोदर पूर्ण करून घेतल्या व नंतर करवीरकरांवर विजय संपादन केला.

☐ **संशोधन पध्दती** :–

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करत असताना प्रामुख्याने ऐतिहासिक संशोधन पध्दती, सर्वेक्षण पध्दती याचा वापर करण्यात आला आहे. कागदपत्रांचे अंतर्गत व बहिर्गत परिक्षण करून (External & Internal) त्याची सत्यता तपासून मगच सशोधनाकरीता त्याचा वापर केला आहे.

विषयाची मांडणी करत असताना प्रामुख्याने प्राथमिक साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे. उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनाच्या आधारे प्रकरणांची मांडणी करण्यात आली आहे.

☐ **प्रबंधाचे आधार :–**

प्रस्तुत शोधप्रबधाकरीता प्रामुख्याने खालील संदर्भ साधनांचा आधार घेण्यात आला आहे.

पुणे पुराभिलेखागार, पुणे येथील –

पेशवा दप्तरातील रूमाल क्रमांक ०१ ते १९, २३, २४, ३१, ३३, ३९, ४४, ४८, ५१, ५६, ५९ मधील अप्रकाशित पत्रे.

शाहू दप्तरातील रूमाल क्रमांक ४ ते १०, १५, २३, २४, २५, २९, ३०, ३१, ४०, ४२, ४८, ५१, ५३, ५५ मधील अप्रकशित पत्रे

चिटणीस दप्तरातील रूमाल क्रमांक १३, १७, २०, २२, २६, ३४, ३८, ४२, ४७, ५०, ५१, ५५, ६५ मधील अप्रकाशित पत्रे

मुंबई पुराभिलेख, मुंबई येथील –

सिक्रेट ॲन्ड पॉलिटिकल डिपार्टमेंट डायरी मधील डायरी क्रमांक १५, १८, १९, १९अ, २०, २१, २२, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३३२, ३३, ३६, ३८, ३९, ४१, ४२ मधील अप्रकाशित पत्र व्यवहार.

सिलेक्शन फ्रॉम लेटर्स, डिस्पॅचस् इन द बॉम्बे सेक्रेअरिअट : मराठा सेरिज, सिलेक्शन फ्रॉम द स्टेट पेपर्स ऑफ द गव्हर्नर जनरल : वॉरन हेस्टिंग्ज, फॉरेस्ट जी. डब्लू.

नटनागर शोधसंस्थान, सीतामऊ, जि. मंदसोर (माळवा), मध्यप्रदेश येथील– उपलब्ध असलेल्या गुलेगुले दप्तर भाग ०१ ते ०८ मधील अप्रकाशित मूळ कागदपत्रांचा, हिंगणे दप्तर भाग ०१ व ०२, कोटा दप्तर यातील अस्सल पत्रव्यहाराचा उपयोग केला आहे. पर्शियन रेकॉर्डस् ऑफ मराठा हिस्ट्री व कॅलेंडर ऑफ पर्शियन करस्पॉन्डन्स, हिस्टॉरिकल पेपर्स रिलेटेड टू ग्वाल्हेर स्टेट, खंड ०१ ते ०५, हिस्टॉरिकल पेपर्स रिलेटेड टू महादजी सिन्दीया यातील अस्सल पत्रव्यवहारचा प्रबंधासाठी उपयोग केला आहे.

ग्वाल्हेर येथील –

'जयविलास पॅलेस' म्युझियममधील कागदपत्रे, वस्तू व फोटो तसेच ग्वाल्हेर किल्ल्यावरील 'गुजरी महाल' मधील म्युझीयम व इतर भागातील वस्तू व फोटो, ग्वाल्हेर किल्ल्यावरील पुरातत्व संग्रहालयातील वस्तू याचाही सदर संशोधनासाठी वापर करण्यात आला आहे.

छ.शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, शाहू संशोधन केंद्र, बॅ. बाळासाहेब खर्डेकर लायब्ररी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, कोल्हापूर पुराभिलेख, कोल्हापूर, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे, दिल्ली युनिव्हर्सिटी लायब्ररो, दिल्ली, मुंबई विद्यापीठ, मुबंई येथील –

सिलेक्शन फ्रॉम पेशवा दप्तराचे सर्व खंड, पूना रेसिडेंन्सी करस्पॉडन्स, हिंगणे दप्तर (खरे वा.वा.,भा.इ.सं.म,पुणे), पुरंदरे दप्तर (भा.इ.सं.म,पुणे), पेठे दप्तर (चितळे, कर्वे भा.इ.सं.म,पुणे), मराठी दप्तर (भावे वि.ल.), चंद्रचूड दप्तर (आपटे द.वि, भा.इ.सं.म,पुणे), शिंदेशाहीची राजकारणे (डिस्काळकर द.बा.), शिंदे शकावली, नाना फडणीस शकावली, शिंदेशाहीची राजकारणे (पारसनिस द. बा), महादजी शिंदे हयांची कागदपत्रे (सरदेसाई), शिंदेशाही इतिहासाची साधने (फाळक अ.बा.), ऐतिहासिक लेख संग्रह (खेर वा.वा.), दिल्ली येथील

मराठयांची राजकारणे (पारसनिस द.ब.), महेश्वर दरबारची बातमीपत्रे, होळकराची कैपियत, होळकरशाहीच्या इतिहासाची साधने (ठाकूर वा.वा.), भाऊसाहेबांची बखर, पेशवा बखर (हेरवाडकर), पूना अखबारात, मराठयांच्या इतिहासाची साधने (राजवाडे), महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास (ओतूरकर), करवीर रियासत (गर्गे), करवीर रियासतीची कागदपत्रे (गुजर व इतर), मराठी रियासत उत्तर विभाग भाग ०१ ते ०३, मराठी रियासत भाग ०१ ते ०८ (सरदेसाई), हिस्ट्री ऑफ द मुगल एम्पायर, खंड १ व २, हिस्ट्री ऑफ द मराठाज् भाग ०१ ते ०३ (ग्रॅन्ड डफ), न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाज्, खंड– १ ते ३ (सरदेसाई), फायनल फ्रेंच स्ट्रगल इन इंडिया ॲन्ड ऑन दी इंडियन सीज, (मालसन), रूलर्स ऑफ इंडिया (एच.जी.कीन), फ्रेंच इन इंडिया (एस. पी.सेन), पॉलिटिकल हिस्ट्री ऑफ द मराठाज् (मालकम), मिलीटरी सिस्टीम ऑफ मराठाज् (एस.एन.सेन), पोर्तुगीज–मराठे संबध (पिसुर्लेकर), फ्रेंच रेकॉर्ड (हताळकर व्ही.जी.) पेशवकालीन महाराष्ट्र, (वा.कृ.भावे) यांचा वापर केला आहे. या व्यतिरिक्त आवश्यक तेथे उपयुक्त दुय्यम साधनांचा प्रबंधासाठी आधार म्हणून वापर केला आहे.

सदरची संदर्भ साधने कोल्हापूर, पुणे, मुबंई, सीतामऊ (जि.मंदसोर, माळवा, म.प्र) ग्वाल्हेर (म.प्र.), दिल्ली वगैरे ठिकाणी उपलब्ध झाली. वरील सर्व साधनांचा वापर करून खालील प्रमाणे प्रकरण रचना केली आहे.

☐ **प्रकरण रचना :–**

प्रस्तुत प्रबंधाची विभागणी एकूण आठ प्रकरणांमध्ये केलेली आहे.

१) प्रस्तावना व संशोधन पध्दती

२) शिंदे घराणे व पाटीलबाबा उर्फ महादजी शिंदे यांचा उदय

३) महादजी शिंदे व पेशवा संबध

४) कोल्हापूरचे छत्रपती व महादजी शिंदे

५) महादजी शिंदे व परकीय सत्ता (इंग्रज, फ्रेंच)

६) महादजी शिंदे व उत्तरेतील सत्ता (मोगल, रोहिला, जाट, रजपूत)

७) महादजी ंशिंदे – अखेरचे पर्व (१७९२ ते १७९४)

८) मूल्यमापन.

O प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पध्दती

या प्रकरणामध्ये प्रस्तावना, विषयाची निवड, विषय आभ्यासाचे महत्व, अभ्यासाचे स्वरूप व व्याप्ती, अभ्यासाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पध्दती, उपलब्ध संदर्भ साधने, प्रकरण रचना याचा आढावा घेण्यात आला आहे.

O प्रकरण दुसरे : शिंदे घराणे व पाटीलबाबा उर्फ महादजी शिंदे यांचा उदय

सदर प्रकरणामध्ये प्रस्तावना, 'शिंदे' नावाची उत्पत्ती, शिदयांचे मूळ गाव कोणते? शिंदे घराणे नेमके कोणते व त्यांचे इतर घराण्याशी असणारे सबंध याचा समावेश करण्यात आला आहे. शिंदे घराण्यातील मूळ कर्तबगार पुरूष राणोजी शिंदे यांचा प्राथमिक इतिहास, पेशव्यांच्या सेवेत प्रवेश, पावलोक – बारगीर – करोल – शिलेदार – सरदार – सुभेदार अशी त्यांची झालेली प्रगती, विविध मोहिमातील सहभाग व त्यांचा झालेला शेवट याचा समावेश करण्यात आला आहे. याच बरोबर राणोजी शिंदे यांचे पुत्र जयाजी शिंदे यांची पार्श्वभूमी, विविध मोहिमातील कामगिरी व शेवट (खून), दत्ताजी शिंदे यांची पार्श्वभूमी, विविध मोहिमातील कामगिरी, शुक्रतालची लढाई व शेवट., जनकोजी शिंदे यांची पार्श्वभूमी, विविध मोहिमातील कामगिरी, पानिपतवरील कामगिरी व शेवट, तुकोजी शिंदे यांची पार्श्वभूमी, विविध मोहिमातील सहभाग व पानिपतावरील शेवट., महादजी शिंदे यांच्या जन्म तिथीबाबत वाद, राजकीय पटलावरील उदय, पानिपत युध्दापर्यंतच्या विविध

मोहिमातील सहभाग, पानिपत युध्दानंतर शिंदे सरदारकीबाबत निर्माण झालेला वाद, महादजी शिंदे यांचे अज्ञातवासात जाणे, महादजी शिंदे यांना मिळालेली सरदारकी या गोष्टींचा ऊहापोह या प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.

o प्रकरण तिसरे : महादजी शिंदे व पेशवा संबध

सदर प्रकरणामध्ये पेशवा बाळाजी विश्वनाथ व राणोजी शिंदे यांचे संबध, पेशवा पहिला बाजीराव व राणोजो शिंदे यांचे संबध, पेशवा बाजीराव व महादजी शिंदे यांचे संबध, पेशवा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब व महादजी शिंदे यांचे संबध, पेशवा रघुनाथराव यांची उत्तरेतील स्वारी व महादजी शिंदे यांचे संबध, पेशवा सदाशिवभाऊ यांची उत्तरेतील स्वारी (पानिपत युध्द) व महादजी शिंदे यांचे संबध, पेशवा रघुनाथराव यांनी महादजी शिंदे यांना सरदारकी देण्याबाबत केलेला विरोध, शिंदे सरदारकीचा वाद, पेशवा माधवराव व महादजी शिंदे यांचे संबध, पेशवा नारायणराव व महादजी शिंदे यांचे संबध, नारायणरावाच्या खुनानंतरची महादजी शिंदे यांची भूमिका, पेशवा सवाई माधवराव व महादजी शिंदे यांचे संबध याचा समावेश करण्यात आला आहे.

याचबरोबर सदर प्रकरणामध्ये पानिपत युध्दातून परतलेले दोन महापुरूष नाना व महादजी यांचे विश्लेषण, नारायणराव पेशवे यांचा झालेला खून व घडून आलेल्या बारभाई कारस्थानातील नाना व महादजीची भूमिका, महादजी शिंदे यांची राघोबाचा पक्ष स्वीकारावा की बारभाईस सहाय्य दयावे याबाबत झालेली दोलायमान स्थिती, महादजी शिंदे यांनी स्वतःचे महत्व वाढविण्यासाठी केलेला प्रयत्न, नानान महादजीवर टाकलेल्या जबाबदा–या – राघोबादादाचा बंदोबस्त करणे – तोतया भाऊसाहेबांचा बंदोबस्त करणे –

इंग्रजांचा बंदोबस्त करणे – तुकोजी होळकर व अहिल्याबाई होळकर भांडण मिटवणे – महादजीची नानास मदत व मोरोबा फडणीसाचा बंदोबस्त, सालबाई तहाबाबत नाना – महादजी मतभेद, महादजीच्या लष्करी ताकदीबाबत नानास असणारी भिती, नानाचे महादजीस पुण्यास बोलावणे, महादजीचा उत्तरेतील व्यापामुळे पुण्यास येण्यास दिलेला नकार, होळकर प्रकरण व नाना महादजीचे संबध, अनुपगीर गोसावी प्रकरण, महादजीस मिळालेल्या पदव्यावरून नाना – महादजी यांचे मतभेद, महादजीचे दक्षिणेत येणे व हिशोबाबाबत नाना महादजीचा झालेला वाद, सवाई माधवराव बरोबर महादजीची जवळीक व नानांचा झालेला विरोध इत्यादी बाबींचा ऊहापोह या प्रकरणात करण्यात आला आहे.

० प्रकरण चौथे : कोल्हापूरचे छत्रपती व महादजी शिंदे

सदर प्रकरणामध्ये कोल्हापूरची पार्श्वभूमी, थोरल्या शाहूंची मोघलांच्या कैदेतून सुटका व मराठा साम्राज्यातील यादवी, ताराबाईचा शाहूस झालेला विरोध, शाहूच्या पक्षातील बाळाजी विश्वनाथ यांचे कार्य, महाराणी ताराबाईचे कार्य व कोल्हापूर गादीची निर्मिती, कोल्हापूरच्या राजकारणातील विविध घडामोडी, राजसबाईचे बंड व छत्रपतीपदी संभाजी, छ. संभाजी व जिजाबाईचे कार्य, मराठा राज्यकारभारात घडून आलेले बारभाई कारस्थान, कोल्हापूर छत्रपतींनी बारभाईस केलेला विरोध, विरोध करण्याची व पेशव्यांशी असहकार्य करण्याची कारणे, पेशव्यांचे शत्रू कित्तूरकर देसाई व हैदर यांचेशी करवीरकरांनी साधलेला संपर्क, पटवर्धनावरील कोल्हापूरकरांचे आक्रमण, नारायण पेशव्यांच्या खूनानंतरची कोल्हापूरच्या छत्रपतींची भूमिका, करवीरचे युध्द पटवर्धन, कानडे या सरदारांचे अपयश व महादजी शिंदे यांचेकडे आलेली युध्दाची सुत्रे, महादजी शिंदेंनी पेशव्यांच्याकडे करवीर युध्दबाबत स्वतःसाठी केलेल्या मागण्या, महादजीचे करवीरवर आक्रमण, करवीरकरांचा

कारभारी येसाजी शिंदे यांचे कार्य, युध्द समाप्तीसाठी तहाबाबत झालेल्या वाटाघाटी/बोलणी, नाना फडणविस यांनी महादजीस केलेले सहाय्य, महादजीचे करवीर सर करण्याकरीता केलेले वेगवेगळे प्रयोग, महादजीची पुण्यास महांकाली तोफेची मागणी, महाकांली तोफेच्या सहाय्याने हल्ला व यश, छ. शिवाजी महाराज(दुसरे) व महादजी यांच्यात झालेला करार/तह, तहाची कलमे इ. मुद्दयांचा समावेश करण्यात आला आहे.

O प्रकरण पाचवे : महादजी शिंदे व परकीय सत्ता (इंग्रज, फ्रेंच)

सदर प्रकरणामध्ये महादजी शिंदे यांचे इंग्रज व फ्रेंच या परकीय सत्ता बरोबर आलेल्या संबधाचा आढावा घेण्यात आला आहे. इंग्रजांचा भारतातील प्रवेश, इंग्रजांचा मराठा साम्राज्यातील प्रवेश, राघोबादादाची सत्तापदाबाबतची महत्वकांक्षा व इंग्रजांचा मराठयांच्या राजकारणातील प्रवेश, सुरतचा तह, इंग्रजांचे पुण्यावरील आक्रमण व प्रथम इंग्रज मराठा युध्द, पुरंदर तह, तळेगावची लढाई, वडगावचा तह, वडगावच्या तहाविरोधी इंग्रजाचे झालेले वर्तन, राघोबादादा महादजीच्या ताब्यात येणे व पुन्हा इंग्रजाकडे जाणे, इंग्रजाविरोधातील चतुसंघ, सालबाईचा तह, उत्तर भारत आणि इंग्रज – महादजी संबध, नाना महादजी संघर्षामध्ये इंग्रजांची भूमिका, फ्रेंचाचा भारतातील प्रवेश, फ्रेंचाचा मराठयांच्या राजकारणातील प्रवेश, महादजी शिंदे व फ्रेंच, महादजी शिंदे व फ्रेंच अधिकारी डि–बॉय, डि–बॉय याची कवायती सैन्य निर्मिती करीता नेमणूक इ. बाबींचा आढावा घेण्यात आलेला आहे.

O प्रकरण सहावे : महादजी शिंदे व उत्तरेकडील सत्ता (मोगल, रोहिले, जाठ, रजपूत)

सदर प्रकरणामध्ये महादजीच्या उत्तरेकडील दैदिप्यमान कारकीर्दीचा आढावा घेण्यात आला आहे. उत्तरेकडील अनेक अडचणीवर मात करून तेथील सत्ताधिसांना नियत्रंणाखाली आणण्यासाठी महादजीने आखलेल्या

मोहिमा, रामचंद्र गणेश कानडे बरोबर महादजीने आखलेली मोहिम, खंडण्या गोळा करण्यासाठी केलेली युध्दे, रोहिलाखंड व दोआबात प्रस्थापित केलेले मराठयांचे वर्चस्व, गोहाद व ग्वाल्हेरचा ताबा, लहान लहान जहागिरदारांच्या बंडाचा केलेला बिमोड, बादशहाबरोबर केलेल्या वाटाघाटी, बादशहाकडून मिळविलेल्या विविध पदव्या व अधिकार, आर्थिक संकट निवारणासाठी केलेले प्रयत्न, जाट व रजपूतांबरोबर झालेला संघर्ष, लालसोटची लढाई, गुलामकादीरचे पारिपत्य, पाटणची लढाई, मेडत्याची लढाई, महादजीने केलेले विविध तह याचा आढावा सदर प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे.

O प्रकरण सातवे : महादजी शिंदे अखेरचे पर्व (१७९२ ते १७९४)

सदर प्रकरणामध्ये प्रस्तावना, महादजीचे उत्तर हिंदुस्थानातून दक्षिणेकडे प्रयाण, महादजीने सोबत आणलेला डामडौल, नागपूरकर भोसल्यांची महादजीस दक्षिणेत जाण्याचा मार्ग बदलण्यासाठी केलेली विनंती, महादजीने उत्तर हिंदुस्थानातील दौलतीची लावलेली व्यवस्था, महादजीचा दक्षिणेकडे जाणेचा हेतू, नानांची महादजी पुण्यास येण्याबाबतची प्रतिक्रिया, पदव्या व हिशोबावरून झालेला वाद, महादजोच्या पाठीमागे उत्तरहिंदुस्थानामध्ये त्याच्या सरदारांनी केलेल्या चुका, शिंदे व होळकर यांचे घडून आलेले लाखेरीचे युध्द, पेशव्यांना मोकळीक देण्याविषयी महादजीचे प्रयत्न परंतु नानांचा त्यास झालेला विरोध, महादजीचा झालेला शेवट याचा समावेश या प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.

O प्रकरण आठवे : मूल्यमापन

सदर प्रकरणामध्ये महादजी शिंदे यांचे विविध मोहिमातील योगदान, त्यांचे डावपेच, मुत्सद्देगिरी, शौर्य, सांस्कृतिक योगदान, लष्कर सुधारणा, स्वभाव इ. गोष्टीचें गुण व दोषासह मूल्यमापन करण्यात आले आहे.

o तथ्ये (साधने) गोळा करण्याचे तंत्र :-

सदरचे संशोधन हे वस्तुनिष्ठ व्हावे व जास्तीत जास्त अचूक माहिती प्राप्त व्हावी म्हणून पुढील साधनांच्या साहाय्याने तथ्ये (साधने) गोळा केलेली आहेत. १) अप्रकाशित मुळ कागदपत्रांच्या झेरॉक्स कॉफी २) अप्रकाशित मुळ कागदपत्रांचे फोटो, स्कॅनिंग कॉफी ३) इंटरनेट - वेब ४) प्रकाशित प्राथमिक व दुय्यम साधने ५) मराठा इतिहासातील नामवंत अभ्यासक डॉ. जी. टी. कुलकर्णी, डॉ. सदाशिव शिवदे, डॉ. चंद्रकांत अभंग, डॉ.एन.जी.भवरे, डॉ. मनोहरसिंग राणावत, प्रा.अरूण भोसले, प्रा.एम.ए.लोहार, मार्गदर्शक डॉ. (श्रीमती)एन.डी.पारेकर यांचे बरोबर विषयासंदर्भात व उपलब्ध साधनासंदर्भात केलेली चर्चा यांच्या सहाय्याने संदर्भ साधनाचे संकलन केले आहे.

o उपलब्ध तथ्ये / संदर्भ साधने :-

उपलब्ध झालेल्या प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांची यादी शेवटी 'संदर्भ साधने' या विभागामध्ये दिली आहे.

................((:))..................

प्रकरण दुसरे

शिंदे घराणे व पाटीलबाबा उर्फ महादजी शिंदे यांचा उदय

- प्रस्तावनाः
- छ. शाहूंची सुटका व बाळाजी विश्वनाथ यांना पेशवे पदाची प्राप्तीः–
- 'शिंदे' नावाची उत्पती :–
- शिंदे घराण्याचा कुलस्वामी देव श्री जोतिबाः–
- शिंदे' घराणे :–
- राणोजी शिंदे :–
- राणोजी शिंदे यांच्या उर्जितावस्थेस प्रारंभ :–
- राणोजी शिंदे यांची उर्जितावस्था व विविध मोहिमातील सहभागः–
- राणोजी शिंदे यांची अखेर :–
- जयाजी शिंदेः–
- जयाजीचे दिल्लीच्या वजीरास सहाय्य :–
- मारवाड – जोधपूरची स्वारी व जयाप्पा शिंदे यांचा खून :
- जनकोजी शिंदे :–
- पार्श्वभूमी :
- जनकोजी शिंदे यांची मल्हारराव होळकरांची भेट घेण्यास नकार
- जनकोजी शिंदे यांचा शेवट :–

- <u>दत्ताजी शिंदे :–</u>
- सिंदखेडची लढाईः–
- रघुनाथराव पेशव्यांची नजीबखानाचा बंदोबस्त करावा म्हणून दत्ताजी व जनकोजीची भेटः–
- नजीबखान दत्ताजी शिंदेस फसवतोः–
- नजीबखानाचा दत्ताजीच्या विरोधात गुप्त तह :–
- अब्दाली व नजीबखान यांची बरारीघाट येथे सैन्याची मजबुती
- दत्ताजीचे मदतीकरीता मल्हारराव होळकरास पत्र :–
- शुक्रतालची लढाई व दत्ताजी शिंदे यांचा मृत्यूः–
- <u>जोतिबा शिंदे :–</u>
- <u>तकोजी शिंदे :–</u>
- <u>महादजी शिंदे :–</u>
- महादजी शिंदे यांचा जन्म :–
- महादजीचे लष्करी शिक्षण :–
- पानिपतावरील महादजी :–

प्रस्तावनाः

छत्रपती संभाजी महाराज यांच्या वधानंतर छत्रपती राजाराम महाराज यांनी मराठा साम्राज्याची धुरा सांभाळली. मात्र छत्रपती राजाराम महाराज यांचा मृत्यू[१] अल्पावधीच घडून आला. राजाराम महाराजांचा मृत्यू मराठा साम्राज्याच्या दृष्टीने हानीकारक असल्याचे व स्वराज्याला ग्रहण लागणार असल्याचे दिसू लागले. मात्र अठराव्या शतकाचा पूर्वार्ध महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक दृष्टोने महत्वपूर्ण मानला जातो. या कालखंडात राजकीय पटलावर अनेक घराणी उदयास आली व त्यांनी आपले नाव अजरामर करून ठेवले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केलेल्या स्वराज्याच्या रोपटयाचा या घराण्यातील कर्त्या पुरूषांनी विस्तार केल्याचे व मराठा साम्राज्य उत्तेरपर्यंत वाढवून अटकपार झेंडा रोवल्याचे दिसून येते.

छ. शाहूंची सुटका व बाळाजी विश्वनाथ यांना पेशवे पदाची प्राप्तीः–

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ताराबाईच्या नेतृत्वाखाली मराठयांनी बरेचसे किल्ले परत स्वराज्यात घेण्यास सुरूवात केली. छ. शाहू महाराज (थोरले) हे त्यावेळी मोघलांच्या कैदेत होते. मराठे शिरजोर बनू नयेत ते परस्परांमध्ये लढून दुर्बल व्हावेत व आपणास त्यांच्यावर वर्चस्व गाजवता येईल. असा विचार करून झुल्फीकारखान याच्या सल्ल्याने आजमशहाने शाहूंचो सुटका (१ मे १७०७) केली.[२] मराठा साम्राज्यात शाहूंचे आगमन झाल्यानंतर सत्तेसाठी शाहू व ताराबाई यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाला. या संघर्षामध्ये बाळाजी विश्वनाथ याने छ. शाहू महाराज यांना मोलाची साथ दिली. याचेच फलित

---

[१] मृत्यू २ मार्च १७०० – म.रि., खंड–२, पृ. २३९

[२] कित्ता, पृ. ३१८

म्हणजे नोव्हेंबर, १७१३ मध्ये शाहू महाराज यांनी बाळाजी विश्वनाथ यास पेशवे पद बहाल केले[3] बाळाजी विश्वनाथ यांनी पेशवेपद प्राप्त झाल्यानंतर मराठा साम्राज्याचा विस्तार व दृढीकरण करण्याच्यादृष्टीने सरंजामी पध्दतीचा पुरस्कार केला. याचाच परिणाम म्हणजे या पेशव्याच्या राजवटीत शिंदे, होळकर व पवार यांचा उदय झाला.

शिंदयाच्या घराण्यामध्य सर्वप्रथम हा मान राणोजी शिंदे यांच्याकडे जातो. अल्पावधीतच राणोजी शिंदे यांनी कर्तबगारी, धाडस व सचोटी या त्रयीच्या जोरावर माळव्यावरच्या संप्पन्न प्रांतावर आपले अधिष्ठान बसवले. शिंदयाच्या घराण्यातील पहिला व मराठा सत्तेतील एक यशस्वी मराठा सरदार म्हणून राणोजी शिंदे यांच्याकडे पाहिले जाते.

बाळाजी विश्वनाथसारखा कर्ता पुरूष मरण पावल्यानंतर पेशवाईची वस्त्रे कोणास दयावी याबाबत दरबारामध्ये विचारमंथन चालू झाले. दरबारामध्ये बैठक बसली असता सर्व सरदारांना उद्‌देशून थोरले छत्रपती शाहू महाराज यांनी हिंदुस्थानमध्ये (उत्तरेत) मराठी सत्तेचा विस्तार करण्याबाबत इच्छा व्यक्त केली त्यावेळी दरबारमध्ये उपस्थित मंडळीमध्ये बरीच चर्चा घडून आली व वेगवेळी मते मांडण्यात आली. सद्यस्थितीत विस्ताराच्या गोष्टी करणे योग्य नसलेले मत प्रतिनिधी यांनी मांडले. तर बादशहा कमजोर झाला आहे त्याच्यात जीव राहिलेला नाही व मोगलांचे राज्य जिंकण्याची हीच उत्तम संधी आहे असे मत प. बाजीरावाने मांडले. आपले मत ठामपणे मांडत असतानाच बाजीरावने *''महाराज अगोदर हे जुने खोड तोडावे म्हणजे फांदया अपोआप खाली येतील''* हे प्रसिध्द उद्‌गार काढले. हे उद्‌गार ऐकून अगोदरच बाजीरावाच्या कामगिरीवर समाधानी

---

[3] शा.रो. पृ. ४२

असलेल्या शाहू महाराजांना आनंद झाला व त्यांनी पेशवाईची वस्त्रे बाजीरावास दिली.[४]

पेशवाईची वस्त्रे मिळाल्यानंतर हिदुस्थानात राज्यविस्तार घडवून आणण्याकरोता पेशवा बाजीराव यांने फौज उभारली व त्यातूनच मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, उदाजी पवार, गोविंदराव बुंदेले इ. शूर व पराक्रमी सरदारांचा उदय झाला. पहिल्या बाजीराव पेशव्यापासून उदयास आलेल्या शिंदे घराण्याने मराठयांच्या इतिहासात अत्यंत महत्वपूर्ण कामगिरी बजावलो.

'शिंदे' नावाची उत्पती :–

शिंद हे नाव इतिहासामध्ये कसे आले, त्याची उत्पत्ती कशी झाली याबाबत अनेक मत मांडली गेली. प्राचीन काळी 'सेंद्रक' या नावाची एक लढवय्या जमात होती. हिच लढवय्या जमात पुढे जाऊन क्षत्रीय समाजात शिंदे असे प्रचलित झाले असावे.[५] सेद्रंकचा अपभ्रंश होऊन शिंदे असे नाव पडले असे मत आहे. तर शिंदे हे शुद्र जातीतील एक आडनाव आहे असेही मानले जाते.[६] शिंदे हे 'रजपूत' असावेत असेही सांगितले जाते[७]

---

[४] पे. ब., पृ. २४., थो.शा.म.च., पृ.४६–४८, ग्रॅन्ड डफ, पृ. २१४, २१५.

[५] म.शि, पृ. ३

[६] *"शुद्र जातीचे दासी स्त्रीस ब्राम्हणापासून संतती झाली असता, त्या संततीस शिंदे हे उपनाव देण्याची चाल फार दिवसापासून चालत आली आहे व ही चाल इतकी दृढ झाली आहे की, शुद्र जातीचे मनुष्याचे आडनांव शिंदे म्हणजे त्या मनुष्याची अथवा त्याचे पूर्वजांची उत्पत्ती वर लिहिल्याप्रमाणें झाली असावी असें अनुमान लोक स्वाभाविकपणें करतात"* अ.शि. घ.इ., पृ. ५,६.

[७] अ.शि.घ.इ., पृ. ६, ७.

'शिशोदे' अगर 'शिधे' याचा अपभ्रंश होऊन शिंदे अडनाव प्रचलित झाले असावे असाही समज आहे. कोकणात तसेच कोल्हापूरच्या पदरीही शिंदे अडनावाचे गृहस्थ प्रसिध्द असल्याचे दिसते.[८]

शिंदे पहिले मराठे असून त्यांचे पहिले अडनाव वागले असावे असेही मानले जाते. शिंदे हे मराठयांच्या ९६ कुळातील एक वूळ आहे असेही मानले जाते कारण पहिल्या बाजीरावाच्या अगोदरही हे नाव इतिहासामध्ये आढळून येते. बहामनी सुलतानांच्या राजवटीमध्ये कांही शिंदे कुटुंबे पुढे आल्याचे उल्लेख सापडतात. मराठी साम्राज्याच्या इतिहासात एक नाव म्हणजे नेमाजी शिंदे होय. शाहू छत्रपतींच्या अगोदरच्या समर्थकांमध्ये नेमाजी शिंदे यांचे नाव गणले जात असे. औरंगजेबाचा मृत्यू, शाहूंची सुटका, बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचा उदय या सर्व घटना घडण्याच्या अगोदर या वीर पुरूषाने माळव्यात धडक मारली होती. दुर्दैवाने या सेनापतीचा पुढील इतिहास ज्ञात नाही.[९]

छत्रपती घराण्याशी शिंदे घराण्याचे वैवाहिक संबध असल्याचेही दिसून येते. औरंगजेबाने खुद्द शाहू महाराजास दोन बायका करून दिल्या होत्या त्यापैकी एक कण्हेरखेड येथील शिंदे–पाटील घराण्यातील होती.[१०]

शिंदे घराण्याचा कुलस्वामी देव श्री जोतिबाः–

शिंदे कुट्बियांचा कुलस्वामी देव जोतिबा आहे. कोल्हापूरजवळ रत्नागिरी नावाचा डोंगर आहे. त्यास वाडी रत्नागिरी, जोतिबाचा डोंगर असेही

---

[८] अ.म.मा.शि.च.का., पृ. १४.

[९] कै.या.व., पृ. ९१ (सिलक्शन फॉर्म द गर्व्हमेंट रेकॉर्ड इन द अलिनेशन ऑफिस, पुणे)

[१०] ......कैलासवासी शाहू महाराज यांसी शिंदे यांची कन्या केली तिचे नाव सावित्रीबाई होते.... ..– कै.या.व., पृ. ९२., थो.शा.म.च. पृ. ०५

म्हटले जाते.[११] या डोंगरावरती श्री जोतिबा हे प्रसिध्द देवालय आहे. या देवाच्या दर्शनाकरिता महादजी शिंदे अनेकवेळा आल्याचे संदर्भ सापडतात. आजहो श्री जोतिबाची दरसाल पुजाअर्चा करण्यासाठी शिंदे घरण्याच्या वंशजाकडून ठरविक रकमेची तरतूद केली आहे. शिंदयाच्या तर्फे येथे दररोज प़जा बांधली जाते व ही पूजा बांधण्याचे काम शिंदयाच्या तर्फे त्यांनी नेमलेला पुजारी करत असतो.[१२] तसेच या देवालयाच्या परिसरातच 'सिंदीया देवस्थान ट्रस्टचे' ऑफिस आहे त्याच्यामार्फत येथील देवालयाच्या संवर्धनाचे व दैनंदिन व्यवस्थेचे काम पाहिले जाते.[१३]

'शिंदे' घराणे :–

शिंदे घराणे मूळचे कोणते याबद्दल वेगवेगळी मते मांडली जातात. 'शिंदेखेड' हे त्यांचे मूळ गाव मानले जात[१४] तर 'कण्हेरखेड'[१५] हेच त्यांचे मूळ गाव असा मतप्रवाह आहे.[१६] शिंदयाची दोन घराणी प्रसिध्द होती एक म्हणजे कण्हेरखेडचे शिंदे घराणे व दुसरे म्हणजे रविरावपदवी मिळवलेले.[१७] .

शिंदे घराण्याचा मूळ पुरूष जनकोजी शिंदे हे होय.[१८] जनकोजी शिदे यांनी कण्हेरखेड गाव वतन म्हणून मिळावे म्हणून पेशव्याकडे विनंती केली होती त्यावरून कण्हेरखेड हे शिंदयाचे मूळ गाव होते हे स्पष्ट होते. या

[११] अ.शि.घ.इ., पृ. ७

[१२] श्री बंडा उमराणी हे शिंदयाच्या तर्फे श्री जोतिबा देवालयामध्ये देवाच्या पुजेचे काम करतात.

[१३] मुलाखत : श्री बंडा उमराणी, जोतिबा देवस्थान, वाडी रत्नागिरी, दि. १०–०१–२०१०

[१४] अ.म.मा.शि.च.का., पृ. १३

[१५] 'कन्हेरखेड' आजच्या सातारा जिल्हयातील वर्धनगड डोंगराच्या पायथ्याशी असलेले, कोरेगाव तालुक्यात साता–यापासून सुमारे २० कि.मी. अंतरावर असलेले गाव आहे.

[१६] मालकम जॉन, *मेमॉअर ऑफ सेन्ट्रल इंडिया,* भाग–१, १८२८,पृ. ९५

[१७] ग्रॅन्ड डफ, पृ. २१२

[१८] रू.इं.मा.सिं., पृ.१०

विनंती मध्ये कण्हेरखेड 'वतनाचा गाव' असा स्पष्ट उल्लेख आहे आणि ही विनंती दुस–यांदा केली असावी असे दिसून येते.[१९]

कन्हेरखेडचे शिंदे घराणे हे एकेकाळी प्रतिष्ठित व सुस्थितीमध्ये घराणे होते असे दिसते. कण्हेरखेडची पाटीलकी[२०] शिंदे घराण्याकडे होती. प्रत्यक्ष छत्रपती घराण्याबरोबर लग्नसबंध जोडण्याइतपत त्यांची प्रतिष्ठा होती. छ. शाहू महाराज मोगलांच्या कैदेत असताना या कुटूंबातील अंबिकाबाई हिचे लग्न शाहूंच्या बरोबर लावण्यात आले होते. छ. शाहूंची कैदेतून सुटका होण्याअगोदर त्यांचा मृत्यू झाला.[२१] काही दिवसांनी अंबिकाबाईच्या पित्याचाही मृत्यू झाला. परिणामी औरंगजेबाच्या दरबारातील शिंदयाचेही महत्व कमी झाले असावे.[२२]

<u>राणोजी शिंदे :–</u>

जनकोजी शिंदे हा शिंदे घराण्याचा मूळ पूरूष मानला जातो. पण शिंदे घराण्याचा राजकीय उत्कर्ष हा राणोजी शिंदे यांच्यापासून झाला. राणोजी

---

[१९]जनकोजी शिंदे यांचे पेशव्यास पत्र. ''श्रीमंत महाराज राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी–विनंती सेवक जनकोजी शिंदे कृतानेक सा।। दंडवत विनंती येथील कुशल त।। मार्गेशीर्ष वद्य सप्तमी भानुवासर पावेतो स्वामीच्या कृपादृष्टीकरून सेवकांचे वर्तमान येथास्थित असे विशेष. – – – – – कनेरखेड वतनाचा गांव स्वामीनी आपणाकडे करून द्यावा म्हणून पूर्वी विज्ञापना केली होती आणि स्वामीनीही ती गोष्ट चित्तात धरली आहे. परंतु योग घडून आला नाही. .... तरी स्वामीनी कृपालु होऊन गावीच्या सनदा आपणाकडे करून घेतल्याने थोर गोष्टी होईल येविषयी स्वामी समर्थ आहेत. सेवेसी विदित होये.'' पे. द., ३०, पृ. १०१.

[२०] पाटीलकीचा उगम हा 'काळीवर पांढर रचली' तेंव्हापासून झाला असे मानले जाते. म्हणजे काळी जमीन जेंव्हा पासून कसायला चालू झाली तेंव्हापसून पाटलाचा उगम झाला असे मानले जाते. पाटील हे नाव ब–याच कागदपत्रामध्ये मोकदम, मोकदम पाटील व फक्त पाटील अशा तीन प्रकारे आलेले दिसून येते. (भा.इं.सं.मं,त्रै., डिसेबंर, १९३२, वर्ष १३वे, अंक–तिसरा, पृ. ७३,७४)

[२१] म.शि., पृ. ३

[२२] अ.शि.घ.इ., पृ. ६.

शिंदे हा जनकोजी शिंदे व द्वारकाबाई शिंदे यांचा मुलगा होय. लहानपणी राणोजी शिंदे यांना 'राणबा', 'राणू' या नावाने ओळखले जात असे.[२३] राणोजी शिंदे यांच्यावर त्यांचे वडिल जनकोजी शिंदे यांचा विश्वास व जीव होता. एकादया स्वारीवर जर राणोजी शिंदे गेले असले व त्यांचे काही वर्तमान न कळाल्यास ते अस्वस्थ होत असत.[२४] राणोजीची जन्मतिथी[२५] अगर पूर्वायुष्यातील गोष्टीबाबत फार सविस्तर माहिती उपलब्ध होत नाही. पण त्याने पेशव्यांचो चाकरी पत्करली व त्याच्या उर्जितावस्थेस प्रारंभ झाला असे दिसते.

राणोजी शिंदे यांच्या उर्जितावस्थेस प्रारंभ :–

राणोजी शिंदे हे बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या पदरी प्रथम हुज–या[२६] म्हणून नोकरीस लागले.[२७] नोकरीची सुरूवात हुज–या म्हणून झाली असली तरी आपल्या गुण व शौर्याने राणोजी हळूहळू वरच्या पदापर्यंत पोहचले. विशषतः पेशव्यांनी राणोजीमधील प्रामाणिकपणा आणि स्वामिनिष्ठा[२८] हे गुण

---

[२३] पु. द., भाग १, पृ.१३८, १३९.

[२४] पे. द., भाग. ३०, नं. १०१, ५३

[२५] राणोजी शिंदे यांचे मृत्यूच्यावेळी (जुलै १७४५) वय ५५ च्या आसपास होते यावरून त्यांची जन्म तारिख काढल्यास ती १६९० च्या आसपास येते.

[२६] प्राचीन काली हुजरे अगदी भिन्न होते. कुलीन, वतनदार, शहाणा मनुष्य पाहून सांप्रत श्रीमान लोक हुज–याच्या चाकरीवर त्यास ठेवत. हुजरे आपल्या जिवापेक्षा धन्याच्या जिवास, अब्रस, हितास फार जपत आणि प्रसंग बघून सल्ला सांगत त्यामुळे लोकांत त्यांची प्रतिष्ठा असे.

[२७] जि.ब.च, पृ. २५., म.प.इ., पृ. ४६

[२८] राणोजी शिंदयाच्या प्रामाणिकपणा व स्वामीनिष्ठतेबाबत सांगितले जाते – राणोजी ची नोकरी पेशवा एकादया व्यक्तीस भेटावयास गेल्यास त्यांचे जोडे सांभाळणे अशी हलक्या दर्जाची होती. पेशवा व छत्रपती यांची एक बैठक संपण्यास विलंब लागला रात्र झाली परिणामी आपल्या धन्याचे जोडे कोणीतरी घेवून जाईल या भितीने राणोजीने धन्याचे जोडे छातीशी कवटाळून घेतले व तो डुलक्या घेऊ लागला. पेशवे जेंव्हा बाहेर आले तेंव्हा त्यांच्या लक्षात ही बाब आली त्यांनी या स्वामीनिष्ठ सेवकाची नेमणूक घोडदळामध्ये पाग्या म्हणून केली.

हेरले आणि त्यांना घोडदळात 'पाग्या'[२९] म्हणून नेमले.[३०] पेशव्यांच्या उत्तरेतील मोहिमेत राणोजीस बरोबर नेण्यामध्ये त्याची स्वामीनिष्ठाच कारणीभूत होती.[३१]

होळकरांच्या कैफियतीवरूनही राणोजी शिंदे यांची स्वामीनिष्ठा व प्रामाणिकपणा या गुणांना दुजोरा मिळतो. मल्हारराव होळकर व राणोजीची भेट, त्यांनी राणोजीस जरीपटका व मुतालकी शिक्का देण्याचे दिलेले आश्वासन, बाजीराव पेशव्यावर चौरे उडवीत असलेला राणोजी व त्याला वस्त्रे देण्यासाठी मल्हारराव यांनी केलेली विनंती इ. बाबी कैफियतोवरून स्पष्ट होतात.[३२]

राणोजी शिंदे यांची उर्जितावस्था व विविध मोहिमातील सहभागः–

इ.स. १७१६ मध्ये राणोजी शिंदे यांनी पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्याकडे नोकरी पत्करली. पेशव्याच्या पदरी नोकरी पत्करल्यानंतर त्यांची उत्तोरोत्तर प्रगती होत गेल्याचे दिसून येते. नाकरीकरोता राणोजी शिंदे

---

[२९] पाग्या ही संज्ञा, जो मनुष्य कांही स्वारानिशी चाकरी करतो व त्या बद्दल कांही मुलूख अथवा कांही नक्त नेमणूक त्यास नेमलेली असते.

[३०] अ.शि.घ.इ., पृ. ८., म.शि., पृ. ४

[३१] न.म.शि., पृ. १६.

[३२] ''मल्हारराव होळकर पुण्याच मुक्कामी होते..........एके दिवशी ...... मल्हारराव होळकर राणोजी शिंदे यास बोलले की, *'राणू तुला पागा जरीपटका मुतालकी शिक्का देतो. तू बराबर चाल.'* त्याने उत्तर केले की, *'मी जोडा उचलणार, माझी थट्टा करीता की काय'* तेंव्हा मल्हारजी बाबा बाललेकी, *'तिसरे प्रहरी काय होते ते पहावे.'* ...... तिसरे प्रहरी मल्हारजी बाबा कचेरीत आले. तो बाजीराव साहेब गादीवर बसून राणोजी शिंदे चौरी उडवीत होता. ते समयी सुभेदारांनी पुनः विनंती केली. *'आमच्या समागमे द्यावयास योजना कोणाची करता?'* तेव्हा श्रीमतानी उत्तर केले की, *'तुम्ही सांगाल त्यास देवू'* नंतर मल्हारजी बाबा बोलले की, *'हा राणू चौरे उडवीतो याजला वस्त्रे द्यावी.'* उत्तम आहे, असे म्हणून तेच समयी वस्त्रे आणून राणोजी शिंदे यास दिली. वस्त्रे पागा देऊन बाहेर गारपिरावर डेरा दिला........... मल्हारजी बाबानी सरकारी शिक्के कटयार श्रीमंताचे रूबेरू (समक्ष–देखत) राणोजीस दिले. त्या दिवसापासून शिंदे, होळकर यांची गाठ..... '' हो.कै., पृ. ८

बाळाजी विश्वनाथ यांच्याकडे राहिले त्यावेळी ते पावलोक[३३] या पदावर कार्यरत होते.

१७१८ मध्ये दिल्ली स्वारीच्यावेळीही राणोजी हे बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांच्याबरोबर होते.[३४] राणोजी शिंदे हे दिल्ली स्वारीच्यावळी बाळाजी विश्वनाथ यांच्याबरोबर गेले हे भावी काळाच्यादृष्टोने महत्वपूर्ण ठरल्याचे दिसून येते. कारण राणोजी शिंदे यांना त्यामुळे उत्तरेकडील राजकारणाचा अनुभव आला व पुढे त्यांनी आपले कार्यक्षेत्र उत्तरेकडे निवडलेले दिसून येते.

मराठा लष्करामध्ये बारगीर व शिलेदार असे दोन प्रकारचे वर्ग होते. राणोजी शिंदे यांची पावलोक या पदावरून १७२१ मध्ये बारगीर म्हणून नेमणूक झाली. १७२१ ते १७२३ या कालावधीमध्ये ते या पदावर कार्यरत होते. [३५] इ.स. १७२४ मध्ये बाजीराव पेशव्यांनी माळवा व खानदेशात स्वारी कली असता त्यावेळी बु–हाणपुरच्या बादशहाच्या अम्मंलदारांबरोबर बाजीराव पेशव्यांचा संघर्ष झाला. सदर स्वारीच्यावेळी राणोजी शिंदे हे प्रसिध्दीस आले[३६]

युध्दकलेमध्ये राणोजी शिंदे हे निपुण होते. पेशव्यांच्या बरोबर अनेक लढायांमध्ये त्यांनी भाग घेतला होता. अनेक लढाया त्यांनी स्वतःच्या कतृत्वाने गाजविल्या होत्या. इ.स. १७२४ मध्ये पेशवा बाजीराव यांनी राणोजी शिंदे

---

[३३] पावलोक : लष्करी उतरंडीमधील एक कनिष्ठ दर्जाचे पद होय.

[३४] पे. द., ३० पृ. २४६, २६०

[३५] शिलेदाराजवळ स्वतःची घोडी असत तर बारगीराजवळ स्वतःची घोडी नसत त्यांना सरकारकडून घोडी व इतर वस्तू मिळत असत. बारगीर व सिलेदार यांच्यामध्ये हा मूलभूत फरक असल्याचे दिसून येते. (मुंबई प्रांत गॅझेट.पृ.२४०–४१)

[३६] अ.शि.घ.इ., पृ. ८

यांना बारगीर या पदावरून काढून 'करोल'[३७] या पदावर नेमले. अल्पावधीतच ते ५ नोव्हेंबर १७२५ रोजी करोल या पदावरून शिलेदार बनले.[३८]

पेशवा बाजीरावाने माळव्याच्या स्वारीच्या वेळी शिंदे, होळकर व पवार या सरदारांना आपल्या बरोबर नेले होते. माळव्याचा प्रांत ताब्यात आला असता त्यांनी शिंदे, होळकर, पवार व श्रीमंत – स्वतः आपण याप्रमाणे माळव्याच्या उत्पन्नाची वाटणी करून सनदा दिल्या. त्या पढील प्रमाणे – श्रीमंत – ४५, शिंदे – २२।।, होळकर – २२।।, पवार – १०।।[३९]

माळव्यावरील स्वारीवरून परत येताच पेशव्याने दिनांक २३ जुलै इ.स. १७२९ रोजी पिलाजी जाधव याचकडील सरंजाम काढून राणोजीस दिले व राणोजीस वस्त्रे प्रधान केल्याचा स्पष्ट उल्लेख राणोजीच्या नावे दिलेल्या २४ जलैच्या सनदेमध्ये केलेला आढळतो.[४०] राणोजी शिंदे यांचा पराक्रम पाहून पेशव्यांनी इतरही अनेक संरजाम राणोजीस बहाल केले होते असे दिसते.[४१] पहिल्या बाजीरावाने राणोजीस माळव्यातील कमावीसी (इ.स.१७२६) दिली होती अशी नोंद सापडते.[४२] लोणी येथील मोकादमीही राणोजीस देण्यात

---

[३७] करोल म्हणजे घोडयावर बसून नेम साधण्याचो एक कला होय.

[३८] शिंदे शकावली, पृ.०६., अ.शि.घ.इ., पृ.०६.

[३९] हो. कै., पृ. ११., प. या. व., पृ. ५३५, अ.म.मा.शि.च.का., पृ.१५

[४०]राणोजीच्या नावे २४ जुलै रोजीची सनद –*'राजश्री राणोजी शिंदे याचकडे जमावाचे बेगमीस सालगुदस्ता पिलाजी जाधव याजकडे सरंजाम होता. त्यापमाणे 'हाली' सालमजुरी मारनिलेकडे देविला असे'* पे.द. ३०. पृ. २९०.

[४१] शा. द., क्रं. २५, पु.क्रं. ०१, पत्र क्रं. ९४६, शा.द. क्र. ५३, पु.क्रं. ०५, पत्र क्र. २२४, अप्रकाशित पत्र, पुणे पुराभिलेख, पुणे

[४२] *'दिमत – राणोजी शिंदे बा।। येवज कमावीस गु।। रामचंद्र मल्हार ब।। हिसेब रूपये......'* पे.द. ३०, पृ. २८२

आली होती.[४३] तांदुळवाडी, रामापूर ही गावे इनाम[४४] म्हणून व औंधची पाटीलकीही देण्यात आली होती.[४५]

अठराव्या शतकात पालखी बाळगण्याचा मान म्हणजे मोठा बहुमान समजला जात असे. हा मान वरिष्ठाकडून काही व्यक्तींनाच मिळत असे. चिमाजी आप्पांच्या नेतृत्वाखालील माळव्याच्या स्वारीमध्ये राणोजी शिंदे यांने महत्वाची कामगिरी बजावली होती. या कामगिरीने प्रभावित होऊन २५ जुलै १७२९ रोजी पेशव्याने राणोजीस पालखी बाळगण्याचा मान दिला[४६]

पेशवा बाजीराव याने निजामाचा पराभव केला. निजामाचा पराभव करण्यामध्ये प्रामुख्याने राणोजी शिंदे यांचे कार्य महत्वपूर्ण होते. याचेच फळ म्हणजे १७३० मध्ये राणोजी शिंदे यास सरदार म्हणून नमण्यात आले. त्यानंतर राणोजीने सुभेदार व रावबहाद्दूर असे बहुमान अल्पकाळातच मिळवले.[४७] राणोजी शिंद हे बाळाजी विश्वनाथ व बाजीराव पेशवे यांच्याबरोबर प्रत्येक स्वारीच्या व लढाईच्यावेळी बरोबर असत. शिंदे, होळकर व पवार या साथीदारांच्या सहाय्याने पेशव्याने प्रत्येक वर्षी उत्तरेमध्ये स्वा–या करण्याचे सत्र अवलंबले होते व मराठी सत्ता वाढविण्याचे धोरण राबविले होते. त्यामुळे थोडया अवधीतच मराठयांची सत्ता उत्तरेत विस्तारली. स्वतः पेशव्याने राणोजीस माळव्याच्या कारभारावर नेमले. माळवा हे शिंदे व होळकर यांचे कार्यक्षेत्र बनले.

---

[४३] शा. द., क्रं.०८, पु.क्रं.०८, पत्र. ९८५२–५५, ५८, पु.क्र.०२, पत्र क्र. २७७, अप्रकाशित पत्रे, पुणे पुराभिलेखागार, पुणे.

[४४] शा. द., क्रं.३०, पु.क्रं.०५, पत्र. २४३, क्र.३१. पु.क्रं. ०१, पत्र क्रं.९८४, अप्रकाशित पत्रे, पुणे पुराभिलेखागार, पुणे.

[४५] शा. द., क्रं.४२, पु.क्रं.०२, पत्र. ५९१०२, अप्रकाशित पत्र, पुणे पुराभिलेखागार, पुणे

[४६] पे.द. क्र. ३०, पृ. २९१

[४७] हिं. द., भाग २, पृ. २२

थोरल्या बाजीराव पेशव्यांनी जेंव्हा माळवा प्रांत जिंकला त्या वेळी प्राताच्या बंदोबस्ताकरिता मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यांची व्यवस्था केली होती. त्यांनी आपल्या प्रातांची व्यवस्था पाहून जवळील मोगलाई मुलखातून चौथाई वसूल करण्याचा आपला हक्क त्यांना दिला. शिंदयांनी 'उज्जैन' व होळकरांनी 'इंदोर' हे आपले मुख्य ठिकाण केले.[४८]

जाने. १७२९ मध्ये उज्जैनच्या वेढयाच्यावेळीही राणोजी शिंदे यांनी शौर्य गाजवले होते पेशवा व दाभाडे यांच्यातील कलहामध्ये राणोजी शिंदे यांने पेशव्यांना मदत केली. दाभाडे यांच्याबरोबर झालेल्या १७३१ च्या डभईच्या लढाईच्यावळीही राणोजी शिंदे बरोबर होते. राणोजीची रवानगी गुजरातमध्ये करण्यात आली होती त्यावेळोही त्यांनी शौर्य गाजवले. या स्वारीच्यावेळी त्याच्यांबरोबर मल्हारराव हे देखील होते.[४९]

इ.स. १७३१ मध्ये पेशव्यानी राणोजीस माळव्यातील कारभारावर नेमले. तेंव्हापासून त्यांनी आपले कार्यक्षेत्र दिवसे दिवस वाढवतच नेले. दि. २२ नोव्हेंबर १७३१ रोजी पेशव्याने मुतालीकीचे शिक्के राणोजीच्या नावे दिले.[५०]

खानदेशात झालेल्या निजामाबरोबरच्या युध्दातही राणोजी शिंदे हा पेशव्यांच्या बरोबर होता.[५१] निजामाबरोबर झालेल्या पालखेडच्या युध्दात राणोजी शिंदे यांचा सहभाग होता. या युध्दामध्ये राणोजी शिंदे यांनी महत्वाची कामगिरी बजावली होती. याचाच परिणाम म्हणजे राणोजी शिंदे

---

[४८] न.म.शि., पृ. १६, १७
[४९] पे.द. क्र. १४. पृ. १
[५०] पे.द., क्र. ३०, पृ. ३०६
[५१] कित्ता, पृ.२६९

यांना सरदारकी मिळाली होती. पालखेडच्या युध्दानंतर राणोजी शिंदे यांचा पूर्वार्ध संपून दुसरा कालखंड सुरू झाला.[५२]

गुजरातचा सुभेदार अभयसिंग यास वठणीवर आणण्याकरिता (मार्च १७३२) शिंदे व होळकर यांची पेशव्यानी नेमणूक केली होती. सदर स्वारीच्यावेळीही राणोजी शिंदे यांनी आपले काम चोख बजावले[५३]

चिमाजी आप्पा यांच्या विरोधात उदाजी पवार व त्यांचा सावत्र बंधू कृष्णाजी पवार यांनी कारस्थाने करण्यास सुरूवात केली होती व याकरिता त्यांनी जयसिंगाचे सहाय्य घेतले होते.[५४] शिंदे व होळकर यांना हे कळताच त्यांनी उदाजी पवार यांच्यावर आक्रमण करून त्यांना समज दिली. उदाजी पवार याने आपली चूक कबूल करून जयसिंगाचा पक्ष सोडला तद्‌नंतर शिंदे व होळकर यांनी जयसिंगावर विजय मिळवला.[५५] माळव्यावर चौथाई व सरदेशमुखी हे दोन अम्मल बसल्यावर बाजीरावाने राणोजीस फौजेच्या खर्चास माळव्यात सरंजाम दिल्याचे दिसून येते.[५६]

वरील महत्वपूर्ण युध्दाबरोबरच राणोजी शिंदे यांनी इतर अनेक लहान मोठया युध्द मोहिमामध्ये शौर्य गाजविलेले दिसून येते. शिंदे व होळकर यांना दिलेल्या जहागिरी जरी पेशव्यांनी दिल्या होत्या तरी त्यांच्या वंशजानी पुढे त्या स्वतःच्या पराक्रमावर वाढविल्या हे ही मान्य करावे लागते. शिंदे व

[५२] पे.द. १४, पृ. ३३, ३६
[५३] पे.द. १२, पृ. ७०–७१
[५४] पे.द. १४, पृ. १
[५५] पे.द. १४, पृ.२
[५६] अ.शि.घ.इ., पृ. ९

होळकर हे स्वकर्तृत्वावर जहागिरी वाढवून उच्चपदावर पोहचले. त्यामुळे पुढे पेशवे व त्यांच्यामध्ये धनी व चाकर असे नाते मुळीच राहिले नाही.[५७]

राणोजी शिंदे यांची आखेर :–

राणोजी शिंदे यांच्या मृत्यूचे ठिकाण 'सुजालपूर' याबाबत इतिहासकारामध्ये एकमत आहे. मात्र मृत्यूच्या तारखेबाबत मतभिन्नता दिसते. सरंजामे व नातू यांच्या मते राणोजी शिंदे इ.स. १७५० रोजी सुजालपूर येथे मृत्यू पावले, त्यावरून त्या गावास 'राणेगंज' असे नाव पडले[५८] राणोजीचा मृत्यू इ.स.१७४५ मध्ये झाला असल्याचेहो उल्लेख सापडतात. जुलै १७४५ मध्ये *मौजे मिर्झापूर प्रांत सुज्यालपूर*[५९] *येथे राणोजी शिंदेचा कैलासवास झाला* असे एका पत्रात स्पष्टपणे नमूद केलेले आहे. मौजे मिर्जापूर उर्फ सुलतानपूर हा गांव परगणे शुजालपूर (शुजालपूर तहसील, जिल्हा शाजापूर, ग्वाल्हेर रियासत) येथे असून त्यास 'राणीगंज' हे नाव राणोजीच्या मृत्यूनंतर देण्यात आले.[६०] २१ जुलै इ.स.१७४५ रोजी जयाप्पा शिंदे यांने गुलगुल्यास पत्र पाठवून राणोजी शिंदे यांची मृत्यूची बातमी कळविल्याचे दिसून येते.[६१]

---

[५७] म.शि.ना.फ.तु., पृ. ११

[५८] अ.शि.घ.इ., पृ. १०., अ.म.मा.शि.च.का., पृ. १९

[५९] नेवाज नदीच्या काठी हा गाव वसलेला आहे.

[६०] शि.इ.सा., भाग १, पृ. ३५, ३६. ३७

[६१] ''मौजे मिरजापूर प्रांत सुज्यावलपूर येथे तीर्थरूपास कैलासवास झाला – – – – ''शि.इ. सा., भाग.०१, पृ. ३७.

बाळाजी यशवंत कमाविसदार – जयाजी – सूरसन सीत अर्बेन मया अलफ मौजे मिरजापूर प्रांत सुज्यालपूर येथे तीर्थरूपास कैलासवास झाला त्यास तेथे छत्री त्या स्थळावरी करावयास राजश्री गोरखोबा यास सांगितले असे त्यास कारगर सिलाट उत्तम पाहिजे तरी येक जन सिलाट जे मशारनिल्हे आणतील ते चौकस पाहून सुज्यालपूरास पाठविणे जाणिजे छ.०२ रजब बहुत काय लिहणे हे विनंती. **गु.द., भाग.०१, पृ. ४२, दि. २१–०७–१७४५ रोजीचे पत्र (अप्रकाशित पत्र, नटनागर शोध संस्थान, सितामऊ, माळवा म.प्र.)**

राणोजीच्या मृत्यूच्या वेळेस त्यांच्या बरोबर त्यांचे वडील पुत्र जयाप्पा शिंदे व त्यांचे सासरे गोरखोजी भापकर हे होते.[६२] राणोजी शिंदे यांचा मृत्यू १० जुलै इ.स.१७४५ पूर्वी झाला असावा असे दिसते. कारण राणोजीच्या नावाचा उल्लेख असणारे राघो पुरूषोत्तम यांचे १० जुलै १७४५ चे पत्र आढळून येते.[६३] राणोजी शिंदे यांचा मृत्यू १९ जुलै १७४५ रोजी झाला असावा याबाबतही काही पत्रामध्ये उल्लेख आढळतात.[६४] त्यामुळे सरंजामे व नातू यांनी राणोजी शिंदे यांच्या मृत्यूची दर्शवलेली १७५० ही तारिख पूर्णतः चुकीची ठरते. उलट १७४५ मध्ये राणोजीचा मृत्यू झाला याला दुजोरा देणारीच अनेक पत्रे आहेत. मृत्यूच्या तारखेप्रमाणेच राणोजीच्या मृत्यूचे नेमके कारण काय होते याबाबतही मतभिन्नता दिसून येते. शुजालपूर येथे राणोजी शिंदे यांचा लष्करी तळ असताना पायास झालेल्या जखमेच्या व्यथा असहाय्य होऊन त्यांचा मृत्यू झाला असावा असे अनुमान काढले जाते. मृत्यूपूर्वी राणोजीना काही आजार अथवा रोग असल्याचे दिसून येत नाही. एखादया लढाईत पायास झालेली जखम मोठी होऊन त्यातच त्यांना मृत्यू आला असावा.

अठराव्या शतकामध्ये स्वामीनिष्ठेला प्राधान्य दिले जात होते. धन्यासाठी आपल्या प्राणाची आहुती देणे त्यावेळी भूषण मानले जात होते. राणोजी शिंदे हे बाळाजी विश्वनाथ यांच्या कारकीर्दीत पेशव्यांच्या पदरी पावलोक (१७१६) म्हणून नोकरीस लागले तेंव्हापासून ते नेहमीच पेशव्यांशी एकनिष्ठ राहिले. त्यामुळे राणोजी शिंदे यांचा पावलोक ते बारगीर, करोल, शिलेदार, सरदार व सुभेदार असा उत्कर्ष झाल्याचे दिसून येते.

---

[६२] शि.इ.सा., भाग. १, पृ. ३५

[६३] पे.द. २१, १५

[६४] ऐ.प.या., नं. ४९, पृ. ६६., शि.इ.सा., खंड. १, नं. ३७, पृ. ३६., ठाकूर डब्लू.डब्लू., *होळकरशाहीचा इतिहास*, पृ. ७९.

राणोजी शिंदे यांचे मराठा सत्तेतील योगदान महत्वपूर्ण असे आहे. शिंदेशाहीचे संस्थापक म्हणून त्यांना मान दिला जातो. त्यांनी पेशवा बाळाजो विश्वनाथ यांच्या सैन्यात साधा सैनिक म्हणून नोकरी पत्करली व नंतर आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सुभेदार पदापर्यंत झेप घेतलेली दिसून येते. विविध युध्दामध्ये राणोजी शिंदे यांचे शौर्य व कर्तबगारी दिसून येते. स्पष्टवक्तेपणा हा गुण राणोजी शिंद यांच्या अंगी होता. अनेक युध्द व तहाच्या वेळी त्यांनी आपल्या मनात जे काही आहे ते बोलून दाखविण्यात कधीच माघार घेतली नाही. पेशवे व चिमाजी आप्पा यांनाही त्यांनी याबाबतची पत्रे पाठविण्यास कधीच माग पुढे पाहिले नाही.

सेनापतीच्या अंगी असणारे जवळ जवळ सर्व गुण राणोजी शिंदे यांच्या अंगी होते. सेनापती म्हणून राणोजी शिंदे यांना फार थोडया प्रमाणात स्वतंत्र मोहीमा काढण्याची संधी मिळाली. अनेक युध्दामध्ये स्वतः बाजीराव अथवा चिमाजी आप्पा हे सेनापती म्हणून कार्य पाहत असत. असे असले तरी त्यानी आपले कार्य चोख बजावलेले दिसून येते.

अल्पशिक्षण, रागीट स्वभाव व कोणत्याही कामात अतीघाई हे दुर्गूण सोडता राणोजी शिंदे हा स्वामीनिष्ठ, कर्तव्यनिष्ठ, शूर, पराक्रमी सरदार होता.

<u>जयाजी शिंदे</u>:–

इतिहासामध्ये वारसाविषयी अनेक संघर्ष निर्माण झालेले दिसून येतात. मात्र यास अपवाद म्हणजे शिंदे घराणे होय. शिंदे घराण्यातील सर्व पुरूषांनी आपल्या कर्तबगारीवर सत्ता संपादन केलेली व सरदारकी मिळवलेली दिसून येते. जयाजी शिंदे हा राणोजी शिंदे यांचा वडोल मुलगा होता. राणोजी शिंदे यांच्या बरोबर अनेक युध्दामध्ये त्याने सहभाग घेतला होता. राणोजी शिंदे

यांच्या मृत्यूनंतर राणोजीचा वडील पुत्र जयाजी शिंदे हा सरदारकीचे काम पाहू लागला.

जयाजीचे दिल्लीच्या वजीरास सहाय्य :-

रोहिलाखंडात घडून आलेले बंड मोडून काढण्यासाठो दिल्लीच्या वजीराने होळकर, सूरजमल जाट आणि जयाजी शिंदे या त्रिवर्गास बोलावले होते. त्यावेळी जयाजी शिंदे यांनी मोठी कामगिरी बजावली. याबद्दल नंतर बादशाहाकडून मिळालेल्या प्रदेशातील पाऊणकोटीचा मुलुख जयाजीच्या वाटणीस आला.[६५] जयाजी व मल्हारराव होळकर यांनी बुदेल्यांच्यावर स्वारी करून विजय संपादन केल्याचे दिसून येते[६६]

मारवाड – जोधपूरची स्वारी व जयाजी शिंदे यांचा खून :

जयाजी शिंदे यांनी अनेक लढायामध्ये शौर्य गाजवले होते परिणामी उत्तरेमध्ये त्यांचा दबदबा निर्माण झाला. माळव्यामध्ये होळकर व शिंदे या दोघाना पेशव्यांनी सत्ता विस्ताराकरीता क्षेत्र नेमून दिले होते. सत्ता विस्तार करत असताना काही ठिकाणी राजकीय हितसंबध शिंदे व होळकर यांच्यामध्ये आडवे येवू लागले व त्यामुळे या दोन बलशाली मराठा सरदारामध्ये संघर्ष निर्माण होवू लागला. या छुप्या संघर्षाचे, युध्दाचे परिणाम शिंदयानी आरंभलेल्या मारवाड – जोधपूर येथील लढाईमध्ये दिसून येतात. या लढाईच्यावेळी जयाजीने मदतीसाठी पेशव्यांना पत्रे पाठविली मात्र त्यास मदत योग्यवेळी मिळालेली दिसून येत नाही.[६७] या युध्दाच्या प्रसंगी

---

[६५] अ.शि.घ.इ., पृ. १२

[६६] गु.द. भाग.०१, पृ.५५, दि. २६–०४–१७४६, **(अप्रकाशित पत्र, नटनागर शोध संस्थान, सितामऊ, माळवा म.प्र.)**

[६७] गु. द., भाग.०१, पृ.५५, दि.२६–०४–१७४६ **(अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान, सीतामऊ, माळवा, म.प्र.)**

विश्वासघाताने विजयसिंगाने जयाप्पाचा खून करविला. या खुनाच्या पाठीमागे मल्हारराव होळकर यांचा हात होता अस बखरकार म्हणतात.[६८] मल्हारराव होळकर जयाजीच्या खुनास जबाबदार होता काय याबाबत इतिहासामध्ये वाद आहे. विजयसिंगास माहित होते की, जयाजी शिदे आणि मल्हारराव होळकर यांचे सख्य फारसे जुळत नाही. तेंव्हा आपण जर जयाजी शिंदे याच्याबरोबर युध्द चालू केले तर मल्हारराव होळकर यांची मदत मिळेल, म्हणून विजयसिंगाने युध्दप्रसंग अंगीकारला होता. परंतु एक वर्ष झाले तरी मल्हाररावाकडून मदत येईना. तेंव्हा त्याने आपला वकील मदत मागण्यासाठी मल्हाररावाकडे पाठविला.[६९]

विजयसिंगाचा वकिल शिंदयाच्या विरोधात मदत मागण्यासाठी मल्हारराव होळकराकडे गेला असता त्यास मल्हारराव होळकर यांनी शिंदे व आम्ही (स्वत:) एका खावंदाचे (म्हणजे पेशव्याचे) चाकर आसल्याने उघडपणे मदत करता येणार नाही हे स्पष्ट केले. पण अप्रत्यक्ष काही मदत करण्याचे मान्य केले. त्यामध्ये माधोसिंग, जयनगरकर, सिवसिंग राणे, उदयपूरकर, उमेदसिंग बुंदीकर, भीमसिंग मारवाडी इ. छोटया मोठया सरदारांना सहाय्यासाठी पत्रे दिली. विजयसिंगाच्या वकिलास ठासून राहण्याचा सल्ला दिला व शेवटी मोगलाइ[७०] मसलत करून यश संपादण्यास सांगितले[७१] दरम्यानच्या काळात जयाजी शिंदे यांनी आक्रमक धोरण अवलंबून मडते (१४ ऑक्टो.१७५४) सर केले व गंगरडे वर आपली स्वारी वळविली. जयाजीच्या

---

[६८] भा.ब., पृ. १२

[६९] म.रि.म.वि., भाग.०३, पृ.५४

[७०] मोगलाई मसलत म्हणजे विश्वासघाताने शत्रूचा नाश करणे अथवा मारेक-याकरवी त्याचा खून घडवून आणणे होय.

[७१] *''शिंदे व आम्ही येका खावंदाचे चाकर. यास्तव उघड तुमची कुमक करता येत नाही. ....तुम्ही ठासून रहावे म्हणजे त्याच्यांने रोमांच वांकडे होणार नाही. आसे करितां कोणी कुमक न करीत तरी तुम्ही मोगलाई मसलत करून यश संपादाव''* भा. ब., पृ. १२

आक्रमक धोरणाचा सामना करणे शक्य नाही हे ओळखून विजयसिंगाने युध्द थांबवावे म्हणून जयाजी बरोबर बोलणी चालू केली.[७२] तसेच आपणास युध्दामध्ये इतर कोणाची मदत मिळते का याबाबत प्रयत्न चालविल्याचे दिसून येते.

शिंदयाच्या वचक लक्षात घेता विजयसिंगास कोणीही मदत करण्यास तयार नव्हते. शेवटी होळकराच्या सल्ल्यानुसार मोगलाई मसलतीचा वापर करण्याचे विजयसिंगाने ठरविले. त्याने तीन मारेकरी तयार करून ते शिंदयाच्या छावणीमध्ये पाठविले. अंगावर जीर्ण वस्त्रे असलेल्या व कंगाल भिका–याच्या वेशात असलेल्या मारेक–याना ओळखणे अवघड होते. त्यांच्याजवळ सु–या लपविलेल्या होत्या. जयाजी शिंदे स्नान करून आले व चौरंगावर उभे राहून डोळे चोळत असताना मारेक–यांनी जयाजोच्या दोन्ही कुशीत दोन्ही बाजूने सुरे खुपसले. जयाजीच्या डे–यापुढे पागेत ही घटना घडताच गडबड झाली. जयाजीच्या अब्दागि–यापैकी एकाने तीन मारेक–यापैकी एकाला मिठी मारून लगेच पकडले. एक मारेकरी ठार झाला व एक नागोरास पळून गेला.[७३]

नागोरास परत गेलेल्या मारेक–यांने जयाजीच्या मृत्यूची बातमी विजयसिंगास कळविली या संधीचा फायदा घेवून विजयसिंग एकदम मराठयांवर चालून आला.[७४] जयाजी शिंदे गंभीर जखमी अवस्थेत होते दत्ताजी त्यांच्या जवळ येवून रडू लागले. तेंव्हा जयाजी शिंदे दत्ताजीस बोलले की, *''शत्रू जवळ आला आणि तू रांडेसारिखा रडतोस ? हे क्षेत्रीय धर्मास उचित की काय ? आता मजला काय होत नाही तुम्ही शत्रूचा पराभव*

---

[७२] शि.इ.सा. भाग. ०३, पृ. २६९ ,२७७., हि. द., भाग. ०१, पृ.१०९

[७३] भा. ब., पृ. १३

[७४] म.रि.म.वि., भाग–०३, पृ.५४.

करावा.'[७५] अशा प्रकारे मृत्यू शय्येवर असताना देखिल या शूर सरदारांने इमान इतबारे स्वतःच्या जिवाची पर्वा न करता शत्रूचा पराभव करावा असे आपल्या बंधूस संबोधले.

दत्ताजीने निकराचा हल्ला करून विजयसिंगास मागे सारून गावात घातले. परत येतो तो जयाजीचा प्राण गेला होता. दत्ताजीचे अनेक थोर लहानानी सांत्वन केले. जनकोजी त्यावेळी जवळ नव्हता. त्यांने त्या दिवशी मेडते सर केले होते. तोही लगेच येऊन पोहचला त्यांने बराच शोक केला.[७६] जयाप्पा शिंदे यांचा खुनी हल्ल्यात मृत्यू झाल्यांनतर शिदंयाच्यावरील संकटाची पेशव्यांना जाणीव झाली. त्यांनी तात्काळ शिंदयाच्या मदतीची व्यवस्था केलली दिसून येते.[७७]

जयाजी शिंदे याच्या बाबतीत मोघलाई मसलतीचा वापर करावा असे मल्हारराव होळकर यांनी सांगितले असले तरी याबाबत बखरी वगळता कोणताही सबळ पुरावा सापडत नाही. मराठा साम्राज्यातील एक बलशाली व प्रबळ सरदार जयाजी शिंदे हा सर्वसाधारणपणे युध्दामध्ये ज्या पध्दतीचा अव्हेर केला जातो अशा मोगलाई पध्दतीस बळी पडला. जयाजी शिंदे याच्या खुनानंतर शिंदे व होळकर यांच्यातील दरी वाढतच गेली. पुढे मल्हारराव होळकर यांनी जनकोजी शिंदे यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला मात्र त्याचा फारसा उपयोग झाला नाही.

---

[७५] भा. ब., पृ. १४

[७६] म.रि.म.वि., भाग–०३, पृ. ५७, जष्ठ वद्य ७, ता. ३०/०६/१७५५ रोजी जयाप्पाचा खून झाला.

[७७] म.रि.म.वि., भाग–०३, पृ. ५८

<u>**जनकोजी शिंदे**</u> :–

जयाजी शिंदे यांचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा पुत्र जनकोजी शिंदे यास सरदारकी प्राप्त झाली. जयाजो शिंदे यांचा खून झाला त्यावेळी जनकोजी शिंदे हे मेडत्याच्या स्वारीवरती होते. त्यांना जयाजीच्या मृत्यूची पत्रे पाठविली त्यावेळी त्यानी मेडत्यावर विजय संपादन केला होता. ते तात्काळ नागोर येथे आले. ही बातमी पेशवा नानासाहेब व भाऊसाहेब यास कळताच त्यांनाही फार दुःख झाले त्यावेळी त्यानी उद्‌गार काढले की, ''*आमचा अर्जुन आज गेला. एक बाजू खचली*' यावेळी पेशव्यानी दत्ताजी शिंदे यांना समाधानाची पत्रे पाठविली की, ''*जनकोजी शिंदे त्यांचे पुत्र आहेत त्यास 'सवाई जयाजी' करून दाखऊ, चिंता काय आहे ?*''[७८]

जयाजीच्या मृत्यूनंतर जनकोजी शिंदे हे चांभारगोंदयास आले तेथे आसणा–या आपल्या कुंटूबास भेटले त्यावेळी मोठया प्रमाणात सर्वानाच दुःख झाले. चांभारगोंदयास जनकोजी आल्याचे कळताच पेशवा नानासाहेब व भाऊसाहेब हे चांभारगोंदयास गेले व त्यांनी त्याचे समाधान केले. याचवेळी पेशव्यांनी जनकोजी शिंदेच्या नावे सुभेदारी व शिक्के करून दिले. पुढे जनकोजी शिंदे हा दत्ताजी शिंदेबरोबर अनेक युध्दात बरोबर होता.[७९]

जनकोजी शिंदे यांना पेशव्यानी उत्तरेकडील स्वारीची आज्ञा दिली. जनकोजी शिंदे यानी हरिगड येथील गुजालसिंग गिराशा, जयनगर, मारवाड, शुक्रतालची लढाई इत्यादी ठिकाणी नेत्रदिपक कामगिरी केल्याचे दिसून येते[८०]

---

[७८] भा. ब., पृ. १५

[७९] भा. ब., पृ. १७

[८०] भा. ब., पृ. ३७, ३८, ३९.

जनकोजी शिंदे यांची मल्हारराव होळकरांची भेट घण्यास नकार :

जयाजी शिंदे यांच्या खुनास मल्हारराव होळकर जबाबदार आहेत हे मनात धरून जनकोजी शिंदे यांनी मल्हारराव होळकर यांच्याशी उत्तरेमध्ये आपली मोहिम चालू केल्यापासून कोणताही संपर्क ठेवला नव्हता. मल्हाराव होळकर यांनी जनकोजी शिंदे यांच्या मनातील किल्मिष घालवून देण्यासाठी गंगाधर तात्यास बोलावून पाठवून सांगितले की, ''शिंदे यांच्या जन्माची सांगड होती, तोपर्यंत श्रीमंतासही आमचा वचक होता. व कित्येक असाध्य कामे साध्य केली. आता आमचे एक मूल आहे तेही पिशाचवत आहे, आणि आमचे वार्धक्यपण जाहले त्यापेक्षा हर यत्न करून जनकोजी शिदे यास भेटून त्यांचे चित्तातील किल्मिष काढून त्यांच्या हाती आपले मुल दयावे.'' गंगोबातात्या जनकोजी शिंदे यांना भेटले व त्यांनी जनकोजीना मल्हाररावाची विनंती मान्य करण्याची गळ घातली. मल्हारराव होळकर वृध्द झाले आहेत व आपणहून भेट घेवू इच्छितात तर त्यांच्या विनंतीचा अव्हेर करू नये. असे समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु आपल्या वडिलांच्या मृत्यूस कारणीभूत असणा-या मल्हारराव होळकराविषयी जनकोजींना प्रचंड तिरस्कार वाटत होता त्यामुळे त्यांची (मल्हाररावाची) व आपली भेट आता स्वर्गातच होईल अस उद्‌गार जनकोजीने काढले. पण गंगोबातात्यानी समजूत काढण्याचा प्रयत्न सुरूच ठेवला. सरतेशेवटी दत्ताजी शिंदेच्या अनुपस्थितीत यावर निर्णय घेता येणार नाही असे सांगून जनकोजीनी गंगाधरपंताची बोळवण केल्याचे दिसते. गंगोबातात्यानी मल्हाररावास परत येवून सर्व वृत्तांत कथन केला. जनकोजीच्या मनातील कटुता व भेटण्यास तयारी नसणे याची कल्पना असूनही मल्हाररावांनी एक पाऊल पुढे जावयाचे ठरवले. जनकोजी अजून लहान आहेत आपणच पुढाकार घ्यायला हवा हे ध्यानी घेऊन मल्हारराव मानापमानाचा विचार न करता जनकोजीकडे गेले. नाइलाजाने जनकोजीस

त्यांच्या वयाचा मान राखून सामोरे जावे लागले. मल्हारराव जनकोजीबरोबर पंधरा दिवस राहिले आणि या कालावधीत जनकोजीच्या मनातील किल्मिष काढून टाकण्यात त्यांना बरेचसे यश आले.[८१]

जनकोजी शिंदे यांचा शेवट :–

इतिहास प्रसिध्द पानिपतच्या लढाईत जनकोजी शिंदेचा सहभाग होता. पानिपतच्या लढाईत जनकोजी सदाशिवभाऊच्या बरोबर होत. युध्द चालू असतांना विश्वासरावांना गोळी लागली याचा परिणाम सदाशिवभाऊ त्वेषाने शत्रूच्या सैन्यावर चालून गेले व दिसेनासे झाले. सदाशिवभाऊ सैन्यात मिसळल्यानंतर मराठा सैन्याचा धीर खचला व सैन्य इतरत्र सैरावैर धावू लागले. सदाशिवभाऊंच्या बरोबर असणारे जनकोजी शिंदे शत्रूच्या हाती सापडले. ज्या सरदारास जनकोजी शिंदे सापडले होते तो अब्दालीचा सरदार होता. त्याने जनकोजी शिंदे यांना ओळखले व जनकोजीस कैदेतून सुटका करण्याच्या बदल्यात पैशाची मागणी कलो.[८२] मात्र जनकोजी शिंदे यांच्याकडे त्यावेळी पैसे उपलब्ध नव्हते.

पानिपत लढाईच्या तिसरे दिवशी काशीराय वकिल विश्वासरावाच्या प्रेतास दहन मिळावे म्हणून खटपट करत होता. काशीराय एका सरदाराच्या तंबूत गेला असता तेथे एका कोप–यात बाबूराव फडणीस व जनकोजी शिंदे त्याच्या दृष्टिस पडले. जनकोजीस गोळी लागली होती व एक भाल्याचीही जखम होती. काशीरायास पाहून जनकोजीने मान खाली घातली तेंव्हा त्या वकिलास वाईट वाटून तो म्हणाला की, ''महाराज तुम्ही खाली मान का घालता? मर्दुमकीन व मेहनतीने जे काम करता यावयाचे ते सर्व तुम्ही केले

---

[८१] भा. ब., पृ. ३९, ४०

[८२] अ.शि.घ.इ., पृ. १४

आहे, आणि लढाईचे दिवशी जी कृत्ये केली त्याचे स्मरण मनुष्यमात्रास सदोदीत राहील.'' हे एकूण जनकोजी वर मान करून म्हणाला की, ''हे खरे आहे की, नशीबाबरोबर कोणास भांडता येत नाही. मी लढाईत मेलो असतो तर बरे झाले असते! परंतु मला येथे धरून आणले हे माझे दुर्दैव होय! हे लोक माझ्या मोकळीकेबद्दल दंड मागतात तो देणे मला मुष्कील आहे असे नाही. पण तो येथे मिळणे अशक्य आहे. तुम्ही माझे वडिलांचे दोस्त आहात व माझे व सुजाउद्दौलाच्या घराण्याची हमेशा दोस्ती असून, माझा बाप त्यांचे उपयोगी पुष्कळवेळा पडला आहे. यावेळी माझे मोकळिकेबद्दल जर नबाब साहेबांनी ऐवज दिला, तर तो उपकार मी कधीही विसरणार नाही''[८३]

काशीरायाने जनकोजीस अभिवचन देवून सुजाउद्दौलाकडे जाऊन जनकोजी शिंदे यांच्याबाबत सर्व हकीगत सांगितली. पानिपत युध्दास जबाबदार असणारा नजीबखान तेथे होता. नजीबखानाने जनकोजीस कैदेतून मुक्त करण्याबाबत बाहयत्कारी अनकुलता दर्शवली. परंतु त्याचे खरे स्वरूप म्हणजे तो शिंदयाच्या घराण्याचा निपःत करण्याची संधी पहात होता. नजीबखानाने तत्काळ दुराणी वजिराकडे जावून जनकोजीच्या कैदेची बातमी त्यास सांगितली. दुर्दैवाने ज्याच्या तंबूत जनकोजी होता त्या सरदाराचे व या वजिराचे वैमनस्य होते. वजीर त्याचा नाश करण्याची संधी पहात होता व जनकोजीच्या स्वरूपात त्यास ती मिळाली. कैदी लपविल्याचा आरोप करून त्या सरदाराचे पारिपत्य करावे म्हणून नजीबखान व वजीर अब्दालीकडे गेले. अब्दालीने त्या सरदारास आपल्याकडे बोलावले व त्या सरदाराच्या तंबूची तपासणी करण्याचा हुकूम दिला. इतक्यात आपला नाश होतो या भीतीने त्या सरदाराच्या नोकरानी जनकोजीस व त्याच्या ब्राम्हण दिवाणास ठार मारून

[८३] अ.म.मा.शि.च.का., पृ. ८०

त्यांचे मुर्दे गुप्त रितीने गाडून टाकले.[८४] अशा रितीने शूर जनकोजीचा शेवट फारच वाईट झाला.

दत्ताजी शिंदे :-

राणोजी शिंदे यांना दोन बायका होत्या. त्यापैकी एक लग्नाची बायको होती तिचे नाव मिनाबाई असे होते.[८५] तसेच एक रखेल होती तिचे नाव चिमाबाई होते. ती रजपूत वंशाची होती.[८६] मिनाबाई हिस जयाप्पा (उर्फ जयाजी), दत्ताजी आणि जोतिबा असे तीन पुत्र होते. चिमाबाई हिस महादजी व तुकोजी असे दोन पुत्र होते. जयाप्पा शिंदे यांच्या मृत्यूनंतर दत्ताजी शिंदे हे शिंदे दौलतीचा कारभार पाहू लागले. दत्ताजी शिंदे धाडसी व पराक्रमी होते. सदाशिवभाऊंना मारेक-यांनी मारण्याचा प्रयत्न केला होता त्यावेळी प्रथम त्याचा सुगावा दत्ताजी शिंदेना लागला होता व त्यावेळी भाऊंना वाचविण्याचे काम दत्ताजीने केल्याचे दिसून येते.[८७]

दत्ताजी हे प्रथम हैदराबादचा सुभेदार सलाबतजंग फराशी पुण्यावर जालून येत होता त्यावेळी प्रसिध्दीस आले. या सलाबतजंगास तळेगावानजीक जावून दताजी व त्याचा भाऊ महादजी या दाघानी रोखले होते.[८८] यावेळी दारूगोळा व इतर बाबी पेशव्यांनी पुरविल्या होत्या त्याबाबतची पत्रे आढळून येतात.[८९]

---

[८४] अ.म.मा.शि.च.का., ८०, ८१

[८५] म.रि.उ.वि., भाग.०२, पृ.६२., बर्वे मुकुंद वामन, *महादजी शिंदीया,* इंदौर, १९२९, पृ. ०१, मालकम, उपरोक्त, पृ. ९६

[८६] शि.इ.सा., खंड.०१, पृ.१-४, नं. १०७, १५४, २६३, २९५.

[८७] पे. द., क्रं.०८, पु.क्रं.०१, प.क्र., ३९४१, (अप्रकाशित पत्र, पुणे पुराभिलेख, पुणे)

[८८] अ.शि.घ.इ., पृ. १३

[८९] पे.द. रू.क.०८, पु.क्र.०४, पत्र क्र. ४४९९, (अप्रकाशित पत्र, पुणे पुराभिलेखगार, पुणे)

सिंदखेडची लढाईः–

निजामाबरोबर झालेल्या सिंदखेडच्या लढाईमध्ये दत्ताजी शिंदे यांनी शौर्य गाजवले. या युध्दप्रसंगी सदाशिवभाऊनी *''दत्ताजी सिंदे यांचे मर्दुमकीची शर्थ आहे जसे ऐकण्यात आले तसे कर्तव्य करून दाखविले''* अशा शब्दात त्याची प्रशंसा केली. नबाबानेही *''गालिमांशी झुंजे बहुत केली, परंतु याप्रमाणे निधडा सरदार मराठियांत नाही.''* म्हणून त्याने दत्ताजी शिंदे यांची स्तुती केलेलो दिसून येते.[१०]

रघुनाथराव पेशवे व दत्ताजी – जनकोजीवरील जबाबदारी :–

रघुनाथराव लाहोरच्या स्वारीवरून परत येत असताना जनकोजी शिंदे यांनी रघुनाथराव याची भेट घेतली. मल्हाररावच्या मदतीने नजीबखानाने कार्यभाग बिघडविला, सबब कसेही करून प्रथम तुम्हो नजीबखांनाचे पारिपत्य करा, असे या भेटीत रघुनाथराव यांने जनकोजीस सांगीतले.[११] मल्हारराव होळकर यांनी नजीबखानास आपला धर्मपत्र मानल्यामुळे पेशवा रघुनाथराव यांनाही प्रत्यक्ष नजीबखानावर आक्रमण करता येत नव्हते तसे केले असते तर मल्हारराव होळकर नाराज झाले असते म्हणून त्यांनी हे काम दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांच्यावर सोपविले.

नजीबखान दत्ताजी शिंदेस फसवतोः–

नजीबखान इतिहासातील धूर्त व्यक्ती, मराठयांचा कर्दनकाळ म्हणून ओळखला जातो. मल्हारराव होळकर यांनी नजीबखानास आपला धर्मपुत्र मानले होते. गोविंदपंत बुंदेले व नजीबखान यांचाही स्नेह होता. दत्ताजी शिंदे लाहोरचा बंदोबस्त करून परत आला. तेंव्हा मराठयांचा अंमल दिल्लीत

---

[१०] भा. ब., पृ. ३६

[११] म.रि.उ.वि., भाग.०२,, पृ. १०२

कायम होणार अशी वेळ आली, म्हणून नजीबखानाने व बादशहाने अब्दालीस निकडीची पत्रे लिहून त्यास त्वरेने हिंदूस्थानात बोलावले होते. मात्र ही बाब मराठयांना माहीत नव्हती.[९२]

दत्ताजी शिंदे यांची स्वारी आपल्यावर होणार हे ओळखून नजीबखानाने गोविंदपंत बुंदेले यास याबाबत बोलणी केली गोविंदपंत बुंदेले याने याबाबत नजीबखानास निश्चिंत रहावयास सांगितले. गोविंदपंत ह दत्ताजीकडे आले व त्यांनी भागोरथीवर पल बांधण्याबाबत दत्ताजीस विचारले व याबाबत नजीबखानाची मदत घ्यावी असे सांगितले. दत्ताजीने गोविंदपंतास नजीबखानास भेटण्यास घेऊन यावे असे सांगितले. नजीबखान चार हजार फौजेनिशी दत्ताजीस भेटावयास आला असता मराठा सरदार जनकोजी शिंदे, अंताजी माणकेश्वर, जानोजीराव वाबळे यांनी नजीबखानाचे पारिपत्य करण्याची योग्य संधी आहे असे सांगितले. मात्र मोगलाई नितिस दत्ताजी शिंदे यांनी विरोध केला.[९३] शेवटी नजीबखान व दत्ताजी यांची भेट झाली व उभयतामध्ये बोलण झाल की, भगीरथीवर नजीबखानाने शिंदयाना फूल बांधून दयावा व शिंदयानी आक्रमण करून जी लूट मिळेल त्यातील दहावा हिस्सा नजीबखानास दयावा. नजीबखानाने ते मान्य केले व बेलभंडार इमान दत्ताजीस दिले.[९४]

मात्र नजीबखानाने दत्ताजीस गंगेवर पूल बांधून देण्याच्या थापा दिल्या होत्या. या कालावधीमध्ये पेशव्यानी अनेक वेळा पत्रे लिहून शिंदयाना

---

[९२] म.रि.उ.वि., भाग.०२,, पृ.११०

[९३] मोगलाई निती म्हणजे गप्तपणे शत्रूचा विश्वासघाताने घात करणे, दत्ताजी शिंदे यांनी यास विरोध केला यातच मराठयांच्या स्वभावधर्माचे सार आहे.

[९४] ''आम्हास भागीरथीवर पूल बांधून द्यावा. आघाडी तुम्हास देतो. पलिकडून रूपया मिळेल त्यात दहावी तक्षीम देऊ. तुम्ही आम्ही एका खंविदांचे चाकर एकनिष्ठ होऊन सेवा करावी.'' भा. ब., पृ. ४४–४५

कळविलेले दिसते की, नजीबखानाचा बंदोबस्त करावा मात्र दत्ताजीने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.[९५]

नजीबखानाचा दत्ताजीच्या विरोधात गुप्त तह :-

नजीबखानाने लगेचच शुजाउद्दौलाकडे आपला वकिल पाठविला व सदरच्या तहाबाबत माहिती त्यास दिली. शुजाउद्दौलाने एक करोड रूपये देण्याचे कबूल केले मात्र दत्ताजी शिंदे यास नदी पार करू देवू नये असे ठरले असा दत्ताजी विरोधात गुप्तपणे तह केला.[९६]

नजीबखानाने दत्ताजी शिंदे यास यवून सांगितले की, ''साहेब आपण गण मुक्तेश्वरी जावून तीर्थयात्रा करावी, मजला आज्ञा दयावी. मी मीरातपूर नजीक शुक्रताल आहे तेथे जावून भागीरथीवर पूल बांधून ठोक करतो. तोपर्यंत आपणही एक महिन्याने मागाहून यावे.'' यावेळीही दत्ताजीस इतर सरदार आपणहो नजीबखानाबरोबर जावून पूल प्रत्यक्ष बांधून घ्यावा असे सुचवत होते मात्र दत्ताजीने याहीवेळी इतरांचे ऐकले नाही.[९७]

पुढे एक महिन्यानंतर दत्ताजीस नजीबखानाने पत्रव्यवहार केला की, ''तूर्त बरसातकाल, नदीस पाणी भारी, तूर्त पूल सिध होत नाही. तुम्ही यासमयी कोणीकडे तरी मोहिमेस जावे.'' असे कळविल्यानंतर तरीही दत्ताजी शिंदे यांना नजीबखानाचा कृत्रीम भाव कळाला नाही व त्यांनी नजीबखानास पत्र पाठविले की, ''तूर्त राहिले तरी राहू द्यावे, तुम्ही फौजेसुधा यावे'' मात्र यावेळी नजीबखानाने साफ सांगितले की, ''आपणास यावयास अनकुल पडत नाही. तुम्ही देखील बुधी करावी'' असे नजीबखानाने कळविताच दत्ताजी

---

[९५] म.रि.उ.वि., भाग.०२,, पृ.११०

[९६] भा. ब., पृ. ४५.

[९७] भा. ब., पृ. ४५, ४६., म.रि.उ.वि., भाग.०२,, पृ. १११, ११२

शिंदे यांना आपण फसलो गेलो आहोत हे कळाले. आपण इतरांचे एकले नाही याचा त्यांना पश्चाताप झाला. काही दिवस दत्ताजीने अन्न पाणी सोडले पुढे जनकोजी शिंदे व इतर सरदारांनी दत्ताजी शिंदे यांची समजूत काढली.

अब्दाली व नजीबखान यांची बरारीघाट येथे सैन्याची मजबुती :–

नजीबखानाने पत्र पाठविल्याप्रमाणे अब्दाली आपल्या प्रचंड सैन्यासह हिदुंस्थानामध्ये उतरला. नजीबखान व अब्दाली यांच्या सैन्याची भेट बरारी–घाट[९८] येथे झाली व तेथेच त्यांनी आपल्या सैन्याची व्यूहरचना तयार केली.

दत्ताजीचे मदतीकरीता मल्हारराव होळकरास पत्र :–

अब्दाली आल्याचे कळताच दत्ताजी शिंदे यांनी मल्हारराव होळकर यास २७ डिसेबंर १७५९ रोजी मदतीकरीता पत्रे पाठविली व आपण ताबडतोब येवून मिळावे असे सांगितले.[९९] पत्र मिळताच मल्हारराव होळकर आपले सैन्य घेऊन ३१ डिसेबंर १७५९ रोजी आपले सैन्य घेऊन बाहेर पडले.[१००] मात्र दत्ताजीस मल्हारराव होळकरांची मदत तात्काळ मिळू शकली नाही. ज्यावेळी दत्ताजीने मदत मागितली त्यावेळी मल्हारराव होळकर बालवाडीच्या युध्दात गुंतले होते.[१०१] दत्ताजी शिंदे याचें पत्र मिळताच मल्हारराव होळकरांनी ती मोहिम अर्धवट सोडून दत्ताजीच्या मदतीस जाणे आवश्यक होते. २७ डिसेबंर १७५९ रोजी दत्ताजीने पुनः मल्हारराव होळकर यास तातडीचे पत्र पाठविले. त्यानंतर मल्हारराव होळकर तीन दिवसानतर दत्ताजीच्या मदतीस निघाले व

---

[९८] दिल्ली पासून १६ मैलावर बरारीघाट आहे.

[९९] पे.द., भाग, २, ११७

[१००] पे.द. २, ११३

[१०१] म. रि., *बाळाजी बाजीराव पेशवा,* खंड, ६, पृ. ३४१

१५ जानेवारी रोजी ते जनकोजीस येऊन मिळाल.[१०२] मल्हारराव होळकरास दत्ताजीच्या मदतीस ताबडतोब जाण्याविषयी पेशव्यांची शिदंयाकडून निकडीची बोलावणी जात होती, परंतु मल्हारराव होळकर यांनी टाळाटाळ कली व ते जयपूरच्या हददीत मुद्दामच रेंगाळत राहील असे दिसते.[१०३]

शुक्रतालची लढाई व दत्ताजी शिंदे यांचा मृत्यू:–

दत्ताजी शिंदे शुक्रतालच्या जवळ पोहचले असता रोहिल्याकडील वकील चेतराम हा दत्ताजीस भेटला. दत्ताजीने वकिलास एक करोड रूपयाची खंडणीची मागणी केली ती त्यांने धुडकावून लावली असता दत्ताजी शिंदे यांनी शुक्रतालवर आक्रमण केले.[१०४]

शुक्रताल येथे सैन्याचा तळ असताना शुक्रतालवर अनेक लहान मोठया चकमकी घडून आल्याचे दिसून येते. एके दिवशी गढीतून रोहीले चालून आले असता जनकोजी व दत्ताजी त्वेषाने त्यास सामोरे गेले. यावेळी जनकोजीची घोडी ठार झाली हातावर तलवारीची व कानास भाल्याची जखम झाली. दत्ताजीसही भाल्याची जखम व गोळी कातरती लागली.[१०५]

शुक्रतालवर अब्दाली, नजीबखान यांच्या सैन्याबरोबर दत्ताजीने युध्द चालू केले त्यावेळी साबाजी शिंदे व मालोजी शिंदे हे पराक्रमी सरदार कामी आले.[१०६] जनकोजी शिंदे व दत्ताजी शिंदे हे निशाणाजवळ शत्रू बरोबर झुंजत होते. याच वेळी यशवंतराव जगदाळेचा भाऊ पिराजी जगदाळे हा जवळच होता. त्याने भावाच्या प्रेतासाठी बराच यत्न केला तेंव्हा त्याचे प्रेत ओढा ओढा

---

[१०२] पे.द. २, ११७

[१०३] म.रि.म.वि., भाग–३, पृ. ११८

[१०४] भा. ब., पृ. ४६, ४७

[१०५] म.रि.म.वि., भाग–२, पृ. ११३

[१०६] भा. ब., पृ. ६७,६८

असे ओरडत असतानाच दत्ताजी शिंदे यांच्या बरघडीत एक गोळी येऊन लागली व ते घोडयाच्याखाली आले. राजाराम चोपदार व राघोबा शेणवी पागनोस हे दत्ताजो जवळ आले तर दत्ताजी जिवंत होते. इतक्यात तेथे नजीबखान रोहिला याचा गुरू कुतूबशहा[१०७] अंबारीत बसून आला. त्यावळी राघोबा पागनोस याने राजाराम चोपदार यास कुतूबशहास दत्ताजीस वाचविण्याबाबत विनंती करण्यास सांगितले. राजाराम चोपदाराने याबाबत कुतूबशहास विनंती केली असता कुतूबशहा दत्ताजी शिंदे यांच्या जवळ आले व त्यांनी दत्ताजी शिंदे यास विचारले की, *''पटेल हमारे साथ तुम और लढेंगे ?''* त्यावेळी दत्ताजी शिंदे यांने उत्तर दिले की, *''बचेंगे तो और भी लढेंगे''* यावर कुतूबशहाने कमरेचा सुरा काढून दत्ताजीचा शिरच्छेद केला व शोर आपल्याबरोबर घेतले. यावेळी राघोबा पागनिस व राजाराम चोपदार हे साहेब दत्ताजोस वाचवा एक करोड रूपये देतो असे विनवत होते मात्र कुत्बशहाने त्यांचे ऐकले नाही[१०८] अशा प्रकारे या शूरवोराचा दुर्देवीरोत्या रणागंणामध्ये शेवट झाला.

'बचेंगें तो और भी लढेंगे' अशा प्रकारचा कुत्बशहा व दत्ताजी यांचा संवाद होऊन त्याचे शीर कुत्बशहाने कापून नेणे वगरे बखरीतील भाग काल्पनिक दिसतो. दत्ताजी शिंदे यांच्या बरगडीत गोळी लागून त्यांचा मत्यू झाला असे सरदेसाईसारखे इतिहासकार मत व्यक्त करतात.[१०९] दत्ताजी शिंदे अब्दालीबरोबर लढताना त्यांच्या मानेवर गोळी लागून ते ठार झाले व

---

[१०७] पुढे पानिपत युध्दाच्या अगोदर कुंजपु–यावर आक्रमण केले असता हा कुतूबशहा मराठयांच्या ताब्यात सापडला. त्यास सदाशिवभाऊच्या समोर उभे केले असता त्यानी त्याचा दत्ताजीच्या वधाचा बदला म्हणून शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली. (भा. ब. पृ. ११०)

[१०८] भा. ब., पृ. ७१, ७२, म.रि.उ.वि., भाग.०२, पृ.१२३, १२४., सरकार, *मराठा साम्राज्याचे पतन,* २, पृ. १३६–१३८

[१०९] यादव गुजर, *मल्हारराव होळकर आणि त्यांचा काळ,* नागपूर, १९९१, पृ.१८२
म.रि.उ.वि., भाग.०२, पृ.१२५

जनकोजीस दंडास गोळी लागून ते घायाळ झाले अशा उल्लेखाचीही अनेक पत्रे आढळून येतात.[११०]

दत्ताजी शिंदे याचे शीर घेऊन शत्रू गेले असता राजाराम चोपदार व उमरावगीर गोसावी यांनी मध्यस्ती केली व नजीबखानास विनंती केली की, 'दत्ताजी शिंदे याचे शिर कापून आणले जे जहाले ते प्रारब्धानुसार झाले. तुम्ही आपला धर्म करावा तो केला. आता हिंदू धर्म आहे शीर ठेविलियांत नफा नाही. उमरावगीर गोसावी याचपासी बहुत मराठे आहेत. धड व शीर एकत्र करून त्याचे सार्थक करतील.'' मात्र नजीबखान एकत नव्हता त्याच्या म्हणण्यानसार मी शीर अब्दालीस नजर केले आहे ते मला परत मागता येत नाही. तेव्हा सुजाउददौलाने नजीबखानास विनंती केली, सरतेशेवटी उमरावगीर गोसावी यांनी दोन लाख रूपये अब्दालीस दिले असता त्यानी दत्ताजीचे शीर त्यांच्या ताब्यात दिले. यमुनातीरी धड व शीर याचे यथाविधी दहन करण्यात आले.[१११] या युध्दप्रसंगी जनकोजीचाही शत्रूने पाठलाग केला मात्र तो त्यास सापडला नाही.[११२] १० जानेवारी १७६० रोजी शुक्रताल येथे दत्ताजी शिंदेचा झालेल्या वधाची बातमी जवळ जवळ ३३ दिवसांनी म्हणजे १३ फेब्रुवारी १७६० रोजी अहमदनगर येथे पेशव्यांना समजली. पेशव्यांनी दत्ताजीच्या वधाचा बदला घेण्याकरीता उदगीरीहून सदाशिवभाऊंना ताबडतोब बोलावले व अब्दालीचा बंदोबस्त करण्यास उत्तर हिंदुस्थानामध्ये मोठया सैन्यानिशी पाठविले व पुढे पानिपतचा संग्राम घडून आला.[११३]

---

[११०] पे.द. खंड. ०१ पृ. १६५, पे.द. खंड.०२, पृ.११४, पे.द. खंड.२७, पृ.२४७, पे.द. खंड.२१, पृ. १८१, १८२, १८७, खंड. ०३, पृ.५१६, शिं. इ. सा., खंड.०१, पृ. १२०

[१११] भा. ब., पृ. ७७

[११२] म.रि.उ.वि., भाग.०२, पृ.१२३, १२४

[११३] यादव गुजर, *उपरोक्त,* पृ.१७१

मराठयांच्या इतिहासात जे कित्यक ह्रदयद्रावक प्रसंग आहेत, त्यांत दत्ताजीच्या वरोल पराक्रमाची गणना करावी लागेल. पानिपतच्या प्रचंड संहाराने दत्ताजीचे अचाट कृत्य लोपून गेले आहे. धन्याची कामगिरी पार पाडण्याकरिताच त्याने आपल्या प्राणाची आहुती दिली. 'बचेंगे तो और भी लढेंगे' हे त्याचे वाक्य आजही इतिहासात अजरामर आहे. मृत्यूला न घाबरणारा, रणागंणातून माघार न घेणारा, शत्रूला पाठ न दाखवणारा, धाडसी योध्दा असे अनेक गुण दत्ताजी शिंदे यांच्यामध्ये दिसून येतात.

<u>जोतिबा शिंदे</u> :–

जोतिबा शिंदे हा राणोजी शिंदेचा तीन नंबरचा पुत्र होता. पानिपतयुध्दा अगोदर अनेक युध्दामध्ये आपल्या बंधुसोबत भाग घेत असे. मात्र आपल्या इतर बंधुच्या पराक्रमाने जोतिबा शिंदे हे फारसे प्रकाशात आले नाहीत.

जोतिबा शिंदे हे जयाजी शिंदे यांच्या बरोबर असत कारण जयाजी शिंदे यांच्या सैन्याच्या पथकामध्ये त्यांचे नाव आढळते.[११४] वोडसाचे कारभारावर लक्ष ठेवण्यासाठी जयाजीने जोतिबाची नेमणूक केली होती.[११५] मल्हारकृष्ण हा वोडासाचा कारभार पहात होता त्याने वोडसेच्या राजावर ४ लाख रूपये खंडणी बसविली त्यापैकी १ लाख रूपये त्या राजाने दिले व बाकीचे देण्यास तो टाळाटाळ करत होता. तेंव्हा दंड म्हणून पुन्हा मल्हारकृष्णने त्याच्यावर १०,५०० रूपये आकारले. या गोष्टीचा सुड घेण्यासाठी त्या राजाने कारस्थान रचले व १७४२ मध्ये मल्हारकृष्णाचा व

---

[११४] शि.इ.सा., भाग.०१, पृ. ०३

[११५] पे.द., खंड.–२१, पृ.०५., पे.रो., पृ. २८

जोतिबाचा खून घडवून आणला.[११६] पुढे त्यागावची सनद पेशव्यांनी जयाजी शिंद यांच्या नावे करून दिलेली दिसून येते.[११७]

<u>तुकोजी शिंदे</u> :–

महादजी शिंदे व तुकोजी शिंदे हे राणोजी शिंदे यास चिमाबाई या रजपूत स्त्री पासून झालेले दोन पुत्र होते. तुकोजी शिंदे हा आपल्या भावांच्या बरोबर प्रत्येक युध्दात भाग घेत असे. तो नेमका कधी मरण पावला याचा उल्लेख सापडत नाही.[११८] तुकोजीच्या मृत्यूबाबत मतभेद आहेत. तुकोजी जाटांच्या बरोबरच्या लढाईत (१७५४) कुंभेर येथे मृत्यू पावला असा एक मतप्रवाह आहे.[११९] गिलच्याच्या बरोबरच्या लढाईत दत्ताजी मारला (१७५९) गेला.[१२०] असाही एक मतप्रवाह आहे. परंतू या दोन्ही गोष्टिबाबत उपलब्ध बखरीत अधार नाही. तुकोजी शिंदे हे पानिपतच्या लढाईत (१७६१) सदाशिवभाऊंच्या बरोबर होते. सदाशिवभाऊ गर्दीमध्ये मिसळल्यानंतर तुकोजीही त्यांच्याबरोबर राहिला होता व त्यांना रणागंणामध्ये वीर मरण आले असेही मानले जाते.[१२१] मात्र पानिपत नंतर शिंदयाची सरदारकी कोणास दयावी याबाबत वाद चालला होता त्यावेळी ती तुकोजीसही राघोबादादाने देवू केली होती त्यावरून तुकोजी शिंदे याचा मृत्यू पानिपत युध्दाअगोदर झाला नाही ही बाब सत्य असल्याचे दिसते.

---

[११६] वोडसेकरांनी मल्हारकृष्णास दगा करून मारले....... कोणी राजाने असा घात व दगा श्रीमंताचे लोकांशी केला नव्हता ऐसा वोडसेकराने केला. म.इ.सा., खंड. ०६, पृ.१७०

[११७] ''तुमचे धाकटे बंधू जोतिबा शिंदे हे कसबे (बदवा) सागर प्रांत वोडसे येथे लढाईत वारले (ठार झाले) यास्तव कसबे मजकूर कुळबाब कानुदरोबस्त इनाम पुत्र पौत्रादि वंश परंपरेने अनुभवणे.'' शि.इ.सा., भाग.०१, पृ. ०८

[११८] अ.म.मा.शि.च.का., पृ. ८१

[११९] रू.इं.मा.सिं., मालकम, उपरोक्त, ११८

[१२०] अ.शि.घ.इ., पृ. १३, ग्रॅन्ड डफ, पृ. ३१२

[१२१] अ.म.मा.शि.च.का., पृ. २०

<u>महादजी शिंदे</u> :–

शिंदे घराण्याची देशभक्ती व स्वार्थत्याग हे गुण पानिपत संग्रामाने उत्कृष्ट निदर्शनास आले. किंबहुना, पाऊणशे वर्षाचा महाराष्ट्राचा इतिहास हा या एका घराण्याने घडविला आहे असे म्हणण्यास हरकत नाही. पानिपताने सदाशिवभाऊचा बळी घेतला, पण महादजीच्या कर्तृत्वास जन्म दिला. पानिपताच्या रणागंणावरून परत आलेले उत्तर मराठेशाही सावरून धरणारे नाना व महादजी हे दोन राष्ट्रपुरूष होते. मागील विपत्तींच्या चिंरतन स्मरणाने व अनुभवाने पुढील राष्ट्रकार्य करण्याची प्रेरणा व संधी त्यांना प्राप्त झालेली दिसते.[१२२] महादजी हे शिंदे घराण्यातील स्वकर्तृत्वावर अतुलनिय कामगिरी केलेले वीरपुरूष होते.

महादजी शिंदे यांचा जन्म :–

महादजी शिंदे यांचा जन्म सन १७२७ की १७३० मध्ये झाला याबाबत इतिहासकारामध्ये वाद आहे. कीन यांच्या मते महादजी शिंदे यांचा मृत्यू झाला त्यावेळी ते ६७ वर्षाचे होते. या वरून त्यांच्या जन्मतारखेचा मेळ घातला असता त्यांचा जन्म १७२७ सालीच झाल्याचे स्पष्ट होते.[१२३] कीन एच. जी. यांच्या मताशी बर्वे एम. डब्लू. सहमत नाहीत त्यांचे मते महादजी शिंदे यांचे मृत्यू समयी वय ६७ वर्षे इतके नसून ६४ वर्ष होते यावरून त्यांचा जन्म १७३० मध्ये झाला. या मतास ते कॉम्पटनच्या मताचा आधार देतात.[१२४] मात्र

---

[१२२] म.रि.उ.वि., भाग.०२, पृ. २२३

[१२३] रू.इं.मा.सिं., पृ. ३६, ५२

[१२४] बर्वे एम. डब्लू., *महादजी शिंदीया,* इदोर, १९२१, पृ.०१.

रियासतकार सरदेसाई सारखे अनेक इतिहासकार महादजी शिंदे यांचा जन्म १७२७ मध्ये झाला असे मानतात.[१२५]

महादजीचे लष्करी शिक्षण :–

महादजी शिंदे हा सुभेदार राणोजी शिंदे याचा मुलगा होता. वयाच्या दहाव्या वर्षापासून महादजी युध्दाच्या रणागणावर आपल्या वडिलांच्या बरोबर जात होता. वयाच्या दहाव्या वर्षी 'वरात' येथील युध्दामध्ये त्यांने सहभाग घेतला होता. त्यानंतरच्या अनेक युध्दामध्य महादजीने राणोजी, जयाजी, दत्ताजी यांच्या बरोबर भाग घेतला त्यातूनच त्यास युध्दनोती, मुत्सद्देगिरी, राजनोती, धर्य याचे शिक्षण मिळत गेल असे दिसते.

पानिपतावरील महादजी :–

महादजी शिंदे यानी आपल्या भावांच्याबरोबर पानिपतयुध्दामध्ये सहभाग घेतला होता. विश्वासरावास गोळी लागणे, सदाशिवभाऊंचे गर्दीत मिसळणे, मराठयांचे अनेक महत्वाचे सरदार रणांगणात धारातीर्थी पडणे या गोष्टीमुळे मराठा सैन्य सैरावैर धावू लागले. तेव्हा महादजी शिंदे यानीही आपली घोडी पानिपतच्या रणागणातून परत फिरवली. पानिपतच्या रणागंणातून पलायन करत असताना त्यांचा एका रोहिला पठाणाने पाठलाग केला. रोहिला पठाणाची नजर महादजीच्या अंगावर असणा–या किंमती ऐवजावर व महादजीच्या सुंदर घोडीवर होती. महादजी घोडीवरून पळत असताना त्याच्या घोडीचा एक पाय खडडयात अडकला व घोडी कोलमडून पडल्यामुळे महादजो एका खड्डयात मूर्च्छा येवून पडल. त्यावेळी त्या पठाणाने महादजीच्या पायावर खोलवर वार करून त्याच्या अंगावरील किंमती ऐवज व

[१२५] सरदेसाई जी.एस., *द मेन करन्टस् ऑफ मराठा हिस्ट्री,* पृ. १३४

घोडी घेवून पळ काढला. त्याच रस्त्याने पेशव्यांच्या फौजेतील एक भिस्ती[१२६] राणेखान[१२७] चालला होता त्यांने महादजीस ओळखले त्यास दया येऊन त्याने त्यास आपल्या बैलावर असणा-या पखालीत घालून पेशव्यांच्या फौजेत आणले. पेशव्यांच्या छावणीत महादजीवर उपचार करण्यात आले मात्र पायावर खोलवर जखम झाल्यामुळे जन्मभरासाठी महादजी शिंदे यांना अपगंत्व मात्र आले.

राणेखानचे उपकार महादजी शिंदे कधीही विसरला नाही. आपल्या भावाचा दर्जा आणि मान, प्रतिष्ठा महादजीने त्यास दिला. त्यास महादजीने भाइ हा किताब दिला व तेंव्हापासून तो भिस्ती राणेखानभाई या नावाने ओळखला जावू लागला. शिंदयाच्या दौलतीमध्ये राणेखानभाईस खास मान असलेला दिसून येतो.[१२८] राणेखानने महादजीचा अत्यंत विश्वासू सल्लागार, जेष्ठ मुत्सद्दी, मध्यस्थ वकील, पराक्रमी सेनापती अशा अनेक भूमिका नंतरच्या काळात पार पाडल्याचे दिसून येते.

महादजी शिंदे यांना पानिपतच्या संग्रामानंतर राघोबादादाचा सरदारकी बाबत विरोध पत्करावा लागला मात्र पेशवे माधवराव यांनी पेशवे पदाचा कारभार स्वःताच्या हाती घेतल्यानंतर महादजी शिंदे यांच्याकडे शिंदे

---

[१२६] भिस्ती सैन्यामध्ये पाणी वाटण्याचे काम करत असत.

[१२७] राणेखान याचे पूर्ण नाव राणेखान वलद फत्तेखान पठाण असून त्याची दोन घराणी सध्या नांदत आहेत एक देवपूर, ता.सिन्नर, जि.नाशिक येथील व दूसरे ग्वाल्हेरास आहे. राणेखान याने महादजीस अफगाणाच्या तावडीतून सोडवले होते याचा परिणाम म्हणजे पुढे महादजीने त्यास जहागीरी, इनाम देवून खवासखान्यात उजव्या बाजूस बासण्याचा मान दिला होता. ग्वाल्हेर येथे खवासीवाले या नावाने राणेखानचे घराणे प्रसिध्द आहे. २२ डिसेंबर १७९१ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. भा.इ.स.म., ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड–०१, पृ.१३,१४.

[१२८] अ.शि.घ.इ., पृ. १५–१६.

दौलतीचा कारभार (१७६९) सोपविला.[१२९] शिंदे दौलतीचा कारभार हाती घेण्या अगोदर व कारभार हाती घेतल्यानंतर महादजीने अनेक मोहिमामध्ये, राजकारभारामध्ये नेत्रदिपक यश संपादन केल्याचे दिसून येते.

पेशव्यांचा उत्तरेकडील मोहिमा आखण्याचा मुख्य उद्देश दक्षिणेकडे द्रव्यनिधीचा ओघ वळविणे हा होता. पण द्रव्य संपादन केल्यानंतर ब–याच लहान – थोर सरदारांना वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याचा लोभ सुटत असे. सर्वस्व पणाला लावून मोहिमा फत्ते करून दक्षिणेकडे द्रव्यनिधी वळविण्याचे भान मात्र महादजीनी कधी सुटू दिले नाही. त्यामुळे पुढील कालखंडात सर्व मोहिमांचा भार एकटया महादजीवर पडला. महदजीसारखा पराक्रमी पुरूष पानिपतच्या युध्दातून वाचला नसता तर शिंदयाच्या या कार्याचा इतर कित्येक शूर घराण्याप्रमाणे मागमूसही राहीला नसता.

पानिपत युध्दामध्ये गेलेली मराठयांचो प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करून मोगल बादशहास महादजी शिंदे यांनी आपल्या वर्चस्वाखाली आणले. एकूणच उत्तरेतील आपल्या वास्तव्याच्या काळात महादजी शिंदे यांनी आपला व पर्यायाने मराठयांचा दबदबा पुन्हा उत्तरेत निर्माण केला. महादजी शिंदे यांनी परकीय सत्ताविरोधात आपले धोरण अवलंबत असताना नेहमीच मराठयांचे वर्चस्व सिध्द केल्याचे दिसून येते.

––––––))((–––––

---

[१२९] म.रि.उ.वि., भाग.०२, पृ. ९३, ९४

प्रकरण तिसरे

महादजी शिंदे व पेशवा संबध

प्रस्तावनाः–

पेशवा बाळाजी विश्वनाथ व शिंदे :–

पेशवा पहिला बाजीराव व शिंदे :–

पेशवा नानासाहेब व शिंदे :–

पेशवा रघुनाथराव व शिंदे :–

पेशवा रघुनाथराव व पानिपतनंतरचा शिंदे सरदारकीचा वाद :–

महादजी शिंद यांच्या अटकेचा प्रयत्नः–

महादजी शिंदे यांची प्रतिक्रियाः–

महादजी शिंदे यांना सरदारकीः–

नानाकडून फडणिसी गेलीः–

पेशवा माधवराव व रघुनाथराव यांचा संघर्ष :–

नानास परत फडणिसी मिळालीः–

पेशवा नारायणराव :–

पेशवा नारायणराव यांचा खून :–

बारभाईचे कारस्थान :–

बारभाई कारस्थानाबाबत राघोबाची प्रतिक्रियाः–

बारभाई कारस्थानाबाबत महादजी शिंदे यांची भूमिकाः–

राघोबादादाचा बंदोबस्त व महादजीः–

सदाशिवभाऊंचा तोतया व महादजी शिंदेः–

नाना फडणविस उत्तरेमध्ये जाण्यास उत्सुक होतेः–

मोरोबादादा यांचे कारस्थानः–

सखारामबापूस अटक :–

आशीरगडचा किल्लाः–

तुकोजी होळकरांची आशिरगडाबाबत प्रतिक्रिया :–

मराठा मंडळ व महादजी :–

नाना फडणविस व महादजीः–

फत्तेसिंग गायकवाड प्रकरणावरून नाना महादजी मतभेदः–

होळकर प्रकरण व नाना महादजी मतभदः–

अनुपगीर गोसावी प्रकरण :–

बादशहाकडून पदव्या स्वीकारण्यावरून घडून आलेला वाद :–

प्रस्तावनाः

मराठा साम्राज्याचे सर्वेसर्वा छत्रपती थोरले शाहू महाराज यांनी सातारा येथे राज्यारोहण केल्यानंतर राज्यकारभाराची व्यवस्था पेशव्यांच्याकडे सोपवली. पेशवा बाळाजी विश्वनाथ हे पराक्रमी होते त्यांनी महाराणी ताराबाई बरोबरचे यादवी युध्द अथवा इतर मराठा सरदार या सर्वांबरोबरच्या संघर्षामध्ये यश संपादन केले परिणामी शाहू महाराज यांनी बाळाजी विश्वनाथ यास पेशवे पद बहाल केले.[१] पेशव्यांच्या राजवटीत शिंदे, होळकर, पवार या सरदारांचा उदय झाला. शिंदयाच्या घराण्यातील राणोजी शिंदे यांनी कर्तबगारी, धाडस व सचोटी याच्या जोरावर माळव्यावरच्या संप्पन्न प्रांतावर आपले अधिष्ठान बसवले. राणोजी शिंदे यांच्यानंतर जयाप्पा शिंदे, दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे यांनी शिंदयाच्या दौलतीची धुरा सांभाळली. पानिपत युध्दानंतर महादजी शिंदे यांनी दोर्घकाळपर्यंत शिंदयाची सरदारकी आपल्याकडे ठेवली व मराठा साम्राज्यात आपला ठसा उठविला. उत्तरेतील मराठा साम्राज्याचा विस्तार हा प्रामुख्याने महादजी शिंदे यांच्या कालावधीतच घडून आला. १७८० ते १७९२ या कालावधीमध्ये महादजी शिंदे यांचे उत्तर हिदुंस्थानामधील राज्यकारभारावर एकतंत्री वर्चस्व होते. उत्तर हिंदुस्थानामध्ये

---

[१] नोव्हेंबर, १७१३ मध्ये शाहू महाराज यांनी बाळाजी विश्वनाथ यास पेशवे पद बहाल केले. – शाहू रोजनिशी पृ. ४२,

राज्यविस्तार करत असतांना तसेच बादशाही राज्यकारभार आपल्याहाती घेतल्यानंतर महादजी शिंदे व पेशवे यांचा संबध वारंवार येवू लागला या संबधाचा आढावा सदर प्रकरणात घेण्यात आला आहे.

- **पेशवा बाळाजी विश्वनाथ व शिंदे :–**

राणोजी शिंदे यांनी पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्याकडे पावलोक पदाची नोकरी (इ.स.१७१६) पत्करली व कन्हेरखेडच्या शिंदे घराण्याचा पेशव्यांच्या बरोबर संबध आला. पेशव्यांशी असणारे शिंदयाचे संबध पुढे वाढतच गेले. १७१८ मध्ये दिल्ली स्वारीच्यावेळी[२] व इतर विविध युध्द मोहिमांच्यावेळी राणोजी शिंदे हे पेशव्यांच्या बरोबर असत.

पेशवा पहिला बाजीराव व शिंदे :–

मराठा राज्याचा राज्यकारभार सुरळित चालावा याकरिता छत्रपती शिवाजी महाराज यांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. या अष्टप्रधानमंडळापैकी कोणतेच पद हे वंशपरंपरागत नव्हते. छ. शाहू महाराज यांनी बाळाजी विश्वनाथ यास पेशवेपद बहाल केले. बाळाजी विश्वनाथ यांच्या मृत्यूनंतर पेशवेपदाबाबत दरबारामध्ये बराच वाद–विवाद झाला. मात्र छत्रपती शाहू महाराज यांनी वंशपरंपरागत हा मुद्दा बाजूला ठेवून बाळाजीचा शूर पुत्र बाजीराव यास पेशवाईची वस्त्रे दिली.[३] पहिले बाजीराव यांनी आनेक युध्दामध्ये बाळाजी विश्वनाथ यांच्याबरोबर सहभाग घेवून शौर्य गाजवले होते. पेशवाईची वस्त्रे मिळाल्यानंतर हिदुंस्थानात राज्यविस्तार घडवून आणण्याकरीता पेशवा बाजीराव यांने फौज उभारली त्यामध्ये होळकर, शिंदे, पवार, बुंदेले हे प्रमुख होते.

---

[२] पे. द. – ३० पृ. २४६, २६०

[३] पे. ब., पृ. २४., थो.शा.च., पृ.४६–४८, ग्रॅन्ड डफ, पृ. २१४, २१५.

राणोजी शिंदे हे युध्दकलेमध्ये निपूण होते. पेशव्यांच्या बरोबरीने अनेक लढायांमध्ये त्यांनी सहभाग घेतला होता.[४] राणोजी शिंदे यांच्या अंगी शौर्य, कर्तृत्व, प्रामाणिकपणा, स्वामीनिष्ठता हे उच्च दर्जाचे गुण होते. बाजीराव पेशवे यांनी राणोजीस उत्तरेमध्ये मल्हारराव होळकर यांच्या बरोबर पाठविले व तेथून पुढे पेशव्यांच्या आदेशानुसार होळकर व शिंदे या समकालीन सरदारांचा उत्कर्ष दिवसे दिवस वाढतच गेल्याचे दिसून येते.[५] उत्तरेतील माळवा प्रांत व त्याच्या आजुबाजूचा प्रदेश हे शिंदे व होळकर यांचे कार्यक्षेत्र बनले.

इ.स. १७२४ च्या माळवा[६] व खानदेश स्वारीच्यावेळी बाजीराव पेशव्यांच्या बरोबर राणोजी शिंदे होते.[७] माळवा प्रांत जिंकला त्यावेळी प्रातांच्या बंदोबस्ताकरिता मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यांची नेमणूक पेशव्यांनी केली होती.[८] जाने. १७२९ मध्ये उज्जैनच्या वेढयाच्यावेळी, निजामाबरोबरच्या पालखेडच्या युध्दात तसेच पेशवा व दाभाडे (१७३१) यांच्यातील कलहामध्ये राणोजी शिंदे यांने पेशव्यांना मदत केली होती.[९] गुजरातचा सुभेदार अभयसिंग (मार्च १७३२) याचा बंदोबस्ताकरीता,[१०] उदाजी पवार व त्याचा सावत्र बंधू कृष्णाजी पवार याच्या विरूध्द पेशव्यांनी राणोजीची नेमणूक केली होती.[११]

राणोजी शिंदे यांची कामगिरी व शौय पाहून पेशव्यांनी राणोजीस अनेक पदव्या व मानसन्मान दिले होते. जुलै इ.स. १७२९ रोजी पेशव्यांनी

---

[४] शिंदे शकावली, पृ.०६., अ.शि.घ.इ., पृ.०६.
[५] हो. कै., पृ. ८
[६] हो. कै., पृ. ११., प.या.व., पृ. ५३५, अ.म.मा.शि.च.का., पृ.१५
[७] अ.शि.घ.इ., पृ. ८
[८] न.म.शि., पृ. १६, १७
[९] पे.द. १४, पृ. ३३, ३६
[१०] पे.द. १२, पृ. ७०–७१,
[११] पे.द. १४, पृ. १,२

राणोजीस वस्त्रे, संरजाम,[१२] कमावीसी,[१३] व पालखी बाळगण्याचा मान दिला.[१४] १७३० मध्ये सरदारकी बहाल केली.[१५] दि. २२ नोव्हेंबर १७३१ रोजी पेशव्यांनी मुतालीकीचे शिक्के राणोजीच्या नावे पाठवून दिले.[१६] अशाप्रकारे शिंदे घराण्यातील राणोजी शिंदे यांचा विविधप्रसंगी पेशव्यांच्याबरोबर संबध आल्याचे दिसून येते.[१७]

- **पेशवा नानासाहेब व शिंदे :–**

पेशवा पहिला बाजीराव यांच्यामृत्यूनंतर बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्याकडे छत्रपतीनी पेशवे पदाची धुरा सोपवली. पेशवे नानासाहेब हे शूर व मुत्सद्दी असल्याचे दिसून येते. राणोजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर (२१ जलै १७४५)[१८] नानासाहेब पेशव्यांनी राणोजी शिंदे यांचा वडिल मुलगा जयाजी[१९] शिंदे यांच्याकडे शिंदे दौलतीचा कारभार सोपविला. जयाजी शिंदे दौलतीचा कारभार पहात असले तरी दत्ताजी, जोतिबा, तुकोजी व महादजी यांच्या नेतृत्वाखाली शिंदयाच्या सैन्याच्या तुकडया होत्या. विविध युध्दामध्ये या बंधूनी सहभाग घेवून अनेक विजय संपादन केलेले दिसून येते.

दिल्लीची सत्ता कमजोर बनल्यानंतर मोगल प्रदेशातील अनेक भागामध्ये बंड उद्‌भवू लागले परिणामी अनेक सरदार स्वतंत्ररोत्या वागू लागले. रोहिलाखंडातील बंड[२०] किंवा पेशव्यांनी ज्या मोहिमा जयाजीवर

---

[१२] पे.द. ३०. पृ. २९०.
[१३] पे.द. ३०, पृ. २८२.
[१४] पे.द. ३०, पृ. २९१
[१५] हिं. द., भाग २, पृ. २२
[१६] पे.द., ३०, पृ. ३०६
[१७] म.शि.ना.फ.तु., पृ. ११
[१८] शि.इ.सा., पृ. ३७
[१९] आनेक पत्रामध्ये जयाजी व जयाप्पा असे उल्लेख आलेले दिसून येतात. सदर दोन्ही नावाच्या एकच व्यक्ती आहेत. महादजी शिंदे जयाजी शिंदे यांना जयाप्पा असे म्हणत असत.
[२०] अ.शि.घ.इ., पृ. १२

सोपवल्या त्या प्रत्येक मोहिमेमध्ये जयाजीने फत्ते मिळवल्याचे दिसून येते. मात्र मारवाडच्या स्वारीमध्ये विजयसिंहाने त्यांचा खून घडवून आणला.[२१] पेशवा नानासाहेब व पेशवा भाऊसाहेब यास जयाजीच्या मृत्यूची बातमी कळताच फार दुःख झाल्याचे दिसून येते.[२२] तसेच त्यांनी तात्काळ शिंदयाच्या मदतीची व्यवस्था केलेली दिसून येते.[२३]

जयाजी शिंदे यांच्यामृत्यूनंतर दत्ताजी व जनकोजी यांनी मारवाडच्या विजयसिंगावर मात केली. पेशवा नानासाहेब यांनी जनकोजी शिंदेच्या नाव सुभेदारी व शिक्के करून दिले व शिंदे दौलतीचा कारभार त्याच्याकडे सोपविला.[२४] जनकोजी शिंदे शेवटपर्यंत पेशव्यांच्या बरोबर एकनिष्ठ राहिले व पानिपतच्या युध्दामध्ये पेशवा सदाशिवरावभाऊ यांच्या साथीने अब्दालीबरोबर लढत असताना शत्रूच्या हाती सापडले[२५] व शेवटी वीरगतीस प्राप्त झाले.

'बचेगें तो और भी लढेगें' असा नारा देणारे दत्ताजी शिंदे पेशव्यांचे तडफदार सरदार म्हणून ओळखले जात होते.[२६] हैदराबादचा सलाबतजंग बरोबरची लढाई[२७] निजामाबरोबरची सिंदखेडची लढाई यामध्ये दत्ताजी शिंदे यांनी पेशव्यांच्या बरोबरोने शौर्य गाजवलेले दिसून येते. यावेळी सदाशिवरावभाऊनी व नबाबानेही त्यांची स्तुती केलेली दिसून येते.[२८]

पेशव्यांनी दत्ताजीची नेमणूक उत्तरेतील स्वारीवर केली त्यावेळी अनेक मोहिमांत त्यांनी यश संपादन केलेले दिसते. मात्र पानिपतयुध्दामुळे ज्या लढाईचे तेज झाकाळून गेले ती शुक्रतालची लढाई मराठयांच्यावर नजीबखान

---

[२१] जेष्ठ वद्य ७, ता. ३०/०६/१७५५ रोजी खून झाला. (म.रि.उ.वि.भाग.०२, पृ. ५७)
[२२] भा. ब., पृ. १५
[२३] म.रि.उ.वि. भाग–०२, पृ. ५८
[२४] भा. ब., पृ. १७
[२५] अ.शि.घ.इ., पृ. १४
[२६] भा. ब., पृ. ७१, ७२
[२७] कित्ता, पृ. १३
[२८] भा. ब., पृ. ३६

रोहिला[२९] याच्यामुळे ओढवली. त्याच लढाईमध्ये बरारी–घाट येथे दत्ताजी शिंदे यांचा मृत्यू झाला. दत्ताजीच्या मृत्यूनंतर पेशव्यांना अतोनात दुःख झाल्याचे दिसून येते. दत्ताजी शिंदे यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठीच नानासाहेब पेशवे यांनी सदाशिवभाऊ व विश्वासराव यांच्या नेतृत्वाखाली उत्तरेमध्ये सैन्य पाठविले व ऐतिहासिक पानिपत लढाई घडून आली. पानिपतच्या लढाईमध्ये मराठयांचा पराभव झाला या पानिपत युध्दामध्ये शिंद घराण्याने अतुलनीय असे शौर्य गाजविल्याचे दिसून येते.

पानिपतच्या रणागंणावर मराठयांचा मानहानीकारक पराभव घडून आला. मराठा सत्तेतील एक कर्ती पिढी पानिपतच्या रणागंणावर मृत्युमूखी पडली तद्नंतर थोडयाच दिवसात पेशवा नानासाहेब[३०] यांचाही मृत्यू घडून आला. या पानिपतच्या युध्दामध्ये सदाशिवभाऊ, विश्वासराव हे मृत्यूमखी पडले होते त्याचबरोबर शिंदे घरण्यातीलही अस्सल वंशाचे कोणी शिल्लक राहिले नव्हते. शिंदे घराण्यातील महादजी शिंदे व तुकोजी शिंदे हे जिवंत राहिले होते मात्र त्यांना राणोजी शिंदे यांचे दासीपुत्र म्हणून ओळखले जात होते.

पानिपतच्या लढाईत बैराग्याचा वेश धारून करून नाना फडणीस यांनी आपला जीव वाचविला[३१] तर घायाळ होऊन पडलेल्या महादजी शिंदे यांना

---

[२९]इतिहासातील धूर्त व्यक्ती म्हणून नजीबखानास ओळखले जाते. मराठयांचा अंमल दिल्लीत कायम होणार अशी वेळ आली तेंव्हा त्याने अब्दालीस निकडीची पत्रे लिहून त्वरेने हिंदूस्थानात बोलावले. याच नजीबखानास मल्हारराव होळकर यांनी आपला धर्मपुत्र मानले होते. **(म.रि.उ.वि. भा. ०२, पृ.११०.)** नजीबखानाने दत्ताजी बरोबर खोटी मैत्री निर्माण करून भगीरथी नदीवर पूल बांधून देण्याविषयी खोटे आश्वासन देवून फसविले होते. **(भा. ब., पृ. ४४–४५.)**

[३०] २३ जून १७६१ रोजी मृत्यू घडून आला.

[३१] पनिपतवर सदाशिवभाऊ नाहीसे झाल्यावर नाना फडणविसानी आपला घोडा परत पिरविला तेव्हा रामजीपंत यांनी नानास वेष बदलण्यास सांगितले. नानानी अंगावरील लढाईचा चिलखत वगैरे सर्व पोशाख उतरला व लंगोटी फक्त ठेवली तेंव्हा त्या ब्राम्हणाने

राणेखान यांनी वाचविले[३२] पानिपताच्या रणागंणावरून परत आलेले उत्तर मराठेशाही सावरून धरणारे नाना फडणवीस व महादजी शिंदे हे दोन महान राष्ट्रपुरूष होते.[३३] नाना फडणविस व महादजी शिंदे या दोन व्यक्तीनी मराठी सत्तेवर प्रगाढ ठसा उठविला. पानिपतच्या युध्दानंतर महादजी शिंदे यांना सरदारकी करीता संघर्ष करावा लागला मात्र पुढे पानिपतावर झालेल्या मराठयांच्या संहाराचा साक्षीदार असलेल्या महादजीने उत्तरेमध्ये झालेली मराठयांची हानी भरून काढण्यामध्ये महत्वाचे कार्य केले.

पेशवा रघुनाथराव व शिंदे :–

पानिपतच्या रणसंग्रामानंतर काही दिवसातच नानासाहेब पेशवे यांचा मृत्यू झाला व माधवराव यांना छत्रपतीनी पेशवेपदाची वस्त्रे बहाल केली.[३४] पेशवेपदाचा कारभार काहीकाळ रघुनाथराव पेशवे यांनी आपल्या हाती घेतला. पेशवा रघुनाथराव यांनी राज्यकारभार करत असताना सर्वसाधारणपणे मराठा साम्राज्याच्या हिताचा विचार न करता स्वःताच्या हिताचा व स्वःताचे महत्व कसे वाढेल याचाच विचार जास्त केलेला दिसून येतो. रघुनाथराव यांना स्वःताला पेशवे बनण्याची तीव्र इच्छा होती.[३५] त्यांच्या या धोरणाचा मराठा साम्राज्यावर दुरगामी परिणाम झालेला दिसून येतो. पेशवा रघुनाथराव व शिंदे घराण्यातील महादजी शिंदे यांचे संबध आले मात्र हे संबध शेवट पर्यंत विरोधात्मक राहिल्याचे दिसून येते.

नानास दक्षिणेकडे नेले. पुढे नानास यशवंतराव (चाबुकस्वार) रामजीपंत व विसोजीराव ब–हाणपूरकर यांनी मदत केल्याचे दिसून येते. – ना.फ.श., पृ. २६ ते २७

[३२] म. रि., खंड ५ पृ. ६६.

[३३] म. रि. खंड. ५. २२३

[३४] २३ जुन १७६१ रोजी माधवराव पेशवे यांना पेशवे पदाची वस्त्रे मिळाली. (ऐ.प.या., नं. १२९, पृ. १७९)

[३५] ना.फ.च., पृ. २३.

पेशवा रघुनाथराव व पानिपतनंतरचा शिंदे सरदारकीचा वाद :–

मराठयांची सत्ता उत्तरेत पानिपतयुध्दामुळे क्षीण झाली होती ती परत स्थापित करण्यासाठी व आपला अम्मल परत बसविण्यासाठी पेशव्यानी विसाजी कृष्ण बिनिवाले व रामचंद्र गणेश कानडे, महादजी शिंदे या तिघास फौज देऊन उत्तरेत पाठविले. मात्र शिंदयाच्या सरदारकीचा प्रश्न तसाच ठेवला.[३६] यावेळी महादजी शिंदे यांनी जनकोजी शिंदे यांचा शिक्का कारभारामध्ये काही दिवस वापरल्याचे दिसून येते.[३७]

शिंदे घराण्यातील जयाजी शिंदे, दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे, जोतिबा शिंदे इत्यादी महापुरूष हे पानिपत अगोदरच्या युध्दामध्ये व पानिपत संग्रामामध्ये कामास आले. या वीर पुरूषांची स्वामीभक्ती व स्वार्थत्याग हे गुण उत्कृष्टरित्या वेळोवेळी निदर्शनास आलेले दिसून येतात. मात्र महादजी शिंदे यास राणोजी शिंदेचा दासी पुत्र म्हणून गौण स्थान देण्याचा राघोबादादांनी प्रयत्न केलेला दिसून येतो. जयाजी शिंदे यांची पत्नी सखुबाई हिने राघोबादादास पत्र पाठवून महादजी हा दासी पुत्र आह असे कळविले होते.[३८] महादजी हा दासीपुत्र आहे असे कारण पुढे करून त्यास जर सरदारकी हवी असेल तर त्यांने सरकारात मोठी रक्कम अदा करावी असे राघोबादादा यांनी महादजीस सांगितले मात्र महादजीने यास नकार दिलेला दिसून येतो. राघोबादादांनी पुढे महादजीचा भाऊ केदारजी यास सरदारकी देवू केली[३९] मात्र त्यास केदारजीने नकार दिला व शिंदे घराण्यातील महादजी हाच एकमेव सरदारकीस लायक व्यक्ती असल्याचे सांगितल्याचे दिसून येते.

---

[३६] बर्वे, एम. डब्लू, उपरोक्त, पृ.१३–१४., अ.शि.घ.इ., पृ.१७,

[३७] ''श्री जोतिस्वरूप चरणी जयाजीसुत जनकोजी शिंदे निरंतर............''
गु.द., भाग–०२, पृ.०८, दि.०३–०७–१७६३, पृ. १५, दि. २१–०१–१७६५ (अप्रकाशित पत्रे, श्री नटनागर शोध संस्थान, सीतामऊ, माळवा म.प्र)

[३८] पे.द., खंड. २९, नं. ५३, पृ. ४८, पत्र दि. १५ मार्च, १७६४.

[३९] पे.द., खंड., ३९, नं. ३३, पृ. २५.

महादजी शिंदे यांच्या अटकेचा प्रयत्नः–

महादजी उत्तरेत स्वारीवर गेल्यानंतर राघोबादादानी शिंदयांच्या वंशातील मानाजी फाकडे[४०] यास शिंदयाची सरदारकी जाहीर केली (१० जुलै १७६४)[४१] मानाजी फाकडेस सरदारकी दिल्यानंतर महादजीचा होणार विरोध लक्षात घेवून रघुनाथरावाने त्याला कैद करून ठेवण्याचीही तयारी केली होती. त्यासाठी देवजी बयाजी नावाच्या होळकराच्या मर्जीतील सरदारास आज्ञा दिली होती. परंतु महादजीने युक्तीने कैदेचा प्रसंग टाळल्याचे दिसून येते.[४२] शिंदे फॅमिलीचा इस्टेटीचा दिवाण नारोशंकर याच्याबरोबर राघोबादादाने महादजीस कैद करण्याबाबत एक करार केल्याचे दिसून येते. या करारानुसार महादजीस पकडून हात बांधून नर्मदेवर आणावे व श्रीमत सांगतील त्याप्रमाणे त्याने भाषण करावे असे ठरले होते मात्र त्यामध्ये नारोशंकरास अपयश आल्याचे दिसून येते.[४३]

महादजी शिंदे यांची प्रतिक्रियाः–

राघोबादादाने मानाजी फाकडे यास १० जुलै १७६४ रोजी सरदारकी जाहीर केल्याचे समजताच महादजी नाराज होऊन राघोबादादाची परवानगी न घेताच १५ जुलै १७६४ रोजी उजैन येथे गेले.[४४] राघोबादादाचा येणारा दबाव इतर बाबींचा विचार करून महादजी शिंदे माळवामध्ये गेले.[४५] पुढे महादजी शिंदे सुलतानजी निबांळकर यांच्याकडे गेले. निंबाळकर हा बीडचा

---

[४०] लढाईमध्ये अतुलनिय कामगिरी करणा–यास, शौर्य गाजवणा–यास फाकडा ही पदवी दिली जाते. इतिहासामधे तीन फाकडे प्रसिध्द आहेत १) मानाजी शिंदे – फाकडा २) इष्टुर फाकडा म्हणजे स्टुअर्ट व ३) कोन्हेरू फाकडा म्हणजे कोन्हेरराव पटवर्धन

[४१] पे.द., खंड. २९, नं. ४८, पृ., ४३, ऐ.प.या., नं. २०४, पृ. १८६.

[४२] प.या.व., पृ. ११२., अ.म.मा.शि.च.का., पृ. ९२

[४३] हि. द., खंड–०३, पृ. ३३ ते ३५.

[४४] पे.द., खंड.२९, नं., ६२, पृ. ५७, नं. ६४, पृ. ५९, नं. ५८, पृ. ८८.

[४५] पे.द., खंड. २९, नं. ९२, पृ.२५.

(मोगल बादशहाचा) ठाणेदार होता त्याची भाची अन्नपूर्णाबाई बरोबर महादजीचा विवाह झाला होता. अन्नपुर्णाबाईच्या मामाने मौजे खोकर मोह परगणे जायखेड हा गाव आंदण दिला होता. सदर गावानजीक असणा–या मौजे रायमोह येथे मनसूरशहावल्ली या नावाचा फकीर राहात होता त्याच्या सेवेत महादजी काही काळ राहीले.[४६] एकूणच येथे महादजीने राजकीय सन्यास घेण्याच्यादृष्टिने पावले उचललेली दिसून येतात.

महादजी शिंदे यांना सरदारकी :–

पेशवा रघुनाथराव यांचा महादजी शिंदे यांना सरदारकी देण्याबाबत विरोध होता. पेशवे पदाचा कारभार रघुनाथराव यांच्याकडून माधवराव यांनी आपल्या हाती घेतला. महादजीस सरदारकी मिळावी असे मल्हारराव होळकर, नाना फडणविस, हरिपंत फडके या मंडळीनाही मनापासून वाटत होते. माधवराव पेशवे यांना महादजीची कार्यक्षमता, शौर्य, धाडस, धडाडी याची माहिती होती[४७] उत्तरेमध्ये खंडण्या गोळा करण्यमध्ये तसेच युध्द मोहिमामध्ये महादजीने महत्वाची कामगिरी बजावली होती.[४८] याचाच परिणाम म्हणजे त्यांनी राघुनाथरावदादा यांचा विरोध डावलून महादजी शिंदे यांच्याकडे शिंदे दौलतीचा कारभार सोपविला व शिंदयाकडे चालत आलेले सर्व संरजामही त्यांनी त्यांचे नावे दिले.[४९] नाना फडणविस यांनी स्वतःच्या हातानी महादजीच्या सरदारकीची सनद लिहली[५०] पूर्वीपासून स्वामी सेवा एकनिष्ठपणे

---

[४६] अ.शि.घ.इ., पृ. १६., बर्वे एम. डब्लू., उपरोक्त, पृ. ११

[४७] सरकार, *फॉल ऑफ द मुघल एम्पायर,* खंड. ०२, पृ. ३४६.

[४८] गु. द. क्र.०२, पृ. १६, २३, २५ (अप्रकाशित पत्रे, श्री नटनागरशोध संस्थान, सीतामऊ, माळवा, म.प्र.)

[४९] २० जानेवारी १७६९ चे पत्र, माधवराव नानांना कळवितात, महादजी शिंदे याजकडे परगणे येवलाबाद हा सरंजाम म्हणून असता जप्ती का केली. तरी मोकळा करणे व वसूल घेतला तोहि त्यांच्या कमाविसदारास देणे. **पे.द., ३९, ले. १०३., ना.फ.श., पृ. १८**

[५०] ''कदारजी व महादजी शिंदे यांचे नावे सनद की, जयाजी शिंदे, दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांचे कारकीर्दीत जो संरजाम त्यांच्याकडे चालत होता. त्याप्रमाणे हल्ली

करत आलात त्याचप्रमाणे करीत रहावे अशी अपेक्षाही या सनदेत व्यक्त केली होती. १७६९ मध्ये या सनदेनुसार शिंदे दौलतीचा कारभार महादजीकडे आला.[५१] महादजी शिंदे यांना विरोध करणा–यांचाही बंदोबस्त माधवराव पेशवे यांनी केला.[५२] शिंदे दौलतीचा कारभार हातामध्ये आल्यानंतर १७६९ ते १७९४ या कालखंडात महादजीनी मिळालेल्या संधीचे सोने केले. उत्तर हिदुंस्थानात मोहिमा आखून मराठी राजसत्तेचा अगदी सतलजपर्यंत विस्तार तर केलाच[५३] पण शिंदयाचे असे स्वतंत्र अस्तित्वही निर्माण केले.[५४] एकूणच महादजी शिंदे यांना १७६१ ते १७६९ इतका दीर्घ कालावधो सरदारकी मिळवण्याकरीता लागला.

नानाकडून फडणिसी गेली:–

राघोबादादानी पेशवे पदाची सूत्रे हातात घेतल्यावर मराठा राज्यकारभारामध्ये बरीचशी उलथा पालथ झाली त्यामध्ये नोव्हेंबर – डिसेंबर १७६२ मध्ये नाना फडणविसाकडून फडणिसी काढून घेण्यात आली.[५५] नाना फडणविस यांना त्या पदावरून काढून टाकण्याचे मुख्य कारण म्हणजे नानांचा कल हा दरबारामध्ये नेहमी माधवराव पेशवे यांच्या बाजूने असे.[५६]

तुमचे नावे करार करून दिला असे. तर कुलमामलतीचा वगैरे दौलतीचा बंदोबस्त राजेश्री अच्युतराव गणेश यांचे विद्यमाने करून पूर्वीपासून स्वामी सेवा एकनिष्ठपणे करत आलात त्याप्रमाणे करीत जावे...'' (सिलेक्शन फ्रॉम द सातारा राज ॲन्ड द पेशवा डायरी, पेशवा माधवराव – १, खंड–०१, पृ.१४५)

[५१] म.रि.उ.वि., भाग.०२, पृ. ९३, ९४

[५२] ३० जानेवारी १७६९ चे पत्र, नानास माधवरावांची आज्ञा की, राघोराम यांचे घर बागणी इंस्लामपूर नजीक व पालेकर यांचे घर चांभारगोंदयात आहे. ती घरी आतल्या वस्तभाव सुध्दा जप्त करावी कारण महादजी शिंदयाच पदरचे हे दोघे असता त्यांच्यावरच हे दोघे चालून गेले व मेलेही. पण घरे वगैरे जप्त करावी. **पे.द.२९, ले. २२९., ना. फ. श., पृ. १९**

[५३] जोशी शं.पु., *मराठयांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार,* भा.इ.सं.म.,पुणे, प्रास्ताविक, पृ०३

[५४] म.रि.उ.वि., भाग.०२, ९३, ९४

[५५] ना. फ..श., पृ. ०४

[५६] ऐ.ले.सं. १ ले, १३७ पृ. १५७.

नानाकडे जर फडणविसी तशीच चालू ठेवली तर राज्यकारभार आपल्या तंत्राने करणे अवघड होईल याची कल्पना रघुनाथराव पेशवे यांना होती.

पेशवा माधवराव व रघुनाथराव यांचा संघर्ष :–

मराठा साम्राज्यातील पेशवाईची वस्त्रे माधवराव यांना मिळाल्यानंतर ते अल्पवयी असल्यामुळे राज्याचा कारभार रघुनाथराव व सखारामबापू पहात होते. परंतु सदर बाब पेशव्यांची आई गोपिकाबाई यांना मान्य नव्हती. राज्याच्या सर्व कारभार रघुनाथराव यांच्याकडे दिल्यास ते आपले वर्चस्व निर्माण करतील व माझ्या मुलास म्हणजे माधवराव यास गौण स्थान प्राप्त होईल असे तिचे मत होते यातूनच पेशवा रघुनाथराव व गोपिकाबाई यांच्यामध्ये वैरभाव निर्माण झाला. रघुनाथवराव यांना स्वःताबाबत खूपच अभिमान होता त्यांचे मते आपण जर मराठा राज्यकारभाराची सुत्रे सोडून दिली तर या साम्राज्यास कोणी वाली राहणार नाही व गोपिकाबाईस परत आपणास मानाने विनंती करून बोलवावे लागेल. मात्र रघुनाथराव व सखारामबापू यांची अपेक्षा फोल ठरली व पेशवे माधवराव यांनी नाना फडणविस यांचे चुलते बाबुराव फडणविस यास फडणिसी व त्रिंबकराव मामा पेठे यांस कारभारी नेमले व राज्याचा कारभार चालविला. रघुनाथरावदादा यांना या गोष्टीचा राग आला परिणामी त्यांनी सत्ताधिशाबरोबर संपर्क साधून त्यांची मदत मिळवण्याचा प्रयत्न चालविला[५७] येथून पुढे पेशवे पदाबाबत संघर्ष वाढत गेल्याचे व पेशव्यांच्या ठिकाणी असणारे सामर्थ्य कमी होवून शिंदे, होळकर यासारखे सरदार प्रभावी, सामर्थ्यशाली बनल्याचे दिसून येते.

नानास परत फडणिसी मिळाली:–

नाना फडणविस यांची फडणिसी पेशवे राघोबादादा यांनी काढून घेतली होती. मात्र माधवराव पेशवे यांनी आपल्या हातामध्ये राज्यकारभार

[५७] अ. या., पृ. ०३,०४

घेतल्यानंतर बरेचसे निर्णय राघोबादादाच्या विरोधामध्ये घेतले त्यामध्ये नाना फडणविस यांना दिलली फडणिसी हे एक होय. नाना फडणविस हे फडणिसी गेल्यानंतर सिंहगडाकडे गेले होते. सप्टेबंर १७६३ मध्ये नाना फडणविस सिंहगडच्या पायथ्यासी कल्याण या गावी मुक्कामी असताना थोरले माधवराव पेशवे यांनी फडणिसीची वस्त्रे घेण्यासाठी नानास निमंत्रण दिले[५८] व ऑक्टोबंर १७६३ मध्ये नाना व मोरोबा यास माधवराव पेशवे यांनी फडणिसी दिली. मात्र यावेळी नाना व मोरोबा यांनी सरकारमध्ये मिळणा–या एकूण फडणिसी उत्पन्नापैकी १ लाख दहा हजार रूपये भरावेत असे त्यांच्यावर बंधन घातले.[५९] सदर रक्कम भरण्याबाबत नाना व मोरोबा यांनी विरोधही केल्याचे दिसून येते.

- **पेशवा नारायणराव** :–

श्रीमंत माधवराव पेशवा यांचे मृत्यूनंतर छत्रपतीनी नारायणराव यांना पेशवाईची वस्त्रे दिली. माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर पेशवाईस उतरती कळा लागली व पेशवाई फक्त नावास शिल्लक राहीली. शत्रूवर मराठयांचा असणारा वचक कमी झाला. पेशव्यांचे वर्चस्व कमी होवून मराठयांची राजसत्ता विभागली गेली. मराठे या व्यापक शब्दाच्या ऐवजी हिदुंस्थानच्या राज्य कारभारामध्ये शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड ही घराणी स्वतंत्रपणे पुढे आली.[६०] शिंदयाचा प्रदेश, होळकरांचा प्रदेश अशा प्रकारे मराठा साम्राज्य ओळखले जावू लागले.

पेशवा माधवराव यांच्या मृत्यूनंतर पेशवा नारायणराव व रघुनाथराव या दोघा चुलते पुतणे यांचे विचाराने पहिले काही दिवस पेशवा दरबारामध्ये राज्यकारभार चालत होता. मात्र दोन महिन्यानंतर उभयंतामध्ये द्वैतभाव

---

[५८] ऐ.ले.सं. ०२, ३५५ व ३६३, ना. फ. श., पृ.०५

[५९] ऐ.ले.सं. ०१, पृ. २९७, ५५७, ५९६, ६१२., ना. फ. श., पृ.०५

[६०] म.शि.ना.फ.तु., पृ. १०,११

उत्पन्न झाला. हा द्वैतभाव इतका वाढला की, पेशवा नारायणराव यांनी अविचारी लोकांचा सल्ला ऐकून रघुनाथराव व आनंदीबाई यांना कैदेत टाकले. यावेळी नाना फडणविस व सखारामबापू यानी पेशवा नारायणराव यास असे कृत्य न करण्याबाबत सल्ला दिला मात्र त्यांनी ता सल्ला न मानता उलटपक्षी दादासाहेब व आनंदीबाई यांचा छळ करण्यास सुरूवात केली. पेशवा नारायणराव यांचे दरबारामध्ये वागणे बरोबर नसे त्यांच्या स्वभावातील पोरपण गेला नव्हता. छ. शिवाजी महाराज यांनी नेमून दिलेला मुख्य कारभारी सखारामबापू यांचाही त्यांनी भरदरबारामध्ये शिवीगाळी देवून अपमान केला. याचा परिणाम म्हणजे दरबारामधील इतर मुत्सद्दी मंडळी आपल्यावरही सखारामबापूसारखी वेळ येवू शकते या विचाराने मागे सरून राहू लागली[६१]

- **पेशवा नारायणराव यांचा खून :-**

पेशवा नारायणराव यांनी रघुनाथरावास कैदेत ठेवून त्यांचा छळ करण्यास सुरूवात केली. परिणामी पेशवा रघुनाथराव यांनीही आपल्यास अनकुल असे सरदार मंडळीना आपल्या बाजूस वळविण्यास सुरूवात केली व पेशवा नारायणराव यांचा बंदोबस्त करण्याकरीता कारस्थान रचले. दरबारातील अनेक असंतुष्ट, दुखावलेली मंडळी देखील रघुनाथराव पेशवे यास जावून मिळाली. रघुनाथराव करत असलेल्या कारस्थानाचा सुगावा सखारामबापू व इतर आनेकांना लागला होता मात्र त्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. मात्र या कटाचा सुगावा नाना फडणविस, मामा, हरिपंत यांना नव्हता असे दिसून येते.[६२] राघोबादादा करत असलेल्या कटाची

---

[६१] अ. यो. पृ.०८

[६२] २६ नोव्हेबर १७७५ महमंद युसूफ – नारायणरावाचा एक मारेकरी म्हणतो – नाना फडणविस, मामा, हरिपंत यांस मात्र ठाऊक नाही. वरकडांस नारायणरावास धरणार हे माहित होते. इ.सं.ऐ.चर्चा पृ. ०८, ना. फ. श. पृ. ४३

मजल खुनापर्यंत जाईल असे कोणास वाटत नव्हते. ऐनवेळी आनंदीबाई, गारदी व प्रभू लोकांनी नारायणरावाचा खून घडवून आणला व रघुनाथराव यांना पेशवे पदाच्या गादीवर बसवले.[६३]

पेशवा नारायणराव यांचा ३० ऑगस्ट १७७३ रोजी शनिवारवाडा येथे खून झाल्यानंतर दरबारामध्ये मोठया प्रमाणात घडामोडी घडून आल्या.[६४] दरबारामधील अनेक मंडळी या झालेल्या घटनेबद्‌दल राघोबादादाच्या विरोधात गेली कारण प्रकरण नारायणराव यांच्या कैदेपर्यंत न राहता खुनापर्यंत गेले ही गोष्ट कोणासही मानवणारी नव्हती. यावेळी कारभारी सखारामबापू यांनीही राघोबादादासमोर सदर प्रकरणाबाबत नाराजी व्यक्त केलेली दिसून येते.[६५]

- **बारभाईचे कारस्थान :-**

पेशवा नारायणराव याच्या मृत्यूच्यावेळी त्यांची सुविज्ञ पत्नी श्रीमंत गंगाबाई यांना गर्भ राहिला होता परिणामी त्यांना सती जाण्यापासून परावृत्त करण्यात आले.[६६] याचवेळी दरबारामध्ये प्रामुख्याने दोन गट पडले होते. एक गट हा जुने सरदार सखारामबापू यांच्या नेतृत्वाखाली होता या गटामध्ये कोल्हापूरकर महाराज, नागपूरकर भोसले, निजामअली, हैदरअली इत्यादी होते. दुसरा गट हा नाना फडणविस यांच्या नेतृत्वाखाली होता यामध्ये पटवर्धन, पेठे, रास्ते वैगरे मंडळी होती. शिंदे व होळकर यांनी तटस्थ धोरण

---

[६३] अ. यो., पृ.०९

[६४] ऐ.प.या. पृ. ४६३.

[६५]सप्टेबंर १७७३ म्हैसकर यांचे पत्रात सखारामबापूचे राघोबादादास म्हणणे की, नारायणरावास मारले ही गोष्ट फटकळ झाली. फडणीस लेखणीचे धनी, त्यास बोलावून सांगावे. लिहण्याचे काम त्यांनी केल्याखेरीज परिणाम नाही. आम्हास समाधान नाही, आम्ही घरास जातो. ऐ.ले.सं.०४, पृ. १९९१, ना. फ. श., पृ. २९)

[६६] ना. फ. ब., पृ. ३२

स्विकारले होते मात्र त्यांचा कल हा नानाकडेच असल्याचा दिसून येतो.[६७] याचवेळी न्या. रामशास्त्री प्रभुणे यांनी न्यायदान केले की, राघोबादादा याचा नारायणराव पेशव्यांचा खून करण्यामध्ये हात होता व राघोबादादा हे दोषी आहेत.[६८] याचा परिणाम म्हणजे मोठया प्रमाणात लोकमत हे राघोबादादाच्या विरोधात गेले.

नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर रघुनाथरावदादा हे पेशवे बनले यावेळी चिंतो वामन व मोरोबा फडणविस हे राघोबाचे दोन प्रमुख सल्लागार व कारभारी होते.[६९] राघोबादादा यांनी पेशवापदाची जबाबदारी स्विकारल्यानंतर कर्नाटक मोहिम काढली व ते कर्नाटक मोहिमेवर असताना दरबारामधील दोन्ही गट एक होऊन राघोबास पदच्युत करण्याच्या कटामध्ये सामील झाले व बारभाई कारस्थान आकारास आले. सखारामबापू बोकिल, नाना फडणविस, हरिपंत फडके, त्र्यंबकराव पेठे, मालोजो घोरपडे, पटवर्धन यासारखे अनेक प्रतिष्ठित सरदार बारभाईमध्ये सहभागी झाले होते.[७०] सखारामबापू हे बारभाईमध्ये सर्वात वडील होते. मोरोबादादा, नाना फडणविस, हरिपंत फडके या सर्व मंडळीनी सर्वानुमते बारभाईचे प्रमुखपद बापूस दिले व सर्वानी त्यांना साथ करावी असे ठरले.[७१]

बारभाई कारस्थान आकारास आले त्यावेळी नारायणराव यांची पत्नी गंगाबाई या गरोदर होत्या तेंव्हा तिला मुलगा होतो की मुलगी यावरून दत्तक घ्यावयाचा की नाही हा निर्णय घेण्यात येईल व राज्यकारभाराची

---

[६७] अ. यो., पृ.११.
[६८] फॉरेस्ट, *सिलक्शन फॉर्म द लेटर्स डिस्पॅचेस ॲन्ड स्टेअ पेपर्स, मराठा सिरीज, खंड, १,* पृ. २५२.
[६९] पे.द., खंड, ३९, नं. १५६, पृ. १५८.
[७०] फॉरेस्ट, *उपरोक्त,* पृ. २५३, ऐ.ले.सं., खंड., ०५, नं. १२९९, पृ. २०९०.
[७१] पे.द. ०५, ले. ३३ दि. २१ फेब्रुवारी १७७४, ना. फ. श., पृ. ३२

दिशा ठरविण्यात येईल असे सखारामबापू बाकिल यांनी ठरविले.[७२] बारभाई कारस्थान आकारास आल्यानंतर १५ नोव्हेंबर १७७३ रोजी सखारामबापू, परशुरामभाऊ व नाना फडणविस या बुजूर्ग मंडळीनी श्रीमंताचे दौलत रक्षणाविषयी एकीचा करार केला. याचवेळी त्यांना राघोबादादा यांचा होणा–या विरोधाची कल्पना होती, राघोबादादा हे गंगाबाईस ईजा पोहचवू शकतात हे लक्षात घेवून गंगाबाईच्या रक्षणासाठी उपाय योजना करण्याबाबत विचार विनिमय चालविला.[७३] बारभाई कारस्थानानुसार गंगाबाईस साता–यास नेऊन सातारच्या राजाचे नाव पुढे करून त्यांच्या नावे कारभार करावा असे सखारामबापू यांचे मत होते. मात्र फेब्रुवारी–मार्च १७७४ मध्ये गंगाबाईवर आनंदीबाईने मारेकरी घातले होते परंतु त्या कटाची माहिती नाना फडणविस यांना लागली व त्यांनी त्याचा योग्यरितीने बंदोबस्त केला. मात्र गंगाबाईस सुरक्षिततेच्या कारणास्तव साता–यास नेणे नाना फडणविस व इतर मंडळीनी विचार करून रद्द केले.[७४] यावेळी सातारा दरबारामधील मंडळीच्या मनामध्ये कोणतेही किल्मीष येवू नये म्हणून त्यांना पत्र पाठवून नाना फडणविस यांनी स्पष्टीकरण दिल्याचे दिसून येते.[७५] तदनंतर नाना, मोरोबा, हरीपंत फडके, एकत्र येवून त्यांनी गंगाबाईस पुरंदरास नेऊन ठेवले यावेळी शिंदे, होळकर, फत्तेसिंग गायकवाड, रास्ते साबाजी भोसले इत्यादी सर्व मंडळीनी अनुकूलता दर्शविल्याचे दिसून येते.[७६] बारभाई कारस्थानामधील प्रमुख मंडळी नाना

---

[७२] पे.द. खंड.०५, न.१७, पृ. १४., ऐ.ले.सं. खंड–०४, पृ. २००९.

[७३] ना. फ. श., पृ. ३०, ऐ.ले.सं. ०५, २०९०.

[७४] ऐ.ले.सं., ०५, ले. १३३०, १३४३., नाना फडणविस शकावली, पृ. ३३

[७५] ३ फेब्रुवारी १७७४, नानाचे पुरंदरवरून साता–यास बाबुराव आपटे यास पत्र की, सखारामबापू हे गंगाबाईस घेवून साता–यास येणार होते मात्र संरक्षणाच्या कारणास्तव त्यांना येता येत नाही. त्यामुळे त्यांचा आणि आम्हा सर्वांचा पुरंदरावर मुक्काम आहे. बापूच्या विषयी कोणताही संशय बाळगू नये ते पूर्णपणे अनुकूल आहेत. साबाजी भोसले, वामनराव, त्र्यंबकराव मामा वगैरे सर्व मंडळी अनुकूल आहेत. – ऐतिहासिक पत्रव्यवहार, ले. १३८., ना. फ. श., पृ. ३१

[७६] म. प. इ., ले. १७०, पृ. १७०., पे.द. भाग.०५, नं. १३, दि. ०८–०२–१७७४

फडणविस व सखारामबापू तसेच गंगाबाई व सवाई माधवराव हे पुरंदरवर असताना त्यांना दगा करून मारण्याबाबत कट राघोबादादा यांनी रचला होता. मात्र या कटाचा सुगावा नानास लागल्यानंतर त्यांनी पुरंदराच्या पायथ्यासी येणे बंद केले व सासवडहून पुरंदरावर प्रयाण केले त्याचबरोबर सुरक्षाव्यवस्थेमध्येही वाढ केली.[७७]

बारभाई कारस्थानाबाबत राघोबाची प्रतिक्रियाः–

बारभाई कारस्थान आकारास येत होते त्यावेळी राघोबादादा हे कर्नाटकच्या मोहिमेवर होते. बारभाई कारस्थानाचा सुगावा लागल्यानंतर राघोबादादा यांनी आपली कर्नाटकची मोहीम अर्धवट सोडून पुण्याकडे कूच केली. त्यावेळी कारभा–यांच्या तर्फे त्र्यंबकमामा पेठे हे रघुनाथराव पेशवे यांच्यावर चालून गेले मात्र त्यामध्ये त्यांचा पराभव झाला. पुढे हरिपंत फडके यांनी सैन्य जमा करून रघुनाथराव यांच्यावर आक्रमण केले असता रघुनाथराव यांनी आपला टिकाव लागत नाही हे ओळखून ब–हाणपुराच्या दिशेने पळ काढिला.[७८]

माधवराव पेशवे व राघोबादादा यांच्यातील संघर्ष मराठेशाहीसाठी दुर्भाग्यशाली आहे पूर्वीच्या पेशवाईत जसे बाजीराव व चिमाजी, बाळाजी बाजीराव व सदाशिवभाऊ यांनी न फुटता कारभार केला तसा उभयता माधवराव व राघोबानी करावा असे वाटणारा एक पक्ष त्यावेळी पेशवाईत होता. त्याप्रमाणे राघोबाशी सलोखा ठेवून त्याला राज्य कारभारात वाव माधवरावांनी दिला पण पुढे हे सहकार्याचे धोरण अशक्य झाले व त्याचे पर्यावसन धोडपच्या लढाईत झाले[७९] व राघोबादादास पराभव पत्करावा लागला. राघोबादादाचा हरिपंत फडके यांनी पराभव केल्यानंतर त्यांनी

---

[७७] ऐ.ले.सं.०५, ले.१४०५, दि. नोव्हेंबर १७७४, ना. फ. श., पृ. ३६

[७८] अ. यो., पृ. १२,१३

[७९] म.प.इ., ले. १५७, पृ. १५६, दि. १५–०६–१७६८., पे.द. भाग–१९, नं.८८

उत्तरेमध्ये पळ काढला. यावेळी हरिपंत फडके हे राघोबादादाचा पाठलाग करत उत्तरेमध्ये गेले. दक्षिणेतून राघोबादादा यांनी उत्तरहिंदुस्थानामध्ये पळ काढल्यानंतर उत्तरेतील मराठा सरदारांची मदत मिळेल अशी त्यांना अपेक्षा होती. राघोबादादानी निजामाचीही मदत मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.[८०]

बारभाई कारस्थानाबाबत महादजी शिंदे यांची भूमिकाः–

बारभाईमंडळीनी रघुनाथराव पशवे यांना पदच्युत करून कारभार आपल्या हाती घेतल्यानंतर शिंदे, होळकर इत्यादी सरदारांना या कारस्थानामध्ये सहभागी होण्याबाबत लिहले. त्यावेळी शिंदयानी आपण तुमच्या मसलतीमध्ये मनापासून अनुकूल आहे, सलग चार वर्षे दिल्ली, रोहिलाखंड वगैरे प्रांती स्वा–या कराव्या लागल्यामुळे मोठी फौज पदरी बाळगावी लागली आहे व त्या फौजेचे देणे तुंबले आहे त्या सर्वाचा निकाल लागल्यावर आपण दक्षिणेमध्ये येतो असे कळविले.[८१] मात्र यावेळी महादजीने आपले वजन कोणत्या पार्टीमध्ये टाकावयाचे हे ठरविले नसल्याचे दिसून येते.[८२] महादजी शिंदे यांना दक्षिणेमध्ये येण्याबाबत सांगितले असतांनाही ते आले नाहीत याबाबत मात्र पुणे दरबारामध्ये वेगवेगळे तर्क सुरू झाले. महादजीने राघोबादादाचा पक्ष स्पष्टपणे न सोडता एकसारखा धरसोडीचा प्रकार चालविला असा आरोप त्यांच्यावर केला जातो.

---

[८०] ''...सखारामबापू व नानानी बारभाई कारस्थान आकारास आणले. लहान मुलाचे नाव पुढे केले आहे तरी आपण सरकारचे जे लहान मोठे दुश्मन आहेत त्यांचे पारिपत्य करावयाचे आहे. त्यास आपण अनुकूल असावे मागील जहाला प्रकार दोन्हाकडूनही तणाव नसावा. हा तह दोस्तीचा ठरला असे शेवटपर्यंत तो टिकावा...'' पे.द., भाग–०५, नं.३२, दि. फेब्रुवारी १७७४, म.प.इ., ले. १७१, पृ.१७१.

[८१] अ. यो., पृ.१७,१८

[८२] फॉरेस्ट, उपरोक्त, पृ. २३३.

राघोबादादाने उत्तरेत पलायन केल्यानंतर शिंदे व होळकर यांनी राघोबादादास आश्रय दिला व आम्ही तुम्हच्याच पक्षात आहोत असे त्यास भासविले. परंतु नंतर सवाई माधवराव यांचा पक्ष जोमाने वाढत आहे असे पाहून शिंदे व होळकर यांनी सवाई माधवराव यांचा पक्ष स्विकारला असाही आरोप शिंदे व होळकर यांच्यावर केला जातो.[८३] मात्र या आरोपामध्ये तथ्य असल्याचे दिसून येत नाही कारण महादजी जरी लगेच बारभाई कारस्थानामध्ये सहभागी झाला नाही तरी तो पुढे बारभाईमधील एक प्रमुख घटक बनल्याचे दिसून येते. राघोबादादा जर यशस्वी झाला तर आपणास सरदारकी गमवावी लागेल याभितीने महादजीने तात्काळ राघोबाचा विरोध पत्करला नसावा.[८४] मात्र नंतर राघोबाचा बंदोबस्त महादजीनेच केल्याचे दिसून येते.

राघोबादादाचा बंदोबस्त व महादजीः–

बारभाई कारस्थान घडून आल्यानंतर काही दिवसातच सवाई माधवराव यांचा जन्म घडून आला व बारभाईस बळकटी मिळाली.[८५] बारभाईमधील प्रमुख मंडळीनी राघोबादादा यांचा बंदोबस्त करण्याचे काम प्रथम हाती घेतले. राघोबादादा याचा बंदोबस्त करण्याकरीता बारभाई मंडळीनी त्र्यबंक फडके, साबाजी भोसले व हरिपंत फडके यांची नेमणूक केली.[८६] हरिपंत फडके यांनी राघोबादादा यांचा पाठलाग चालू केल्यानंतर राघोबादादा यांनी ब–हाणपुराकडे महादजी शिंदे यांची मदत मिळेल या आशेने प्रयाण केले.[८७] यावेळी नानांनी महादजीस कळविले की, राघाबा खानदेशातून पळत

[८३] म.शि.ना.फ.तु. पृ. १२
[८४] म.शि.ना.फ.तु. पृ. १४
[८५] सवाई माधवरावांचा जन्म सोमवार दि.१८–०४–१७७४ रोजी झाला. पे.द. भाग.०५, नं.४५, म.प.इ., ले.१७३, पृ. १७२, धोंडो महादेव यांचे बाजीपंत आण्णास पत्र, दि. २१–०४–१७७४.
[८६] पे.द. खंड – ०५, नं. २४ पृ. २१,२२, ऐ.ले.सं.,खंड.०४, पृ.२००८.
[८७] पे.द. खंड – ०५, नं. ४९ पृ. ४४.

नर्मदापार जात असले तर त्यांना जावू देवू नये. तुम्ही व होळकर एक होवून आडवे व्हावे व राघोबादादास कैद करावी.[८८] त्यानंतर हरिपंत यांनी पत्र पाठविले की, राघोबादादा माळव्यात येत आहेत तेंव्हा त्यांची वाट अडवून त्यास पकडावे त्यावेळी महादजी शिंदे यांनी उलट पत्र पाठवून कळविले की, राघोबा हे माळव्यामध्ये दोन मार्गाने येऊ शकतात एक म्हणजे हुंडयाचा घाट व दुसरा म्हणजे बुडव्याचा घाट होय पैकी हुंडयाच्या घाटाचा बंदोबस्त आम्ही करतो व दुस–या मार्गाचा म्हणजेच बुडव्याच्या घाटावरील मार्गाचा आपण बंदोबस्त करावा. नेमके बुडव्याच्या घाटामार्गे राघोबा इंदैरपर्यंत थेट गेले. महादजी शिंदे यांच्यावर याप्रकरणाबाबत आरोप केला जातो की, महादजी शिंदे यांना पेशव्यांच्या घराण्यातील वादाचा स्वतास फायदा करून घ्यावयाचा होता. स्वःताचे महत्व वाढवावयाचे होते म्हणून त्यांनी राघोबाकडे दुर्लक्ष केले.

हरिपंत फडके हे राघोबाचा पाठलाग करत माळव्यामध्ये गेले असता महादजी शिंदे यांनी त्यास आपण राघोबादादाची समजूत काढतो तुम्ही पुढे न येता नर्मदातिरी छावणी टाकावी असे सांगितले.[८९] यावेळी महादजीने मध्यस्ती केल्यामुळे हरीपंत फडकेना माघार घ्यावी लागली. मात्र मोगल व भोसले यांच्या फौजा बरोबर असल्याने त्या फौजेबाबत व युध्द थांबविण्याबाबत नेमका निर्णय घेण्यास हरीपंत फडकेना अडचण निर्माण झाल्याचे दिसून येते. नानास यावळी महादजी राघोबादादाच्या पक्षास जावून मिळतो की काय याची भिती वाटत होती व त्याने राघोबाच्या पक्षास मिळू नये म्हणून नानाने वारंवार पत्रे पाठविल्याचे दिसून येते.[९०]

महादजी शिंदे यांनी राघोबादादाबरोबर बोलणे करून हरिपंतास निरोप पाठविला की, राघोबादादाचे फौजेचे देणे सात लाख रूपये झाले आहे ते

---

[८८] म. शिं.का., ले. ०१, १४ मार्च १७७४ नानांचे महादजीस पत्र

[८९] अ. यो., पृ.१८

[९०] ना. फ. श. पृ. ३४

दयावे म्हणजे राघोबादादा शरण येतील. हरिपंतानी यावेळी राघोबादादाच्या मागणीप्रमाणे पैसे पाठविले मात्र राघोबादादानी पैसे मिळताच सुजाउदौल्याकडे जाण्याच्यादृष्टिने आपली हालचाल चालू केली. महादजी शिंदे यांना सदर बातमी कळताच त्यांनी राघोबादादाच्या सैन्यास सभोवताली वेढा दिला व दक्षिणेकडे येण्याबाबत त्यांना सुचना केली. शिंदयाचा हा निग्रह पाहून राघोबादादांनी वाटेत हरिपंत फडके आहेत त्यास प्रथम बाजूस करावे मगच आपण दक्षिणेमध्ये येता असे सांगितले. महादजीच्या सांगण्यावरून हरिपंत आपला तळ हलवून व-हाडच्या सरहद्दीमध्ये देऊळ घाटाजवळ थांबले व राघोबादादाने दक्षिणेकडे कूच केलले दिसून येते.[११]

राघोबादादास दक्षिणेमध्ये घेवून येत असताना महादजी शिंदे यांनी आपले वकिलास पुरंदरवर सखाराम बापू व नाना फडणविस यांच्याकडे पाठविले. महादजीच्या वकिलाने यावेळी नाना फडणविस व बापू यांच्याबरोबर करार केला तो पुढील प्रमाणे –

१) राघोबादादा यांना दहा लक्षाची जहागीरी देण्यात यावी.

२) मराठा साम्राज्यात असणा-या किल्ल्यापैकी मध्यम पतीचे तीन किल्ले स्वदेशात राघोबादादास देण्यात यावेत.

३) राघोबादादाविषयीची मध्यस्ती शिंदयाच्याकडेच रहावी.

४) खर्चाकरीता शिंदयाना एक लाख रूपये व शिंदखेड[१२] हे गाव देण्यात यावे.[१३]

यावेळी महादजीने आपला स्वार्थ साधला अशी टोका व नाराजी नानानी पुढे व्यक्त केलेली दिसून येते.

---

[११] अ. या., पृ. १९.

[१२] शिंदखेड हे गाव लखुजी जाधवाची जहागीरी होती.

[१३] अ. यो., पृ. २०.

महादजी शिंदे यांनी पटवर्धनामार्फत जुलै १७७५ मध्ये राघोबादादा यांच्या बरोबर मध्यस्ती केलेली दिसते मात्र या घटनेनंतर नानांनी महादजीवर अविश्वास दाखविल्याचे दिसून येते. कारण नानांच्या मतानुसार श्रीमंत दादासाहेब उत्तरेमध्ये नर्मदा उतरून आल्यावर त्यांचा बंदोबस्त महादजी कडून होणे गरजेचे होते मात्र प्रत्यक्षात तसे काहीही घडून आले नाही. राघोबादादा गुजरात येथे पळून गेले नंतर पुढे हरिपंत व इतर सरदारांच्या भेटी झाल्यावर सर्वांनी मिळून राघोबादादाचा पूर्ण बंदोबस्त हाणे आवश्यक होते परंतु तेही शक्य झाले नाही. होळकरांनीही लक्ष दिले नाही. महादजीने शिंदखेड वगैरे ज्या मागण्या केल्या होत्या त्या सर्व पूर्ण करूनही ते उज्जैन येथे राहिले व राघोबादादाचा योग्य तो बंदोबस्त त्यांनी केला नाही.[१४] एकूणच नाना व महादजो यांच्यामध्ये येथून पुढे परस्पराविषयी आकस व अविश्वास निर्माण झाल्याचे दिसून येते.

महादजीच्या वकिलांने केलेला करार कारभा–यांनी मान्य केला. मात्र दक्षिणेमध्ये येत असताना राघोबादादा दररोज पुन्हा नवनवीन बोलणी बोलत होते. राघोबादादाच्या या दररोजच्या वेगवेगळया मागण्या वाढत चालल्यामुळे कारभा–यांना राघोबादादा व महादजीचा राग आल्याचे दिसते. कारभा–यांच्या मते शिंदयाच्या मध्यस्तीमुळे दादास आजपर्यंत पंधरा लाख रूपये, किल्ले व जहागीर दिली. शिवाय शिंदयानी स्वतः करीता जे जे आजपयत मागितले ते ते सर्व दिले तरीही राघोबादादास कराराप्रमाणे वागावयास लावण्याचे शिंदयाना जमत नाही. शेवटी कारभा–यांनी शिंदयास ''तुमच्याने निभत नसल्यास त्यास खुशाल वाटेल ते करू दयावे ते व आम्ही बघून घेवू.''[१५] असे सांगितले. महादजी शिंदे यांनीहो या निरोपाप्रमाणे आचरण केले परिणामी राघोबादादा यांनी संधी साधून अकस्मात एके दिवशी बंदोबस्तामधून बाहेर

---

[१४] ऐ.ले.सं., ले. १४८७, नाना फडणविस शकावली पृ. ४०
[१५] अ. यो., पृ. २१

पडून उत्तरेकडे पलायन केलेले दिसून येते. या प्रकरणाबाबत महादजीवर राघोबादादा यास सोडून दिले असा आरोप केला जातो. मात्र राघोबादांदानी पलायन केल्यानंतर लगेचच शिंदे व होळकर यांच्या फौजा राघोबादादाच्या पाठीमागे लागलेल्या दिसून येतात.

महादजीचे मनात रघुनाथरावास झासीचे किल्ल्यात कैद करून ठेवावे असे होते.[९६] मात्र आपणास झासीच्या किल्यामध्ये कैद करून ठेवणार आहेत ही बातमी राघोबादादा यास लागली व तेंव्हा पासून ते पहारेक–यांच्यावर हल्ला करण्याची संधी पाहत होते. चौंडी महेश्वर जवळ त्यानी पहारेक–यावर हल्ला कला व त्याना घायाळ करून ते भडोच येथे इंग्रजास जावून मिळाले[९७] पुढे इंग्रज मराठा युध्द घडून आलेचे दिसून येत व त्याकरीता शिंदे व होळकराच्या सैन्याने दक्षिणेकडे–पुण्याकडे कुच केल्याचे दिसून येते.[९८]

सदाशिवभाऊंचा तोतया व महादजी शिंदेः–

महत्वाच्या व्यक्तीच्या मृत्यूबाबत इतिहासामध्ये नेहमीच वाद उत्पन्न झालेले दिसून येतात. महत्वाच्या व्यक्तीच्या ठायी सर्वसामान्य जनतेची आस्था व श्रध्दा असते परिणामी ती व्यक्ती आपल्यामधून लोप पावली अथवा मृत्यूमुखी पडली असे मानावयास सहजासहजी लोक तयार होत नाहीत आणि याचाच फायदा या महत्वाच्या व्यक्तीच्या चेह–याशी साम्य असणा–या व्यक्ती घेत असल्याचे दिसून येते.

---

[९६] ....दादानी झांसी तालुक्यात रहावे त्याजपासी आम्हा उभयता (शिंदे–होळकर) सरदारांची दोन हजार फौज राहिल. रखवालीस खर्चास १२ लक्षाची जहागिरी .... दादासाहेबांचे खूळ तुटले. स्वारी भारी फौजेनिशी तिकडे उत्तरेत येईल. बादशहासही समजून घेतले जाईल.... गु.द., भाग.०४, पृ. ८६ (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान सितामऊ, माळवा, म.प्र.)

[९७] अ.शि.घ.इ., पृ.२०, २१

[९८] सि.अॅ.पॉ.डि.डा., नं. १८, ले.नं. २६, पृ. १३९–१४०.(अपकाशित पत्र, मुंबई पुराभिलेख, मंबुई)

इतिहासामध्ये हरिपंत फडके यांच्या भावाचा तोतया, जनकोजी शिंदे[९९] यांचा तोतया, सातारचे चतुरसिंग राजे भोसले यांचा तोतया, सवाई माधवराव याची बायको यशोदाबाई[१००] आहे असे सांगणारी एक तोतया स्त्री अशाप्रकारे आनेक तोतया निर्माण झालेले दिस्‌न येतात. अशाच प्रकारे पानिपत युध्दानंतर सदाशिवभाऊ यांचा निर्माण झालेल्या तोतयाने काही काळ सर्वांनाच चकित केलेले दिसून येते. सदाशिवभाऊ यांच्या मृत्यूबाबत अगोदरच वाद होता व त्यातच या तोतयाने भर घातली याला कारण म्हणजे सदाशिवभाऊ यांची पत्नी पार्वतीबाई यांना हा तोतया खरोखरच आपला नवरा कशावरून नसेल असे वांरवार वाटत असे. तिने सौभाग्यचिन्ह धारण करण्याचे व सौभाग्यवती हे उपपद लावण्याचे अजूनही टाकले नव्हते.[१०१] मात्र या तोतयास पकडण्यात आले व त्यास मिरज येथे ठेवण्यात आले. सदाशिव भाऊच्या तोतयाची खरेखोटेपणाची शहनिशा झाल्यानंतर त्यास मिरज येथून पटवर्धनांनी व नानांनी रत्नागिरीस २४ नोव्हेंबर १७७५ रोजी महिपत कृष्ण साठे यांचकडे पाठविले.[१०२] रत्नागिरीमध्ये रामचद्र नाईक पराजंपे हा सावकार होता त्याच्याकडे रत्नागिरीचो मामलत होती. रत्नागिरीस तोतया आल्यावर हा रामचंद्र नाईक त्यास अनुकूल झाला. तोतयास आपण सहाय्य केल्यास व कारस्थान उभे केल्यास आपला मोठया प्रमाणात फायदा होईल असे या नाईकास वाटून त्याने तोतयास कैदेतून मोकळे केले त्यास ऐश्वर्याची व

---

[९९] रघुजी थोरात चाडोलीकर यांने दोन वर्षे आपण जनकोजी म्हणून प्रदर्शन केले होते नोव्हेंबर १७६३ मध्ये ते उघडकीस येवून तो तोतया असल्याचे सिध्द झाले व त्यास शिक्षा झाली. – शि.इ.सा. भाग–०१, प. २२३ ते २७८ दरम्यान याबाबत अनेक पत्रे आढळून येतात. म.रि.उ.वि. भाग.०२, पृ. ४११

[१००] खरी यशोदाबाई १८११ साली मृत्यू पावली होती, तोतया यशोदाबाई १८२२ साली प्रकट झाली. ओक पु.ना., *पेशवे घराण्याचा इतिहास,* कॉन्टिनेटल प्रकाशन, विजयनगर, पुणे, ३०, आवृत्ती–२००१, पृ. २८०–२८१.

[१०१] अ. या., पृ . ४३

[१०२] स. मा. रो., भाग. ०२, पृ. ११७, ना. फ. श. पृ. ४३

अधिकाराची चिन्हे, स्वारीचा लवाजामा देवून त्याच्या नावाची ग्वाही फिरवली. रत्नागिरीचा किल्ला व सुभा त्याच्या हवाली केला.[१०३]

अधिकारी मंडळीनी या तोतयाची आनेकवेळा चौकशी करून तो कोकणातील एक कणोज ब्राम्हण असून खोटा आहे असे सिध्द झाले होते. परंतु तरीही काही व्यक्ती हा सदाशिवभाऊसाहेब खरा आहे असे समजून त्याच्यावर विश्वास ठेवत होती. त्यामध्ये कित्येक वजनदार घराण्यातील मंडळी होती. इचलकंरजीचे घोरपडे, परशुरामपंत भाऊचा चुलत भाऊ हरबा अण्णा, सदाशिवभाऊंचा मेव्हणा रघुनाथराव कोलटकर, पेशव्यांची मातोश्री गंगाबाई हिचा सख्खा मामा नारो शंकर, पेशव्यांचे आरमार इ. तोतयास वश झाले होते. विजयदुर्ग, देवगड, गोवळकोट, अंजनवेल, सुवर्णदुर्ग इ. किल्ले या तोतयाच्या ताब्यात होते. दक्षिण कोकण आपल्या ताब्यात घेवून उत्तर कोकणवर त्याने स्वारी केली. त्याच्याजवळ वीस हजार इतकी फौज जमा झाली होती व त्याच्या चौक्या बोरघाटावर राजमाचीपर्यंत बसत आल्या व तो पुण्यावर आक्रमण करण्याची तयारी करू लागला.[१०४]

१२ नोव्हेबंर १७७६ रोजी नानाने तोतयाचा बंदोबस्त करण्याकरीता बापूजी शिदे यास २०० चांगले सैन्य ठेवावे व पारिपत्य करावे म्हणून सनदपत्र दिल्याचे दिसून येते.[१०५] भिवराव पानसे याच्या नेतृत्वाखाली तोतयाचा बंदोबस्त करण्यासाठी कारभा-यांनी सैन्य पाठविल्याचे दिसून येते. पानसेनी बोरघाटांत लढाया करून तोतयास मागे सारले. मात्र तोतयाचा पूर्ण बंदोबस्त ते करू शकले नाहीत. शेवटी तोतयाचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी नाना व सखारामबापू यांनी महादजी शिंदे यांच्यावर टाकली. महादजी शिंदे यांनी पाचहजार सैन्यानिशी राजमाची येथे आक्रमण केले व

---

[१०३] सेन एस्.एन., *ॲग्लो मराठा रिलेशन,* पृ. २८२, २८३.

[१०४] अ. यो., पृ.४४

[१०५] स. मा. रा., भाग.०२, पृ. १२२, ना. फ.श. पृ. ४७

तोतयाचा बिमोड केला.[१०६] तोतया इंग्रजाकडे मदत मिळेल या आशेने समुद्र किना–याहून इंग्रजाकडे पळून जात असताना त्यास रघुजी आंग्रे यांने पकडले.[१०७] तोतया सापडल्यानंतर आंग्रेनी महादजीस याबाबत कळविले व २९ नोव्हेबंर १७७६ ला नाना व महादजी हे रघुजी आंग्रे यास सामोरे गेले यावेळी तोतयास पकडल्याबाबत नाना व महादजी यानी आनंद व्यक्त केल्याचे दिसून येते.[१०८] रघुजी आंग्रे यांनी महादजीची भेट झाल्यानंतर या तोतया भाऊसाहेबास महादजीच्या ताब्यात दिले.[१०९] महादजीने त्यास पुण्यास आणून कैदेत ठेवले[११०] व बाळाजी गोविंद व राणेखान यांच्याकडे त्याच्या बंदोबस्ताची जबाबदारी दिली.[१११] पुणे येथे या तोतयाची परोक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याकरीता एकूण सव्वीस पचाची नेमणूक करण्यात आली. त्यामध्ये सदाशिवभाऊच्या बरोबर वावरलेले लोक, त्यांच्या बरोबर लहानपणापासून असणा–या मंडळीचा समावेश करण्यात आला होता.[११२] यावेळी राम शास्त्री न्यायाधिस, बाबूजी नाईक बारामतीकर, गोपीनाथ दीक्षित, धोडिंबा पुरंदरे, हरीपंत फडके, त्रिंबकपंत इत्यादी सव्वीस पंच होते. सदाशिवभाऊंच्या लहानपणापासून परिचयाचे पंच मुद्दाम नेमले होते. सरदार व मुत्सद्दी ब्राम्हण यांनी त्याची परिक्षा घेतली. परिक्षेमध्ये तो तोतया खरा ठरला नाही. त्यांने आपले नाव श्रीमंत सदाशिव चिमणाजी भाऊ असे सांगितले. अंतिमता तो व्यक्ती भाऊ नाही असे ठरले तेंव्हा पेशव्यांची आज्ञा घेऊन कारभारी सखारामबापू व नाना फडणविस यांनी महादजी शिंदयांना तोतयाचे पारिपत्य करण्यास सांगितले. महादजीने तोतयास पुण्याचे उत्तरभागी कुंभारवेशीजवळ

---

[१०६] चं द., ले. नं ७६९, उत्तर हिंदुस्थानांतील बातमीपत्र.

[१०७] ऐ.ले.सं. खंड. ०६, नं. १८८१, पृ. २६५८.

[१०८] ऐ.ले.सं. ०६, ले. १९२४, १९०७, पृ. २६९३, ना. फ. श., पृ. ४८

[१०९] भा.इ.सं.मं.त्रै. वर्ष–१८४९, पृ.१६० – १६१, तोतया प्रकरणीचे एक बातमीपत्र, ले.प्रो.पोतदार व शं.ग. दाते

[११०] पे.द. खंड, ३६, नं. ३१४, पृ. २७२., ऐ.ले.सं., खंड. ०६, नं. १९२४, पृ. २७१०.

[१११] म.शि.का., नं.२६, म.प.इ., ले.१७७, पृ. १७४.

[११२] अ. या, पृ. ४७.

नेऊन मेकसू मारोन ठार केले आणि त्याचा सरदार दौलतगिरी यास हत्तीचे पायी दिल. पुढे त्याच्या लोकांनाही पकडून ठार मारण्यात आले.[११३] यावेळी तोतयाचा बिमोड करण्याकरीता ज्यानी मोलाची कामगिरी केली त्यांना नानाने बक्षीस दिल्याचे दिसून येते[११४]

वरील तोतया प्रकरणाबाबत विरोधामध्ये काही पुरावे सापडतात त्याचा विचार केला असता खरोखरच भाऊसाहेब मरण पावले होते का असा संशय निर्माण होतो. मुळ मोडी कागदपत्रामधील संदर्भ साधनांचे अवलोकन केले असता असे म्हणावे लागेल की, सदाशिवभाऊ पानिपत युध्दानंतर जिवंत होते. या मूळ संदर्भ साधनामध्ये भाऊस आलेली पत्रे यांचा प्रामुख्याने समावेश होतो.[११५] मात्र पानिपत युध्दानंतर मराठा सत्तेमध्ये राजकीय स्तरावर नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली होती ही पोकळी शत्रूस जाणवू नये म्हणून मुद्दाम शत्रूची दिशाभूल करण्यासाठी, सदाशिवभाऊ जिवंत आहेत असे भासवण्यासाठी सदरची पत्रे पाठविली असावीत असे दिसून येते. एकूणच सदाशिवभाऊ हे पानिपतच्या रणागंणावर मृत्यू पावले हे सत्य नाकारता येत नाही.

नाना फडणविस उत्तरेमध्ये जाण्यास उत्सुक होतेः–

---

[११३] भा.इ.सं.मं.त्रै. वर्ष–१८४९, पृ.१६० – १६१, तोतया प्रकरणीचे एक बातमीपत्र, ले.प्रो.पोतदार व शं.ग. दाते.

[११४] २२ मे १७७७ नाना फडणीस यांनी राजपुरी प्रांतातील हसमनीस येसाजी शिवाजी यास आप्तगीर दिली. कारण त्यांनी तोतयाशी लढाई दिली. तसेच ६ लोकास बक्षीस रूपये ५२५ देवजी सालोखे यास त्याचा बाप तोतयाप्रकरणी मारला गेला म्हणून असामी, जंजीरकर शामल यास सोडून कृष्ण सावंत हा सरकारकडे येऊन कामगिरी करू लागला म्हणून रू. ५०० दिल. – **स. मा. रो., ०१, पृ. १५, ना. फ. श. पृ. ५०**

[११५] अ) १७६५ चे खुद्द भाऊसाहेबांचा उल्लेख असलेले पत्र – ''श्री श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी सेवक रामपा जामदारखानी व वेंकट रामपा बहादर नी ...'' **पे.द., रू.क्र. ७, पु. क्र. ५, पत्र क्र. ३७७५ (अप्रकाशित पत्र, पुणे पुराभिलेख पुणे)**

ब) सन १७७३ नंतरचे पत्र – ''श्री श्रीमंत भाऊसाहेबाचे सेवेस सेवक भीकाजी काळे ––––––––'' **पे. द., रू.क्र. १९, पु. क्र. ९, पत्र क्र. ३७७५) (अप्रकाशित पत्र, पुणे पुराभिलेख पुणे)**

पानिपतच्या रणसंग्रामानंतर नाना फडणविस हे उत्तरेमध्ये गेले नव्हते जवळ जवळ आठरा वर्षाचा कालावधी त्यांना दक्षिणेमधील सर्व प्रश्न सोडविण्यामध्ये गेले. दक्षिणमधील सर्व प्रश्नांचा निकाल लागल्यानंतर नानांना उत्तरेमध्ये आपण जावे असे वाटू लागले.[११६] इंग्रजांचे पारिपत्य झाले होते ही बातमी बादशहास सांगावी. तसेच बादशहानेही नाना फडणविस यांनी उत्तरेमध्ये यावे याबाबत पेशव्यांचा वकिल हिंगणे यास बोलले होते. बादशहा व दिल्लीकरांना नाना फडणविस यांनी उत्तरेमध्ये यावे असे वाटत होते. यावरून नानांच्यामनामध्ये दिल्लीस जावे असे होते मात्र त्यांना ते मृत्यूपर्यंत जमले नाही.[११७]

मोरोबादादा फडणविस यांचे कारस्थानः–

राघोबादादाचा पूर्ण बंदोबस्त झाला नव्हता त्याचवेळी पुणे दरबारामध्ये मोरोबादादाचे कारस्थान उभे राहिले. नाना फडणविसाचे चुलत भाऊ मोरोबा हे माधवरावांचे बाहयत्कारे मुख्य प्रधान होते. मात्र पेशवा दरबारामध्ये त्यांना कोणताचा मान नव्हता परिणामी त्यांनी राघोबादादाचा पक्ष स्विकारला होता.[११८]

राघोबादादा यांने दरबारामधील असंतुष्ट लोकांना आपल्याकडे वळविण्याच्या दृष्टिने हालचाली चालू केल्या होत्या. मोरोबा फडणविस यास नानाने फडणिसीचा कारभार हाती घेतल्यानंतर दरबारामध्ये दुय्यम स्थान दिले होते. परिणामी मोरोबा आणि नाना फडणविस यांचा संघर्ष चालू झाला यातून मोरोबा व राघोबा हे जवळ आले.[११९] मोरोबाने राघोबादादास पेशवे

[११६] हि. द., भा.०२, ले. ८७

[११७] ना. फ. श. पृ.७१, २४ फेब्रुवारी १७७९ पुरूषोत्तम महादेव हिंगणे यांचे नानास पत्र

[११८] ना. फ. ब., पृ. ३३

[११९] एम. व्ही. बर्वे, उपरोक्त, पृ. ५३.

पदाच्या गादीवर बसविण्यासाठी कारस्थान रचले व या सर्व कारस्थानास इंग्रजांचे प्रबळ पाठबळ व सहाय्य असल्याचे दिसून येते.[१२०] तसेच या कारस्थानात सखारामबापूचांही गुप्तरित्या सहभाग होता.[१२१]

नानाबरोबरचा आपला संघर्ष टोकाला पोहचल्यावर मोरोबा नानास पदावरून पदच्युत करण्यासाठी मसलती करू लागला. त्याच्या कारस्थानातील मुख्य मुद्दे होते ते म्हणजे –

१) राज्याची मालकी व पंतप्रधानाचे पद सवाई माधवराव पेशवे याचकडे आह त्याप्रमाणे पुढेही असावे त्यात फेरफार करू नये.

२) पेशव्यांचे वय लहान असल्याने ते प्रौढ दशेत येईपर्यंत श्रीमंत दादासाहेबास हे पेशव्यांच्या जागी राहतील व वडीलकीचा मान हल्ली सखारामबापूकडे आहे तो राघोबादादाकडे देण्यात यावा.

३) पेशव्यांचे मुख्य कारभारी सखारामबापू आहेत ते पद त्यांच्याकडेच रहावे. सखारामबापूकडे सरंजामाचा मुलूख, इनामे व मानमरातब सरकारातून जे जे चालत आलेले आहेत ते तसेच पुढे चालू राहतील.

४) दुय्यम कारभारी पद व अखत्यारीचा कारभार सध्या नाना फडणविसाकडे आहे तो माझ्याकडे (मोरोबा) देण्यात यावा.

५) नाना फडणविसास दरबारामध्ये कोणतेही स्थान देण्यात येवू नये. याप्रमाणे मोरोबाच्या कारस्थानाचे मुख्य मुद्दे होते.[१२२]

महादजी शिंदयास ज्याप्रमाणे जहागीर देण्याचे नानानी मान्य केले होते त्याप्रमाणे होळकरास जहागीर देण्याचे मोरोबाने मान्य करून त्यास आपल्या

---

[१२०] ऐ.ले.सं., खंड. ०६, नं. २९८०, पृ. २८२०, ऐ.ले.सं., खंड. ०७, नं. २३२४, पृ. ३००९.

[१२१] गु. द., भाग.०४, पृ. १३२ (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान, सितामऊ, माळवा, म.प्र.)

[१२२] अ. यो., पृ. ६९–७०

पक्षात ओढले. होळकराबरोबर इतर अनेक सरदार मोरोबाच्या पक्षास येऊन मिळाले व सतरा हजार फौजेनिशी मोरोबाने पुण्यावर चाल केली. मोरोबा पुण्यावर चालून येत आहे हे समजताच नानाने पुणे सोडून पुरंदरवर पलायन केले व मोरोबाने पुण्याचा ताबा घेतला.[१२३] महादजी शिंदे यावेळी कोल्हापूरच्या मोहिमेवर होते. मोरोबा फडणविसानी आपल्या कारस्थानाचा भाग म्हणून चिंतो विठ्ठल यास मुंबईस पाठवून राघोबादादास ताबडतोब पुण्यास येण्याबाबत निरोप पाठविला. कारण रघुनाथरावास पेशवाईचा अधिकार देण्याची मसलत इंग्रजही करू लागले होते व त्यास होळकर अनुकूल होते.[१२४] सवाई माधवराव गादीवर रहावा असे नानाचे मनात फार होते, पण तो निराश्रित असल्या कारणांने त्याचे काही चालत नव्हते. मोरोबा फडणविसानी गंगाबाई व सवाईमाधवराव यांना पकडण्याबाबत कारस्थान रचले मात्र हे कारस्थान नानासाहेबास कळाल्यानंतर त्यांनी पुरंदरच्या पायथ्याशी असलेल्या गंगाबाईची रवानगी पुरंदरवर केली. गंगाबाईच्या रक्षणाकरीता पुरूषोत्तमराव कृष्ण उर्फ दाजी[१२५] यांची नेमणूक केली.[१२६] होळकरासही यावेळी वाटत होते की नाना कारभारात नसावे कारण त्यांनी राज्यकारभारामध्ये शिंदयांच्या बरोबर गट्टी जमविली होती.[१२७] यावेळी जवळ जवळ तीन महिने मोरोबाच्या हातामध्ये पुण्याचा कारभार होता.[१२८] मोरोबाने यावेळी मानाजी शिंदेबरोबर संपर्क साधून महादजीची सरदारकी काढून

---

[१२३] अ. यो., पृ. ७१

[१२४] ऐ.ले.सं, नं. २३९४, पृ २३२५.

[१२५] पुरूषोत्तमराव कृष्ण उर्फ दाजी हा पराक्रमी होता. त्यांने गंगाबाई व सवाई माधवराव यांचा बंदोबस्त एकदम कडक ठेवला होता. प्रत्येक व्यक्तीची झडती घेतल्याशिवाय तो त्यांना गंगाबाईच्या भेटीकरीता पाठवत नसे. असेच एकदा एक कुणबीनीची झडती घेतली असता तिच्या बुचडयामध्ये सुरा सापडला होता. चौकशी केली असता ती आनंदीबाईची जासूस निघाली. या पुरूषोत्तमराव कृष्ण उर्फ दाजी याचा मुलगा हरिहरराव होय. त्याच्याच एका मुलांने हरिवंशरायाची बखर लिहली.

[१२६] अ. यो., पृ. १६

[१२७] कित्ता, पृ. ७८

[१२८] ऐ.ले.सं., खंड.०७, नं. २३१८, २३१९, पृ. ३२३४, ३२३६.

घेण्याच्या दृष्टिने प्रयत्न केल्याचे दिसून येते मात्र हा त्याचा प्रयत्न फसल्याचे दिसून येते.[१२९]

मोरोबाचा बंदोबस्त करण्याकरीता नानांने महादजीस कोल्हापूर मोहिम आटोपून अथवा अर्धवट सोडून ताबडतोब पुण्यास यावे याकरता अनेक पत्रे पाठविल्याचे दिसून येते.[१३०] यावेळी महादजीने आपणास अर्धवट मोहिम सोडून येता येत नाही,[१३१] कोल्हापूरकराबरोबर तह जवळ जवळ निश्चित झाला असून यादी तयार झाली आहे,[१३२] आपण आवसान घालवू नये श्रीमंतांचा चोख बंदोबस्त ठेवावा, श्रीमंतापासी सावधानाने रहावे अशा प्रकारची पत्रे पाठवून नानास आधार दिल्याचे दिसते.[१३३] महादजीने कोल्हापूरकरांचा निकाल लावल्यानंतर मोरोबाच्या कारस्थानामध्ये लक्ष घातले. महादजीने प्रथम होळकरास मोरोबाच्या गटातून काढून नानाच्या पक्षात आणले[१३४] पुढे नानास पुण्यास आणले व त्याना राज्याचे काम करण्यास सांगितले. मोरोबा फडणीसास कैद करून अहमदनगरच्या किल्ल्यात नगरकरांच्या देखरेखीखाली ठेवले (११जुलै१७७८)[१३५] अशाप्रकारे मोरोबाच्या बंडाचा महादजीने बंदोबस्त केला. यावेळी नानास पूर्वपद महादजीच्या आश्रयानेच मिळाले असे मानले जाते[१३६]

महादजीने जर या वेळी ख–या अंतःकरणाने सवाई माधवरावाच्या पक्षास साहाय्य दिले नसते तर मोरोबाची सरशी होऊन रघुनाथरावाची स्वारी

---

[१२९] ऐ.ले.सं., खंड. ०७, नं. २३८३, पृ. ३३०७.
[१३०] शिं. रा., नं. २३ ते २९, पृ. ११,१२.
[१३१] शिं. रा., नं. २३, पृ. ११, महादजीचे नानास पत्र, दि. २६/०३/१७७८., शि. रा., नं.२४, पृ. ११, महादजीचे नानास पत्र, दि. २७/०३/१७७८.
[१३२] शिं. रा., नं. २५, पृ. ११, महादजीचे नानास पत्र, दि. २९/०३/१७७८.
[१३३] शिं. रा., नं. २६, २७, २८ पृ. ११, महादजीचे नानास पत्र, दि. २९/०३/१७७८, ३०/०३/१७७८, ३१/०३/१७७८
[१३४] ऐ.ले.स. ०७, ले.नं. २३६५, ना. फ. श., पृ. ६५
[१३५] भा.इ.सं.म., ऐ.सा., खंड, ०२, पृ. ०५, ०६ – मोरोबादादाच्या कैदेविषयी पत्रे.
[१३६] अ.शि.घ.इ., पृ. १९

इंग्रजांच्या मदतीने पुणे येथे आली असती. महादजीच्या मनांत राघोबादादाबरोबर मुळीच स्नेह करावयाचा नव्हता, म्हणून त्यांने पुरंदरास पोहचताच तुकोजी होळकरास दादाच्या गटातून बाहेर काढले. होळकर आपल्याकडे येताच इंग्रज पुण्यावर चालून येण्याअगोदर महादजीने आपली फौज पुण्यात पाठवून पुण्यातील फितुर मंडळीचे पारिपत्य केले. ११ जुलै १७७८ रोजी मोरोबास कैद केले व त्यास अहमदनगच्या किल्यात बंदिस्त ठेवले. बजाबा पुरंदरे यालाही कैद केले. फक्त सखारामबापू खेरीज फितुरातील सर्व मंडळीचा महादजीने बंदोबस्त केला.[१३७] आशाप्रकारे मोरोबाच्या कारस्थानाचा शेवट घडवून आणला.

सखारामबापूस अटक :–

सखारामबापू हे पेशव्याचे मुख्य कारभारी होते. पेशवाईतोल एक कर्ता पुरूष म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असे. सखारामबापू हा मोरोबा फडणविस यांने चालविलेल्या कारस्थानामध्ये सहभागी झाला होता याबाबतचा पुरावा व बापूंच्या हस्ताक्षरातील पत्रे महादजी शिंदे यांच्याकडे होती. मात्र मराठा साम्राज्यात पसरलेली अस्वस्था व बंडे मोडून काढणे यास महत्व देवून महादजीनी बापूंच्या फितुरीकडे दुर्लक्ष केले होते. सखारामबापू यांना देखील आपण मोरोबाच्या बंडात सामील झालो याबाबत पश्चाताप वाटत होता. ०६ जून १७७८ रोजी बापूनी महादजी शिंदयाची भेट घेतली व आपण नानास सोडून मोराबाकडे गेलो ही आपली चुक झाली मला क्षमा करावी, मोरोबा मला कैद करत होता म्हणून मी मोरोबाच्या पक्षास जावून मिळालो, आता नाना व तुम्ही जे मला सांगाल ते ऐकू असे सांगितले. मात्र महादजीने सर्व

---

[१३७] म.शि.ना.फ.तु., पृ. १५, १६

अडचणीचा निकाल लागेपर्यंत सखारामबापूच्या फितुरीकडे दुर्लक्ष केले होते.[१३८]

मोरोबाच्या बंडाचा बिमोड, इंग्रजांचा पराभव, दादासाहेबांचा बंदोबस्त इ. आनेक बाबींचा निकाल लागल्यानंतर महादजी शिंदे यांनी सखारामबापूचे प्रकरण हाती घेतले. सखारामबापूच्या फितुरी बाबत त्यांनी नानास कळविले. पुरंदरवर महादजीनी नानाची भेट घेतली व दोघांची खलबते झाली तद्नंतर सखारामबापूस अटक करण्याचे ठरले व त्याप्रमाणे शिंदयानी सखारामबापूस अटक केली.[१३९] सखारामबापूस एकुलता एक मुलगा होता नानाने तेलंग ब्राम्हणाकडून त्यास मारले व सखारामबापूचा खाजगी कारभारी सदाबा मांजरीकर याला फितुर करून घेवून त्याजकडून आपणास अनुकूल पत्रव्यवहार करून घेतल्याचे दिसून येते.[१४०] अशाप्रकारे बारभाईच्या प्रमुखास अटक केल्यामुळे बारभाईचे कारस्थान पुर्णतः मोडकळीस आलेचे व नाना महादजी यांचा मराठी सत्तेवर अंमल चालू झाल्याचे दिसून येते.

आशीरगडचा किल्लाः-

कोल्हापूर व पेशवे यांचे संबध प्रथमपासूनच फारसे चांगले नव्हते. कोल्हापूरकरांनी पेशव्यांच्या प्रदेशावर स्वारी करून त्यांचा प्रदेश काबीज करण्याचे धोरण राबविले होते. कोल्हापूरकरांचा बंदोबस्त करण्यासाठी पेशव्यांनी महादजी शिंदे यांची नेमणूक केली. मात्र महादजी शिंदे यांनी कोल्हापूरवर स्वारी करण्याच्या अगोदर आशीरगडच्या किल्ल्याची मागणी केली. मराठा राज्यामध्ये काही मोजकेच बळकट किल्ले होते त्यामध्ये आशीरगडच्या किल्ल्याचा समावेश होता. आशीरगडचा किल्ला महत्वाच्या ठिकाणी होता तो किल्ला महादजीस न देता दुसरा सामान्य किल्ला

---

[१३८] ऐ.ले.सं.०७, पृ. ३२२९, ३२३२, २१८१, ३२८६

[१३९] अ.यो., पृ. १२९, १३०

[१४०] भा.इ.स.मं. त्र., खंड.०९, नं.०५, पृ. ८८.

कारभा–यांनी देवू केला असता त्यास महादजीने नकार दिला. महादजीच्या मागणीकडे दुर्लक्ष करावे तर कोल्हापूर पेशव्यांचा प्रदेश काबीज करत होते व त्यास हैदरकडून मदत मिळत होतो. शिंदयाचे म्हणणे ऐकावे तर एवढी मोठी जहागीर शिंदयाना देणे कारभा–यांना परवडणारे नव्हते व त्यातच ते दक्षिणेमध्ये जहागीरी मागत होते. नाना फडणविस यांनी यावरती पर्याय काढला की, भेलसे वैगरे माळव्यातील दहा लाखाची जहागीरी शिंदयाना देण्यात यावी व शिंदयानी काही तक्रार न करता कोल्हापूरचे पारिपत्य करावे, राज्यात चोहोकडे बंड झाले आहेत त्यांचाही बंदोबस्त करावा व शेवटी सर्व बंदोबस्त झाला असता उज्जैनेस जावयास जेंव्हा ते निघतील तेव्हा त्यांजबरोबर आशीरगडचे बोलणे बोलून योग्य तो निणय घ्यावा. महादजीनी हे म्हणणे मान्य केले व कोल्हापूरवर स्वारी केली. मात्र कारभारी सखारामबापूंचा शिंदयाविषयीचा दृष्टिकोन हा पूर्वीपासूनच चांगला नसल्यामुळे त्यांच्या मनात महादजीस जहागीर देण्याचे अजिबात नसल्याचे दिसून येते. महादजीस जहागीरी देण्याचे नुसते वचन देण्यासही बापू तयार नसल्याचे दिसून येते. तसेच आशीरगडच्या प्रकरणामध्ये महादजीविषयी नाना फडणविसानी सौम्य धोरण राबविल्यामुळे सखारामबापूच्या मनामध्ये नानाविषयी मत्सर उत्पन्न झाल्याचे दिसून येते. एकूणच आशीरगडच्या प्रकरणावरून सखारामबापू हा एक गट व नाना तसेच महादजीचा एक गट असे दोन गट पुढे आल्याचे दिसून येते.[१४१]

तुकोजी होळकरांची आशीरगडबाबत प्रतिक्रिया :–

होळकर व शिंदे या दोन सरदारांचा उदय व उत्कर्ष एकाच वेळी झाला हे दोन्हीही सरदार समकालीन होते. माळवा व उत्तर भारतामध्ये या दोन घराण्यातील वीर पुरूषांनी आपली सत्ता प्रस्थापित करून आपले

[१४१] अ.या., पृ. ५२

सामर्थ्य वाढविले. साम्राज्यविस्तार व राज्यकारभार करण्याच्यादृष्टिने पेशव्यांच्या बरोबर या दोन सरदारांचा वारंवार संबध येत असल्याचे दिसून येते. होळकर व शिंदे यांचे कार्यक्षेत्र परस्परास जवळ होते, परिणामी या दोन सरदारामध्ये मैत्री बरोबरच वारंवार संघर्ष झाल्याचेही दिसून येते.

मल्हारराव होळकर व महादजी शिंदे यांचे संबध मैत्रीपुर्ण होते मात्र मल्हारराव होळकर यांच्या मृत्यूनंतर होळकरांच्या दौलतीमध्ये घडून आलेल्या घटनामध्ये महादजीचा हस्तक्षेप व अहिल्याबाई होळकरास महादजीचे झुकते माप यामुळे तुकोजी होळकर व महादजी यांचे संबधामध्ये दुरावा आल्याचे दिसून येते.

राघोबादादाने उत्तरेमध्ये पलायन केल्यानंतर महादजी शिंदे व होळकरास कारभा-यांनी बंदोबस्त करण्यास सांगितले होते. तुकोजी होळकर यांनी याबाबत ताबडतोब कोणताही प्रतिसाद दिला नव्हता मात्र पुढे त्यांनी याबाबत पत्र पाठवून आपली स्वामीनिष्ठा पेशव्यांच्या प्रती आहे असे स्पष्ट केल्याचे दिसते.[१४२] तुकोजी होळकर यांनी नानास स्पष्ट केले की महादजी शिंदे व आमच्यामध्ये सलोखा नसल्यामुळे आम्ही कोणताही प्रतिसाद दिला नाही मात्र सध्या दोघामधील संबध सुधारले आहेत. एकूणच शिंदे व होळकर यांच्यामधील संबध वारंवार बदलत असल्याचे दिसून येते.

कारभा-यांनी शिंदयास अशीरगड व इतर जहागीरी देताच तुकाजी होळकर यांनीही कारभा-याकडे जहागीरी व आशीरगडच्या तोडीचा किल्ला मागण्यास सुरूवात केली. सदर मागणीचे कारण देताना त्यांनी सांगितले की,

---

[१४२] पे.द., ५, ले. ४६, महादजी शिंदे कागदपत्रे, ले.०२, ३ मे १७७४ तुकोजी होळकराचे नानास पत्र, पत्रोत्तरे न पाठविली याचे कारण महादजी शिंदे व आमचे चित्तात सफाई नव्हती. त्याची दुरूस्ताई होऊन स्वामिसेवा एकरूपपणे करावी, या अर्थे निखालसत्ता जाली. श्रीमंताची राघोबादादाची गांठहि अचानक पडली. निरोपाय जाणून ताकपीरहि भेटले, पुढे श्रीमंत इकडे येणार येसी चित्तात आमची विषयी विपर्यास आला असेल. पण येथिल विचार आपलेखेरीज नाही. जे कर्त्यव्य ते आपल्या लक्षानेच होईल.

शिंदे आणि आम्ही बरोबरीचे सरदार आहोत. तेंव्हा दोघांनाही सारखीच जहागीरी मिळणे आवश्यक आहे. मात्र कारभा-यानी होळकरांना स्पष्ट नकार दिल्याचे दिसून येते.[१४३] तसेच आपणही काही कामगिरी करून अथवा शौर्य गाजवावे मग त्याबाबत विचार करू असे सांगितले.

मराठा मंडळ व महादजी :-

संभाजी पुत्र छत्रपती शाहू महाराज दक्षिणेत आल्यानंतर दक्षिणेत अनेक सरदारांना त्यांनी आपणास सहाय्य करावे अशी पत्रे पाठविली. मराठी साम्राज्यात त्यावेळी अनेक जबरदस्त सरदार होते. असून त्यांना जिंकण्याइतपत शक्ती शाहूंच्यामध्ये नव्हती. मात्र त्यांना केंद्रस्थान न लाभल्याने ते आपआपसात झगडण्यात आपली शक्ती वाया घालवत होते. तेंव्हा त्या त्या सरदारांना त्यांच्या क्षेत्रात पूर्ण स्वातंत्र्य दयावे व त्यांना मराठी राज्याचे घटक म्हणून मान्यता दयावी. म्हणजे सांघिक प्रबळ मराठी राज्य स्थापन होईल. अन्यथा एकजुटीच्याअभावी एक एकटा सरदार निर्बल ठरून नाश होईल असा व्यापक राजकारणाचा सिध्दांत बाळाजी विश्वनाथ यांनो सरदारापुढे मांडला. सरदारांनाही सदरची कल्पना पटली व या योजनेप्रमाणे दाभाडयांना गूजरात, आंग्रे - कोकण, फत्तेसिंग - कर्नाटक, भोसले - व-हाड, खानदेश अशी क्षेत्रे वाटून देण्यात आली.[१४४] पुढे ही सरदार मंडळी प्रबळ झाल्यामुळे दालतीचा कारभार एकटया पेशव्यांना पहाणे शक्य नव्हते. कोणताही निर्णय घेत असताना शिंदे, होळकर यासारख्या सरदारांना विश्वासात त्यांना घ्यावे लागत असे. मूळ राज्यसत्ता भोसल्यांची, सर्वाधिकार पेशव्यांचा, मनसबा फडणीसांचा व तलवार सरदारांची अशाप्रकारे मराठी सत्ता चार ठिकाणी विभागली होती परिणामी एकतंत्री कारभार चालणे अशक्य होते. सरदारांनी लढाई जिंकून शत्रूला तहाला आणावे, फडणीसानी

---

[१४३] अ. यो., पृ. ६३

[१४४] *दत्तोपंत आपटे लेख संग्रह,* दत्तोपंत आपटे स्मारक मंडळ, पुणे, १९४५, पृ. ४५

मुलकी धोरण पाहून तहाच्या अटी बनवाव्या, पेशव्यांनी यावर मलखाशी करावी व सातारच्या छत्रपतींचे त्यावर शिक्का मोर्तब व्हावे असा चौतंत्री कारभार मराठा साम्राज्याचा चाले. यामध्ये प्रत्येकाला इतर तीन तंत्रे सांभाळावी लागत असे. हा चौतंत्री कारभार जोपर्यंत ठोक चालला होता तोपर्यत मराठयांचे साम्राज्याची भरभराट झाली. इंग्रज लोक मराठेशाहीच वर्णन करतांना ''मराठे राज्य'' न म्हणता ''मराठा संघ'' (Confederacy) असे म्हणत. हा संघ जोपर्यंत टिकला तोपर्यंत सर्व हिंदूस्थानभर मराठी सत्ता प्रस्थापित करण्याचा संभव होता, पण तो संघ मोडताच हा संभव सर्वस्वी नष्ट झाला.[१४५] या संघाचे पुढे बारभाईमध्ये रूपातंर झाले बारभाईचे नेतृत्व सखारामबापूकडे होते. सखारामबापूने मोरोबाच्या कारस्थानास सहाय्य केल्याने त्यांना अटक करण्यात आली. पुढे मराठा साम्राज्याच्या नेतृत्वाची धुरा नाना व महादजी यांच्याकडे आली त्यामध्ये महादजीने महत्वाची कामगिरी केल्याचे दिसून येते..

नारायणराव पेशवे यांच्या खुनानंतर बारभाई कारस्थान आकारास आले. बारभाईची ही संकल्पना यशस्वी ठरली ती मराठा मंडळातील सरदारामुळे हे सत्य नाकारता येत नाही.[१४६] बारभाईच्या प्रारंभीच्या काळात महादजीवर नानांनी राघोबादादाचा बंदोबस्त, भाऊसाहेबाच्या तोतयाचा बंदोबस्त, इंग्रजांचा बंदोबस्त, आणि अहिल्याबाई तुकोजी यांच्या सरदारकीबद्दलच्या भांडणात मध्यस्थी करणे ही कामे सोपवली होती. महादजीने आपणावर सोपवलेली जवळ जवळ सर्व कामे प्रामाणिकपणे पार पाडली. मात्र महादजीने राघोबाचा बंदोबस्त करण्यामध्ये दिरंगाई लावली व स्वताचे हित साधले असा आरोप महादजीवर केला जातो.[१४७] महादजी जर

[१४५] हो. कै., पृ. २५७
[१४६] म. शि. का., ले. १४, १६
[१४७] का. प., या. ले. ६४

राघोबाला मिळाला तर बारभाई मंडळ यशस्वी होणे कदापि शक्य नाही हे नानास माहित होते. यावेळी महादजी आर्थिक अडचणीमध्ये होता तेंव्हा ही आर्थिक अडचण सोडवण्याच्या दृष्टिने व स्वतःचे हित जास्तीत जास्त साधण्याच्या दृष्टिने बारभाईस साथ देणे इष्ट आहे हे महादजीस माहीत होते. मात्र महादजीने काही काळ धरसोडीचे धोरण राबविले. महादजीच्या या दुटप्पी धोरणामुळे नाना व महादजी यांच्यामध्ये वितूष्ट येवून ते पुढे वाढतच गेल्याचे दिसून येते.[१४८]

नाना फडणविस व महादजी शिंदे :–

१७७९ पासून महादजीचा प्रत्यक्ष पेशव्यांच्या बरोबर संबध न येता पेशव्यांचा कारभारी नाना फडणविस यांच्या बरोबर जास्त सबंध येवू लागला. त्यामुळे येथून पुढे नाना व महादजी यांचा कधी संघर्ष तर कधी मिलाफ याचाच इतिहास होता असे म्हणता येईल. नाना व महादजी यांचे काही काळ सख्य अथवा स्नेह जमला होता व त्याचाच लाभ मराठा साम्राज्यास झाल्याचे दिसून येते. मात्र हा लाभ अथवा आनंद १७७९ नंतर टिकू शकला नाही. पहिल्या इंग्रज मराठे युध्दात महादजीने आपल्या लष्करी बळाच्या जोरावर इंग्रजाना माघार घ्यावयास लावली. महादजीची दैदिप्यमान कामगिरी त्याचे लष्करी नैपुण्य सिध्द करणारी ठरली. पुरंदरचा तह, सालबाईचा तह इ. प्रसंगी महादजीची भूमिका खूपच महत्वपूर्ण ठरली. गुलाम कादरखानाची बंडाळीही महादजीने मोडून काढली. अशाप्रकारे महादजीचे वाढणारे हे वर्चस्व पाहून नाना महादजीचा हेवा करू लागले.[१४९] व महादजीच्या प्रत्येक धोरणाविषयी शंका घऊ लागले.[१५०]

---

[१४८] पे.द. खंड ३९, ले. ३२, ५३, ९३

[१४९] इ .ले. सं. ले. १३, ६७, म. शि. का. ले. १९, का. प. या. ले. ३४९

[१५०] 'पाटीलबावांची चाल संदेह न पडावयाचे तेथे पाडतील, दुही नसेल तेथें उत्पन्न करतील' अशी नानाची सदा भावना असे. –म.रि.उ.वि. भाग.०२, पृ. ९७

हरिपंत फडके यांच्या प्रमाणे महादजी आपण जे सांगू ते ऐकतील असे नानास वाटत होते. मात्र तसे न होता महादजीने आपल्या लष्करी ताकदीच्या जोरावर बारभाईवर आपली पकड मजबूत केली व ते आपल्या लष्कराच्या बळावर नानास वारंवार वाकवू लागले. पुणे दरबाराचा सर्व कारभार आपल्या हातामध्ये असून देखील महादजी आपणास कोणताच प्रतिसाद अथवा मान देत नाही याबद्दल नानास राग होता. महादजीने जर काही आपल्यावर हालचाल केली तर प्रतिकार करण्यासाठी नानाने हरिपंत फडक्यास आपल्याजवळ ठेवले होते. हरिपंत फडक्यास कारभारातून दूर करावे असे महादजीस वाटत होते मात्र नानाने महादजीच्या या मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.[१५१]

इंग्रजांचा बंदोबस्त करण्याच्या धोरणामध्येही नाना व महादजी यांच्यामध्ये मतभेद झाल्याचे दिसून येते. मराठा साम्राज्यामध्ये इंग्रजांचे आगमन होण्यास प्रथम रघुनाथराव कारणीभूत झाला नंतर मात्र महादजीच्या भयास्तव नानाने इंग्रजांना जवळ केल्याचे दिसून येते. सालबाईच्या तहाच्यावेळी महादजीचे वर्चस्व इंग्रजावर होते ते नाहीसे करण्याचा नाना प्रयत्न करू लागल.[१५२] इंग्रजांना मुबलक उत्पन्न देणा–या बंगाल प्रातांवर स्वारी करून त्यांच्यावर वर्चस्व निर्माण करावे असे नानाबरोबरच महादजीसही वाटत होते. बंगालच्या मोहिमेकरीता महादजी हा योग्य सरदार होता मात्र महादजीचे वाढणारे वर्चस्व लक्षात घेऊन नानाने पूर्वेकडे विस्तार करण्याचा हक्क नागपूरकर भोसल्यांचा आहे असे सांगून भोसल्यांना जास्त महत्व देण्याचा व महादजीस खाली ओढण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. सदर बाबोवरून नाना व महादजी यांच्यामध्ये दुरावा निर्माण झाल्याचे दिसून येते. यावेळी पेशव्यांच्या रक्षणासाठी नाना महादजीस पुण्यात बोलवित होते मात्र

---

[१५१] इति.संग्रह. पृ. ६२
[१५२] अ.शि.घ.इ., पृ. ३३

इंग्रजांवर दबाव ठेवणे व उत्तरेकडील कारभार योग्य रितीने करणे या गोष्टी माळव्यात राहूनच योग्य प्रकारे करता येतील असे कारण देवून महादजीने पुण्यास येण्यास नकार दिला. मात्र महादजी आपले ऐकत नाही या गोष्टीचा नानास खूपच राग आल्याचे दिसून येते.[१५३] महादजीने दिल्लीचा अधिकार प्राप्त झाल्यानंतर बादशहाच्यावतीने बंगाल प्रातांची चौथाई इंग्रजाजवळ मागितली. मात्र त्यास इंग्रजांनी नकार दिला याबाबत इंग्रजांना धडा शिकवावा त्यांना आपल्या नियत्रंणाखाली आणावे म्हणून महादजीने तयारी चालवली मात्र याबाबतीत नानाने महादजीस कोणतीही मदत पाठविल्याचे दिसून येत नाही. नंतर इंग्रजांनी महादजीशी सख्य निर्माण केले व दिल्लीच्या राजकारणात हस्तक्षेप न करण्याचे महादजीस वचन दिले परिणामी बंगाल प्रातांची मोहिम तशीच राहून गेली.[१५४] मात्र इंग्रज व महादजी जवळ आल्याने नानास याबाबीचा राग आल्याचे दिसून येते.

फत्तेसिंग गायकवाड प्रकरणावरून नाना व महादजी मतभेद :-

मराठा साम्राज्यात आपला प्रभाव वाढविण्याच्या दृष्टिने इंग्रजानी आपले धोरण राबिविले होते. त्याकरीता त्यानी कधी आक्रमक धोरण, कधी फंदफितुरीचे धोरण अशा धोरणांचा अवलंब केला होता. मराठा सरदार फत्तेसिंग गायकवाड यास इंग्रजांनी आपल्या बाजूस वळविल होते व त्याच्याशी मैत्रीचा तह केला होता.[१५५] पहिल्या इंग्रज मराठा युध्दाच्यावेळी १० हजार फौज इंग्रजांच्या मदतीला फत्तेसिंग गायकवाडने सिपरीकोलार येथे

---

[१५३] 'देशी येण्याचे कारण नाही. नर्मदेअलिकडील प्रदेश आम्ही उभयता (शिंदे - होळकर) सांभाळतो त्यांनी (नानांनी) दक्षिणेचा बंदोबस्त ठेवावा ......' म.शि.का., ले. ९७, १७३, १७८

[१५४] अ.शि.घ.इ., पृ. ३३, ३४

[१५५] सि.ॲ.पॉ.डि.डा., नं.२२, ले. ४०, पृ. १६२-१६५ (अप्रकाशित पत्र, मुंबई पुराभिलेख, मुंबई)

ठेवली होती.[१५६] फत्तेसिंगराव गायकवाड हे इंग्रजांना फितुर झाले होते तेंव्हा त्यांच्यावर नानांनी कडक कारवाई करावी असे महादजीचे मत होते. मात्र नानांनी फत्तेसिंग गायकवाडबाबत सौम्य धोरण पत्करले होते. केवळ पैशासाठी अशा प्रकारचे नानांनी धोरण राबविले हे महादजीस अजिबात पसंत नव्हते. तव्हा या प्रकरणावरूनही नाना व महादजी यांच्यामध्ये वितुष्ट आल्याचे दिसून येते.[१५७]

होळकर प्रकरण व नाना महादजी मतभेद :-

होळकर प्रकरणावरून नाना व महादजी यांच्यामध्ये मतभेद झाल्याचे दिसून येते. होळकराच्या दौलतीमध्ये अहिल्याबाई यांना खूपच मान होता. अहिल्याबाई आणि तुकोजी होळकर यांचे दौलतीवरून भाडण लागले होते या भांडणात महादजीने अहिल्याबाईची बाजू घेतली. या भांडणामध्ये महादजीने अहिल्याबाईची बाजू घेण्याचे कारण म्हणजे मल्हारराव होळकर यांनी आपली सून अहिल्याबाई व नातू मालोजी यांचा हात महादजीच्या हाती देवून त्यांना योग्य प्रकारे पाठिंबा देवून सांभाळ करावा असे सांगितले होते. मात्र महादजीचे प्रस्थ कमी करावे व उत्तरेच्या राजकारणात महादजीस त्याच्या तोडीचा सरदार निर्माण करावा या हेतूने नानाने तुकोजीला पाठिंबा दिला. या संघर्षामध्ये महादजीची सरसी झाल्याचे दिसून येते.[१५८]

महादजोने उत्तरेमध्ये मराठयाचे वर्चस्व निर्माण केले त्याचबरोबर त्यांने बराचसा प्रदेश आपल्या वर्चस्वखाली आणला हे करत असताना त्यांने प्रचंड

---

[१५६] पु.अ., भाग.०२, अे.आ.न., १२०, पृ.६१, दि. ३ ऑक्टोबंर, १७८१.

[१५७] 'गोंदबा (गोविंदराव गायकवाड) इंग्रजास मिळाले, सरकारचा मुलूख मारला, तरी त्याचीच शिफारस नानाकडून होते. हे अपूर्व वाटते ..... बादशाही कारभार आमचे हाती आलेपासून नानाचा सारा मिठेपणाच गेला....' – म.शि.का., ले. ६०,८८,९७,३४८)

[१५८] म. शि. का. ले. १६१, १७८,२२१

द्रव्य संग्रह केला असावा अशी शंका नानास यांना वारंवार येत होती मात्र प्रत्यक्षात महादजी अनेक युध्द व स्वा–यांच्या खचामुळे कर्जबाजारी झाला होता. दिल्लीचा कारभार जरी महादजीने आपल्या हाती घेतला असला तरी दिल्लीत मोठया प्रमाणात अराजकता व गोंधळ निर्माण झाला होता हा गोंधळ मिटविण्यात व दिल्लीची व्यवस्था लावण्यासाठी महादजीस बराच खर्च करावा लागला होता.[१५९]

बादशाही कारभार चालवण्यासाठी पादशहाने महादजीस फारसी सिक्का करून दिला, त्याचे शब्द *''महाराजाधिराज उमराव अलिजाबहाद्दूर माधवराव सिंदे''* असे होते. सदर बाब नानास माहित नव्हती मात्र या शिक्कयाची फारसी नक्कल सदाशिव दिनकरने गुप्तपणे नानास पाठविली परिणामी नानाच्या मनात महादजीविषयीचा संशय जास्तच वाढत गेल्याचे दिसून येते.[१६०]

अनुपगीर गोसावी प्रकरण :–

अनुपगीर गोसावी हा एक लढवय्या सेनापती आणि प्रख्यात तांत्रिक मांत्रिक होता. हजारो कडव्या गोसाव्यांच्या फलटणीच्या जोरावर त्याने दिल्ली – आग्रा परिसरात आपला चागलाच जम बसविला होता. त्याच्या पराक्रमावर खुष होऊन दिल्लीच्या बादशहाने त्यास 'हिमत बहाद्दर' असा किताब दिला होता. अनुपगीर गोसावी सुरूवातीस महादजीकच्या सेवेत होता. मात्र १७८८

---

[१५९] 'घोडी विकूनही सावकारापासून सुटका नाही. दहा रूपये राऊतास मिळत नाही. अनावृष्टीने तमाम रयत मेली. चमेलीपासून चंबळनदी मथुरेपर्यंत लावणीस कुणीच उरले नाही. फौजेचा खर्च कर्जावरच चालतो.....'असे नानांच्याच बातमीदाराने कळविले आहे. इंग्रज मराठे युध्दानंतरच्या काळात महादजीच्या विपन्नतेत आणखी भरच पडली. तरी नानांनी सर्व सरदारांवर बसवलेली दहकपट्टी (सरंजामी उत्पन्नाच्या दहा टक्के कर) महादजीने मान्य केली आहे. – म.शि.का.,ले.२५३,२८६, ए.ले.स. पृ. ५–९, अ.शि.घ.इ. पृ. २३

[१६०] म.रि.उ.वि., भाग–२, पृ. १००

च्या सुमारास त्याचे महादजीशी बिनसले आणि त्याने अलिबहाद्दरच्या[१६१] पदरी नोकरी स्विकारली. या अलिबहाद्दरची नेमणूक नानांनी महादजीचे उत्तरेकडील वाढणारे वर्चस्व कमी करण्याच्या हेतूने होळकरांचे सहाय्यक म्हणून केली होती.[१६२]

इ.स. १७७९ मध्ये महादजी अचानक खूपच आजारी पडले अनेक वैदयाना दाखवूनही त्यांना बरे वाटत नव्हते. तेंव्हा जोतिष्यास बोलावण्यात आले जोतिषाने हा रोग शारीरिक नसून प्रयोगादिक (जादूटोणा) आहे असे सांगितले. जोतिष्याच्या निर्णयानुसार अनुष्ठाणास ब्राम्हण घेतले आणि त्यानंतर महादजीस आराम वाटू लागला पुढे प्रयोग करणा–या शोध घेतला गेला. वृंदावनामध्ये एक नागरीन बाई प्रयोग करीत होती तिला पकडण्यात आले व तिच्याकडे चौकशी केली असता तिने हिम्मतबहाद्दर अनुपगीर गोसावी याचे नाव घेतले[१६३]. त्यावेळी या अनुपगीर गोसाव्याने महादजीशी बिनसल्यामुळे महादजीवर जादुटोणा केला आसावा असा सर्वांचा ग्रह झाला. पकडलेल्या गोसाव्याच्या शिष्यणीच्या जबाबावरून महादजीने गोसाव्याला पकडण्यास फौजा पाटविल्या. पण अनुपगीरला अलिबहाददरचा आश्रय लाभला होता व अलिबहाद्दरला नानाचा पाठिंबा होता यामुळे महादजीचे काहीही चालले नाही. महादजीने हे प्रकरण पुण्यास पाठविले असता तेथेही महादजीस माघार घ्यावी लागली. यातून नाना व महादजी यांच्या संबधामध्ये जास्तच दुरावा निर्माण झाल्याचे दिसून येते.[१६४]

---

[१६१] मस्तानी बाजीराव यांचा नातू.

[१६२] म.शि.का., ले. १३१, ३५८, ४३०

[१६३] दत्तोपंत आपटे लेख संग्रह, दत्तोपंत आपटे स्मारक मंडळ, अ.वि.गृ. प्रकाशन, पुणे, १९४५, पृ. १६०, १६१, पाटीलबाबाचे दिल्ली येथील राजकारण

[१६४] म.शि.का., ले. १३१, ३५८, ४३०

बादशहाकडून पदव्या स्वोकारण्यावरून घडून आलेला वाद :–

नाना व महादजी वाद हा जसा वैयक्तिक पातळीवर होता, तसाच तो घटनात्मक पातळीवरही निर्माण झाला. हा वाद म्हणजे मोगल बादशहाने देवू केलेल्या पदव्या स्वोकाराव्या की नाही हा होय. दक्षिणेतील सर्व अडचणींचा पुर्ण बंदोबस्त केल्यानंतर महादजी शिंदे यांनी उत्तरेकडे प्रयाण केले. उत्तरेमध्ये महादजीना आपले शौर्य दाखविण्यास खूपच वाव होता. रजपूत, जाठ व मोगल सरदार यांचा विविध युध्दामध्ये त्यांनी पराभव केला व मराठयांचे वर्चस्व उत्तरेमध्ये पुनः निर्माण केले. यावेळी बादशहा असहाय्य झाला होता व त्याच्यापुढे मराठे व इंग्रज असे दोन पर्याय मदतीकरीता होते. मराठयांचे दिवसेदिवस वाढत जाणारे वर्चस्व यामुळे असहाय्य बादशहाने मराठयांची मदत मिळविण्याचा प्रयत्न चालू केला.

मराठयांचा सरदार महादजी शिंदे हा उत्तरेमध्ये सर्व कारभार पहात होता त्यामुळे बादशहाने महादजीस मदतीसाठी अवाहन केले व बादशाहीचा बंदोबस्त करण्याबाबत विणवले. यावेळी महादजी शिंदे यांनी आपणास संपूर्ण अधिकार असल्याखेरीज आपणाकडून बादशाहीचा संपूर्ण बंदोबस्त होणार नाही असे सांगितले. महादजीने बादशहाकडून यावेळी पेशव्याकरीता वकील–इ–मुतलिक[१६५] मागितली. बादशहाने स्वहस्ताने या मागणीवरून हुकूम लिहीताना आपण खुद्द महादजीस ओळखतो, पेशवे लांब राहणार व त्यास आपण ओळखतही नाही. अशा पध्दतीने सर्व पदे व मानमरातब प्रथम पेशव्यास देवून पेशव्याच्या तर्फेने आपण ती महादजीस देत आहोत असा

[१६५] वकील – ई – मुतलक' म्हणजे संपूर्ण अधिकार असलेला अधिकारी, दिल्लीचे बादशहा आपल्या जेष्ठ उमरावास वेळोवेळी जे मानसन्मान, पदव्या देत त्या सा–यात श्रेष्ठ असा वकील – ई – मुतलक हा सन्मान मानला गेला आहे. सुवर्णमत्स चिन्ह आणि राजचिन्हे असलेली ही अब्दागिरी त्या व्यक्तीने स्वारीबरोबर मिरवत नेण्याची प्रथा होती. (इति.सं.पु.५,अं. १०,११,१२, पृ.४४–४५)

स्पष्ट फारसी हुकूम लिहीला.[१६६] आता हा फरक खुद्द बादशहाने केला की, महादजीने अंतस्थपणे करवून घेतला हा वादाचा विषय आहे. मात्र सदाशिव दिनकरांने पुण्यास कळविले की, मुख्य पद महादजीने आपल्या नावे घेतले व नायबी पेशव्याच्या नावे घेतली आहे. यामुळे नाना तर्क काढला की महादजीने मुद्दम पेशव्यांचा अपमान केला आहे. सदाशिव दिनकरास महादजीने सदर पदे दक्षिणेत नेण्याविषयी सांगितले मात्र सदाशिव दिनकरने त्यास नकार दिला सदर पदे सात वर्षे उज्जन मध्ये पडून होती[१६७]

वकिलीमुतलकी व नायबमुनायबी पदासंबधाने नाना महादजीच्या दरम्यान केव्हा स्वताच्या पत्रांनी तर केंव्हा वकिलामार्फत पुष्कळ वाटाघाटी झाल्या. यावेळी नाना या पदव्या घेवू नये याबाबत ठाम होते मात्र पदव्या जर घेतल्या नाहीत तर उत्तरेमध्ये मोठा गैरसमज निर्माण होईल व मराठयांचा जो धाक इतर सरदारावर बसला आहे तो कमी होईल असे महादजीस वाटत होते.[१६८]

या पदव्याबाबत दिल्लीचा वकिल हिंगणे याच्या पत्रावरून वेगळीच दिशा स्पष्ट होते ती म्हणजे अफरासिआबखान मारला गेल्यानंतर बादशाही कारभार पाटीलबावास दयावा असा विचार पातशहानी ठरविला आणि वकिलमुतालकीच्या व मीरबक्षीगिरी याच्या प्रत्येकी दोन दोन फर्दा तयार केल्या, एक श्रीमंताचे नावे व एक पाटीलबावाचे नावे. यावेळी बादशहाने असे सांगितले की दोन खिजमता तुम्हांकडे पाठविल्या आहेत. पाहिजे तर श्रीमंतांचे नावे कारभार शिक्का खोदून करा किंवा पाहिजे तर तुम्ही आपले नावे शिक्का खोदून कारभार करा. तेंव्हा महादजीने आठ नऊ महिने स्वताचेच नावे वकिलमुतालकीचा शिक्का खोदून कारभार चालविला. पंरतु

---

[१६६] सि.ॲ.पॉ.डि.डा., नं.३२, ले. २९, पृ. २३६–२४३, २५३

[१६७] म.रि.उ.वि.,भाग–२, पृ. ९७

[१६८] म.शि.का., ३७१, ३७७, ३९९, ४०३, म.रि.उ.वि., भाग.०२, पृ.१०१

सदर बाबीवरून बरेच वादंग उठल्यानंतर महादजीने दुसरा शिक्का श्रीमंतांचे नावे खोदवून कारभार चालविला.[१६९] एकूणच सदर बाबीवर विश्वास ठेवल्यास येथे महादजीने स्वहितास प्राधान्य दिल्याच दिसून येते.

वास्तविक स्थितीचे अवलोकन केल्यास दिल्लीवर पुन्हा बादशहाची स्थापना महादजीने केली म्हणून बादशहाने महादजीला सन्मान देऊ केला. बादशाही सन्मान महादजीने स्वोकारावा की नाही याबाबत वाद होता. महादजी हा सन्मान स्वोकारण्यावर जेवढा ठाम होता तेवढाच नानांचाही त्यास कडवा विरोध राहिला.

एकूणच सर्वबाबींचा आढावा घेतल्यास महादजीस अडचणीत आणण्याची संधी नाना कधी सोडत नसे. अर्थात महादजीचा लौकीक कमी करणे हाच त्यामागील हेतू होता. तुकोजी होळकरास नानाने वास्तविक महादजीच्या मदतीस ठेवणे आवश्यक होते तसे न करता नानाने टिपूवर मोहिम घाईघाईने उपस्थित करून तुकोजीस दक्षिणेस नेले. महादजीने उत्तरेत अमाप यश संपादन केले बादशहास गादीवर बसवून त्याच्याकडून स्वताकरीता वजीरी व पेशव्याकरीता वकिलमुतालकी मिळवल्यानंतर नानाचा महादजी विषयी विरोध वाढतच गला. महादजी योग्यतेस चढला हे ऐकून नाना त्याचा हेवा करू लागला. नानास असे वाटे की, जशी पेशव्यानी सातारा राजकुलाची अवस्था केली, तशी पेशव्यांची अवस्था महादजी करील ती न व्हावी म्हणून तो इग्रजाशी मोठया स्नेहाने वागू लागला. काही दिवस इंग्रजाबरोबर बोलणे महादजीमार्फत चालत असे ते बंद करून इंग्रजांचा एक वकिल पुणे दरबारात ठेवला. नागपूर भोसल्यास पुण्यास आणून त्याचा इंग्रजाबरोबर स्नेह जोडून महादजीस लौकिकात हलका बनविले. महादजीने संपादन केलेल्या दौलतीत पेशव्यांचा हिस्सा असावा व त्याने पेशव्याचे वर्चस्व

---

[१६९] म.रि.उ.वि., भाग.०२, पृ.१०२, १०३

मानावे म्हणून अलिबहाद्दर व तुकोजी होळकर या दोघाना फौज देवून दिल्लीस रवाना केली.

महादजीने उत्तरेमध्ये जवळ जवळ १२ वर्षे राज्यकारभार केला हा करत असताना त्यांचा पेशवे व पेशव्यांचे कारभारी नाना फडणविस यांच्या बरोबर सबंध आले. इ.स. १७९२ नंतर महादजी दक्षिणेमध्ये आले यावेळी त्यांचे व नाना फडणविस यांचे हिशोबावरून व इतर आनेक बाबीवरून संघर्ष झाल्याचे दिसून येते सदर सर्व बाबींचा आढावा प्रकरण सात मध्ये घेण्यात आला आहे.

..........)))(((.......

प्रकरण चौथे

कोल्हापूरचे छत्रपती व महादजी शिंदे

करवीर (कोल्हापूर) गादी पूर्वपीठीका/पार्श्वभूमी :–

मराठा काळातील कोल्हापूर :–

पेशवा व कोल्हापूरकर छत्रपती:–

करवीर छत्रपतींचा बारभाईस विरोध :

करवीर युध्दाची सुत्रे महादजी शिंदे यांच्याकडे :

छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) करवीर आणि

महादजी शिंदे यांचा करार : (२३ एप्रिल १७७८)

करवीर (कोल्हापूर) गादी पूर्वपीठीका/पार्श्वभूमी :–

करवीर[१] (कोल्हापूर)[२] हे मराठा कालखंडातील एक महत्वाचे आणि स्वतंत्र सत्ताकेंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले असले तरी या शहराला फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. दक्षिण काशी[३] म्हणून ओळखल्या जाणा–या कोल्हापूरवर प्राचीन काळात सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, देवगिरीचे यादव यांची सत्ता होती.[४] मध्ययुगीनकाळामध्ये बहामनी राज्याचा संस्थापक हसन गंगू (इ.स. १३४७–१३५८) याची काही काळ कोल्हापूरवर सत्ता होती. पुढे हा प्रदेश आदिलशाहीच्या वर्चस्वाखाली आला व तो जवळ जवळ १५० वर्षे त्यांच्या ताब्यात होता.[५]

करवीर मधील उत्तरेश्वर, खोलखंडोबा, रंकाळा, पद्माळा, रावणेश्वर व ब्रम्हपुरी या सहा वसाहती मिळून सध्याचे कोल्हापूर निर्माण झालेले आहे. यामधील ब्रम्हपुरी ही सर्वात प्राचीन व आद्य वसाहत मानली जाते. ब्रम्हपुरी ही वसाहत ब्रम्हदेवाने वसवली असावी व त्यावरून त्यास ब्रम्हपुरी असे नाव

---

[१] सध्या करवीरला कोल्हापूर असे म्हटले जाते व करवीर हा कोल्हापूरातील एक तालुका आहे.

[२] शहर १६° ४२' उत्तर अक्षांस ७४° १६' पूर्व रेखांशावर समुद्रसपाटीपासून १८७० फूट उंचीवर पंचगगा नदीच्या काठावर वसलेले आहे. – मालसे पी.टी., *कोल्हापूर ए स्टडी इन अर्बन जिऑग्रॉफि,* पुणे, १९७४, पृ. १३

[३] चौधरी की.का., (संपा.) *कोल्हापूरचा इतिहास,* पृ. ३३,३४., 'करवीर महात्म्य' या ग्रंथामध्येही करवीरला 'दक्षिण काशी' असे संबोधले आहे.

[४] क. रि. पृ. ०२

[५] मोडक बा.प्र, *कोल्हापूर प्रातांचा इतिहास,* भाग – ०१, पृ. २२३ – २५

पडले असावे अशी एक अख्यायिका प्रसिध्द आहे.[६] कोल्हापूर परिसरामध्ये कोल्हासूर व करवीर या दोन दैत्यांनी अहाकार माजवला होता व स्थानिक लोकांना खूप त्रास दिला होता. देवी महालक्ष्मीने या दोन दैत्यांना मारले त्यावेळी त्या दोघानी मरतेसमयी या भागाला आपले नाव दयावे अशी इच्छा प्रकट केली याचा परिणाम म्हणजे या भागास 'कोल्हापूर' व 'करवीर' या नावाने ओळखले जावू लागले. अशीही एक अख्यायिका प्रसिध्द आहे. पूर्वी या शहराचा राजा 'शृगाल' हा होता या नावाचे प्राकृतरूप 'कोल्हा' असे आहे त्याला जोडूनच 'पूर' हे गाववाचक नाव येवून 'कोल्हापूर' असे नाव पडले असावे असाही एक समज आहे.[७]

मराठा काळातील कोल्हापूर :–

शककर्ते शिवाजी महाराज यांनी मराठा साम्राज्याची निर्मिती केली व रायगड ही मराठा साम्राज्याची राजधानी केली. रायगडावरून राज्याचा कारभार चालवत असताना त्यांनी मराठा साम्राज्याचा विस्तार करून मराठयांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. मात्र अजारपणामुळे शिवाजी महाराजांचा मृत्यू ३ एप्रिल १६८० रोजी झाला.[८] छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर छ. संभाजी महाराज हे छत्रपतीपदी (२० जुलै १६८०)[९] आरूढ झाले. छ. संभाजी महाराजांच्या राज्यरोहणापासूनच्या कालखंडास महाराष्ट्राच्या इतिहासात इ.स. १६८१ ते १७०७ हा कालखंड 'स्वातंत्र्ययुध्दाचा कालखंड' म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्ययुध्द कालखंडात छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई (१६७५–१७१४) असे तीन राज्यकर्ते मराठा साम्राज्यास लाभले.

---

[६] डॉ.सांकलिया एच.डी., डॉ.दीक्षीत एम्.जी., *एक्सकॅव्हॅनशन ॲट ब्रम्हपुरी,* पुणे, १९५२, पृ. ०४.

[७] मालसे पी.टी., उपरोक्त, पृ. ०१

[८] क. रि., पृ. १२

[९] कित्ता, पृ. १४

छत्रपती संभाजी महाराज व कवि कलष याचां औरंगजेबाने वध (११ मार्च १६८९)[१०] घडवून आणला व संभाजी पुत्र शाहू व राणी येशूबाई यांना १८ ऑक्टोबर १६८९ रोजी रायगड किल्ला सर करून कैदेत टाकले. छत्रपती शाहू महाराज हे कैदेमध्ये असताना छत्रपती राजाराम महाराज यांनी मराठा राज्यकारभाराची सुत्रे यशस्वीपणे सांभाळली. जवळ जवळ सात वर्षे त्यांनी औरंगजेबाशी मुकाबला केला.[११] छत्रपती राजाराम महाराज यांचा मृत्यू इ.स. १७०० रोजी झाला व अंबिकाबाई या सती गेल्या.[१२] राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर मराठा साम्राज्य लयास जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. मात्र याच वेळी महाराणी ताराबाई[१३] यांनी मराठी सत्तेचा कारभार आपल्या हातात घेतला[१४] व औरंगजेबासारख्या बलाढय शत्रू पासून मराठा साम्राज्याचे रक्षण केले. ताराबाईस यावेळी मराठा साम्राज्यातील इतर सरदारांची व प्रमुख कारभा–यांची मान्यता व सहकार्य होते.[१५]

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर[१६] त्याचा मुलगा आजमशहा हा मुघल सत्तेचा बादशहा बनला. मोगल सत्तेवर आलेल्या आजमशहा बादशहाने झल्फिकारखानाच्या[१७] सल्ल्याने छत्रपती शाहू महाराज यांची कैदेतून सुटका

---

[१०] कवी श्यामलदास, *विरविनोद,* खंड–०२, भाग–०४, पृ–३७६

[११] क. रि., पृ. ५७

[१२] राजाराम महाराजांना एकूण चार बायका होत्या. अंबिकाबाई या महाराजांच्या तिस–या राणीसाहेब. राजाराम महाराजांच्या मृत्यू समयी त्या विशाळगड येथे होत्या. महाराजांच्या पागोटयाबरोबर त्या सती गेल्या.पगडी सेतू माधवराव, *मराठयांचे स्वातंत्र्य युध्द,* पृ. ५४–५८

[१३] हंबीरराव मोहिते यांची कन्या. माहेरचे नाव सीताबाई, जन्म १६७५ राजारामाशी ताराबाइचा विवाह १६८४–८५ च्या सुमारास झाला त्यांना एक पुत्र शिवाजीराजे हेच करवीर राज्याचे पहिले छत्रपती होय. त्यांचा जन्म ९ जून १९९६ रोजी झाला. त्यानंतर कन्या अंबिका तिचा जन्म मार्च १६९९ मध्ये झाला. – क. रि., पृ. ५६

[१४] ताराबाईचे वय त्यावेळी २५ वर्षे इतक होते. – क. रि. पृ. ५७

[१५] क. रि. पृ. ६२

[१६] २० फेब्रुवारी १७०७ रोजी निधन झाले.

[१७] याचे मूळ नाव ईतिकदखान होय. रायगड किल्ला काबीज केला व येशूबाई, छ.शाहू यांच्यासह अफाट संपत्ती घेवून तो औरंगजेबाच्या छावणीत दाखल झाला म्हणून औरंगजेबान त्यास झल्फिकारखान ही पदवी बहाल केली.

केली. छ. शाहू महाराज यांची सुटका करण्यामागे मराठा साम्राज्यामध्ये यादवी माजावी व मराठा सत्ता क्षीण व्हावी हा मुख्य हेतू बादशहाचा व त्याच्या वजीराचा होता. छ. शाहू महाराज यांच्या सुटकेबाबत मराठा साम्राज्यामध्ये संमिश्र प्रतिक्रिया होती. त्यामध्ये प्रामुख्याने दान गट निर्माण झाल. संभाजीचा पुत्र शाहू यांचा गादीवर खरा हक्क आहे असा माननारा एक वर्ग होता. तर ताराबाईने स्वातंत्र्याचे रक्षण केले, औरंगजेबाशी टक्कर दिली म्हणून त्यांच्या मुलाचा (प. शिवाजी) गादीवर खरा हक्क आहे असे माननारा एक वर्ग होता.[१८]

छ. शाहू महाराज मराठा साम्राज्यात दक्षिणेकडे यावयास निघाल्यानंतर ताराराणीस ही गोष्ट रूचली नाही. मराठा साम्राज्याच्या पडत्या काळात आपण त्याचे रक्षण केले असून छ. शाहू महाराज यांचा त्याच्यावर काहीही अधिकार नाही असे तिने जाहीर केले. पुढे तिने दक्षिणेत यत असणारे शाहू हे खरे शाहू नसून तोतया आहेत अशीही पत्रे सरदारांना पाठविली. एकूणच ताराराणीस कोणत्याही परिस्थितीमध्ये छ. शाहूंच्या हाती सत्ता दयावयाची नव्हती.[१९]

छ. शाहू महाराज स्वराज्यामध्ये येण्यास निघाल्यानंतर ताराराणी हीने मराठी सत्तेचा कारभार छ. शाहू महाराज यांच्या हातात देण्यास नकार दिला. यातून मराठी सत्तेमध्ये यादवी सुरू झाली. संभाजी पुत्र शाहू (१७०७–४९) व ताराबाई यांच्यामध्ये संघर्ष होऊन इ.स. १२ ऑक्टोबर १७०७ च्या खेडच्या लढाईमध्ये ताराबाईच्या पक्षाचा पराभव झाला.[२०] खेडच्या लढाईनंतर झालेल्या अनेक लहान–मोठया लढाईमध्येही शाहू महाराजीनी ताराबाईवर मात केली व शाहू साता–याच्या गादीवर मराठा सत्तेचे वारसदार म्हणून विराजमान (१२

[१८] क. रि., पृ. ७८
[१९] म. रि., ०५, बाळाजी विश्वनाथ, पृ. ३५.
[२०] क.स.कै., पृ. ३७., कवी श्यामलदास, *उपरोक्त,* पृ. ३७८

जानेवारी १७०८)[२१] झाले. छ. शाहू महाराज यांनी सातारा काबीज केल्यानंतर महाराणी ताराबाई हिन कोल्हापूर–पन्हाळा परिसरामध्ये प्रयाण केले व तेथून ती शाहच्या विरोधात कारस्थाने रचू लागली. छत्रपती शाहू महाराजांनी परसोजी भोसलची नेमणूक ताराबाईच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याकरीता केली होती. मात्र १७०९ मध्ये परसोजीचा मृत्यू झाल्यानंतर ताराबाईने १७१० मध्ये पन्हाळयास शिवाजी (पहिले) यांच्या नावाची छत्रपती म्हणून द्वाही फिरवली. ताराबाईने सर्व सरदारांना पत्रे पाठवून शिवाजी महाराज (पहिले) हेच खरे छत्रपती आहेत असे कळविले.[२२] अशाप्रकारे मराठा साम्राज्याची दोन शकले पडली व सातारा आणि कोल्हापूर ही दोन मराठी सत्ता केंद्र बनली.[२३]

महाराणी ताराबाई यांनी कोल्हापूरच्या गादीवर आपला पुत्र शिवाजी (पहिले) यांना बसवून त्या स्वतः राज्यकारभार पहात होत्या. मात्र १७१४ मध्ये कोल्हापूरच्या राजकीय पटलावर मोठया प्रमाणात बदल घडून आले. इ.स. १७१४ मध्ये सत्तातंर घडून येवून संभाजी (पहिले)[२४] हे कोल्हापूरच्या छत्रपतीपदी आले.[२५] त्यांच्या काळात प्रथम राजसबाई[२६] या राज्यकारभार करत होत्या. तद्नंतर त्यांची पत्नी जिजाबाई यांचीही त्यांना समर्थ साथ लाभली. बाळाजी विश्वनाथ यांने सय्यद हुसेन यांच्या सहाय्याने बादशहा बरोबर करार घडवून आणला व शाहूंच्या नावे चौथाई व सरदेशमुखी सनद, मातोश्री येशुबाई यांची सुटका केली. शाहूंच्या मातोश्री येशूबाई या मोघलांच्या कैदेतून सुटून आल्या तेंव्हा कोल्हापूरकर संभाजी महाराज यांनी पत्र पाठवून आपला आनंद व्यक्त केला.[२७] कोल्हापूर व सातारा यांच्यातील तणाव

---

[२१] म.रि.म.वि. भाग–०१, पृ. १३
[२२] क.रि., पृ. ११०–१११
[२३] म.रि., पृ. २०४
[२४] जन्म विशाळगड येथे २३ मे १६९८, क.रि.पृ.५६
[२५] क.रि.पृ. १६८
[२६] कागलकर घाटगे यांची कन्या,दोन मुले–मुलगी सोयराबाई व मुलगा संभाजी राजे.
[२७] क.छ.घ.इ.सा., भा.०१, पृ. ०७

वारणेच्या तहाने कमी झाल्याचे दिसून येते. मात्र या वारणेच्या तहाचे स्वरूप एक राज्य (सातारा) मुख्य व एक मांडलिक असे असलेले दिसून येते. यामुळे कोल्हापूरकरांना स्वास्थ मिळणे कदापि शक्य नव्हते, परिणामी कोल्हापूरकर व सातारा पुढे पेशवे यांच्यामध्ये वेळोवेळी संघर्ष घडून आल्याचे दिसून येते.[२८] कोल्हापूर सातारा एकीकरणाचाही प्रयत्न वारणेच्या तहाने झाला होता मात्र त्यात यश आले नाही.[२९]

पेशवा व कोल्हापूरकर छत्रपतीः–

छ. शाहू महाराजांनी आपणास होत असलेला विरोध पाहून मराठा सरदारांना पत्रे पाठविली व आपणच खरे मराठा राज्याचे वारस आहोत असे कळविले. याचा परिणाम व्हावयाचा तो झाला व अनेक सरदार ताराराणीचा पक्ष सोडून शाहू महाराजांच्या पक्षास गेले. छ. शाहूंच्या पक्षातील बाळाजी विश्वनाथ याने यावेळी महत्वाची कामगिरी बजावली व याचेच बक्षीस म्हणून बाळाजी विश्वनाथ यास 'सेनाकर्ते' ही पदवी व पुढे अष्टप्रधानमंडळातील 'पेशवा' हे महत्वाचे पद छ. शाहू महाराजांनी बहाल केलेले दिसून येते.

छ. शाहू महाराज यांनी बाळाजी विश्वनाथ यास पेशवा पद बहाल केल व बाळाजी विश्वनाथ यांने शाहूंच्या शत्रूंचा बिमोड करण्याचे कार्य हाती घेतले. कोल्हापूरकर हे शाहूंचे प्रबळ विरोधक होते त्यांचा बिमोड करण्याची जबाबदारी पेशव्यांच्यावर होती. पेशवा बाळाजी विश्वनाथ त्याच बरोबर त्याच्यानंतरच्या सर्व पेशव्यांना कोल्हापूरच्या सत्ताधिशांनी नेहमीच विरोध केल्याचे दिसून येते. हे करत असतांना त्यांनी निजाम, हैदर, टिपू, कित्तूरकर देसाई यांचीही मदत मिळवण्याचा वेळोवेळी प्रयत्न केलेला दिसतो.

---

[२८] म.रि.म.वि., पृ. २३३

[२९] म.प.इ., पृ. १२७., क.छ.घ.इ.सा., पृ. ७५–७६

पेशव्यांच्या कारकिर्दीमध्ये विशेषतः पहिला बाजीराव व नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीमध्ये मराठी सत्तेचा उत्कर्ष घडून आला. नानासाहेब पेशवे यांनी कोल्हापूरकरांच्या बरोबर शाहू महाराजाच्या परस्पर एक तह केला होता. त्या तहान्वये छत्रपती शाहू महाराज यांना संतती नसल्यामुळे त्यांच्या मृत्यू नंतर कोल्हापूर व सातारा ही दोन्ही राज्ये एक करण्यात यावीत. पेशव्यांनी शाहू महाराजांच्या कारकीर्दीप्रमाणे पुढे अखंड सेवा करावी. शिंदे, होळकरांकडे पूर्वीप्रमाणे संरजाम ठेवण्यात यावे. अशाप्रकारची बारा कलमे त्या तहामध्ये होती.[३०] पुढे मराठा साम्राज्यामध्ये अनेक घडामोडी घडून आल्या व हे एकिकरण बाजूला पडल्याचे दिसून येते. सातारा व करवीर ही दोन्ही राज्ये एकत्र करावीत याबाबत अनेकदा जिजाबाईनी कळविले होते मात्र पेशव्यांनी त्याच्याकडे फारसे लक्ष दिलेले दिसून येत नाही.[३१]

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या प्रारभी प्रबळ सत्ता म्हणून ओळखली जात असलेल्या मराठी सत्तेचा तिस–या पानिपत (१४ जानेवारी १७६१) युध्दात पराभव झाला व मराठा साम्राज्यामध्ये आनेक घडामोडी घडून आल्या. यातील बारभाई कारस्थान ही महत्वाची घटना होती.[३२] या बारभाई कारस्थानामुळे रघुनाथदादा व त्यांचे समर्थक सरदार तसेच मराठी सत्तेतील निवडक सरदार यांच्यामध्ये दुफळी निर्माण झाली. यामध्ये करवीरकरांचा बारभाईस विरोध होता.

करवीर छत्रपतींचा बारभाईस विरोध : कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज मृत्यू पावल्यानंतर राणी जिजाबाई[३३] या छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) यांच्या नावे राज्यकारभार पाहू लागल्या. मात्र १७ फेब्रुवारी १७७३ ला

[३०] म.रि., पुण्यश्लोक शाहू, भा.०५, पृ. २१

[३१] पे.द., खंड.०६, ले.२०, पृ. १३९

[३२] ना.फ.च., पृ. १७.

[३३] तोरगलकर शिंदयांच्या घराण्यातील नरसोजीराव शिंदे यांच्या कन्या असून त्यांचा संभाजी महाराजाबरोबर विवाह इ.स.१७२६ मध्ये झाला.

महाराणी जिजाबाई यांचा मृत्यू झाला.[३४] त्यानंतर महाराणी जिजाबाई यांची सवत महाराणी दुर्गाबाई या छत्रपती शिवाजी याचे नावे राज्यकारभार पाहू लागल्या. यावेळी त्यांना महाराणी जिजाबाई यांच्या माहेरकडील येसाजी कुसाजी शिंदे हा राज्यकारभार करण्यास मदत करत होता. बारभाईचे कारस्थान उभारले असता नाना फडणविस यांनी करवीरकरांचे वकिल जिवाजी भोसले, महादेव शास्त्री, फोडेंकर यांना पुण्यास आण्न त्यांच्यातील वाद मिटवून दिला होता व त्यांना बारभाईस सहकार्य करण्याबाबत सांगितले होते. मात्र करवीरकर छत्रपती यांचा याबाबत योग्य प्रतिसाद नव्हता.[३५]

सन १७७४ मध्ये रघुनाथराव कर्नाटकामधून पुण्यास येऊ लागला त्यावेळीही करवीरकरांनी त्यास दाद दिलो नाही. याचवेळी त्यांनी इचलकरंजीवर फौज पाटविली व त्यांची ठाणी हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. इचलकंरजीच्या महाराणी अनुबाई यांनी पुण्यास याबाबत कळविले व करवीरकरांना फौज मागे घेण्याबाबत सांगावे असे सांगितले. पेशव्यांचे कारभारी सखारामबापू यांनी याबाबत करवीरच्या छत्रपतींना पत्र पाठविले मात्र त्यापत्रासही करवीरच्या छत्रपतींनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही.[३६]

करवीरकर छत्रपती हे पूर्णतः पेशव्यांच्या विरोधात आपले धोरण आखत होते. करवीरकर छत्रपती यांनी पेशव्याच्या मुलखास उपदव करणा–या बेळगांवच्या उत्तरेस असणा–या कित्तूरकर देसाई व मराठयांचा शत्रू हैदर यांच्याबरोबर मैत्रीचे संबध निर्माण केले होते. हे सर्व जाणून बारभाईने करवीरकर छत्रपती यांचा विरोध मोडून काढण्यासाठी वेळोवेळी फौजा पाटविल्या होत्या.[३७] मात्र मराठी फौजाना अपयश येत होते.

---

[३४] क.रि.पृ. २९३

[३५] म.रि., खंड–६, पृ. ३१२.

[३६] कित्ता, पृ. ३१३.

[३७] कित्ता, पृ. क्र. ३१२, ३१४

पटवर्धन व इचलकंरजीकर घोरपडे या पेशव्यांचे सरंजाम करवीरास लागून होते. या प्रदेशावर वारंवार स्वा-या करून तो प्रदेश आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करवीर करत होते. याबाबत लक्ष्मीबाई घोरपडे[३८] यांनी पेशव्यांना पत्रे पाठवून करवीरचा बंदोबस्त करावा म्हणून कळविले होते.[३९] १८ एप्रिल १७७५ बापू व नाना यांनी १५ दिवसात करवीरकरांचा त्रास कमी करतो त्यांचा बंदोबस्त करतो अशी पत्रे पाठविली.[४०] १५ मे १७७५ नाना फडणीस अनुबाईस लिहीतात, करवीरकरांचे उपद्रवाविषयी लिहले तरी कोन्हेरराव यांस ६ हजार फौजेनिशी पाठविले आहे. तरी लवकरच बंदोबस्त होईल.[४१] करवीरकरांचा बंदोबस्त करण्याकरीता पेशव्यांनी परशुरामभाऊ पटवर्धन, रामचंद्र गणेश कानडे, कोन्हेरराव व कृष्णराव यांची नेमणूक केली मात्र त्यांना पूर्णतः करवीरचा बिमाड करता आला नाही.[४२]

मराठी फौजानी करवीरास वेढा दिला तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) यांनी प्रीतीराव चव्हाण[४३] याच्याशो संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यावेळी येसाजी शिंदे करवीरचा कारभार पहात होता व त्यांच्या मनात प्रीतीराव चव्हाण उर्फ बापूसाहेब यांच्याविषयी आकस निर्माण झाला होता. प्रीतीराव चव्हाण हे डिग्रज येथे होते त्यांना पन्हाळा येथे बोलावण्यात आले व हिम्मतबहाद्दर हा किताब देण्यात आला.[४४]

---

[३८] नारायणराव व्यंकटराव घोरपडे यांची पत्नी

[३९] ऐ.ले.सं., भा.०५, पृ. १४५३

[४०] इ.सं.इ., पृ. १२३.

[४१] ना.फ.श. पृ. ३९

[४२] ऐ.ले.सं., ०६, पृ. २६६६ (नानांचे शिवाजीपंत म्हैसकरास पत्र, २८ ऑगस्ट १७७६)

[४३] पटवर्धनानी जेंव्हा १७७४ ला करवीरला वेढा दिला होता तेव्हा प्रीतीराव चव्हाण उर्फ बापूसाहेब यांनी तो परतवून लावला होता. प्रीतीराव चव्हाण हे मूळचे नलदुर्गचे होते ते डिग्रज येथे राहिले होते. छत्रपतीनी पेशव्यांचा संरजाम सोडावे याबाबत ते जिजाबाईस वारंवार सांगत होते.

[४४] क.स.कै., पृ. ४२, ४३

सन १७७७ च्या प्रारंभी परशुरामभाऊ पटवर्धन व रामचंद्र गणेश कानडे हे सरदार पेशव्यातर्फे करवीरकरांशी लढत होते. रामचंद्र गणेश कानडे यांनी करवीरचा कारभारी येसाजी शिंदे याचा पराभव करून कापसी, रायबाग, तेरदाळ, गोकाक, चिकोडी, निपाणी हस्तगत केले.[४५] मात्र सावसीच्या लढाईतील मराठी सैन्याच्या पराभवामुळे परशुरामभाऊ पटवर्धन यांना कर्नाटकात जावे लागले आणि करवीरच्या मोहिमेचा सर्व भार रामचंद्र गणेश कानडे[४६] याच्यांवर पडला.[४७] याचवेळी शिंदे – होळकर हे पुणे दरबारास अनुकूल नाहीत व राज्यात ऐकी नाही अशी बातमी सगळीकडे पसरली परिणामी या संधीचा फायदा घेवून कोल्हापूरकरांनी पेशव्यांचा मुलूख लुटण्यास सुरूवात केली.[४८]

करवीर युध्दाची सुत्रे महादजी शिंदे यांच्याकडे :

मराठी फौजाना येत असणारे अपयश पाहून नाना फडणीस यांनी करवीरचे राज्य अंमलाखाली आणण्याकरिता महादजी शिंदे यांची करवीरच्या मोहिमेवर नेमणूक केली.[४९] सन १७७७ ते १७८१ या कालावधीमध्ये शिंदे व नाना यांची गठ्ठी जमली होती. त्या मुदतीमध्ये शिंदयानी मोठमोठे पराक्रम करून रज्यातील अनेक बंडे मोडली व सरकारास मदत केली. करवीरकरांचा बंदोबस्त हे एक त्यातील महत्वाचे कार्य होते.[५०] मात्र महादजी शिंदे यांनी

---

[४५] खोबरकर वि.गो., *मराठयांच्या स्वा–याचे मुक्काम,* पृ. ५१७–५१८

[४६] हा रामचंद्र गणेश कानडे १२ डिसेबंर १७८० रोजी वसईचा बचाव करताना कर्नल हार्टले याची गोळी लागून मृत्यू पावला. – खोबरेकर, वि.गो., *मराठयांच्या स्वा–याचे मुक्काम,* पृ. ५१८

[४७] ना.फ.च., पृ. ४०.

[४८] अ.यो. पृ. ४५

[४९] गु.द., भाग–०३, पृ. २५९ (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान, सीतामऊ, माळवा, म.प्र.)

[५०] अ.यो., पृ. ४६

करवीरची मोहिम आपल्याकडे घेण्याअगोदर काही अटी पेशव्यांच्या समोर ठेवल्या त्या खालील प्रमाणे होत्या.

१) दक्षिणेत (स्वदेशी) दहा लक्षाची जहागीरी मिळावी.

२) अशीरगडचा किल्ला मिळावा.[५१]

महादजी शिंदे यांना स्वदेशी जहागीरी व अशीरगडचा किल्ला देण्याविषयी सखारामबापू व नाना फडणीस यांचे मत नव्हते त्यामुळे त्यांनी चालढकल केली. मात्र महादजी शिंदे यांनी रहिमतपूर येथे आपल्या फौजेचा मुक्काम टाकला. रहमतपूरच्या मुक्कामी महादजी शिंदे यांनी आपली मुलगी बाळाबाईचा विवाह राजश्री सिदोजी नरसिंगराव सितोळे याच्या बरोबर लावून दिल्याचे दिसून येते.[५२] लग्नाचे कार्य झाल्यानंतरही महादजीने आपल्या मागण्या पूर्ण केल्या खेरीज आपण करवीरवर आक्रमण करणार नाही असे सांगितले. त्यामुळे नाना व सखारामबापू यांना महादजी शिंदे यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या.[५३]

पावसाळा असल्याने महादजी शिंदे रहिमतपूर येथेच थांबले होते. पावसाळा संपत आल्यावर महादजी डिसेंबर १७७७ मध्ये कोल्हापूर येथे आले. ते कोल्हापूरला येण्याअगोदर रामचंद्र गणेश व कोल्हापूरचे येसाजी शिंदे यांच्यामध्ये हिगंणगाव येथे मोठी लढाई झाली होती. या युध्दामध्ये कोल्हापूरकरांच्या चार तोफा आणि इतर साहित्य रामचंद्र गणेश यांच्या हाती लागले होते. महादजी शिंदे कोल्हापूरकरकडे कूच करून आले तेंव्हा त्यांनी येताना वडगाव, हेरले, कोडोली, आळते वैगरे ठाणी घेव्न खुद्द कोल्हापुरास वेढा घातला. (एप्रिल १७७८)[५४]

---

[५१] ....देसी मुले माणसे ठेवण्यास जागा नाही तेंव्हा अशीरगडचा किल्ला देण्यात यावा...... ..... शि.इ.सा., भाग–०३, पृ. १००

[५२] गु.द., भाग–०४, पृ. १२१, दि.०४–०९–१७७७ (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान सितामऊ, माळवा, म.प्र.)

[५३] सि.ऑ.पॉ.डि.डा., क्र–१९, ले.३५, पृ.१७२–१७३ (अप्रकाशित पत्र, मुंबई पुराभिलेख, मुंबई)

[५४] अ.यो., पृ. ६२

महादजी शिंदे यांनी करवीरास वेडा दिला आणि तीन महिनेपर्यंत ते शहर जिंकाण्याचे अटोकाट प्रयत्न केले. महादजी शिंदे यांच्याजवळ त्यावेळी जवळ जवळ ३० हजार इतकी फौज होती. कोल्हापूर छत्रपतीचे कारभारो येसाजी शिंदे यांनी एवढया मोठया सैन्याचा मुकाबला करणे अवघड आहे हे ओळखून महादजी शिंदे यांच्या बरोबर बोलणी चालू केली. याकरीता त्यांनी आपले दोन कारकून महादजी शिंदे यांच्याकडे पाठविले. तडजोडीचे बोलणे चालू असतानाच दोन्ही सैन्यात चकमकी चालू होत्या. महादजी शिंदेच्या सैन्यान बत्तीश शिराळे येथे अक्रमण करून तेथे लुट केली. अशा प्रकारे कोल्हापूरच्या आसपासची अनेक ठिकाणे महादजी शिंदे यांनी जिंकूण आपल्या ताब्यात घेतली. येसाजीने एकाचवेळी आक्रमण व तहाची बोलणी चाल् केल्याने महादजीने त्याच्यावर विश्वास ठेवला नाही व आपले आक्रमक धोरण तसेच पुढे चालू ठेवले.[५५]

तहाची बोलणी चालू असताना सदरचे प्रकरण हे दोन लाखावर मिटवावे असे येसाजी शिंदे याचे म्हणणे होते. मात्र महादजी शिंदे एवढया छोटया रकमेवर तयार झाला नाही त्यांनी ३० लाख रूपयाची मागणी केली. करवीरकरांना ती पुरवणे शक्य नव्हते त्यामुळे त्यांनी युध्द चालूच ठेवले. हैदरअलीची मदत घेण्याचा येसाजी शिंदे यांनी प्रयत्न चालवला होता. याची महिती महादजी शिंदे यास लागली आणि याचा परिणाम म्हणजे महादजी शिंदे यानी आपला वेढा तीव्र केला.[५६]

करवीरकरांच्या बरोबर चालू असणा–या युध्दाची माहिती वेळोवेळी पुण्यास कळविली जात असे. तसेच युध्दाकरीता लागणारी मदत महादजी शिदे मागवून घेत असत. नाना फडणविस यांनी वेळोवेळी युध्दाकरीता लागणारी मदत पाठविल्याचे उल्लेखाची पत्रे आढळून येतात.[५७] नानानी

---

[५५] क.रि., पृ. ३०९

[५६] क.रि., पृ. ३१०

[५७] का.से.घो.घ.का., पृ. ३३१.

महादजीस तोफा व इतर सरंजाम पाठविण्याची व्यवस्था केलेली दिसून येते[५८] दिर्घकाळ चाललेल्या लढाईचा कोल्हापूर शहरातील लोकांच्या दैनंदिन जिवनावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येते. कोल्हापूरात महागाई वाढली, लोकांच्यामध्ये अस्वस्थता वाढू लागली. इतके जरी असले तरी कोल्हापूरकर येसाजी–सटवाजी इतर मंडळी ही शरणागती पत्करण्यास तयार नव्हती.[५९]

कोल्हापूर आपल्या आक्रमणास दाद देईना तेव्हा कोल्हापूरची रसद तोडण्याचा प्रयत्न महादजी शिंदे यांनी केला. महादजीने कोल्हापूर शहराभोवती आपली फौज पसरवली व फितुरीने माणसे फोडण्याचा प्रयत्न केला. सामानगड, भुदरगड येथील जासूसांना त्यांनी आपल्याकडे वळविले व त्यांच्याकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न चालविला.[६०]

महादजी शिंदे व करवीरच्या फौजा यांच्यात चकमकी घडून येत होत्या. जानेवारीत झालेल्या एका चकमकीत हरजी शिंदे जखमी झाल्याचे व ४० लोक ठार व ४०–५० लोक जखमी झाल्याचे व सटवाजी भोसले याच्याबरोबर घनघोर युध्द झाल्याचे पुरावे आढळून येतात.[६१] ४ जून १७७७ करवीरकर येसाजी शिंदे यांच्या बरोबरच्या युध्दामध्ये जे मातबर माणूस ताब्यात आले त्यांना धनगड, राजमाची, कोरी हया गडावर कैदेत ठेवण्याचा हुकूम नानांनी दिला.[६२] महादजी शिंदे कोल्हापूरच्या स्वारीमध्ये व्यस्त असताना उत्तरेमध्ये त्यांच्या ताब्यातील प्रदेश शत्रूनी परत घ्यावयास सुरूवात केली होती व महादजीस उत्तरेतून परत येण्याबाबत बोलावणे येत होते. मात्र

[५८] म.शि.का., ले. ३५.
[५९] क.रि., पृ. ३१२
[६०] क.छ.घ.इ.सा., भाग–०८, पृ. ९७.
[६१] म.शि.रा., भाग–१,१७७८, पृ.क्र. ०१
[६२] स.मा.रो., ०१, पृ. १५

महादजीने यावेळी कोल्हापूरचा बंदोबस्त झाला की लगेच उत्तरेकडे कूच करतो अशा आशयाची पत्रे पाठविलेली आढळून येतात.[६३]

कोल्हापूर शहर हे सहजासहजी जिंकणे शक्य नाही हे महादजी शिंदे यास माहित होते. महादजी शिंदे याच्या जवळ असणा–या तोफा या छोटया होत्या त्याचा कोल्हापूरच्या तटबंधीवर काहीही परिणाम होत नव्हता. परिणामतः महादजी शिंदे यांनी पुण्याहून महांकाली तोफ मागविली व त्याकरिता त्यांनी मोठा पत्रव्यवहारही केला. महाकांली तोफेवरच महादजी शिंदे यांची भिस्त असल्याने त्यांनी ती येई पर्यंत लढाईची तिव्रता कमी केली.[६४]

महांकाली तोफ येईपर्यंत महादजी शिंदे यांनी अचानकपणे एक विपरित मार्ग काढला तो म्हणजे कोल्हापूरची जी फौज होती त्यांची घरे आजूबाजूच्या शहराभोवतालच्या खेडयामध्ये विखुरली होती त्यांचा शोध काढून त्यांना उपद्रव देण्याचे सत्र महादजी शिंदे यांनी सुरू केले.[६५] ५ मार्च रोजी महांकाली तोफ क–हाड जवळ आल्याचे वर्तमान महादजी शिंदे यांना कळाले तेव्हा त्यांनी लढाईचा जोर पुन्हा वाढविला व कोल्हापूर जिंकूण घ्यावयाचे असेच धोरण ठेवले. करवीरला महांकाली तोफ पोहचल्यावर त्यांनी तिस–या दिवशी चौफेर मोर्चे बसवून तोफांचा मारा चालू ठेवला. कोल्हापूरच्या दक्षिणबाजूकडून प्रामुख्याने त्यांनी मारा चालविला. सातव्या दिवशी करवीरमधून येसाजी शिंदे यांनी आपला प्रतिनिधी पाठविला व तहाची बोलणी चालू ठेवली. शेवटी २३ एप्रिल १७७८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) व महादजी शिंदे यांच्यामध्ये करार झाला.[६६]

---

[६३] गु.द., भाग–४, पृ. १३४, दि. ०१–०२–१७७८ (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान, सीतामऊ, माळवा, म.प्र.)

[६४] क.रि., पृ. ३११

[६५] कित्ता, पृ. ३१२

[६६] म.शि.रा., पृ. ०१

छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) करवीर आणि महादजी शिंदे यांचा करार : (२३ एप्रिल १७७८)

छत्रपती शिवाजी महाराज दुसरे व महादजी शिंदे यांच्यामध्ये खालील प्रमाणे करार घडून आला.

१) कोल्हापूरातील देवस्थानास आणि ब्राम्हणास गावे इनाम दयावीत. यामध्ये श्री महालक्ष्मी, शंकराचार्य स्वामी, श्री जोतिर्लिंग, मन्सूर साहेब इत्यादींचा समावेश राहील.

२) कोल्हाप्रकरांनी राघोबादादा, हैदर वैगेरेना आश्रय देवू नये. तसेच त्यांच्याबरोबर कोणत्याही प्रकारचा संबध ठेवू नये. राज्याच्या वृध्दी व कल्याणासाठी योग्य ते धोरण राबवावे.

३) शिवाजी गोपाळ, रामचंद्र गणेश इत्यादी लोकांना पकडून ठेवले आहे त्यांना सोडन दयावे.

४) कोल्हापूरकरांनी घाटगेकरांच्याकडे कागल हे प्रथम पासून आहे ते त्यांना परत दयावे.

५) युध्द खंडणी म्हणून कोल्हापूरने एकूण १५ लक्ष रू. दयावेत. प्रत्यक्ष चार लाख दयावेत व टप्प्या टप्प्याने ११ लाख रूपये दयावेत.

६) लाट, रांगोळी, चिकोडी, मनोळी यांच्या सनदा कोल्हापूरने दयाव्यात.

७) राणोजी घोरपडे (सेनापती) यांची घेतलेली गावे करवीरकरांनी त्याना परत दयावीत व पहिल्या सारखाच त्यांना मान दयावा.

८) पंतप्रतिनिधी, बावडेकर अमात्य व सेनापती यांना पुर्ववत प्रमाणे मान दिला जाईल.[६७]

---

[६७] क.रि., पृ. ६४९,६५०,६५१., गु.द. भाग.०४, पृ. १४१, दि. २८–०४–१७७८ रोजीच्या पत्रातून या तहाची माहिती मिळते. (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान, सीतामऊ)

वरील तहावरून छत्रपतो शिवाजी महाराज (दुसरे) व महादजी शिंदे यांच्यात झालेल्या करारामुळे सेनापती राणोजी घोरपडे कापशीकर व कोल्हापूर छत्रपती यांच्यातील संबध दुरावले होते याची कल्पना येते. छत्रपतीनी सेनापतीच्यावर बरेच निर्बध घातले असावेत हे लक्षात येते.[६८] आर्थिकदृष्टयाही हा करार करवीरकरांना जाचक होता.

करवीरकरांचा बारभाईस तसेच पेशवाईस असणारा विरोध मोडून काढण्याकरिता नाना फडणीस यांनी परशुराम भाऊ पटवर्धन, रामचंद्र गणेश कानडे यांना फौज घेऊन करवीरवर पाठविले होते. मात्र मराठी फौजांना वेळोवेळी येत असणारे अपयश पाहून त्यांनी महादजी शिंदे यांना करवीरच्या मोहीमेची सुत्रे स्विकारण्याबाबत विनवणी केली. महादजी शिंदे यांनी आपल्या अटी मान्य करून घेऊन करवीरवर स्वारी केली. करवीर हे ठाणे सहजासहजी जिंकता येणार नाही लहान तोफेचा तेथे काही उपयोग होणार नाही हे ओळखून महादजी शिंदे यांनी महांकाली तोफ पुण्याहून मागवून घेतली. महादजी शिंदे यांनी फितुरीचे व दडपशाहीचेही धोरण राबविले व करवीर सर केले. महादजी शिंदे यांना आपल्याच स्वकीयाबरोबर युध्द करणे योग्य वाटत नव्हते. याबाबत सरदेसाई लिहीतात की, ''महादजीस मराठे बांधवाविरूध्द सैनिक शक्तीचा उपयोग उचित वाटत नव्हता. आपल्या जिवनात एकदाच कोल्हापूरच्या राजाविरूध्द १७७८ मध्ये त्याने हा उपाय केला. त्याने युध्द व संघर्ष मराठयांच्या शत्रूशीच केले होते''[६९]

करवीरकरांनी महादजी शिंद सारख्या मुरब्बी सेनानीला तीन महोने झुंजवले याकरीता त्यांनी हैदरशीही संधान साधण्याचा प्रयत्न केला. करवीरकरांना मोरोबादादा व रघुनाथदादा यांचा पाठिंबा होता. मात्र करवीरकरांनी ज्या आसपासच्या सरदारांना दुखावले होते त्यानी महादजी

---

[६८] का.से.घो.घ.इ., पृ. ११८, ११९.

[६९] इंगळे राम, *मावळते मल्हारराव–उदयोन्मुख महादजी,* विश्वभारती प्रकाशन, नागपूर, पृ. क्र. ७७.

शिंदेस सहाय्य केलेचे दिसून येते. येसाजी शिंदे याने या युध्दामध्ये करवीरकर छत्रपती यांचे कारभारी म्हणून महत्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसून येते.

----))((----

प्रकरण पाचवे –
महादजी शिंदे व परकीय सत्ता (इंग्रज, फ्रेंच)

<u>महादजी –इंग्रज संबध</u>

इंग्रजांचा भारतातील प्रवेश :–

इंग्रजांचा मराठयांच्या राजकारणात प्रवेश :–

राघोबादादा इंग्रजाकडे व सुरतचा तह :–

सुरतचा तह :–

इंग्रजांचे पुण्याकडे प्रयाण व प्रथम इंग्रज मराठा युध्दास सुरूवात :–

पुरंदर तहानंतर इंग्रजांच्या मागण्या :–

इंग्रज मराठे युध्दास पुन्हा सुरूवात :– तळेगावची लढाई

वडगावचा तह :– दादा शिंदयाच्या ताब्यातः–

राघोबा पुन्हा इंग्रजाकडे :–

इंग्रजाविरोधात चतुसंघ :–

सालबाईचा तह :–

उत्तर भारत आणि इंग्रज – महादजी :–

नाना महादजी संघर्षामध्ये इंग्रजांची भूमिका :–

<u>फ्रेंच व महादजी शिंदे संबध</u>

फ्रेंचाचा भारतातील प्रवेश :–

फ्रेंचाचा मराठयांच्या राजकारणातील प्रवेश :–

महादजी शिंदे व फ्रेंच :–

महादजी शिंदे व फ्रेंच अधिकारी डि–बॉय :–

महादजी –इंग्रज संबध

मराठा साम्राज्याचा राज्यकारभार छत्रपतीकडून पेशव्याकडे हस्तातंरीत झाल्यानंतर पेशवा बाळाजी विश्वनाथ, पेशवा पहिला बाजीराव, पेशवा बाळाजी बाजीराव, पेशवा माधवराव यासारखे पराक्रमी पेशवे मराठा साम्राज्यास एकामागून एक लाभले व मराठा साम्राज्य उत्तरेमध्ये अटकेपर्यंत पसरले. मात्र मराठेशाहीचा हा इतिहास एकटया पेशव्यांनी घडविला नसून शिंदे, होळकर, पवार, भोसले, गायकवाड व इतर लहान मोठे सरदार या सर्वानी मिळून घडविला. या सर्व सरदारांचा एक संघ निर्माण झाला होता त्यास 'मराठासंघ' अथवा 'मराठामंडळ' असे म्हटले जात होते. स्वदेशी तसेच परदेशी शत्रूबरोबर मराठा मंडळातील सरदारच सामना करत असत. स्वदेशातील निजाम, हैदर, रजपूत, जाट, राहिले इत्यादी सत्ता बरोबर सामना करावा लागला तर परकीय शत्रूपैकी इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज या सत्ता बरोबर मराठा सत्तेला सामना करावा लागला.

मराठा सत्तेचा परकीय सत्तापैकी इंग्रजाबरोबर जास्त संपर्क आल्याचे दिसून येते. इंग्रज हे मराठयांचे "fairest friend and noblest enemy" असे असल्याचे दिसून येते.[१] इंग्रज भारतात व्यापारी म्हणून आले व पुढे राज्यकर्ते बनले याची कारणे मराठयाच्यात असलेला एकीचा अभाव, देशातील आठरापगड जाती अशी अनेक आहेत. इंग्रज हे चौकस स्वभावाचे होते मात्र मराठे हे चौकस स्वभावाचे जागृत नसलेले दिसून येतात. इंग्रज हे कोण आहेत, त्यांचा स्वाभाव गुणदोष कसा आहे, त्यांची राज्यव्यवस्था, सैन्यव्यवस्था कशी, त्यांचे द्रव्यबळ, सैन्यबळ किती आहे इत्यादी बाबींची माहिती येथील मुत्सद्दी मंडळीनी मिळवणे आवश्यक होते परंतु तसा कधी

---

[१] *द.म,* पृ. ३५

प्रयत्नच झाला नाही. इंग्रजांची असणारी भाषा भारतीयापेक्षा वेगळी होती, त्यांचे राहणीमान, चालीरिती वेगळया होत्या म्हणून भारतीयांनी त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. इंग्रजांनी मात्र भारतीय लोकांची बारीक सारीक माहिती गोळा केली, भारतीयांच्या कमकुवत गोष्टींचा शोध घेतला व पुढे त्याच्यावरच भर देवून त्यांनी हळूहळू राज्यकारभारामध्ये प्रवेश केला. एकूणच इंग्रज हे इतरापेक्षा वेगळे होते. अशा या इंग्रजांचा भारतातील मराठयांशी संबध आला.

इंग्रजांचा भारतातील प्रवेश :–

भारतामध्ये युरोपिय सत्ता येण्याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतात असलेली समृध्दी होय. भारतामध्ये असलेल्या मसाल्याचे पदार्थ, कापड याची युरोपियन बाजारपेठेमध्ये खूपच मागणी होती. तुर्कांनी कॉन्स्टटिनोपलचा पाडाव केल्यानंतर युरोपियनांचा भूमार्ग बंद झाला. तद्नंतर युरोपियन राष्ट्रांनी जलमार्गाचा शोध घेण्याची मोहिम हाती घेतली. याचाच परिणाम म्हणजे वास्को – द – गामा हा १४९८ रोजी भारतामध्ये कालीकत बंदरामध्ये उतरला. तत्कालीन झामोरिन राजाने त्याचे यथोचित स्वागत केले. [२]

जलमार्गाचा शोध लागल्यानंतर भारतामध्ये पोर्तुगिज, डच, फ्रेंच, इंग्रज इत्यादी सत्ता एकामागून एक आल्या. या परकीय सत्तापैकी १६ व्या शतकामध्ये हिदुंस्थानामध्ये पोर्तुगीज लोकांचे प्राबल्य होते. १७ व्या शतकामध्ये डच लोकांचे प्राबल्य होते व १८ व्या शतकामध्ये फ्रेंच लोकांचे वर्चस्व

[२] झामोरिन राजा पोर्तुगीज राजास– ''आपल्या घराण्यातील सरदार वास्को – द – गामा हे आमच्या राज्यात आल्यामुळे आम्हास फार संतोष होत आहे. आमच्या राज्यात दालचिनी, लंवग, सुंठ, मिरी आणि जवाहिर यांची समृध्दी असून त्याच्याबदली आपल्याकडून सोने, चांदी, पोवळी इत्यादी जिन्नस आम्हास मिळावे, अशी आमची इच्छा आहे.'' म.वइ., पृ. ११

हिदुंस्थानामध्ये होते तर १८ व्या शतकानंतर इंग्रजांचे प्राबल्य हिंदुस्थानामध्ये निर्माण झाले.[३]

भारतात इंग्रजांचा प्रथम प्रवेश सन १५९९ मध्ये झाला. इंग्लडहून 'जॉन मेल्डन हॉल' हा प्रथम भारतामध्ये आला. तो भारतामध्ये जवळ जवळ सात वर्षे होता.[४] १५९९ मध्ये 'मर्चेंट एडवेंचर्स' नावाने ओळखली जाणारी पूर्वेकडील देशाबरोबर व्यापार करण्यासाठी एक कंपनी स्थापन झाली. ३१ डिसेबंर १६०० रोजी राणी एलिझाबेथने या कंपनीस 'रॉयल चार्टर' द्वारे 'ईस्ट इंडिया कंपनी' या नावाने १५ वर्षासाठी व्यापार करण्यास मान्यता दिली. कॅप्टन हॉकिन्स हा सन १६०९ मध्ये जहॉगीर बादशहाच्या दरबारामध्ये आला. १६१२ मध्ये कॅप्टन बेस्ट दोन इंग्रजी जहाजे घेवून सुरत येथे आला. सन १६१५ मध्ये इंग्लडचा राजा जेम्स प्रथमने सर थॉमस रो यास जहॉगीर बादशहाच्या दरबारामध्ये व्यापारी करार करण्याच्या उद्‌देशाने पाठविले. सन १६२२ रोजी इंग्लडच्या चार्लस् द्वितीयने पोर्तुगालच्या राजकुमारी बरोबर लग्न केले त्यावेळी पातगालच्या राजाने मुंबई हे बेट आंदण म्हणून चार्लस् द्वितीय यास दिले. चार्लस् द्वितीयने वार्षिक १० पौंड भाडयाने कंपनीस ते दिले.[५]

इंग्रजांनी मुंबईमध्ये आपली वसाहत स्थापन केल्यानंतर त्यांचा मराठयांच्याबरोबर संबध येवू लागला. सुरूवातीस त्यांनी बचावाचे व सावधगिरोचे धोरण राबविले. मद्रास इलाख्यात ज्याप्रमाणे इंग्रजांनी आपले साम्राज्य बसविले होते तसे पश्चिमेकडे त्यांना लवकर बसवता आले नाही. मराठयांनी इंग्रजांना कोणताही उपद्रव केला नाही व इंग्रजांनीही माधवराव पेशवे होते तोपर्यंत मराठयांच्या राज्यकारभारात लक्ष दिले नव्हते. मात्र इंग्रज

---

[३] म.वइ., पृ. १०

[४] कवी श्यामलदास, *वीरविनोद,* खंड–०१, पृ. ८०–८१

[५] ओझा एन.एन., *आधुनिक भारत,* खंड–१, दिल्ली, २००४, पृ.०८–०९

हे मुंबई व मुंबईच्या आसपासच्या प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित करण्यास प्रयत्नशिल असल्याचे दिसून येते व त्या अर्थाची इंग्लडहून त्यांना अनेक पत्रे आल्याचे दिसून येते.[६]

इंग्रजांचा मराठयांच्या राजकारणात प्रवेश :–

इंग्रजाचा भारताच्या राजकारणातील ख–या अर्थाने प्रवेश बक्सार युध्दाने (१७६४) झाला या युध्दामध्ये शहाआलम, शुजाउद्दौला व मीरकासीम यांचा पराभव झाला. मात्र या युध्दामध्ये मराठा सैन्याची मदार ज्या शिंदे व होळकरावर होती त्यांनी भाग घेतला नाही.[७] बक्सार युध्दानंतर मराठा राजकारभारामध्ये १७६४ ते १७७४ या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये अनेक घडामोडी घडून आल्या. याचा परिणाम म्हणजे मराठा राजकारभारामध्ये इंग्रजांचा प्रवेश झाला.

पेशवा नारायणराव यांच्या खुनानंतर राघोबादादा हे पेशवे बनले. मात्र राघोबादादास दरबारातील मंडळीचा विरोध होता परिणामी बारभाई कारस्थान आकारास आले. १८ एप्रिल १७७४ रोजी माधवराव पेशवे यांचा जन्म झाला व राघोबादादास असणा–या विरोधामध्ये वाढ झाली कारण पेशव्याच्या गादीस वारस मिळाला होता.[८] राघोबादादाने बारभाई विरोधामध्ये आपली मोहिम उघडली असता बारभाई मंडळाने राघोबाच्या विरोधात त्र्यंबकराव पेठे, साबाजी भोसले, हरिपंत फडके यांना पाठविले.[९] बारभाईच्या सैन्याचा मुकाबला करण्याची ताकद राघोबादादा यांच्यामध्ये नव्हती. परिणामी महादजी

[६] ''कसेही करा, लांच द्या, फितुर करा, दुफळी वाढवा, परंतु मुंबई जवळील साष्टी, उरण, घारापुरी, करंजे वगैरे बेटे संपादा'' पुढे इंग्रजांनी राघोबाचा पक्ष धरून युध्द चालू केले. – अ.म.मा.शि.च.का., पृ. १२२

[७] यादव गुजर, *मल्हारराव होळकर आणि त्यांचा काळ,* नागपूर, १९९०, पृ. २०५

[८] पे.द.खंड. ०५, नं. ३०, पृ. २७, नं.४३, पृ.३९

[९] पे.द. खंड.०५, नं.२४, पृ. २१–२२

शिंदे यांचे सहाय्य मिळेल या आशेने राघोबादादाने ब–हाणपुरास प्रयाण केले.[१०] राघोबादादाने उत्तरेतील शिंदे व होळकर यांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. मात्र महादजी शिंदे यास सरदारकी देण्यामध्ये राघोबादादाने विरोध केला होता त्यांना माधवराव पेशवे यांच्या काळात सरदारकी मिळाली व ते माधवराव पेशवे यांच्यामुळेच पुढे आले त्यामुळे महादजीने माधवराव पेशव्यांच्या पक्षास आपला पाठिंबा दर्शविला. शिवाय तुकोजी होळकर हा महादजी शिंदे यांच्या सल्ल्याने वागत होता त्यामुळे त्याचीही राघोबादादा मदत मिळाली नाही.[११]

शिंदे व होळकर यांची मध्यस्ती फुकट गेल्यानंतर रघुनाथराव यांना पेशव्यांच्या शत्रूच्या मदतीशिवाय गत्यतंर राहिले नाही. सुजाउद्दौला किंवा हैदरअली या पेशव्यांचा शत्रूकडे जावे तर ते लांब होते. इंग्रज हे गुजरातमध्ये जवळच्या जवळ होते त्यामुळे इंग्रजाकडे राघोबादादाने मदतीची याचना केली.[१२] इंग्रजानाही मराठयांच्या राजकारणामध्ये भाग घेवून आपले वर्चस्व मराठा साम्राज्यामध्ये वाढवावयाचे होते व ती संधी त्यांना राघोबादादाच्या स्वरूपात प्राप्त झाली.[१३] राघोबादादास आपण मदत केल्यास आपला तोटा नसून फायदाच आहे हे इंग्रजांनी ओळखले होते. इंग्रज वकिल मॉस्टिन याने आपला असिस्टंट चार्लस ब्रोम यास राघोबाकडे पाठवून आपला पाठिंबा राघोबादादास असेल असे सांगितल्याचे व राघोबादादास आपल्या बाजूस वळवून मराठा राज्यकारभारामध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

---

[१०] पे.द.खंड. ०५, नं.४९, पृ.४४

[११] म.वइ., पृ. ६०,६१

[१२] न्यु.हि.ऑ.म., *खंड.०३,* पृ.४६., म.प.इ., ले. १७६, पृ.१७३–१७४

[१३] अ.म.मा.शि.च.का., पृ. १२२

[१४] चार्लस् ब्रोम राघोबादादास इंद्रगड येथे भेटला त्यावेळी राघोबादादाने आपणास इंग्रजांची मदत मिळत असल्याबाबत आनंद व्यक्त केल्याचे दिसून येते. यावेळी राघोबास इंग्रजाकडून प्रामुख्याने तोफा व दारूगोळा यांची मदत हवी होती.[१५]

राघोबादादा इंग्रजाकडे व सुरतचा तह :-

प्रत्यक्षामध्ये मराठयांच्या बरोबर मैत्रीचा तह करण्यामध्ये इंग्रजांना स्वारस्य नव्हते. मात्र इ.स.१७६८ साला पासून मुंबई, वसई व साष्टी याच्या आसपास प्रदेश मिळवावा व आपला वकिल पुण्यात पेशव्यांच्या दरबारामध्ये ठेवावा याकरीता इंग्रज अग्रही होते.[१६] राघोबादादा महादजीची मदत मिळेल या आशेने माळव्यात गेले होते मात्र त्यांना महादजी अथवा होळकरांची मदत मिळू शकली नाही परिणामी ते इंग्रजांच्या आश्रयास गेले व उभयतामध्ये सुरतचा तह घडून आला. राघोबादादा व इंग्रज यांच्यामध्ये ६ मार्च १७७५ रोजी सुरत येथे तह झाला. हा तह सुरतचा तह म्हणून ओळखला जातो.[१७] सुरतच्या तहान्वये राघोबादादास पेशवे पदावर बसविण्याचे ठरले व त्याच्या

[१४] ''माधवराव व राघोबा यांच्यात खरे सख्य नाही तरी राघोबास सांगावे की, आम्ही तुम्हास मदत करू व असे सांगून राघोबाकडून बोलणे येईल असे करावे.'' अशी समज मॉस्टिन याने ब्रोम यास दिली होती. म.वइ., पृ. ४८

[१५] ''नानासाहेब पेशव्यांच्या मरणोत्तर माधवराव पेशव्यांना सर्वस्वी मदत मी केली, त्याचा मानमरातब राखला, मुलूखगि-या व स्वा-या केल्या व माधवरावास पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळले. असे असता माधवराव कृतघ्न बनला. माझा अपमान करू लागला. माझे स्नेही सरदार फोडू लागला. व आखेर मला कैद करण्यापर्यत पाळी आली. तेंव्हा मला आता इंग्रजाशिवाय कोणी आधार उरला नाही'' म.वइ., पृ. ४९

[१६] अ.म.मा.शि.च.का., पृ. १२२

[१७] न्यु.हि.ऑ.म., खंड.०३, पृ.४६

बदल्यात इंग्रजांच्या मागण्या राघोबादादाने पूर्ण कराव्यात असे ठरले. इंग्रज फौजा व हरिपंत फडके यांच्यामध्ये लढाई झाली.[१८]

सुरतचा तह :–

राघोबादादा व सुरतचा इंग्रज गव्हर्नर रॉबर्ट गॅम्बायर यांच्यामध्ये चर्चा होऊन ६ मार्च १७७५ रोजी सुरतेचा तह झाला. या तहातील कलमे खालील प्रमाणे होती.

१) वसई, साष्टी, ठाणे आणि मुंबईजवळील काही बेटे आणि गुजरातमधील जंबूसार, ओल्पाड व अंकलेश्वर हे परघणे राघोबादादाने इंग्रजांना दयावेत.

२) इंग्रजांनी राघोबादादास पेशवेपद प्राप्तीस सैन्याची मदत करावी.

३) राघोबादादाने सैन्याच्या खर्चाकरीता वर्षाला दिड लाख रूपये इंग्रजांना दयावेत.

४) राघोबादादाने आपल्याकडील सहा लाख रूपयाचे जडजवाहीर इंग्रजाकडे गहाण ठेवावेत.[१९]

अशाप्रकारे राघोबादादाने पेशवेपदाच्या प्राप्तीसाठी वैयक्तिक स्वार्थासाठी इंग्रजांची मदत घेतली व इंगजांचा मराठा साम्राज्यात आपले पाय रोवण्याचा मार्ग सुकर झाला.

---

[१८] पे.द.खंड. ३६, पृ.२५७–२५८, पृ.२१९–२२०

[१९] हंटर विल्यम विल्सन, *द इंडियन एम्पायर,* पृ.३९१

इंग्रजांचे पुण्याकडे प्रयाण व प्रथम इंग्रज मराठा युध्दास सुरूवात :–

सुरतच्या तहानंतर कर्नल किटींग याच्या अधिपत्याखाली इंग्रज फौज मदतीस घेवून राघोबादादा पुण्याकडे यावयास निघाला. राघोबादादाच्या या स्वार्थी वृत्तीने मराठा साम्राज्यामध्ये राघोबादादाच्या विरोधामध्ये मोठया प्रमाणात वातावरण निर्माण झाले. यातूनच पहिले इंग्रज – मराठा युध्द घडून आले. हरिपंत फडके यावेळी गुजरातमध्ये होते. कर्नल किटींग इंग्रज सैन्यासह व राघोबादादा आपल्या सैन्यासह पुण्याकडे पेशवाई संपादन करण्याच्या उद्‌देशाने चालले. याचवेळी हरिपंत फडके यांनी राघोबादादास ओरास येथे अडविले व तेथे उभय पक्षात घनघोर लढाई झाली मात्र लढाईचा अंतिम निकाल लागला नाही. पुढे पावसाळा चालू झाल्यामुळे युध्द थांबले.

पावसाळयामुळे इंग्रज मराठे यांचे युध्द थांबले होते मात्र या युध्द स्थगितीच्या काळातच इंग्रजाच्या धोरणामध्ये अचानक बदल झाला. तो बदल म्हणजे इंग्रजांनी घडवून आणलेल्या घटनात्मक तरतुदीनुसार मुंबईच्या गव्हर्नरने राघोबादादाबरोबर तह करण्यासाठी अथवा मराठयांच्या बरोबर युध्द करण्यासाठी पूर्व परवानगी घेणे आवश्यक होते व तशी परवानगी तत्कालिन गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज याने घेतली नव्हती. त्यास मराठयांच्या बरोबर चालू असलेले युध्द अथवा राघोबादादाबरोबरचा तह मान्य नव्हता त्यामुळे त्याने तात्काळ हे युध्द बंद केले. वॉरन हेस्टिंग्ज याने मराठयांच्या बरोबरचे हे युध्द खूपच महागात पडेल हे आळखून कर्नल अप्टन यास डिसेबंर १७७५ मध्ये पुणे दरबारामध्ये तहाची बोलणी करण्याकरीता पाठविले.[२०]

---

[२०] पे.द. खंड. ३६, नं. २८१, पृ.२४०

कर्नल अप्टन हा पुण्यास आला व पुण्यामध्ये तो जवळ जवळ तीन महिने होता.[२१] परंतु या कालावधीमध्ये त्याला कारभा–यांनी कोणतीही दाद दिली नाही. परिणामी या कालावधीमध्ये कोणताही शांतता करार झाला नाही. मुंबईकरांनी नुसते भांडण उकरून काढले याच मुद्दयावर विशेष भर देवून साष्टीसह सर्व घेतलेला प्रदेश इंग्रजांनी परत दयावा व राघोबाचा पक्ष बिनशर्त सोडावा असा आग्रह कारभा–यांनी धरला होता. सदर बाब मान्य करण्यास इंग्रजांचा वकिल तयार होत नव्हता व तहाचे बोलणे मोडल्यासारखे झाले. दि.०७ मार्च १७७६ रोजी कलकत्तेकरांनी मराठयांशी फिरून युध्द करण्यास मुंबईकरांना परवानगी देण्याचे ठरविले. पण याच्या अगोदर पुरंदर येथे तहाचे बोलणे होवून १ मार्च १७७६ रोजी पुरदरचा तह उभयपक्षात झाला होता.[२२] या तहातील मुख्य अटी खालील प्रमाणे होत्या.

१) साष्टी, ठाणे बेट इंग्रजांनी घेतले होते ते त्यांच्याकडेच ठेवावे. .

२) भडोच शहर व त्याच्या आसपासचा तीन लक्षाचा प्रदेश पेशव्यांनी इंग्रजांना दयावा.

३) इंग्रजांनी राघोबाचा पक्ष सोडून दयावा.

४) अठ्ठाविस महालांचा सुरत प्रांत इंग्रजांना दयावा.

५) इंग्रजांनी गुजरातच्या कारभारामध्ये हस्तक्षेप करू नये.

६) राघोबाने आपली फौज विसर्जित करून गोदातिरी कोपरगावी रहावे. अशा प्रकारे तह झाला.[२३]

---

[२१] अ.रा.कुलकर्णी, *द मराठाज्,* डायमंड पब्लिकेशन, पुणे, नोव्हेबंर, २००८, पृ. १२४

[२२] पे.द. खंड. ३६, नं. २८१, पृ.२४०

[२३] सि.ॲ.पॉ.डि.डा., नं. १९, पत्र ७९, पृ. २२८–२३३., ऐ.ले.सं., भाग–०५, पत्र नं. १८२२, म.प.इ., ले.१७५, पृ.१७३ – शिवाजी बाबाजीचे पत्र दि. ०८–०३–१७७६

या तहाने पेशव्यांना सहा लक्षाचा प्रदशावर पाणी सोडावे लागले असले तरी घरच्या भांडणात परकीय सत्तेचा हात जावू नये याकरीता ते योग्यच असल्याचे दिसून येते.

पुरंदर तहानंतर इंग्रजांच्या मागण्या :–

सखारामबापू हयानी पुरंदरच्या तहनाम्यावर सही केली.[२४] मात्र याचवेळी इंग्रजांनी आणखी मागण्या मागितल्या त्या म्हणजे –

१) मराठयांच्या राज्यकारभारामध्ये नाना फडणविसास महत्वाचे स्थान होते व नाना इंग्रजाबरोबर कुरघोडीचे राजकारण नेहमीच करत असत. तेव्हा मराठा कारभारातून नाना फडणीस निघाले पाहिजेत.

२) नानाने फ्रेंचाना मराठा दरबरामध्ये झुकते माप दिले होते तेव्हा फ्रेंचाचे मराठा दरबारातून उच्चाटन करावे व परत दरबारामध्ये त्यांना आसरा मिळता कामा नये अशी व्यवस्था करावी.

३) राघोबादादांची योग्य ती व्यवस्था पेशवा दरबाराने करावी.

४) वरील तिन्हीही गोष्टी पेशवे सरकारच्या खर्चातून व्हाव्यात.

५) इंग्रजाना मोबदला म्हणून बक्षीस स्वरूपात काही सोईचा मुलूख मिळावा.

६) इंग्रजांनी पुण्यास यावे असे सखारामबापूनी लेखी पत्र दयावे.

इंग्रजांच्या वरील काही मागण्या कारभारी सखारामबापू यांना मान्य होत्या मात्र इंग्रजांना लेखी आमंत्रण देण्यास सखारामबापूनी नकार दिला व पुरंदरचा तह अमलात येण्याची शक्यता खूपच कमी झाली.[२५]

---

[२४] ना.फ.ब., पृ. ४१

पुरंदरच्या तहानंतर इंग्रजांनी मराठयांच्या राजकारणामध्ये प्रत्यक्ष भाग घेण्याचे काही कालावधीसाठी टाळले. मात्र मोरोबा फडणविस याने बंड केल्यानंतर पुन्हा मराठा दरबारामध्ये हस्तक्षेप करण्याचो संधी इंग्रजाना प्राप्त झाली. मोरोबाने बंड करून पुण्याचा कारभार आपल्या हाती घेतला.[२६] नाना फडणविस व महादजी शिंदे हे मोरोबाच्या बंडाचा बिमोड करण्यामध्ये गुंतले असतानाच इंग्रजानी पुन्हा एकदा राघोबादादास पुण्यास आणून पेशवेपदावर बसविण्यासाठी हालचाल सुरू केली.[२७] याचवेळी गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज याने मराठयांच्या बाबत धोरण राबविण्यास, व राघोबादादास पाठिंबा देण्यास पूर्णतः स्वातंत्र्य मुंबई गवर्नरला दिले होते.[२८]

नाना फडनविस हे आपला चुलतभाऊ मोरोबाच्या बुध्दीचा अव्हेर करत असत. परंतु हा अव्हेर ते उघडपणे न करता अंतर्गत विरोध करत असत कारण मोरोबास बलाढय मंडळीचा आश्रय होता. इंग्लिश लोकास वाटे की नाना अजिबात काळजी करत नाहीत याचा अर्थ त्यांना फ्रेंच लोकांचे सहाय्य असावे व फ्रेंचानी नानास मदतीचे अश्वासन दिले असावे. गंगाबाईच्या मृत्यूनंतर सखारामबापू आजपर्यंत मोठे गरीबीने आणि स्नेहाने वागणारे नाना फडणविस होते त्यांचा द्वेष करू लागले व राघोबास परत गादीवर आणण्याच्या मसलतीमध्ये शिरले. नानावर छाप पाडावी हाही एक हेतू त्यांचा होता. एकूणच सर्व वातावरण नानाच्या विरोधामध्ये व इंग्रजांना अनकुल असे घडत गेले.[२९]

---

[२५] अ.यो., पृ. ९०, ९१
[२६] इ.ले.सं. खंड.०७, नं.२३१८–१९, पृ.३२३४–३६
[२७] न्यु.हि.ऑ.म. खंड.३, पृ.७६
[२८] म.रि.उ.वि., खंड.०१, पृ.१४८
[२९] ना.फ.ब., पृ.४१

नानाबरोबरचे वैर व पेशवे दरबारामधील गोंधळ या गोष्टीचा फायदा घेवून मोरोबाने राघोबादादास पेशवेपदावर आणण्याचे व स्वातःला अधिकार प्राप्ती व्हावी याकरता कारस्थान रचले. या कारस्थानास इंग्रजांनी मदत केली.[३०] इंग्रज वकिल मॉस्टिन हा मोरोबाच्या कारस्थानामध्ये शिरला होता याचे महत्वाचे कारण म्हणजे–

१) इंग्रजांचा वैरी नाना फडणविस यांच्या हातातून कारभार निघावा.

२) फ्रेंच लोक पुण्याच्या दरबारामध्ये प्रस्थ माजवू पहात आहेत त्यांचे पुना दरबारामधून उच्चाटन व्हावे.

३)ईस्ट इंडिया कंपनीच्या मदतीने दादासाहेबांची पेशवेपदावर स्थापना व्हावी.

४) कंपनीस मराठा साम्राज्याचा जास्तीत जास्त फायदा व्हावा.

मात्र इंग्रजांच्या या धोरणामुळे इंग्रज व मराठे संबधामध्ये बिघाड निर्माण झाला व मराठे इंग्रजाना आपले शत्रू मानू लागले.[३१]

इंग्रज मराठे युध्दास पुन्हा सुरूवात :– तळेगावची लढाई

इंग्रज हे पुणे दरबारातील बारीक सारीक माहिती काढत होते त्यावेळी त्यांच्या निदर्शनास आले की, कारभारी सखारामबापूंचे नाना व महादजी शिंदे

---

[३०] म.प.इ., ले.१७६, पृ.१७३–१७४., म.रि.उ.वि., भाग–०१, पृ.३९–४०

[३१] अ.यो.,पृ.७९, इंग्रजांच्या मनामध्ये फ्रेंचाविषयी व नाना फडणीस यांच्याविषयी प्रथमपासूनच राग होता कारण या दोघांचा गुप्त तह झाला आहे असे इंग्रजांचे म्हणणे होते. इंगजांनी नानास 'पुरंदरच्या तहाच्या शर्ती तुम्ही पाळणार की नाही' असे विचारले असता पुणे दरबाराकडून 'त्या तहाच्या शर्ती तुम्ही पाळा म्हणजे आम्ही पाळू' असे सांगण्यात आले. हे नानाचे उत्तर इंग्रजास आवडले नाही नानाच्या हातात असणारा पेशवाईचा कारभार काढून तो दादासाहेबाच्यां हातात देवून त्यास मुख्याधिकारी नेमावे असे इंग्रजांना फार दिवसापासून वाटत होते. अ.यो., पृ. ११८

यांच्याबरोबर संबध चांगले नाहीत, होळकरांचे नानाशी वाकडे आहे, शिंदयाचा नानावर रूसवा आहे, शिंदे व होळकर यांचे परस्पराविषयी मन शुध्द नाही. कोणाचे कोणाशी जुळत नाही व कोणी कोणास जुमानत नाही. दक्षिणेमध्ये हैदरने बंड उभारले आहे. निजामही अस्वस्थ आहे. अशाप्रकारे पुणे दरबारामध्ये सर्व दुर्दशा आहे व त्यांच्यावर आक्रमण करण्याची ही योग्य संधी आहे असे इंग्रजांना वाटू लागले.[३२]

पुरंदरच्या तहाने इंग्रजांचे समाधान झाले नव्हते व मुंबईचा तत्कालिन गव्हर्नर हॉर्नबी यालाही हा तह मान्य नव्हता. कारण त्यांना राघोबास सहाय्य करून त्यास जवळ ठेवण्यातच जास्त फायदा होता. इंग्रजांनी राघोबास मराठयांच्या ताब्यात न देता दहा हजार रूपये देवून मुंबईत आश्रय दिला व त्याच बरोबर तहाने ठरलेला मुलूखही घेण्याचा प्रयत्न केला. तसेच युध्द करण्याच्या तयारीने त्यांनी आपली फौजही गुजरातमध्ये तयार ठेवलेली दिसून येते.[३३]

इंग्रजानी पुण्यावर चालून येण्याकरीता आपली हालचाल सुरू केल्याचे कळताच नानाने इंग्रजाच्या आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी महादजी शिंदे यांच्यावर जबाबदारी टाकली. शिंदेही इंग्रजांचा पराभव करावयाचाच या इरादयाने आपल्या सैन्याची व्यवस्था करू लागले.[३४] महादजी शिंदे यांनी यावेळी ब–हाणपूर मागितले ते त्यांना देण्यात आले त्यानंतर महादजीने इंग्रजांविरोधामध्ये आपली मोहिम उघडली. इंग्रजांच्या विरोधामध्ये यावेळी शिंदे, होळकर व रास्ते यांची मिळून चाळीस हजार फौज जमा झाली. इंग्रजाबरोबर निकराची लढाई होण्याचा संभव असल्याने तोफखानाही सज्ज

[३२] सि.ॲ.पॉ.डि.डा., नं १९, ले. ७९,९८,१०६,११०,११८, पृ.२२८–१३३, २८९–२९६, ३०५–३०६, ३२१–३२२, ३४१–३४४ (अप्रकाशित पत्रे, मुंबई पुराभिलेख, मुंबइ)
[३३] म.व इ. पृ. ६७., किंकेड, पारसनिस, *हिस्ट्री ऑफ मराठा पिपल,* पृ. ११५
[३४] अ.यो., पृ. १२३

ठेवण्यात आला व तो तोफखाना भिमराव पानसे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आला होता.[३५]

कर्नल एगर्टन याने जानेवारीच्या प्रारंभास आजारी पडल्याने सैन्याच्या अधिपत्याचा राजीनामा दिला व तो मुंबईस जावू लागला मात्र कोकणातील वाटा मराठयांनी अडविल्यामुळे तो परत तळेगाव येथे आला.[३६] इंग्रज घाट चढून तळेगाव नजीक येताच भिमराव पानसेनी त्याच्यावर आक्रमण केले त्यावेळी खंडाळयाचा ले.कर्नल के हा बाण लागून जखमी झाला. कारल्याची मुक्कामी तोफेचा गोळा लागून स्टुअर्ट मृत्यू पावला, मि. मॉस्टिन हा स्वारीबरोबर होता मात्र तोही आजारी पडला व त्यातच त्याचा मृत्यू झाला. मराठयांची फौज नाना मोठया प्रमाणात जमणार नाही असे इंग्रजांना वाटत होते मात्र नानांनी शिंदे, होळकर व इतर सरदार यांना जमवून जवळ जवळ चाळीस हजार फौज जमा केली होती.[३७]

इंग्रज व राघोबादादा तळेगावच्या जवळ आले असता त्यांना कोणीही माणूस दिसले नाही कारण मराठयांनी तळेगाव जाळून बेचिराख केले होते.[३८] इंग्रजांना होळकर आपल्यास अनुकूल होतील अशी आशा होती मात्र ते शक्य झाले नाही कारण होळकरांनी नकार दिला. शिदंयानाही होळकर इंग्रजाच्याकडे जातील अशी शंका होती त्यामुळे सैन्याची व्यवस्था करत असताना त्यांनी पुढील बाजूस स्वःताची फौज मध्ये होळकर व शेवटी फडके, पटवर्धन यांची फौज अशी रचना केली. तळेगाव नजीक इंग्रजांनी तोफांचा मारा सुरू केला प्रत्युत्तरादाखल मराठयांनीही तोफाचा मारा केला. तळेगाव मराठयांनी जाळून टाकल्यामुळे तेथे जनावरांना चारा व सैन्यास अन्न

---

[३५] म.व इ.,पृ.७१

[३६] कित्ता, पृ. ७१, ७२

[३७] अ.या., पृ. १२३

[३८] ऐ.ले.सं. ०७, पृ. ३३९२, ले. २४६१., ना. फ. श. पृ.७०

मिळेनासे झाले. नानांनी तर इंग्रज जर पुण्यापर्यंत आले तर पुणेही जाळून टाकण्याचा निर्णय घेतला होता.[३९] त्याकरीता त्यांनी शनिवारवाडयामध्ये कडबाही भरून ठेवला होता. इंग्रजांना ही बातमी समजताच ते घाबरले व त्यानी वडगावकडे आपला मोर्चा वळविला. मराठा सैन्याच्या चौक्या इंग्रज फौजेच्या आसपास बसल्या होत्या. इंग्रज वडगावकडे जात आहेत असे कळताच मराठा सैन्याने आकमण केले व झालेल्या युध्दामध्ये इंग्रजांचा पराभव झाला. मराठयांच्या हाती इंग्रजांच्या पाच तोफा व इतर साहित्य लागले.[४०] १४ जानेवारी १७७९ रोजी इंग्रजांनी मिस्टर फार्मर या आपल्या वकिलास मराठयांच्या लष्करांत तहाचे बोलणे करण्याकरीता पाठविले. फार्मर यास नाना फडणविसाने प्रथम अटी घातल्या की,

१) राघोबास सर्वप्रथम मराठयांच्या स्वाधीन करावे.

२) इंग्रजांनी प्रथम तह मोडला तेंव्हा पुर्वीच सर्व तह रद्द समजावेत.

३) साष्टी, उरण, जंबुसार वैगरे व पेशवे, गायकवाड यांचे जे जे मुलूख इंग्रजांनी घेतले ते सर्व इंग्रजांनी परत दयावेत.

४) पूर्वी श्रीमंत नानासाहेब व माधवराव पेशवे यांचेबरोबर झालेल्या तहास अनुसरून इंग्रजांनी कोणत्याही मुलखाची अशा न धरता केवळ स्नेहभावाने राहावे.

या अटी फार कडक अशा वाटून इंग्रजांच्या वकिलाने महादजी शिंदे यांच्याकडे बोलणे चालू कले. इंग्रजांनी महादजीस असे सांगितले की, सध्या

---

[३९] १३ जानेवारी १७७९ नानांचे मत पुणे जाळावे. होळकर व शिंदे यांच्या मते न जाळावे. मुलूख जाळल्यामुळे इंग्रजांची मसलत फसलयाचे दिसून येते. ऐ.ले.सं. ०७ ले. २४६०., ना. फ. श. पृ. ६९

[४०] अ.यो.,पृ. १२५

आमच्या हातात कोणतेही अधिकार नाहीत व आम्हास कलकत्तेकरांची मान्यता नसल्याने तह करता येत नाही.[४१] मात्र महादजीने यावेळी इंग्रजांना कठोर शब्दात सांगितले की, आपणास जर पुरंदरचा तह मोडण्याचा अधिकार आहे तर नवीन तह करण्याचा आधिकारही असणारच. आपणास राघोबादादास आमच्या हवाली करावयाचे नसल्यास आम्ही व राघाबादादा बघून घेवू. नाना फडणविस यांनी सांगितलेल्या सर्व अटी मान्य कराव्यात.[४२] मराठयांच्या आग्रही धोरण पाहून शेवटी इंग्रजांनी मराठयांच्या बरोबर तह केला. हा तह वडगावचा[४३] तह म्हणून ओळखला जातो.

वडगावचा तह :– दादा शिंदयाच्या ताब्यात

हॉलमस् हा इंग्रज अधिकारी महादजीकडे तहाची बोलणी करण्याकरीता १५ जानेवारी १७७९ रोजी आला व १७ जानेवारी १७७९ रोजी मराठा इंग्रज यांच्यामध्ये वडगावचा तह झाला. या तहाच्या अटी खालील प्रमाणे होत्या –

१) इंग्रजांनी राघोबादादास मराठयांच्या ताब्यात दयावे.

२) इंग्रजांनी मराठयांचा साष्टी, ठाणे व इतर घेतलेला सर्व प्रदेश मराठयांना परत करावा.

---

[४१] सि.अ.पॉ.डि.डा., खंड. २१, पृ. ४५९, (अप्रकाशित पत्र मुंबई पुराभिलेख)

[४२] इंग्रजांनी शिंदयास असे सांगून पाहिले की, ''आज आम्ही निरूपायाने तह केला तर तो करण्यास आम्हास पूर्ण अधिकार नाही. कलकत्तेकर तो तह कदाचित मानणारही नाहीत.'' यावर शिंदयानी उत्तर केले की, ''पुरंदरचा तह मोडण्यास जर मुंबईकर इंग्रजांना अधिकार पोहचत होता तर नवीन तह करण्यास त्यांना अधिकार पोहचलाच पाहिजे. ...... शेवटी इंग्रजांचा निरूपाय होऊन तह मान्य करावा लागला. म.रि.उ.वि., ०१, पृ. १८३., ना. फ. श. पृ. ७०, म.व इ., पृ.७२

[४३] 'वडगाव' पुण्याच्या दक्षिण – उत्तर बाजूस ४५ कि.मी.वर असणारे नॅशनल हायवे नं.०४ वरील लहान खेडे आहे.

३) तहाची अंमलबजावणी होईपर्यंत खात्री म्हणून ले. स्टुअर्ट व मिस्टर फार्मर यांना मराठयांकडे ओलिस ठेवावे.

४) राघोबापासून जे तहनामे वैगरे दस्तऐवज इंग्रजांनी केले आहेत ते सर्व पेशव्यांच्या स्वाधीन करावेत.

५) कलकत्तेकरांकडून कर्नल गाडर्ड हा नवीन फौज घेवून येत होता त्यास परत जाण्यास सांगावे.

६) इंग्रजांना मराठयांनी तळेगावहून मुंबईकडे जावू दयावे.

७) तह घडवून आणण्यास शिंदयानी मदत केली म्हणून त्यास भडोच व त्याच्या खर्चाकरिता चार लाख रूपये इंग्रजांनी दयावेत.

अशा प्रकारे इंग्रज व मराठे यांच्यामध्ये तह घडून आला.[४४] वडगावच्या लढाईनंतर उभय पक्षांनी वरील प्रमाणे तह मान्य केला. इंग्रज व मराठे यांच्यामध्ये झालेला वडगावचा तह इंग्रजांना जाचक होता. मराठयांच्या जाचक अटी मान्य करण्यापेक्षा वाटेल ते नुकसान सहन करून आक्रमण करावे असे इंग्रजांना वाटत होते. परंतु त्याबाबत कलकत्ता व मुंबई गव्हर्नरमध्ये एकमत होत नव्हते. शेवटी कलकत्ता येथून गॉडर्ड याच्या नेतृत्वाखाली मराठयांच्या बरोबर युध्द करण्याकरीता इंग्रजांनी सैन्य पाठविण्यात आले, कर्नल गॉर्डर सुरतेहून मुंबईस मोठया सैन्यासह आला. मात्र त्यास उशीर झाला होता.[४५]

वडगावच्या तहानंतर राघोबास इंग्रजांनी कारभा–यांच्या ताब्यात दयावे की, शिद्यांच्या याबाबत अंतिम निर्णय बराच काळ होत नव्हता. हरिपंत फडके यांनी दादांनी पुण्यास यावे याबाबत खटपट चालू केली होती. कारण

---

[४४] म.प.इ., ले.१८०, पृ. १७५–१७६., ऐ.ले.सं., खंड.०७, पृ.३३९२, ३३९३., कॅ.ऑ.प.क., खंड. ०५, नं.१६०, न्यु.हि.ऑ.दम., खंड, ०३, पृ. ७६–८२

[४५] पू.अ., भाग.०२,पृ. १४., म.शि.का., ले. ५०., ना.फ.श., पृ. ७५

महादजीच्या ताब्यात जर राघोबादादास दिले तर कोणता अनर्थ घडेल हे सांगता येत नव्हते. महादजी विषयी अशी परिस्थिती निर्माण होण्याचे कारण म्हणजे महादजीने उत्तरेमध्ये प्राप्त केलेले यश व त्यांनी केलेल्या अनेक बंडाचा बिमोड होय. त्याच प्रमाणे महादजीने इंग्रजाबरोबर तह करण्यामध्येही पुढाकार घेतला होता. महादजी राघोबादादास आपल्या ताब्यात ठेवून स्वतः कारभार हातामध्ये घेतील व आपणास पोरके व्हावे लागेल अशी भिती यावेळी नानास वाटत होती.[४६]

अंतिमतः राघोबादादा तीनशे स्वार, हजार – बाराशे गारदी व तोफा अशा सरंजामानिशी महादजीकडे आले. २९ जानेवारी १७७९ रोजी राघोबादादाने कारभा–यास पत्र पाठवून सांगितले की, इंग्रजांच्या ताब्यात मराठा साम्राज्य जाईल म्हणून मी शिंदे व होळकर यांच्याकडे गेलो. तसेच पुढे याच पत्रामध्ये त्यांनी आपले राज्यकारभाराविषयी मत,[४७] आपण केलेल्या चुकाबाबत माफी मागितल्याचे दिसून येते.[४८] यावेळी महादजी शिंदे यांनीही राघोबाबरोबरच इतर मराठयांच्या शत्रूंनाही मराठयांच्यावर वक्रदृष्टि करणा–यांना चेतावनी दिल्याचे दिसून येते.[४९]

राघोबाच्या गोटाभोवती महादजीने आपल्या चौक्या बसविल्या पण त्या राघोबाच्या गोटापासून दूर ठेवून राघोबास नजरकैदेत ठेवण्यात आले.

---

[४६] म.शि.का. ले.२७५., कुलकर्णी म.रा., *नाना फडणीस,* डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९, पृ. ४६

[४७] २९ जाने.१७७९, ...अतःपर राज्याचा लोभ धरणार नाही. सवाई माधवरावानी धनीपण, सवाई बाजीरावानी कारभार मुतालक करीत असावे. मुले थोर राज्याधिकारी होये तो नाना फडणीस व सखारामबापू यांनी कुलअखयारी करून राज्य संभाळावे.'' पे.द. ०५, ले. ९७, इ.सं. ऐ.टि. ०१ ले.०७., ना.फ.श. पृ. ७१

[४८] पे.द. ०५, ले. ९७, इ.सं.ऐ.टि. ०१ ले.०७., ना. फ. श. पृ. ७१

[४९] ''.... शिंदे बोलले की, पुन्हा कै. नानासाहेब यांच्या राज्यास फंदफितुर वाईट चिंतील त्यांस काशीत मात्रगमनाचे पातक घडेल....पे.द. ०५, ले. ९७, इ.सं.ऐ.टि. ०१ ले.०७., ना. फ. श. पृ. ७१

राघोबाच्या बंदोबस्ताचा सर्व जबाबदारी महादजीने आपल्याकडे घेतल्यामुळे महादजीस राघोबाची कैद काळजीपूर्वक करावी लागली. राघोबाच्या इतर साथीदार चिन्तो विठ्ठल रायरीकर व खरकसिंग यांना साध्या कैदयाप्रमाणे ठेवण्यात आले. यावेळी महादजीने राघोबादादाकडून यापुढे आपण पेशवाईच्या गादीवर कोणताही हक्क सांगणार नाही असे लेखी बेदावापत्र लिहून घेतले.

इंग्रज निघून गेल्यानंतर दादासाहेबासह शिंदयाच्या लष्कराचा तळ एक महिनाभर तळेगावीच पडला होता. आखेर राघोबाला झांशीस ठेवावे असे ठरले व त्याच्याकरीता दरसाल पाच ते सात लाख रूपये व त्याच्या बंदोबस्ताच्या खर्चाकरीता शिंदयास चार ते पाच लाख रूपये देण्याचे कारभा-यांनी कबूल केले. महादजीने आपला सरदार हरि बाबाजी याच्या नजरकैदेखाली राघोबाला झांसीकडे रवाना केले.[५०]

राघोबा पुन्हा इंग्रजाकडे :-

नाना व महादजी यांच्यामध्ये अंतर्गत मतभेद होते. नानावर आपला जास्ती दाब असावा म्हणून महादजीने रघुनाथरावास हाती धरले होते. रघुनाथरावास बुंदेलखंडात जहागीरी देण्यात यावी व राघोबादादा पेशव्यांच्या राज्यास कोणताही त्रास देणार नाहीत याची हमी महादजीने घेतली. रघुनाथरावास जहागीरी देण्याचे पेशव्यांने कबूल केल्यावर लगेच त्यांची रवानगी महादजीने बुंदेलखंडाकडे केली. महादजीचे मनात रघुनाथरावास झासीचे किल्ल्यात कैद करून ठेवण्याविषयी होते. मात्र ही बातमी राघोबादादास नर्मदेजवळ आल्यावर गुप्तरित्या कळाली. महादजीने आपणास कैद करण्याअगोदर आपणच संधी साधून पळ काढावा यादृष्टिने राघोबा प्रयत्नशील राहिला व पहारेक-यांच्यावर हल्ला करण्याची संधी पाहू लागला. झासीस जात असताना चौंडी महेश्वर जवळ नर्मदा नदीवर एक फूल आहे या

[५०] म.वइं., पृ. ७३., ना.फ.ब., पृ. ५८, ५९

ठिकाणी राघोबास पळ काढण्यास संधी मिळाली व पहारेक-यावर हल्ला करून त्याची दाणा दाण केली व मोरक्यास घायाळ करून तो पुन्हा भडोच येथे इंग्रजास जावून मिळाला[५१] यावेळी महादजी राघोबादादास मिळाला व कृत्रीम रितीने हरीबाबाजीस मारविला असा आरोप महादजी शिंदयाच्यावर केला जातो मात्र त्यामध्ये सत्यांश कमी दिसून येतो.[५२] शिदंयाच्या छावणीतून पुन्हा राघोबा पसार झाल्याने नानांनी महादजीवरील आपला राग कधीच सोडला नाही व येथून पुढे दोघामधील अविश्वासाची दरी वाढतच गेल्याचे दिसून येते.[५३]

इंग्रजाविरोधात चतुसंघ :-

राघोबादादा पुन्हा इंग्रजांना जावून मिळाल्यामुळे इंग्रजानी पुन्हा मराठयांच्या बरोबर युध्द करण्याची तयारी चालू केली. नानानेही यावेळी निजाम, हैदर, मराठे व नागपूरकर भोसले असा इंग्रजाविरोधात संघ तयार केला. हा संघ जर यशस्वी झाला तर इग्रजांचा टिकाव लागणार नाही अशी सुचना अरकाटच्या नबाबाने इंग्रजांना दिली होती व या संघातून किमान मराठयांना तरी बाहेर काढावे असा सल्ला त्यांनी इंग्रजांना दिला होता. चतुसंघातील हैदरला इंग्रजांनी आपल्यास मिळावे याबाबत अमिष दाखवले. मात्र यावेळी हैदरन या अमिषाला बळी न पडता आपला वकिल पुणे दरबाराकडे पाठविला व इंग्रजाविरोधात आघाडी उघडण्याबाबत धोरण आखले.[५४]

---

[५१] अ.शि.घ.इ, पृ.२०, २१

[५२] भा.इ.स.म., वर्ष, १९९४, पृ.४१, महादजी शिंदे वरील आरोप एक टिपण, राम इंगळे.

[५३] अ.या., पृ. १९, म.शि.का., ले. १४०

[५४] सि.अ.पॉ.डि.डा., खंड. २१, पृ. ५०७-५७१, ५७४, ५९५-६१३ (अप्रकाशित पत्र मुंबई पुराभिलेख), म.द.बा., खंड. १, नं. ०२.

गोडार्डने मुंबईस कंपनीस पत्र पाठवून या चतुसंघाची माहिती कळविली की, पेशव्यांचे कारभारी व महादजी शिंदे हे हैदर, निजाम यांच्या बराबर करार करून संयुक्तरित्या इंग्रजावर आक्रमण करणार आहेत. यावेळी राघोबास मदत करून आपण चुकलो आहे असे वारंवार इंग्रजाना वाटू लागले. मराठयांच्या कोणत्याही धोरणास आपण विरोध करणार नाही असे व वडगावचा तह इंग्रजांनी अमान्य केला आहे असे हेस्टिंगने महादजीस सांगितले. मात्र राघोबास जर ताब्यात दिले तरच आपण इंग्रजाबरोबरचे युध्द थांबवू असे नानानी स्पष्टपणे सांगितले.[५५]

महादजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मराठयांचे सैन्य इंग्रजाबरोबर लढत होते. फत्तेसिंग गायकवाड यांची दहा हजार फौज यावेळी इंग्रजाच्या मदतीस सिपरीकोलार नजीक होती.[५६] महादजीच्या सैन्याची सिपरी कोलार येथे इंग्रज सैन्याबरोबर मोठी लढाई झाली.[५७] होळकर यावेळी वाफगावात होते.[५८] अधुन मधून इंग्रज व मराठा सैन्याच्या चकमकी चालूच होत्या.

महादजी गुजरात प्रांतात असताना ब्रिटिशांनी महादजीच्या प्रदेशावर हल्ला करून ग्वाल्हेर काबीज केले व तो किल्ला गोहदच्या राण्याच्या ताब्यात दिला. ही बातमी महादजीस कळताच महादजीने प्रतिहल्ला चढवून गेलेला प्रदेश परत मिळवला. गोहदकर राणा आपल्यास सहाय्य करील या आशेने इंग्रजानी आक्रमण केले होत मात्र ते पूर्णतः अपयशी ठरले. राणा व रजवाडे लोकांनी शिंदयास विरोध करण्यास नकार दिला.[५९]

---

[५५] सि.ॲ.पॉ.डि.डा., खंड. २१, पृ. ६३५–६३५, गोडार्डचे पत्र, ३०–०९–१७७९, (अप्रकाशित पत्र मुंबई पुराभिलेख)

[५६] पू.अ., भाग.०२,पृ. ६१, अे. आर. नं. १२०, ०३ ऑक्टोबंर, १७८१

[५७] पू.अ., भाग.०२,पृ.०६ हैबतराव गोपाळचे नानास पत्र, अे.आर. नं. १०१, १ सप्टेबंर १७८१

[५८] पू.अ., भाग.०२,पृ. २३, अे.आर. नं. १०१, १२ सप्टेबंर १७८१

[५९] अ.शि.घ.इ., पृ.२१

महादजी शिंदे काळाबाग कालीसिद नदी जवळ आपल्या सैन्याचा तळ ठेवला होता तर इंग्रजांची फलटणे सिपरीकोलार येथे होती. गोहदकर जाटांनी महादजीविरोधात धोरण राबविण्यास जरी नकार दिला असला तरी काही काळ गोहदकर व इंग्रज यांची युती होती. इंग्रजांनी गोहदकर जाटांना महादजी बरोबर बोलणी करण्याकरीता मध्यस्ती करण्यास सांगितले. गोहदकरानी महादजीस भेटून इंग्रजांनी मैत्रीचा तह करण्याबाबत हात पुढे केला आहे असे सांगितले मात्र महादजी बोलणी करण्यास तयार झाला नाही.[६०] महादजीने इंग्रजाबरोबर झालेल्या याठिकाणच्या युध्दात त्यांना माघार घ्यावयास लावली होती. युध्दजन्य परिस्थितीमुळे यावेळी महागाई वाढून इंग्रजांचे हाल झाल्याचे दिसून येते.[६१]

इंग्रज सैन्याचे हाल होवू लागल्यावर गोडार्ड राघोबादादास पेशव्यांच्या ताब्यात दयावे व तह करावा या उद्‌देशाने राघोबास घेवून पुण्यास येण्यास निघाला. गोडार्डने आपणास पुणे दरबारशी बोलावयाचे आहे असे कळविले, मात्र यावेळी आपण शांतता अथवा तह यादृष्टिने विचार करत नाही असे नानानी गोडार्डला कळविले. परिणामी इंग्रजांनी महादजीकडे तहाबाबत बोलणे लावले. महादजीच्या सांगण्यावरून इंग्रजांनी पेशव्यांना अहमदनगर किल्ला व राघोबास ताब्यात दयावे व त्याच्या बदल्यात मराठयांनी ४० लाख रूपये इंग्रजांना दयावे असा तह करावा असे सांगितले. महादजीने स्वतः हा विचार केल्याने नाना व पेशवे यांना या गोष्टिचा राग आला मात्र महादजी शिंदयाची लष्करी ताकद जास्त असल्यामुळे त्यांना विरोध केला नसल्याचे दिसून येते. तद्‌नंतर इंग्रजांनी आपणास चार किल्ले व ४ कोटी रूपये दयावेत अशी

---

[६०] पू.अ., भाग.०२,पृ. ३६ ऐ.आर. नं. ११२, २० सप्टेबंर १७८१., पू.अ., भाग.०२, पृ.४९, ऐ.आर. नं. ११६, २७ सप्टेबंर १७८१

[६१] पू.अ., भाग.०२,पृ. ४६ ऐ.आर. नं. ११५, २३ सप्टेबंर १७८१., पू.अ., भाग.०२,पृ. ५१, ५२, ऐ. आर. नं. ११७, २८ सप्टेबंर १७८१

मागणी चालू केली. तसेच इंग्रजांनी राघोबाबरोबर बोलणे केले होते की, इंग्रज मदत करतील मात्र त्याच्याबदल्यात इंग्रजाच्या मागण्या राघोबाने पूर्ण कराव्यात. इंग्रजाबरोबरचा प्रश्न मिटवत असतानाच होळकरांचा अंतर्गत कलह चालू झाला व महादजीस त्याकडे लक्ष दयावे लागले. महादजी तुकोजी होळकर व अहिल्याबाई होळकर यांचे भांडण मिटविण्यामध्ये व्यस्त होते व तरूण पेशवा हा पूर्णतः पेशवा दरबारातील मंडळीवर आवलंबून होता.[६२]

महादजीने नानास निरोप पाठविला की, इंग्रजाबरोबर बोलणी करण्याबाबत आपण भेटावे. अंतिमतः मराठा सत्तेने इंग्रजाबरोबर तह करण्याचे मान्य केले व तसे बोलणे करण्याबाबत गोडार्डला कळविले. गव्हर्नर जनरलनेही पेशव्यांना पत्र पाठवून नवीन तह करण्याबाबत लिहले व गोडार्ड यास याबाबत पाठवित असल्याचे सांगितले.[६३] दरम्यान महादजीने उत्तर भारतातील राजकारण स्थिर केले. चतुसंघातील हैदरने त्र्यंबक आप्पाजी यास महादजीकडे पाठविले. त्र्यंबक आप्पाजी व महादजी पुण्यास आले. त्र्यंबकराव, रास्ते यांनी हैदरबरोबर विविध मुद्दयावर चर्चा केली मात्र चर्चेत फारसे यश आले नाही व हैदरने युध्दाचा निर्णय घेतला. याचवेळी सदाशिव दिनकरने महादजीने जे तहाबाबत बोलणे चालविले आहे त्याची एक प्रत नानास पाटवून दिली याचे कारण नाना व महादजीचा अंतर्गत संघर्ष होय.[६४]

---

[६२] सरदेसाई गो.स., *ऐतिहासिक पत्रव्यवहार,* नं. १७४, सि.ॲ.पॉ.डि.डा., खंड. २१, पृ. ६८७, ६९३, ६९७–६९९, ७०२–७०५, ७४२, ७२०, ७४६–७४९ (अप्रकाशित पत्रे मबई पुराभिलेख), शि.रा. , खंड. २, नं. १०४

[६३] सि.ॲ.पॉ.डि.डा., खंड. २१, पृ. ६३३–६३५ (अप्रकाशित पत्र मुंबई पुराभिलेख), सरदेसाई, *ऐतिहासिक पत्रव्यवहार,* नं. १६९, शि.इ.सा., खंड. २, नं. १०३, खंड, १, नं. ३५

[६४] हि.पे.रि.म.शिं., नं.५२,५३,५४,५५., सि.ॲ.पॉ.डि.डा.,, खंड. २१, पृ. ७३२, ७३६, ७४२–७४५. (अप्रकाशित पत्र मुंबई पुराभिलेख)

सालबाईचा तह :–

इंग्रजानी युध्द चालू असतानाच महादजी बरोबर मराठा दरबाराशी संबध न ठेवता तहाची बोलणी चालू केली. ख–या अर्थाने यावेळी ब्रिटिशांनी मराठा दरबाराशी बोलणी करणे आवश्यक होते मात्र तसे काही झाले नाही. महादजीने इंग्रजाकडून काही रक्कम लाच म्हणून स्विकारली असावी अशा त–हेची टिका यावेळी महादजीवर झालेली दिसून येते. इंग्रजानी वडगावचा तह अमान्य केला व त्यानुसार गोडार्डनेही हुकूमानुसार आचरण केले होते.[६५]

२४ मे रोजी गव्हर्नर जनरलने गोडार्डला पुणे दरबारामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी पाठविले. यावेळी गोडार्डने पुणे दरबारास राघोबावरती झालेल्या खर्चाची मागणी करण्यास सुरूवात केली मात्र याबाबत पुणे दरबाराचा विरोध होता. १० जून रोजी सुरत मधून गोडार्ड यास असे सांगण्यात आले की, त्याने अथवा मुंबईतील इंग्रजांनी राघोबास संरक्षण अथवा पाठिंबा देवू नये. याचवेळी राघोबा १५ जून रोजी सुरत येथे जावून मिळाला.[६६] कलकत्ता येथून पुन्हा मुंबईस पत्र आले की, बॉम्बे कंपनीने महादजी बरोबर बोलणी करून योग्य तो निर्णय घ्यावा.[६७] अंतिमतः महादजी शिंदे यांनी इंग्रजाबरोबर बोलणी करून सालबाईचा तह घडवून आणला. इंग्रजाकडून ॲंडरसन व मराठयाकडून महादजी शिंदे व नाना फडणविस यांनी सालबाईचा तह केला.[६८] सालबाईच्या तहातील कलमे खालीलप्रमाणे होती –

---

[६५] फॉरेस्ट, उपरोक्त, खंड. १, पृ. ६७२, दि.२४–०५–१७७९

[६६] सि.ॲ.पॉ.डि.डा., खंड. २१, पृ. ४६५–४६६, ४५५–४६७, ४८०–४८१, ४८६–४९६ (अप्रकाशित पत्रे मुंबई पुराभिलेख), सिलेक्शन फ्रॉम द पेशवा दप्तर, खंड. ३६, नं. ३५७, पारसनिस, म.द.बा., खंड. १, नं. १.

[६७] फॉरेस्ट, उपरोक्त, खंड. १, पृ. ६७५ – ६७८

[६८] ना.फ.ब., पृ.६६

१) पुरंदरच्या तहानंतर इंग्रजांनी मराठयांच्या ज्या मुलूखावर ताबा मिळविला होता त्या प्रदेशावरील हक्क सोडावा.

२) साष्टी व मुंबईच्या आसपासची लहान बेटे इंग्रजांना देण्यात यावी.

३) भडोच शहर इंग्रजांना देण्यात यावे.

४) गुजरामध्ये इंग्रजांनी जिंकलेला प्रदेश मराठे व बडोदयाच्या गायकवाडांना परत दयावा.

५) फत्तेसिंग गायकवाड यास गुजरातमधील सरदार म्हणून मान्यता देण्यात यावी.

६) हैदरअलीने इंग्रजाचा जिंकलेला प्रदेश त्यांना परत देण्याकरीता मदत करावी.

७) इंग्रजांनी राघोबादादास आश्रय देवू नये.

८) पेशव्याकडून राघोबादादास दरमहा २५ हजार रूपये पेन्शन देण्यात यावी व राघोबाने राजकारणातून निवृत्त व्हावे.

९) इंग्रज व मराठयांनी व्यापारी धोरण पूर्वी प्रमाणेच ठेवावे.

१०) इंग्रजांच्या मित्र व शत्रूंना मराठयांनी आपले मित्र व शत्रू मानावे.

११) तहाच्या अटीचे पालन दोन्ही बाजूनी होते की नाही, याची पाहणी स्वतः महादजी शिंदे यांनी करावी.

अशाप्रकारे उभय पक्षात तह घडून आला[६९] व प्रथम मराठे इंग्रज युध्द थांबले गेले. या तहावर गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्जने ६ जून १७८२ रोजी

[६९] सि.ॲ.पॉ.डि.डा., खंड. २६, प.नं.४३, प. ४४५ (मुंबई पुराभिलेख, अप्रकाशित पत्र)

सही केली व पेशव्यांनी २० डिसेबंर १७८२ रोजी सही केली.[७०] युध्दामध्ये राघोबादादा व इंग्रज यांच्या संयुक्त फौजेचा मराठा सैन्याने महादजोच्या नेतृत्वाखाली पराभव केला व मराठयांच्या तोफा व पायदळाने महत्वाची कामगिरी पार पाडली असली तरी मराठा सैन्याचा बोजडपणा मात्र दिसून आला.[७१]

प्रथम इंग्रज मराठा युध्दामध्ये मराठयांनी इंग्रजावर विजय मिळविला असला तरी तो पुर्णतः विजय नव्हता हे मात्र खरे. कारण इंग्रज हे पूर्णपणे मराठा साम्राज्यामधून निघून गेले नाहीत. युध्दानंतर जो तह झाला त्यामध्येही मराठयांनी फारसे काही मिळवलेले दिसून येत नाही. राघोबादादाचा ताबा वगळता कोणतेही कलम विशेष फायदयाचे नसल्याचे दिसून येते. हैदरअलीने मात्र इंग्रजांच्या बरोबर चालू असणारे युध्द तसेच पुढे चालू ठेवल्याचे दिसून येते. एकूणच चतुसंघ इंग्रजाविरोधात मराठयांनी निर्माण केला व त्यातून माघारही अगोदर मराठयांनीच घेतली.[७२]

उत्तर भारत व इंग्रज–महादजी :–

उत्तर हिंदुस्थानामध्ये महादजी शिंदे व इंग्रज दोघेही वावरत असल्यामुळे त्यांचे परस्पर संबध आले. दिल्ली व दिल्लीचा पादशहा स्वाधीन करून घेण्याची दोघांचीही खटपट होती मात्र महादजीच्या मृत्यूपर्यंत इंग्रजांना उत्तरेत आपले वर्चस्व स्थापित करणे जमले नसल्याचे दिसून येते.[७३]

---

[७०] म.रि.उ.वि. खंड. ०१ पृ. ३६६–३६७., सि.ॲ.पॉ.डि.डा., खंड. २६, प.नं.४३, पृ. ४४५

[७१] गु.द., खंड.०४, पृ.३४ (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान, सीतामऊ)

[७२] म.इ., खंड. ३, पृ. १४७–१५१., ग्रॅन्ड डफ, खंड.२, प. १४५–१४७, न्यु.हि.ऑ.द.म., खंड. ०३, पृ. ११८–१२८, ॲ.म.रि.,पृ. द.म., पृ.१२५–१२५., सि.ॲ.पॉ.डि.डा., नं.२८, ले.०८, पृ.३७–४९

[७३] म.वइं., पृ.१३८

अफ्राशियाबखानाचा खून झाल्यानंतर दिल्लीचा बादशहा असाय्य झाला होता. बादशहाला मदतीकरीता दोन मार्ग होते एक इंग्रज व दूसरे मराठे म्हणजे महादजी शिंदे होय. यापैकी बादशाहाने महादजीस मदतीसाठी पत्रे पाठविली. बादशहाच्या दरबारातील मराठयांचा वकील गोविंदराव हिंगणे यांनीही याबाबत अनेक पत्रे[७४] पाठवून महादजीस बादशहाच्या दरबारातील अंतर्गत माहिती कळविली. अशा प्रकारे इंग्रजांना बादशहावर वर्चस्व प्रस्थापित करण्याची संधी महादजीने दिली नाही.[७५] बादशहाने मराठयांची मदत स्विकारली असली तरीही इंग्रजांनी बादशहाचे आपल्या बाजूने मन वळविण्याचा प्रयत्न चालविला होता. सन १७८३ च्या आखेरीस मेजर बाऊन यास हेस्टिंगने बादशहाच्या भेटीस दिल्लीस पाठविले आणि आपणही स्वतः मागाहून लखनौस दि.२७/०३/१७८४ रोजी दाखल झाला. हेस्टिंगने बादशहाचे मत महादजीच्या विरूध्द करण्यास व गोड गोड बोलून इंग्रजांचीच मदत घेण्याविषयी प्रयत्न चालविले.[७६] इंग्रज मोगल बादशहाचे मतपरिवर्तन करत होते परंतु त्यांना प्रबळ अशा मराठयांच्या बरोबर विरोध पत्करणे, दुश्मनी करणे जाचक ठरणार हे माहित होते त्यामुळे त्यांनी आपले धोरण सावधरितीने आखलेले दिसून येते.[७७] अखेरीस महादजीने इंग्रजावर मात केल्याचे दिसून येते.

नाना महादजी संघर्षामध्ये इंग्रजांची भूमिका :–

नाना व महादजी हे मराठा साम्राज्याचे प्रमुख अधारस्तंब होते. मात्र नाना व महादजी यांच्यामध्ये अंतर्गतरित्या एकमेकास विरोध असल्याचे दिसून

---

[७४] यावेळी मराठयांचा वकिल गोविंदराव हिंगणे यांनी जवळ जवळ महादजीस २२ पत्रे पाठविल्याचे दिसून येते.

[७५] मरिउवि., भाग–२, पृ.६०

[७६] मरिउवि., भाग.–२, पृ.६४

[77] म.शि.का., पृ. ३३८., म.प.इ., ले.१८९, पृ.१८४–१८५

येते. सालबाईच्या तहानंतर महादजीचे महत्व वाढले गेले.[७८] महादजीने उत्तरेत अमाप यश संपादन केल्यानंतर व बादशहास गादीवर बसवून त्याच्याकडून स्वतःकरीता वजिरी व पेशव्याकरीता वकिलमुतालकी मिळविल्यानंतर नानाचा महादजी विषयी विरोध वाढतच गेला. नानास असे वाटू लागले की, जशी पेशव्यानी साता–या राजकुलाची अवस्था केली, तशी पेशव्यांची अवस्था महादजी करील ती न व्हावी म्हणून तो इंग्रजाबरोबर मोठया स्नेहाने वागू लागला. याअगोदर इंग्रज महादजीमार्फतच मराठयांच्याबरोबर बोलणे बोलत असत. त्यामुळे महादजीस महत्व प्राप्त झाले आहे असा समज नानाचा होता परिणामी नानांनी इंग्रजांचा एक वकिल पुणे दरबारात ठेवला.[७९] पेशव्यांच्या दरबारात इंग्लिशाचे आगमन होण्यास प्रथम रघुनाथराव कारणीभूत झाला नंतर मात्र महादजीच्या भयास्तव नानाने त्यांचे प्राबल्य वाढविल्याचे दिसून येते.[८०] इंग्रज वकिल पुणे दरबारात राहू लागल्याने मराठा राजकारभारातील गोंधळ इंग्रजांच्या लक्षात येवू लागला. इंग्रजाना आपले भविष्यातील धोरण आखता आले व पुढे तर त्यांनी मराठा साम्राज्यावर आपले वर्चस्व निर्माण केले.

समारोप :–

थोरल्या माधवरावाच्या काळात इंग्रजांना मराठयांच्या राज्यकारभारामध्ये हस्तक्षेप करता आला नाही. मात्र राघोबादादास सहाय्य करण्याचे अश्वासन देवून ते योग्य संधीचे वाट पहात होते. माधवराव पेशवे यांचा राज्यकारभारामध्ये दरारा होता त्यामुळे राघोबास उघडपणे मदत करून त्यास पुण्यास आणण्याचे त्यांच्या हातून धाडस होत नव्हते. परंतु माधवरावाच्या

---

[७८] ना.फ.ब., पृ. ६८

[७९] अशिंघइ, पृ.२२, २३

[८०] कित्ता, पृ. ३३

मृत्यूनंतर पेशवाईची घडी बरीच विस्कटली. नाना फडणविसाचे पेशवे दरबारातील राज्यकारभारामध्ये तसेच लष्करी नैप्युण्यामध्ये महादजी शिंदे यांचे महत्व उत्तरोत्तर वाढू लागले. नाना इंग्रजांना ओळखून होते त्यामुळे इंग्रजांना व नेहमीच विरोध करणा–या राघोबास नानांनी चार हात लांबच ठेवल्याचे दिसून येते.

राघोबादादाने पेशवाई मिळविण्याकरीता इंग्रजांचो मदत घेतल्याने 'राघोबादादाने पेशवाईवर सांगितलेला हक्क' ही बाब घरगुती भांडण न राहता त्याला राजकीय महत्व प्राप्त झाले. राघोबाने इंग्रजांची मदत घेतल्यामुळे बारभाईस इंग्रजांसारच्या बलाढय सुसंघटित शत्रूशी युध्दप्रसंग दीर्घ काळ ओढवून घ्यावा लागला. मराठयांनी हे युध्द जिंकले परंतु पुणे दरबारात इंग्रजांचा चंचुप्रवेश व्हायचा तो झालाच. इंग्रजाबरोबर झालेल्या युध्दात अथवा पुरंदरचा तह, वडगावचा तह व सालबाईचा तह या तिन्हीही तहाच्या बाबतीत महादजी शिंदे यांनी महत्वाची कामगिरी बजावल्याचे दिसून येते. '*'इंग्रजांचे पारिपत्य करून नाव राहू देणार नाही'*'[८१] असे महादजी म्हणत असे. उत्तरोत्तर महादजीचे वाढत जाणारे महत्व यामुळे नानाने पुढे इंग्रजांना जवळ केल्याचे दिसून येते. एकूणच इंग्रजांचा वापर हा नाना व महादजी यांनी आपले वर्चस्व वाढविण्यासाठी केला. मात्र याचा वाईट परिणाम घडून आला व तो म्हणजे इंग्रजांनी मराठयांची सत्ता नाना व महादजीच्या मृत्यूनंतर हस्तगत केली.

[८१] गु.द., भाग–०५, पृ.५०., दि.१३–०९–१७८१

फ्रेंच व महादजी शिंदे संबध

मराठा सत्तेचा परकीय सत्तांबरोबर संबध आला त्यामध्ये फ्रेंचांचाही समावेश होतो. मराठा सत्ता विस्ताराचे कार्य मराठा मंडळातील सरदार करू लागल्यावर या सरदारांच्या बरोबर फ्रेंचाचा संबध आला. पेशवा सवाई माधवराव यांच्या काळात फ्रेंचाचा संबध हा मराठा साम्राज्याचे आधारस्तंभ नाना फडणविस व महादजी शिंदे यांच्या बरोबर आल्याचे दिसून येते.

परकीय सत्ता व मराठो सत्ता यांच्या परस्पर सबंधावर काही प्रमाणात लेखन झाले आहे. इंग्रज, डच, म्हैसूर, पोर्तुगीच, फ्रेंच मराठा संबधावर प्रामुख्याने डॉ. बाळकृष्ण, डॉ. मुद्देचेरी, डॉ. व्ही.जी.हताळकर, डॉ.एस.पी.सेन, डॉ.एम.ए.नायम, डॉ. ब्राग्रांज परेरा, डॉ.एस.एस.देसाई व डा. पिसुर्लेकर यांचे लेखन दिसून येते.

डॉ. व्ही.जी.हताळकर यांचे 'फ्रेंच मराठा संबध (१६६८–१८१८)' (मुंबई विद्यापीठ प्रकाशन, १९५८) हे पुस्तक प्रामुख्याने मराठा फ्रेंच संबधावर प्रकाश टाकत असल्याचे दिसून येते. तसेच मराठा फ्रेंच संबधावर महाराष्ट्र शासनान व्ही.जी.हताळकर यानी भाषांतर केलेली 'फ्रेंच रेकॉर्ड इन इंडिया' या सदरखाली एकूण ९ खंड प्रकाशित केले आहेत. सदर खंडही मराठा फ्रेंच संबधावर प्रकाश टाकत असल्याचे दिसून येते.

फ्रेंचाचा भारतातील प्रवेश :–

भारताचा इतिहास लिहणारा कवी श्यामलदास मते १६०४ मध्ये फ्रान्समध्ये पहिल्या 'ईस्ट इंडिया' कंपनीची स्थापना झाली व पुढे १६११ मध्ये दुसरी, १६१५ मध्ये तिसरी, १६४२ मध्ये चौथी व १६४४ मध्ये पाचवी ईस्ट

इंडिया कंपनीची व्यापाराच्या दृष्टिने स्थापना झाली.[८२] मात्र ख-या अर्थाने फ्रान्समध्ये व्यापारा-याच्या दृष्टिकोनातून १६६४ रोजी कोलबर्ट यांच्या मार्गदर्शनाखाली Company des Indes Orentales ची स्थापना झाली. १६६७ मध्ये फ्रेंक कैरो नावाने व्यापाराच्या दृष्टिकोनातून एक संघटना स्थापन झाली. १६६८ मध्ये फ्रेंचानी सुरतमध्ये आपली पहिली वखार स्थापन केली. १६६९ मध्ये मुसलीपट्टम येथे दुसरी वखार स्थापन केली. यानंतर फचानी आपला विस्तार हळूहळू भारतामध्ये वाढविल्याचे दिसून येते. फ्रेंचाच्या वसाहतीमधील चंद्रनगर येथील फ्रेंचाची वसाहत महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. १७४०-४२ पर्यंत फ्रेंचाचे व्यापार हेच प्रमुख धोरण होते. १७४२ नंतर व्यापाराबरोबरच फ्रेंचानी भारतीय राजकारणामध्ये भाग घेण्यास व आपले साम्राज्य स्थापन करण्यास सुरूवात केलेली दिसून येते.[८३]

फ्रेंचाचा मराठयांच्या राजकारणातील प्रवेश :-

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केल्यानंतर परकिय सत्ताबरोबर आपले धोरण ठरवत असतांना परकिय सत्तांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. शिवाजी महाराजांचे फ्रंच व डच या दोन परकिय सत्तांबरोबर व्यापारी दृष्टिकोनातून संबध आल्याचे दिसून येते. इंग्रज आपले धोरण आक्रमक रितीने राबवत तेंव्हा इंग्रज सत्तेस पायबंध बसावा व सत्तेत समतोल साधला जावा यादृष्टिने शिवाजी महाराज यांनी फ्रेंच व डच लोकांना झुकते माप दिल्याचे दिसते. शिवाजी महाराज तोफा व इतर साहित्य या दोन सत्ताधिशाकडून खरेदी करत असत. शिवाजी महाराजांनी फ्रेंचांना व्यापा-याच्या सुविधा दिल्या होत्या. १६६८ मध्ये या सत्ता

[८२] कवी श्यामलदास, *वीरविनोद, खंड-०१,पृ.७९*

[८३] ओझा एन.एन., *आधुनिक भारत,* खड-०१, पृ. १३-१४

राजापुरमध्ये आपल्या वखारी घालून व्यापार करू लागल्या. मात्र फ्रेंच व डच यांनी कधीही मराठयांच्या विरोधात धोरण राबविल्याचे दिसून येत नाही.[८४]

पेशवे काळामध्ये माधवराव पेशवे यांना इंग्रजांच्या कवायती फौजेचा सामना करण्याकरीता फ्रेंचाच्या कवायती फौजेची आवश्यकता होती व त्याकरीता त्यांनी फ्रेंचाच्या बरोबर संधान साधल्याचे दिसून येते.[८५] हैदर हा मराठयांचा दक्षिणेतील एक प्रबळ शत्रू होता त्याचा बंदोबस्त करण्याकरीता मराठयांना फ्रेंचांचा तोफखाना व इतर युध्द साहित्याची गरज होती.[८६] फ्रेंचाची मदत मिळवण्यासाठी त्र्यंबकराव पेठे यास माधवराव पेशवे यांनी फ्रेंचाकडे पाठविलेले दिसून येते.(१७७२) उभय पक्षामध्ये तह झाला होता तो खालील प्रमाणे –

१) फ्रेंचानी मराठयांना युध्द सामुगी व इतर साहित्यासह युध्दामध्ये मदत करावी. प्रत्येक युध्दामध्ये बरोबरीने सहभाग घ्यावा.
२) फ्रेंचांना मराठयांनी हैदरअली बरोबरच्या युध्दामध्ये मदत करावी.
३) बंगाल व इतर भागामध्ये फ्रेंचाचा प्रभाव व विस्तार वाढविण्यास मराठयांनी मदत करावी.
४) इंग्रजाविरोधामध्ये दोन्हीही सत्तांनी परस्पर सहकार्याचे धोरण राबवावे.[८७]

इंग्रजांनी मराठा राज्यकारभारामध्ये प्रवेश केला होता व इंग्रजाप्रमाणे आपणही मराठा साम्राज्यामध्ये आपला व्यापार वाढवावा व पेशवाई राजकारणात आपला प्रवेश व्हावा अशी फ्रेंचाची इच्छा होती. फ्रेंचांनी आपला

[८४] द.म. पृ. ३५
[८५] रिबिफ्रेम., १९५८, पृ. १७५
[८६] ग्रॅड डफ, खंड. ०१, १९२१, पृ.५६९)
[८७] कदम यु.ए., *फ्रेंच मराठा रिलेशन (१६६८–१८१८)*, पीएच.डी प्रंबध, मार्च २००४, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. १४०–१४१

वकिल सेंट ल्युबीन याच्या विद्यमाने पुणे दरबाराबरोबर आपले संबध वाढवण्यास सुरूवात केली. पुरंदर तहाच्या वाटाघाटी इंग्रज व मराठे यांच्यामध्ये चालू होत्या त्याच दरम्यान इंग्रजांना शह देण्याच्या उद्देशाने मराठयांनी फ्रेंचाशी जवळीक साधल्याचे व फ्रेंच मराठा संबध अधिक जवळ आल्याचे दिसून येते.[८८]

इंग्रज व फ्रेंच या सत्ता युरोपमध्ये परस्परांच्या वैरी होत्या. अमेरिकेत वसाहतवादयांना फ्रेंचानी चितावनी दिली व त्यांना इंग्रजाविरोधात उभे केले होते. अमेरिकेप्रमाणेच भारतामध्ये इंग्रजाविरोधात पेशव्यांना मदत करण्याचे फ्रेंचाचे धोरण होते. पेशव्यांनीही फ्रेंचांना हाती धरले कारण राघोबाचा पक्ष इंग्रजांनी धरला होता व फ्रेंचाना जवळ केल्याने त्यांना शह बसणार होता. फ्रेंचाचा वकील सेंट ल्युबीन हा पुण्यास मराठा दरबारामध्ये होता. त्यास जाणीवपुर्वक जितका अधिक मानमरातब देता येईल तितका देवून इंग्रजांच्या मनात हेवा उत्पन्न करण्याचा प्रयत्न नानाने चालविलेला दिसून येतो. यावेळी नाना व सेंट ल्युबीन यांचा तह झाला, नाना व ल्युबीन यांनी शपथा घेतल्या अशी बातमो सगळीकडे उटली होती.[८९] इंग्रज व फ्रेंच यांचे वकिल ज्यावेळी नानास भेटावयास येत त्यावेळी नाना फ्रेंच वकिल भेटावयास आल्यास त्याला आणण्याकरीता हत्ती पाठवून देत असे व खुद्द आपण व सखारामबापू तंबूच्या बाहेर येवून स्वागतासाठी उभे राहत असत. इंग्रज वकिल भेटावयास आल्यास नाना त्यास सामोरे जाण्यास एकादा दुय्यम सरदार पाठवत असे.

---

[८८] द.म., पृ.१२४

[८९] या तहानुसार ''नाना फडणीसाच्या घरी एके दिवशी सेंट ल्युबीन व इतर अनेक फ्रेंच लोक जमून व सर्वांच्या देखत ल्युबीन याने बायबलच्या पुस्तकाची व नानाच्या गायीची शपथ घेवून तह ठरविला. त्यात पेशव्यांनी प्रेंचाना चौल बंदर दयावे, व फ्रेंचानी फौजेनिशी इंग्रजाविरूध्द लढण्यास मदत करावी अशी कलमे होती.''

यामुळे इंग्रजांचा नाना फडणविस यांच्यावर खूप राग होता. असे दुटप्पी धोरण मराठयांनी इंग्रज व फ्रेंच यांच्या बाबतीत राबविलेले दिसून येते.[१०]

महादजी शिंदे व फ्रेंच :–

पानिपत युध्दानंतर मराठयांच्या साम्राज्याचा आधार नाना व महादजी होते. बारभाईनंतर या प्रमुख दोन व्यक्तीबरोबर परकियांचा संबध आला. उत्तरेमध्ये महादजी शिंदे यांना मराठा साम्राज्याचा विस्तार व स्वतःचे वर्चस्व निर्माण करत असताना स्वकीया बरोबरच परकिय सत्ताचाही संबध आला. उत्तरेतील राजकारणामध्ये इंग्रजाबरोबर फ्रेंचानीही आपले स्वारस्य दाखविले होते. Sieu Dujardy या फ्रेंच अधिका–यांने बादशहाबरोबर आपले संबध प्रस्थापित केले होते. उत्तरेमध्ये मराठयांचा सरदार महादजी शिंदे याचे महत्व प्रामुख्याने होते. उत्तरेत चंद्रपुरच्या फ्रेंचानी महादजी बरोबर तह केला होता तो खालील प्रमाणे होता –

१) मराठे व प्रांन्स हे एकमेकाचे मित्र राहतील.

२) बंगाल मधील इंग्रजाविरोधातील मोहिमेत मराठा व फ्रेंच बरोबरीने भाग घेतील.

३) भारतामधील प्रेंच सैन्यास कटक व गुजरात मध्ये जाण्यास महादजी शिंदे मदत व मार्गदर्शन करतील.

४) भारतातील इतर कोणत्याही सत्ताधिशाबरोबर फ्रेंचाचा संघर्ष झाल्यास महादजी फ्रेंचाना मदत करेल.

५) महादजी शिंदे फ्रेंचाना आवश्यक असणारी युध्द सामुग्रीची मदत करेल.

---

[१०] म.वइ., पृ. ६८,६९., अ.यो., पृ. ८८

६) बंगाल मधील चौथाईवरील हक्क फ्रेंचानी मान्य करावा.

वरील प्रमाणे झालेला तह हा दोन्हीही सत्ताधिशांच्या दृष्टिने महत्वपूर्ण असल्याचे दिसून येतो.[९१]

महादजी शिंदे व फ्रेंच अधिकारी डि–बॉय :–

पहिल्या मराठा इंग्रज युध्दामध्ये मराठयांनी इंग्रजांचा पराभव केला मात्र या युध्दामध्ये इंग्रजांच्या कवाइती सैन्यापुढे मराठी सैन्याचा बोजडपणा व गबाळेपणा मात्र स्पष्ट दिसून आला. पहिल्या मराठा इंग्रज युध्दामध्ये परकिय सैन्याचा पराक्रम बघून महादजीने आपल्या लष्करामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.[९२] कवायती पायदळ, स्वतंत्र तोफखाना व फ्रेंच अधिकारी नेमून सैन्य तरबेच केले. अव्यवस्था सोडून त्यांनी सैन्यामध्ये शिस्त आणली व त्याच्याच बळावर त्यांनी उत्तरेमध्ये आपले वर्चस्व निर्माण केले. याकामी त्यांना जनरल डि–बॉय या फ्रेंच अधिका–याची खूप मदत झाली.

मराठा राज्यकारभारामध्ये प्रथम परकिय युध्दतंत्राचा अवलंब करण्याचे धोरण पेशवे नानासाहेब यांनी अवलंबले होते. मात्र नानासाहेब यांच्या मृत्यूनंतर दुर्देवाने परकीय युध्दनितीस मराठा सरदाराकडून विरोध झाल्याचे दिसून येते.[९३] डी–बॉय, पेरॉन, जॉर्ज थॉमस, स्किनर यासारखे युरोपियन लष्करी अधिकारी त्याकाळी भारतामध्ये कार्यरत होते.[९४]

मराठा सत्तेमध्ये काम करण्या–या परकीयांची प्रामुख्याने कोणतीही चौकशी केली जात नव्हती. परकीय तंत्रज्ञानाचा आपल्या सैन्यात अभाव आहे

---

[९१] कदम यु.ए., *फ्रेंच मराठा रिलेशन (१६६८–१८१८)*, पीएच.डी प्रबंध, मार्च २००४, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. कदम, पृ. १४३

[९२] मिसिऑम, पृ. १२२

[९३] कित्ता, पृ. १०९–११०

[९४] म.रि.उ.वि., भाग–२, पृ.३२४

तो भरून निघावा व आपल्याशी त्याने प्रामाणिक रहावे हीच अपेक्षा या गो–या नागरीकाकडून केली जात असे.[९५]

डि–बॉय या महादजीकडील अधिका–याविषयीची माहिती त्याच्या दुस–या बायकोने[९६] त्याचे लिहीलेले चरित्र, लुई फर्डिनंड स्मिथ यांचे 'कवाइती कंपू उदय, विस्तार व अंत' (१८०५), त्याच बरोबर सेन एस.एन. यांचे 'मिलीटरी सिस्टीम ऑफ मराठाज्', सरदेसाई गो.स. यांचे 'मराठी रियासत उत्तर विभाग, भाग–०२, जेम्स टॉड व ग्रॅंड डफ यांचे लिखाण यामध्ये माहिती दिसून येते.

आठराव्या शतकामध्ये नशीब आजमावण्यासाठी डि–बॉय भारतामध्ये आला. डि–बॉयचा जन्म फ्रान्सच्या आग्नेयेला असलेल्या सॅव्हॉय[९७] प्रांतातील शांबेरी येथे ०८/०३/१७५१ रोजी झाला.[९८] शांबेरीतील एका महाविद्यालयात कायदयाचे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना काही कारणास्तव त्याने कायदयाचा आभ्यास सोडून लष्करी शिक्षण घेण्याचे ठरविले.[९९] मात्र सॅव्हॉय प्रांत त्यावेळी सार्डिनियाच्या ताब्यात होता व सार्डिनियाच्या लष्करात हलक्या कुळातील व्यक्तीना नोकरी दिली जात नव्हती परिणामी डि–बॉयला नोकरी मिळाली नाही.[१००] तद्‌नंतर डि–बॉयने प्रांन्सच्या लष्करी तुकडीत नोकरी पत्करली. फ्रांन्सच्या लष्करी तुकडीत डि– बॉयने पवेश केल्यानंतर त्याचा मॉरिसस, रशिया – तुर्क युध्द, कॅन्स्टॅटिनोपल, इजिप्त असा सैन्यामधील विविध पदावर प्रवास झाला. यावेळी त्याला कैदही झाल्याचे दिसून येते.

[९५] मिसिऑम, पृ. १२३

[९६] हिंदुस्थानातून परत गेल्यावर इंग्लडमध्ये डि–बॉयने दुसरे लग्न केले. परंतु दहा महिन्यातच त्याची फारकत झाली. १८६६ मध्ये त्याच्या दुस–या बायकोचा मृत्यू झाला.

[९७] प्रान्सच्या आग्नेय भागात इटलीच्या सरहद्‌दीवर सेव्हॉय प्रांत आहे.

[९८] म.रि.उ.वि. भाग–०२,पृ.३२६

[९९] फा.फ.स्ट्र.इ., पृ. १५९

[१००] म.रि.उ.वि. भाग–०२,पृ.३२६–३२७

इजिप्तमध्ये गेला असताना डि–बॉयला इंग्रज वकिल जॉर्ज वॉल्डविन याने शिफारस पत्र दिले व डि–बॉय जानेवारी १७७८ मध्ये मद्रास मध्ये आला. काही काळ मद्रासच्या इंग्रजांच्या फलटणीत काम केल्यानंतर डि–बॉय १७८२ मध्ये गव्हर्नर लॉर्ड मेकार्टने याची शिफारस घेवून कलकत्त्यास गेला. १७८३ मध्ये हेस्टिंग्जने शिफारसपत्र देवून त्यास असिफउद्दौलाकडे पाठविल.[१०१] असिफउद्दौलाने त्याची उत्तम सोय केली होती. सालबाईचा तह झाल्यानंतर महादजी उत्तरेमध्ये बादशहाच्या राज्यकारभारामध्ये लक्ष घालण्याकरीता निघाला त्याचवेळी मेजर ब्राऊन हा इंग्रजातर्फे महादजीचे बादशहाच्या दरबारामध्ये प्रस्थ वाढू नये म्हणून बादशहाची भेट घेण्यास निघाला त्याच्याबरोबर डि–बॉयही होता. महादजीच्या पदरी इंग्रज वकिल ॲंडरसन हा होता त्याची गाठ डि–बॉयने घेतली. यावेळी उत्तरेमध्ये गोहादच्या राण्याने महादजीच्या विरोधामध्ये आपले धोरण राबवून ग्वाल्हेरचा किल्ला हस्तगत केला होता. महादजीने गोहादच्या राण्याबरोबर युध्द चालू केले असता गोहादच्या राण्यास मदत करण्याच्या दृष्टिकोनातून डि–बॉयने महादजीस अडचणीमध्ये आणण्याकरीता काही सूचना राणास केल्या, मात्र डि–बॉयच्या सूचनाचा कागद महादजीच्या हाती लागला. महादजीने इंग्रज आपले मित्र असतानाही त्यांनी शत्रूस मदत करणे थांबवावे असे हेस्टिंग्जला लिहले व डि–बॉयची रवानगी कलकत्त्यास झाली. पुढे स्थिर स्थावर झाल्यावर डि–बॉय लखनौला आला व तेथून महादजीचे विरोधक गोहादकर व जयपूरकर यांच्याकडे नोकरी करण्याच्या दृष्टिने प्रयत्न चालवले. मेजर ब्राऊन बरोबर डि–बॉय पुन्हा दिल्लीस गेला व बादशहास भेटला असता बादशहाने त्यास महादजीकडे पाटवून दिले. अशाप्रकारे या फ्रेंच अधिका–याचा प्रथम

[१०१] कित्ता, पृ.३२७

महादजीस विरोध होता परंतु नशीबाने त्यास पुन्हा महादजीकडेच नोकरी करावयास लागल्याचे दिसून येते.[१०२]

महादजीच्या पदरी नोकरीस असताना डि–बॉयला प्रथम दोन फलटणी तयार करण्यास महादजीने सांगितले व ते काम अहोरात्र कष्ट करून डि–बॉयने पूर्ण केले. डि–बॉयच्या फलटणीचे यश पाहून महादजीने डि–बॉयच्या नेतृत्वाखालील फलटणींची संख्या वाढविली व त्या फलटणीचा दबदबा सर्व उत्तर हिंदुस्थानात असल्याचे दिसून येते. महादजीने डि–बॉयला प्रथम पगार चार हजार इतका ठरविला होता व नंतर डि–बॉयला त्याने बढती देवून तो पगार दहा हजार इतका केला तसेच त्यास गंगा युमेनेच्या तिरावर काही प्रदेश जहागिरी[१०३] म्हणून दिला.[१०४] महादजीने दक्षिणेस येण्याचा निर्णय घेतल्यानंतर डि–बॉयवर विश्वास टाकून त्याच्यावर महत्वाची जबाबदरी टाकल्याचे दिसून येते.[१०५] महादजी १७९२ मध्ये दक्षिणेत येण्यास निघाला त्याचवेळी डि–बॉय यास पुत्ररत्न झाल्याचे दिसून येते.[१०६] १७९५ पर्यंत डि–बॉय हा शिंदयाचेकडे सेवेत होता नंतर तो आपल्या गावी शांबेरीस निघून गेला. डि–बॉयचा मृत्यू २१–०६–१८३० रोजी शांबेरी या त्याच्या गावी झाला[१०७]

मराठयांची पुर्वीची गनिमी काव्याची युध्द पध्दत श्रेष्ठ होती परिणामी इंग्रजांना त्याचा सामना करणे कठिण जात होते. या गनिमी पध्दतीमुळेच

[१०२] म.रि.उ.वि.,भाग– ०२, पृ. ३२८., नमशि.,पृ. ३७

[१०३] या जहागिरीतील डि–बॉयने अलीगड हे आपले मुख्य ठाणे बनविले व तेथे एक वाडा बांधला त्यास 'साहेबगड' म्हणून ओळखले जात असे.

[१०४] म.रि.उ.वि. भाग–०२, पृ. ३३०–३३१

[१०५] कित्ता, पृ. ३८९

[१०६] डि–बॉयने हिंदूस्थानातील एका मुस्लिम स्त्री बरोबर विवाह केला होता तिच्यापासून त्यास एक मुलगा झाला. त्याचे प्रथम नाव अलिबक्ष असे होते. परंतु डि–बॉय युरोपमध्ये गेल्यावर त्यास खिस्ती धर्माची दिक्षा देण्यात आली व त्याचे नाव चार्लस् अलेक्झांडर असे ठेवण्यात आले. तोच पुढे डि–बॉयच्या संपत्तीचा मालक झाला.

[१०७] म.रि.उ.वि. भाग–०२, पृ. ३३१

मराठयांचा पहिल्या मराठा – इंग्रज युध्दामध्ये विजय मिळाला. मात्र त्यामध्ये काही त्रुटीही होत्या आणि नेमक्या त्याच त्रुटी दूर करण्याकरीता महादजी शिंदे यांनी फ्रेंच अधिका–यांना आपल्या पदरी ठेवून कवायतो फौज उभारण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. महादजीने डि–बॉयच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या परकिय कवायती फौजेचा स्वकीय सत्तेविरोधामध्ये खूपच फायदा झाल्याचे दिसून येते. मात्र या फौजेचा इंग्रजाबरोबर लढत असताना मात्र फायदा झाला नाही असे दिसून येते. याचे कारण म्हणजे परकिय युध्दतंत्र पुर्णतः महादजीच्या अधिका–यांनी आत्मसाद केले नव्हते. तसेच महादजीकडे ही युध्द पध्दती अंमलात आणण्यासाठी पुरेसे अधिकारीही नव्हते.

उत्तरेतील छोटया छोटया संस्थानातील बंड मोडून काढणे, चौथाई अथवा खंडणी गोळा करणे, दिल्ली दरबारामध्ये आपले वर्चस्व निर्माण करणे इ. गोष्टी महादजी फ्रेंचाच्या मदतीनेच करू शकला हे सत्य नाकरता येत नाही.

.........))))((((..........

प्रकरण सहावे

महादजी शिंदे व उत्तरेकडील सत्ता

(मोगल, रोहिले, जाठ, रजपूत संबंध)

प्रस्तावना:–

महादजी व केदारजी उत्तरेत :–

रामचंद्र गणेश कानडे व महादजी उत्तरेत :–

महादजीने खंडण्या गोळा केल्या :–

झबेताखानाचा बंदोबस्त व रोहिलाखंडावर मराठयांचे वर्चस्व :– १७७२

दोआबात मराठयांचे वर्चस्व प्रस्थापित:–

इंग्रजांचा उत्तरेतील राजकारणात प्रवेश करण्याचा प्रयत्न :–

बादशहा मराठयांच्या आश्रयास :–

बारभाईचे कारस्थान व महादजी दक्षिणेकडे :–

महादजी शिंदे यांचा उत्तरेतील दुसरा टप्पा:–

गोहाद हस्तगत :–

ग्वाल्हेर हस्तगत:–

जहागिरदारांना आपल्या वर्चस्वाखाली आणले :–

बादशहाची मदतीकरीता महादजीस पत्रे :–

बादशहाकडून महादजीस मानाच्या पदव्या बहाल :–

महादजीचा आर्थिक संकटावरील उपाय :–

महादजी व रजपूत संबधामध्ये बिघाड :–

माचेडीचा (अलवार) प्रतापसिंग व महादजी :–

जयपूरकर व महादजी संघर्ष :–

महादजीचे जयपूरवर आक्रमण व तहः–

लालसोटची लढाई :– जुलै १७८९

प्रत्यक्ष लढाई व महादजीची माघार :–

दिल्ली गुलामकादीरकडे :–

पेशव्यांची महादजीस व महादजीची बादशहास मदतः–

पाटणची लढाईः–

मेडत्याची लढाई :–

सांभारचा तहः–

महादजी मेवाडमध्य :–

समारोप :–

प्रस्तावनाः–

पानिपतच्या युध्दाअगोदर मराठयांच्या उत्तरेतील धोरणाची मदार प्रामुख्याने शिंदे व होळकर या दोन सरदारावरच असल्याचे दिसून येते. उत्तरेतील अनेक अडचणी व संकटाचे निवारण हे दोन सरदार करत असत. मात्र या दोन सरदारानी उत्तरेतील अंतर्गत राजकारणात भाग घेतल्याने त्यांना तेथील सत्तांचा कडवा विरोध झाल्याचे दिसून येते. हिंदुस्थानामध्ये बादशहा हा सर्वेसर्वा समजला जात असे. उत्तरेत बादशहा व मराठे यांच्या संबधाबाबत ज विशिष्ट रूप पेशवाईच्या उत्तरार्धात प्राप्त झाल त्याची जबाबदारी मुख्यत्वेकरून शिंदे घराण्याकडे होती. नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दीत जयाजी, दत्ताजी व जनकोजी यांनी दिल्लीचा कारभार मराठयांच्या हाती आणण्यासाठी आपले प्राण खर्ची घालवले. नंतर माधवराव व सवाई माधवराव यांच्या कारकीर्दीत महादजी शिंदे यांनी दिल्लीचा कारभार स्वतःच्या कर्तबगारीवर आपल्या हाती घेतला[१] व बादशाहचे वजीर पद मिळवून स्वतःचे तसेच मराठयांचे वर्चस्व उत्तरेमध्ये निर्माण केले.

महादजी शिंदे यांचे उत्तरेकडील धोरण हे दोन टप्प्यामध्ये प्रामुख्याने विभागलेले दिसून येते. यामध्ये पहिला टप्पा हा महादजी शिंदे यांना स्वतःचे अस्तित्व सिध्द करणारा व खडतर असा पहिल्या मराठा इंग्रज युध्दापर्यंतचा होता. या टप्प्यामध्ये महादजी शिंदे यांना सरदारकी मिळवण्यासाठी व शिंदे दौलतीचा मालक होण्यासाठी संघर्ष करावा लागल्याचे दिसून येते.[२] दुस–या टप्प्यामध्ये महादजीने उत्तरेत मराठयांचे पर्यायाने स्वःताचे निर्विवाद वर्चस्व निर्माण केलेले दिसून येते.

---

[१] भाइसमं.त्रै., अंक १ ते ४, वर्ष १९२३–२४, पृ. २१

[२] पे.द.,खंड.२९,नं.२२०,पृ.२३२, नं.२२२,पृ.२३४

महादजी व केदारजी उत्तरेत :–

पानिपतच्या लढाईनंतर उत्तरेतील कमकुवत झालेली मराठयांची सत्ता सावरण्याकरीता रघुनाथरावाने महादजी व केदारजो या दोघांना माळव्यात रवाना केले. परंतु शिंदयाची सरदारकी कोणास दयावी व शिंदे दौलतीचा मालक कोणास करावे हे मात्र ठरवले नाही. महादजी व केदारजी हे दोघेही लहान आहेत व त्यांना हिदुंस्थानची म्हणजेच उत्तरेची माहिती व्हावी हा हेतू राघोबादादाचा प्रामुख्याने होता. मात्र त्यांच्या जिवाला कोणताही धोका होवू नये म्हणून राघोबादादानी त्यांच्या रक्षणासाठी विठ्ठल शिवदेव यास पाठविल्याचे दिसून येते.[३] महादजी शिंदे यांच्या जिवीताची काळजी राघोबादादा यांनी घेतली असली तरी राघोबादादाने शिंदयाच्या सरदारकी बाबत हेतुपरस्पर राजकारण केले. शिंदयाची सरदारकी राघोबादादाने तुकोजीस संपत्तीची मागणी करून देण्याचा प्रयत्न केला मात्र तुकोजीने सरदारकीस महादजीच योग्य असल्याचे सांगितले व नकार दिला. पुढे मानाजी फाकडे यास शिंदयाची सरदारकी राघोबादादाने बहाल केली.[४] मानाजी फाकडेस सरदारकी जाहिर केल्याचे समजताच महादजी शिंदे यांनी उत्तरेतून माघारी दक्षिणेकडे प्रयाण केले व गुरू मन्शुरशहा याच्या जवळ काही काळ घालविला.[५]

महादजीस शिंदयाची सरदारकी मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागला. राघोबादादाचा असणारा विरोध व मानाजी फाकडेचे अवाहन या सर्व गोष्टीवर मात करून महादजी शिंदे यांनी बाजी मारली व शिंदे दौलतीचे ते मालक

---

[३] ''केदारजी शिंदे व महादजी शिंदे यासही पाठविले आहे. यांचेही स्वरूप राखोन उपयोग पडेल ते करावे, सांप्रत शिंदयाच्या जागी तेच आहेत'' असे दादांनी विठ्ठल शिवदेव व नारोशंकर यास लिहीले. –अ.म.मा.शि.च.का, पृ. ८७, वि.घ.इ. पृ. ५०–५३

[४] प.या.व., पृ. ११२., अ.म.मा.शि.च.का., पृ.९२

[५] अ.शि.घ.इ., पृ. १६

बनले. महादजी शिंदे यांना सरदारकी देण्यामध्ये प्रामुख्याने माधवराव पेशवे यांचे सहाय्य महत्वपूर्ण ठरले. माधवराव पेशवे यांनी महादजीस सरदारकी १७६९ मध्ये दिली. याचे महत्वाचे कारण म्हणजे माधवराव पेशवे यांना उत्तरेमध्ये मराठयांच्या साम्राज्याची पानिपतच्या महत्वपूर्ण घडामोडीनंतर पुनश्चः उभारणी करावयाची होती.[६]

रामचंद्र गणेश कानडे व महादजी उत्तरेत :–

पानिपतच्या युध्दानंतर मराठयाची उत्तर हिंदुस्थानामध्ये सत्ता कमकुवत झाली होती. मराठयांचा पानिपत युध्दामध्ये पराभव झाल्यामुळे उत्तरेतील सत्ताधिशांनी मराठयांचे वर्चस्व झुगारून देवून ते स्वतंत्र होवू पहात होते.[७] परत उत्तर हिंदुस्थानामध्ये आपले वर्चस्व निर्माण करावे यासाठी पेशवा माधवराव यांनी मोठी फौज तयार केली या फौजेवर रामचंद्र गणेश कानडे यास सुभेदार नेमले व विसाजी कृष्ण बिनीवाले यास कारभारी म्हणून नेमले. तसेच महादजी शिंदे व होळकर यांना आपल्या फौजेसह सेनापतीस मिळावे असे सांगितले. मात्र महादजीने लगेच कूच न करता तसेच काही दिवस घालविल्याचे दिसून येते व याचे कारण म्हणजे त्यास सरदारकी मिळविण्यासाठी करावा लागलेला संघर्ष होय. माधवराव पेशवे थेऊरला जात असतांना त्यांच्या लक्षात ही गोष्ट आली त्याबरोबर त्यानी महादजीस बोलावून कठोर शब्दात समज दिली व उत्तरेमध्ये जावयास सांगितलेले दिसून येते.[८] यावेळी उत्तरेतील या स्वारीमध्ये महादजी शिंदे यांनी महत्वपूर्ण

---

[६] पे.द.,खंड.२९,नं.२२०,पृ.२३२, नं.२२२,पृ.२३४

[७] न्यु.हि.ऑ.म., खंड. २, पृ. ५१७

[८] माधवराव पेशव्यांनी निक्षून सांगितले की, ''पाटील, मी परत पुण्यात येतांना तुमच्या तळावर जर एक तंबू दिसला. तर सर्व गोठ लुटून तुमची जहागीरी जप्त करीन यासाठी आताची आता कूच करून चला.'' माधवरावाचा सर्व सरदारावर इतका धाक होता की त्यांचे कोणीही मोडत नसत. अ.म.मा.शि.च.का., पृ. १००, १०१

कामगिरी बजावली व तेथून पुढे महादजी शिंदे यांचा प्रामुख्याने उत्कर्ष झाल्याचे दिसून येता.[९] महादजी शिंदे यांच्याबरोबर उत्तरेतील मोहिमेत इतरही मराठा सरदार होते त्यांच्या वर्चस्वाखाली महादजीस रहावे लागले होते मात्र त्यातूनही महादजीने संघर्ष करत आपले अस्तित्व व कर्तबगारी सिध्द केलेली दिसून येते. या टप्प्याच्या उत्तरार्धात महादजी उत्तरेकडील मराठयांच्या राजकारणामध्ये पमुख बनलेला दिसून येतो.

महादजीने खंडण्या गोळा केल्या :–

महादजी शिंदे यांनी उत्तरेमध्ये गेल्यानंतर मराठा अंमलाखाली असलेल्या प्रदेशातून खंडणी गोळा करण्याचे काम चालू केले यावेळी खानाजी जाधव यांने महादजीस खूप मदत केल्याचे दिसून येते.[१०] उदयपूर येथे खंडणी गोळा करण्यासाठी गेल्यानंतर महादजीस तेथील विजयसिंग, छत्तरसिंग मेहता लाल इत्यादी राजांनी १७६६ ते १७६९ या कालावधीमधील मराठयांना न दिलेली खंडणी दिली. (मे १७६९)[११] महाराणा अरिसिंगही मराठयांना खंडणी देण्यास तयार झाला व त्यांन जुलै १७६९ मध्ये ६४ लाख रूपये खंडणी मराठयांना दिली तसेच महादजीसही १ लाख रूपये दिले.[१२] मराठा सैन्य उत्तरेमध्ये गेले असता जाटांनी मराठयांना विरोध करण्यास सुरूवात केली.[१३] ६ एप्रिल १७७० रोजी मराठा जाट यांचे युध्द झाले.[१४] युध्दामध्ये जाटांना माघार घ्यावी लागली त्यावेळी त्यांनी महादजी शिंदयाच्याकडे शांततेची बोलणी करण्यास सुरूवात केली. जाट व

[९] ऐ.ले.सं., खंड.०४, पृ.१८७९., पे.द.खंड.२९,नं.२२४, पृ.२३६, नं.२३१,पृ.२३९
[१०] भा.इ.सं.म.त्रै., अभंग चंद्रकांत, *पानिपतोत्तर मराठयांचे राजस्थानवरील वर्चस्व,* पृ.७८
[११] गु.द., भाग.०२, पृ.१०६,
[१२] सि.फ्रॅा.पे.द., खंड.२४, पृ.२४३, खंड. ३४, पृ. १८५
[१३] इ.ले.सं.खंड.०४,पृ.१८७५, बर्वे एम.व्हो., *महादजी शिंदीया,* पृ.१२
[१४] कॅ.ऑ.प.क., खंड.०३,पृ.१२८, १६१

मराठयांमध्ये यावेळी तह झाला व या तहानुसार जाटांनी मराठयांना ६५ लाख रूपये देण्याचे कबूल केले. त्यातील १० लाख रूपये रोख दयावेत व बाकीचे हप्त्यान दयावेत असे ठरले.[१५] एकूणच महादजीने आपले वर्चस्व सिध्द करून दाखवले व तो स्वतःही आर्थिकदृष्टिया सक्षम बनला.

झबेताखानाचा बंदोबस्त व रोहिलाखंडावर मराठयांचे वर्चस्व :– १७७२

उत्तरेत पानिपतयुध्दानंतर मराठयांचे पभुत्व पुन्हा वाढविण्यासाठी मराठी फौजा गेल्या त्यावेळी नजीबखानाचे पारिपत्य करावे असा विचार चालू होता. मात्र यास तुकोजी होळकर याचा विरोध होता कारण नजीबखानाबरोबर होळकरांचे कायम सख्य असलेले दिसून येते. नजीबखानास मल्हाररावाने माणसपुत्र मानले होते. अशावेळी ज्याने मराठयांच्या नाश करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले, पानिपतसारखे संकट मराठयांच्यावर ओढवले, शिदंयाच्या घराण्याशी ज्याचे हाडवैर होते त्याचा समूळ नाश करण्याबाबत सर्वांचे मत होळकर वगळता एक झाले. यावेळी महादजीही रोहिल्यांचा बंदोबस्त करण्याकरीता आग्रही असल्याचे दिसून येते[१६]

नजीबखान रोहिला सरदार पानिपतनंतर दिल्ली दरबारात वजीराचे काम बघत होता. पानिपतयुध्दानंतर काही वर्षे वजिराचे काम पाहिल्यानंतर आपले वजीराचे काम झबेताखानाकडे सोपव्न तो नजीबाबाद या स्वतः वसविलेल्या शहरामध्ये वार्धक्यामुळे रहावयास गला.[१७] मराठयांनी उत्तरेत प्रवेश केला आहे असे समजताच उत्तरेतील नजीबखान रोहिला यास ख–या अर्थाने वचक बसला. कारण अब्दाली हा परत त्यास मदत करण्यास येवू

---

[१५] फॉ.ऑ.मु.ए., खंड.०३, पृ.०९

[१६] ''माझे बंधू व माझा पुतण्या यांच्या मृत्यूचा सूड उगविल्याशिवाय मी कधी राहणार नाही. रोहिल्यांची पाळेमुळे खणून टाकल्याखेरीज जनकोजीबावाविषयी माझे दु:ख कमी होणार नाही.'' अ.म.मा.शि.च.का., पृ. १०३

[१७] न.म.शि., पृ. २५

शकत नव्हता व मराठे परत आपला प्रदेश काबीज करणार याची भिती त्यास होती. त्यातच त्याचा दि. ३१ आक्टोबर १७७० रोजी मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा झबेताखान हा त्याच्या संपत्तीचा मालक बनला.[१८] झबताखान हा नजीबखानाचा मुलगा शूर अगर मुत्सद्‌दी नव्हता त्यामुळे दिल्ली दरबारामध्ये त्यास आपले वर्चस्व निर्माण करता आले नाही. झबेताखान याने स्वतःला बादशहाकडून मीरबक्षी हा किताब घेतला.[१९] मराठा सैन्याने दिल्लीवर आक्रमण करताच इ.स.१७७१ मध्ये झबीताखान दिल्ली सोडून पळून गेला.[२०]

दोआबात मराठयांचे वर्चस्व प्रस्थापितः–

दिल्ली सोडून पळून गेलेला झबेताखान हा मराठयांच्यावर आक्रमण करण्याच्यादृष्टिने तयारी करू लागला. यावेळी महादजी शिंदे व विसाजी कृष्ण बिनीवाले हे बंगश बरोबरच्या युध्दामध्ये व्यस्त होते. महादजी व विसाजी कृष्ण बिनीवाले यांनी इटावा हस्तगत केल्यानंतर फरूकाबादवर १५ डिसेंबर १७७० रोजी मोहिम आखली. अहमदखान बंगशला मराठयांचा सामना करणे शक्य नव्हते परिणामी त्यांने पानिपतच्या युध्दानंतर मराठयांचा जो जो प्रदेश घेतला होता तो सर्व प्रदेश मराठयांना परत दिला. आशाप्रकारे मराठयांनी दोआबातील आपला गेलेला प्रदेश परत मिळवला व आपली सत्ता तेथे पुनश्चः स्थापन केली.[२१]

महादजी शिंद यांनी ४ मार्च १७७२ रोजी शुक्रतालवर कब्जा केला. शुक्रताल येथे महादजीचा भाऊ दत्ताजी शिंदे यांचा मृत्यू झाला होता त्याच्या

---

[१८] कॅ.ऑ.फ.क., खंड.०३, नं. २११., न्यु.हि.ऑ.द.म., खंड. २, पृ. ५२६, ५२७
[१९] कॅ.ऑ.फ.क., खंड.०३,नं.६०५
[२०] न.म.शि., पृ. २५
[२१] न्यु.हि.ऑ.द.म., खंड. २, खंड. २, पृ. ५२७

मृत्यूचा बदला महादजीने घेतला. झबेताखान याने मराठयांच्या बरोबरच्या युध्दातून पळ काढिला व महादजीने त्याच्या प्रदेशातून सर्व थकीत खंडणी वसूल केली.[२२] मराठयांना यावेळी पानिपत युध्दामध्ये गेलेले घोडे, हत्ती, तोफा व इतर मौल्यवान वस्तू परत मिळाल्या.[२३] महादजीने नजीबखानाच्या जहागिरीतील शुक्रताल, फत्तरगड व घोसगड असे तीन बळकट किल्ले हस्तगत केले. तसेच जाटांच्यावर हल्ला करून त्यांची बरीच कत्तल घडवून आणली. फत्तरगडावर पानिपत युध्दात कैद करून ठेवलेली मुलेमाणसे, बायका, संपत्तीची लूट मराठयांना मिळाली व मराठयांचा दरारा उत्तरेत पुन्हा निर्माण झाला.[२४]

इंग्रजांचा उत्तरेतील राजकारणात प्रवेश करण्याचा प्रयत्न :–

ब्रिटिशांनी शहाआलम व इतर मंडळींचा बक्सारच्या युध्दामध्ये पराभव केल्यानंतर उत्तरेमध्ये आपला विस्तार करण्याचे धोरण तात्काळ राबविले नाही याचे कारण म्हणजे त्यांना शक्तीशाली मराठयांचा विरोध पत्करावयाचा नव्हता. मात्र याचवेळी इंग्रजांनी मराठयांना उत्तरेमध्ये कोणी मित्र भेटू नयेत यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

मराठे बादशहास दिल्लीच्या तख्तावर बसवणार याची इंग्रजाना कल्पना असल्याने इंग्रजानी बादशहाची मानसिक तयारी करून त्यास आपल्या नियत्रंणाखाली आणण्याचे व उत्तरेत आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी

[२२] इ.ले.सं.खंड.०४,पृ.१८८७, हि.ऑ.म.पि., खंड. ३,पृ. १००
[२३] गु.द.,खंड.०३, पृ.०६, दि.२५–१७७२., (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान, सीतामऊ, माळवा, म.प्र.)
[२४] पे.द., भाग.०१, ले.६९, पृ. ६९–७०., अ.म.मा.शि.च.का., पृ. १०९

पयत्न केल्याचे दिसून येते.[२५] मात्र इंग्रजाची मदत स्विकारण्याबाबत बादशहाची नकारात्मक भूमिका राहिल्याचे दिसून येते.[२६]

बादशहा मराठयांच्या आश्रयास :-

मराठयांना उत्तरेमध्ये प्रामुखाने दोन शत्रू होते एक जाट व दुसरे रोहिला होय. या दोन्ही शत्रूंच्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करावयाचे असेल तर बादशहास आपल्या ताब्यात ठेवणे आवश्यक आहे हे महादजी ओळखून होते. मराठयांचे सैन्य उत्तरेमध्ये गेले त्यावेळी असहाय्य बादशहा शहाआलम हा ब्रिटिशांच्या ताब्यात होता[२७] बादशहा मल्हारराव होळकर व क्लाईव्ह या दोघाकडे मदतीसाठी संधान बांधत होता.[२८] बादशहास इंग्रजांच्या ताब्यातून आणून परत दिल्लीच्या तख्तावर बसवणे आवश्यक होते.[२९] यावेळी बादशहा शहाआलम यास इंग्रजांनीही मदत देण्याच काही अटीवर कबूल केले होते. मात्र बादशहाने इंग्रजांची मदत घेण्यास नकार दिला व मराठयांची मदत मिळविण्याचा प्रयत्न चालविला. बादशहाने आपला सरदार सिराजउद्दौला यास मराठयांचे सरदार गणेश कानडे व महादजी शिंदे यांचेकडे मदत करण्याबाबत बोलणी करण्यासाठी पाठविले. यावेळी मराठयांनी ज्या अटी बादशहापुढे ठेवल्या त्या सर्व बादशहाने मान्य केल्या. गाझीउद्दीन यास वजोर पद देण्यात आले व बादशहा शहाआलम हा मराठयाच्या संरक्षणामध्ये दिल्लीस आला.[३०] महादजी शिंदयाच्या सैन्याने १७७१ च्या सुरूवातीलाच दिल्लीमध्ये प्रवेश केला व झबेताखानास दिल्लीतून हाकलून दिले १०

[२५] म.प.इ., ले.१५५, पृ.१५४., कॅ.ऑ.फ.क., खंड.०३,नं. ६१४
[२६] म.रि.उ.वि.,भाग.०२ पृ. २५९
[२७] पे.द.खंड.२९,नं.२६६, पृ.२७१, म.वइ., पृ.११७
[२८] म.प.इ., ले.१५४, पृ.१५२-१५३
[२९] कॅ.ऑ.प.क., खंड.०३, नं.५०५, ५१७, ५३०., पे.द., खंड.२९, नं.२२, पृ. १८-१९
[३०] म.प.इ., ले.१६१, पृ.२६१., पे.द., भाग.२९, न. २६६

फेब्रुवारी १७७१ पर्यंत त्याने दिल्ली पुर्णतः आपल्या ताब्यात घेतली.[३१] दिल्लो शहर, किल्ला व राजवाडा ताब्यात घेतला. दरम्यानच्या कालावधीमध्ये नजीबखान रोहिला मरण पावला.[३२]

शहाआलमची दिल्लीच्या तख्तावर स्थापना करावी असे दरबारातील पठाण, रजपूत, शीख इ. सरदारांना वाटत होते. रोहिल्यांचा बंदोबस्त मराठयांनी केला याबद्दल या सरदाराना बरे वाटू लागले. शहाआलमने पेशवे दरबारास १० लाख रूपये खंडणी देण्याचे कबूल केले. झबताखान हा नजीबाबाद येथे युध्दाची तयारी करत होता मात्र मराठयांचे सैन्य बघून त्याने पळ काढला व मराठयांचा विजय झाला.[३३]

मराठयांनी दिल्ली ताब्यात घेतल्यांनतर त्यांनी बादशहापुढे आपल्या अटी ठेवल्या त्यासर्वच अटी बादशहाने मान्य केल्या व तहावर १२ फेब्रुवारी १७७१ रोजी सही केली.[३४] १२ फेब्रुवारी १७७१ रोजी बादशहा अलाहाबादहून दिल्लीस आला. यानंतर महादजीने बादशहाबरोबर इतर महत्वपूर्ण बाबीवर चर्चा केली.[३५] अशाप्रकारे मराठयांची पानिपतयुध्दामध्ये गेलेली प्रतिष्ठा व बादशहास त्याचे गेलेले पूर्ण अधिकार महादजी शिंदे व विसाजी कृष्ण बिनिवाले यांनी परत मिळवून दिले. मराठयांची अशा प्रकारची यशस्वी घोडदौड उत्तरेमध्ये चालू असतानाच मोठा अपशकुन घडला तो म्हणजे

---

[३१] न्यु.हि.आ.म., खंड. २, पृ. २५९

[३२] दि. ३१ ऑक्टोबर १७७० रोजी मृत्यू झाला. म.रि.उ.वि.,भाग.०२, पृ. ५२६,५२७

[३३] न.म.शि., पृ.२६

[३४] पे.द.खंड.२९, नं.२६५, २६६, पृ.२७०, पृ.२७१., ओतुरकर रा.वि., *महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास,* पृ. १६१

[३५] पे.द.खंड.२९,नं.८९,पृ.८४, दि. १३.०४.१७७१

माधवराव पेशवे यांचा २८ व्या वर्षी १८ नोव्हेबंर १७७२ ला पुणे येथे मृत्यू झाला.[३६]

बारभाईचे कारस्थान व महादजी दक्षिणेकडे :–

माधवराव पेशवे यांच्या मृत्यूनंतर नारायणराव पेशवे हे पेशवे पदाच्या गादीवर आले मात्र यावेळी राघोबादादा यास पेशवे पद धारण करण्याची तीव्र इच्छा होती परिणामी त्याने एक वर्षातच नारायणरावचा गारदयाकरवी खून घडवून आणला.[३७] नारायणराव पेशवे यांच्या मृत्यूनंतर बारभाई कारस्थान आकारास आले व त्यानुसार राघोबादादा यास विरोध करण्यात आला. यावेळी इंग्रजांनी राघोबादादास पत्रे पाठवून नारायणरावाचा मृत्यू व राघोबादादाच्या पेशवे पदास शुभेच्छा दिलेल्या दिसून येतात.[३८] राघोबादादास इंग्रजांचा पाठिंबा सहजासहजी मिळाल्याने ते इंग्रजांच्या आश्रयास गेले व इंग्रजांनी पुण्यावर आक्रमण करण्याची तयारी चालवली, करवीरकर छत्रपतीनी पेशव्यांचा प्रदेश काबीज करण्यास सुरूवात केली तेंव्हा नानानी महादजीस दक्षिणेस येण्याबाबत सांगितले व महादजी उत्तरेतील माहोम सोडून दक्षिणेकडे प्रयाण केले. महादजी शिंदे यांच्या उत्तरेकडील धोरणाचा पहिला टप्पा येथे संपल्याचे दिसून येते.

महादजी शिंदे यांचा उत्तरेतील दुसरा टप्पाः–

करवीरकर छत्रपती, मोरोबा फडणविस यांच्या बंडाचा बंदोबस्त केल्यानंतर व इंग्रजाबरोबरच्या सालबाईच्या तहानंतर महादजीने उत्तरेकडे

---

[३६] पे.द.खंड.२९,नं.२७०,पृ.२७४.

[३७] दि.३०–०८–१७७३ रोजी खून घडून आला. – म.प.इ., ले.१६६, पृ.१६५–१६७., ऐ.ले.सं., भाग–.०४., नं.१२५७.

[३८] इस्ट इंडिया कंपनीचा पेशवे दरबारशी फारसी पत्रव्यवहार, प.क्र.१७., म.प.इ., ले.१६८, पृ. १६९.

प्रयाण केले.[३९] महादजीने उत्तरेमध्ये गेल्यानंतर आठ वर्षेपर्यंत दिल्लीचा कारभार केला. या कालखंडाचे ठोकळ मानाने दोन कालखंड पडतात. लष्कराच्या जोरावर अनेक सरदारांचा पाडाव करून त्यांनी बादशाही सत्ता हाती घेतली[४०] यामुळे मुसलमानी व रजपूत सरदार यांनी एकदम उठाव करून लालसोटच्या लढाईत महादजीस शह देण्याचा प्रयत्न केला आणि गुलामकादरने दिल्ली हस्तगत केली येथपर्यंत पहिला कालखंड पडतो. लालसोटच्या लढाईतील अपयशानंतर महादजीने परत सैन्याची जमवा जमव केली व उत्तरेतील राठोड, रजपूत बंडखोर मोगल सरदार यांचा बंदोबस्त करून पुनश्चः दिल्लीत मराठयांची सत्ता प्रस्थापित केली तो दुसरा कालखंड होय.

पहिल्या चार वर्षापर्यंत महादजीने उत्तरेत वर्चस्व निर्माण करून दिल्लीचा राज्यकारभार आपल्या हातामध्ये घेतल्यापासून पुण्याहून त्यांना मदतही झाली नाही व विरोधही झाला नाही. उत्तरेतील राज्यकारभार हा त्यांचा एकतंत्री राज्यकारभार होता. उत्तरेतील राजकारणातील यश अपयशाची सर्वस्वी जबाबदारी महादजीने स्विकारली होती. नानांनी महादजीस त्यांच्या कारभारातील चुका दाखविल्या होत्या मात्र योग्य ती मदत न मिळाल्यामुळे महादजीने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. मात्र त्याचा परिणाम पुढे दिसून आल्याचे दिसून येते. लालसोटच्या लढाईत महादजीचा पराभव झाल्यानंतर त्यानी उत्तरेतच सैन्य उभारले तसेच पुण्यासही सैन्य मदत

---

[३९] गु.द., भाग–०४, पृ.३४, ३५, १३७ जालिमसिंगास महादजीचो पत्रे. (अप्रकाशित पत्र, श्री नटनागरशोध संस्थान, सीतामऊ, माळवा, म.प्र.)

[४०] भाइसमं, पुणे, अंक १ ते ४, वर्ष १९२३–२४, पृ. २१

मागितली त्यावेळी पेशवा दरबारने महादजीच्या मदतीकरीता तुकोजी होळकर व अलिबहाद्दर यांना पाठविल्याचे दिसून येते.[४१]

गोहाद हस्तगत :-

सर्वप्रथम गोहादवर राघोबादादाच्या कारकीर्दीमध्ये मराठयांनी आक्रमण केले होते त्यावेळी त्या मोहिमेमध्ये महादजी शिंदे सामील होते. यावेळी एक महत्वपूर्ण घटना घडली होती ती म्हणजे गोहादच्या राण्यास[४२] महादजी सामील आहे अशी अफवा त्यावेळी मराठा सैन्यामध्ये पसरली होती. तसेच महादजीच्या शत्रूंनी महादजीस बदनाम करण्याच्या दृष्टिकोनातून तो जाटांस दाणासामुग्री पुरवितो असा आरोप केला होता. महादजीवर करण्यात आलेला हा आरोप खूप मोठा होता याचा परिणाम म्हणजे रागास जावून राघोबाने महादजीस 'मेखसू घालून ठार मारावे' असा आदेश दिला. विचूंरकर व होळकर हे मात्र याप्रकरणाबाबत महादजीस अनकुल असा विचार मांडत असत. मात्र राघोबा कोणाचेही ऐकत नव्हता. उलट मल्हारराव होळकरासच राघोबादादाने या प्रकरणात भाग न घेण्याबाबत सांगितल्याचे दिसून येते.[४३]

महादजी शिंदे हे दक्षिणेमध्ये इंग्रजाबरोबरच्या लढाईत गुंतल्याचे पाहून गोहादच्या राण्याने मराठयांच्या विरोधात बंडाचे निशाण उभारले त्याने मराठयांच्या ताब्यात असणा-या प्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण करण्याचा

---

[४१] भाइसंम., अंक १ ते ४, वर्ष १९२३-२४, पृ. २२

[४२]'महादजीशी विशेष संबध गोहदकर यांच्या बरोबर येतो. हे कुटूंब भरतपूरच्या राजघराण्याहून वेगळे असून हल्ली त्यांचे वास्तव्य धोलपुरात आहे. चौदाव्या शतकात यांचे पूर्वज ग्वाल्हेर येथे येऊन राहिले. तेथून ईशान्येस २२ मैलावर त्यांनी आपले ठाणे केले. इ.स. १५०५ पासून गोहदचा राणा या नावांने त्यांची लहानशी जहागीरी चालली. प्रथम बाजीरावाने गोहदकर राण्यास कबज्यात आणले.'

[४३]'सुभेदार, आपण या कामात पडू नये, आखेर गुलामाची जात आपल्या जातीवर गेली.' - अ.म.मा.शि.च.का., पृ. ९३.

प्रयत्न चालू केला.[४४] गोहादचा राणाने डि–बॉय या फ्रेंच अधिका–यास महादजीचा बंदोबस्त करण्याकरीता नेमले होते. डि–बॉय या फ्रेंच अधिका–यांने यावेळी गोहादच्या राणास महादजीच्या बंदोबस्ताकरीता १ लाख रूपयाची मागणी केली. राणाने ती मागणी पूर्ण केली नाही परिणामी त्याने महादजी विरोधात आपली आघाडी उघडली नाही. यावेळी महादजीस या फ्रेंच अधिका–याच्या ठिकाणी असणारे गुण लक्षात आले व त्यास आपल्या पदरी नोकरीस ठेवले. सर्वप्रथम डि–बॉयला दोन फलटणी तयार करण्यास महादजीने सांगितले. त्यापमाणे त्याने दोन उत्कृष्ट फलटणी तयार केल्या व महादजीचा विश्वास संपादन केला. पुढे या डि–बॉयच्या फलटणी वाढविण्यात आल्या व त्यांनी महादजीचे उत्तरेत वर्चस्व निर्माण करण्यामध्ये महत्वाची कामगिरी बजावल्याचे दिसून येते. १७८४ ते १७९५ या कालावधी पर्यंत हा अधिकारी शिंदयांच्या पदरी होता.[४५] गोहादवर महादजीने आक्रमण केले व किल्ला हस्तगत केला. महादजीने यावेळी गनिमी युध्द पध्दतीचा स्विकार केला होता. तद्नंतर महादजीने पाश्चात्य युध्द पध्दत स्विकारलेली दिसून येते.

ग्वाल्हेर हस्तगतः–

पानिपतयुध्दानंतर मराठयांची काही प्रमाणात हानी झाली. उत्तरेतील मराठयांचा दबदबा कमी झाला याचाच फायदा जाटांनी घेवून ग्वाल्हेरचा महत्वपूर्ण किल्ला मराठयांच्याकडून हस्तगत केला होता. सन १७६७ मध्ये हा किल्ला मराठयांनी परत मिळविला. मात्र महादजी शिंदे दक्षिणेमध्ये आल्यानंतर सन १७७९ मध्ये हेस्टिंगच्या कारवाईने राणा छत्रसाल मराठयाविरूध्द इंग्रजांस सामील झाला आणि कच्छवा, धार, भीड व ग्वाल्हेर

---

[४४] म.इ., खंड, ०३, पृ. ५७, ५८

[४५] कित्ता, पृ. ५८

किल्ला त्यांने हस्तगत केला.[४६] महादजीने आपल्या सर्व सैन्यसह ग्वाल्हेरवर स्वारी केली व २१ जुलै १७८३ रोजी ग्वाल्हेर किल्ला पूर्णपणे आपल्या वर्चस्वाखाली आणला.[४७]

एकंदरीत ग्वाल्हेर व गोहाद ही दोन स्थळे घेण्यास महादजीस बरोबर एक वर्ष लागले. ग्वाल्हेर व गोहाद महादजीने काबीज केल्याचे समजताच मराठा साम्राज्यामध्ये यावेळी मोठया प्रमाणात आनंदाचे वातावरण निर्माण झालचे तसेच महादजीचा दरारा चहुकडे पसरल्याचे दिसून येते.[४८]

जहागिरदारांना आपल्या वर्चस्वाखाली आणले :–

महादजी शिंदे इंग्रजाबरोबरच्या युध्दामध्ये गुंतला आहे याचा फायदा त्याच्या वर्चस्वाखाली असणा–या उत्तरेकडील लहान लहान जहागिरदारांनीही घेतला होता. माळवा व बुदेलखडात त्यांनी बंडखोरी करून स्वतःला स्वतंत्र करून घेतले. यामध्ये भोपाळ, दतिया, चंदेर, नखर, खेचीवाडा यांचा समावेश होता. १७८२ पर्यंत या सर्व छोटया राजांचा महादजीने बंदोबस्त केला. ऑगस्टमध्ये महादजी शिंदे यांनी शत्रूच्या ताब्यात असणा–या सर्व गढया आपल्या ताब्यात घेऊन त्या शिवाजी विठ्ठल याच्या ताब्यात दिल्या.[४९]

बादशहाची मदतीकरीता महादजीस पत्रे :– मोगल बादशहा दरबारातील कटकारस्थानास कंटाळला होता. मोगल प्रदेशामध्ये घडून येणारी सततची बंडे व इतर सरदारांचे असहकार्य यामुळे बादशहा असहाय्य बनला होता.

[४६] गु.द., भाग.०५, पृ.३०, (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान, सीतामऊ, माळवा, म. प्र.), म.रि.उ.वि, भाग–२, पृ.५०–५२

[४७] म.शि.का., नं.१०८., मपइ., ले. १८२., पृ.१७९, १८०., म.इ., भाग.०३, पृ. ५७,५८

[४८] 'एक पाऊल हाती घेतल्याशिवाय दुसरे पाऊल टाकू नये अशी पध्दत सामन्यतः महादजीची होती.' – सरदेसाई, मरिउवि., भाग–२, पृ. ५४

[४९] गु.द., भाग.०४, पृ. ०७, १६, (अप्रकाशित पत्र, श्रीनटनागर शोध संस्थान, सीतामऊ, माळवा)., म.इ., पृ. ५७, ५८

याचवेळी महादजी शिंदे यांनी इंग्रजाबरोबर लढून यश मिळविले व नंतर त्यांच्याशी तह घडवून आणला. तसेच नंतर लगेच ग्वाल्हेर व गोहाद ही दोन महत्वाची स्थळे हस्तगत केली. त्यामुळे असहाय्य बादशहाचीसुध्दा खात्री झाली की, आता महादजीचा आश्रय घेतल्याशिवाय गत्यंतर नाही.[५०] यावेळी इंग्रजही महादजीस भिऊन होते. बादशहा आपल्या ताब्यात असल्याने महादजीस राग येवू नये म्हणून हेस्टिंग्जने धाकटया ॲंडरसनला महादजीस भेटण्याकरीता पाठविल्याचे दिसून येते.[५१]

बादशहाला मदतीकरीता दोन मार्ग होते एक म्हणजे इंग्रज की, जे सहजासहजी मदत करणार नाहीत व पुढे त्रासाचे होईल हे नक्की व दुसरे म्हणजे महादजी शिंदे होय. यापैकी बादशाहाने महादजीस पत्रे पाठविली व मदतीकरीता याचना केली. मोगल दरबारमध्ये असणारे मराठयांचे वकील गोविंदराव हिंगणे यांनी याबाबत अनेक पत्रे पाठव्न महादजीस अंतर्गत माहिती दिल्याचे दिसून येते. वकील गोविंदराव हिंगणे यांनी यावेळी महादजीस सल्ला दिला की, दिल्लीच्या दरबारामध्ये शिरकाव करण्याची ही एक महत्वपूर्ण संधी आहे तसेच माठया प्रमाणात संप्पती कोणत्याही प्रकारची लढाई न करता प्राप्त होईल. महादजी शिंदे पत्रे पाठवूनही दिल्ली प्रकरणाबाबत काहीही प्रतिसाद देत नाहीत हे लक्षात येताच गोविंदराव हिंगणे हे स्वतः ग्वाल्हेर येथे महादजीस भेटले व ख–या अर्थाने महादजीने दिल्लीचे प्रकरण हाती घेतलेल दिसून येते.[५२]

---

[५०] म.रि.उ.वि., भाग–२, पृ. ५४

[५१] म.शि.का., नं. ३३८, म.प.इ., ले.१८९, पृ. १८४,१८५.

[५२] गेविंदराव हिंगणे यावेळी महादजीस एकूण बावीस पत्रे पाटविली. 'विपुल द्रव्य हाती लागेल, विना लढाई काम होईल, अशी संधी पुन्हा येणार नाही.', मरिउवि., भाग–२, पृ. ६०.

बादशहाकडून महादजीस मानाच्या पदव्या बहाल :–

उत्तरेत दिल्ली दरबारामध्ये बराच मोठा गोंधळ निर्माण झाला होता. इ.स. १७८४ मध्ये शिंदे व बादशहा यांची आग्–यास भेट झाली यावेळी महादजीने काही मागण्या बादशहाच्या पुढे ठेवल्या त्या सर्व मागण्या बादशहाने मान्य केल्या व महादजीने बादशहाच्या मुलखाचा कारभार करावा असे ठरले. १ मे १७८५ मध्ये बादशहाने मोठा दरबार भरवून पेशव्यास व पेशव्याकडून महादजीस अनेक पदव्या व अधिकार बहाल केले.[५३] महादजी शिंदे यांनी सवाई माधवराव पेशव्यांना बादशहाकडून 'वकिल–ए–मुतालिक', 'अमीर–उल–उमरा', 'मुखत्यारूल– मलिक', 'मदारूल महाल', 'मसलत–लज्जत– उमेद आरा किनेखास', 'फातफार वफादार', 'शीर्द साकार सादत मंद', 'बजयादे बंफर्जंत', 'खासूल खास बालाजा', 'महाराजाधिराज', 'पंडीत प्रधान' अशा विविध पदव्या घेतल्या व पेशव्यांच्या तर्फे स्वःता धारण केल्या. पुढे महादजीने त्या २१ जून १७९२ रोजी मोठा दरबार भरवून पेशव्यांना सन्मानपूर्वक बहाल केल्या[५४]

महादजीचा आर्थिक संकटावरील उपाय :–

बादशहाचे कारभारीपद महादजीने हाती घेतल्यानंतर महादजीची जबाबदारी वाढली मात्र यावेळी त्यास अनेक आर्थिक अडचणीना तोंड दयावे लागल्याचे दिसून येते. उत्तरेतील अनेक स्वा–यामुळे महादजीवर ८० लाखाचे कर्ज झाले होते. त्याच्या स्वतःच्या सैन्याचा खर्च दरमहा ७ लाख रूपये होता तर बादशहाच्या सैन्याचा खर्च दरमहा ३ लाख रूपये होता. महादजीने या संकटातून बाहेर पडण्यासाठी मथुरा यथे टाकंसाळ सुरू केली व नानाशाही

---

[५३] म.रि.उ.वि.भाग–२, पृ. ९७.

[५४] म.आ.म., पृ. २२०, सि.ॲ.पॉ.डि.डा., नं.३२, ले.२९, पृ.२३६–२४३, २५३., न.म.शि.,पृ. २८–३९.

रूपया पाडला.[५५] तसेच महादजीने बादशहाचा कारभार पहात असताना आर्थिक टंचाईतून बाहेर येण्यासाठी काही जहागिरी जप्त केल्या, खंडण्या वसूल केल्या याचा परिणाम म्हणजे मुसलमान व रजपूत लोक महादजीवर नाराज झाले.[५६] रावत भीमसिंग, मानसिंग, गोविंदराव कृष्ण वगैरे सरदारांच्या मालमत्तेची महादजीने जप्ती करण्याबाबत आपल्या सरदारांना आदेश दिल्याचे दिसून येते.[५७]

महादजी व रजपूत संबधामध्ये बिघाड :–

रजपूत लोक म्हणजे धर्माने व जन्माने मराठयांचे जातभाईच होते.[५८] राणोजी शिंदे यांना मिनाबाई व चिमाबाई अशा दोन बायका होत्या त्यापैकी चिमाबाई ही रजपूत वंशाची होती. मिनाबाई हिस जयाजी, दत्ताजी आणि जोतिबा असे तीन पुत्र होते. चिमाबाई हिस महादजी व तुकोजी असे दोन पुत्र होते.[५९] एकूणच शिंदे व रजपूत यांचे रक्ताचे संबध असल्याचे दिसून येते. तरीही महादजी व रजपूत संबधामध्ये बिघाडले[६०] त्याची कारणे पुढोल प्रमाणे दिसून येतात :–

१) महादजीचा सरदार यशवंतराव वाबळे व त्याचा मुलाचा रजपूत राजा प्रतापसिंगाने खून घडवून आणला होता.[६१]

---

[५५] ''महादजीने लष्करात टाकसाळ घालून नानाशाही रूपये पाडला......'' म.इ.,भाग.०३, पृ. ६०–६१
[५६] अ.शि.घ.इ., पृ. २३.
[५७] गु.द., भाग.०३,पृ. ८८, दि.२६–०७–१७७४ रोजीचे पत्र, पृ. ११५, दि.०६–०४–१७७५ रोजीचे पत्र. (अप्रकाशित, श्रीनटनागर शोध संस्थान, सीतामऊ, माळवा, म.प्र.)
[५८] म.रि.म.वि., भाग–३, पृ. ६२
[५९] अ.शि.घ.इ., पृ. १२
[६०] सि.ॲ.पॉ.डि.डा., नं.३६,
[६१] म.शि.का., नं. ३५१, पृ.४७२

२) महादजीचे उत्तरेतील वाढणारे वर्चस्व प्रतापसिंगास अजिबात मानवणारे नव्हते. परिणामी महादजीस काहीही करून उत्तरेतून घालवून दयावयाचे यादृष्टिने प्रतापसिंग महादजी विरोधात कारवाया करत होता.[६२]

३) जयाप्पा शिंदे यांचा खून विजयसिंहाने घडवून आणला होता त्याचाही बदला महादजीस घ्यवयाचा होता.[६३]

४) महादजी शिंदे यांचे इंग्रजाबरोबर पहिले मराठा इंग्रज युध्द चालू होते त्यावेळी जयपूरचा राजा विजयसिंग याने इंग्रजाबरोबर संधान साधून आपले वर्चस्व स्थापन करण्याचा व महादजी पर्यायाने मराठयांची उत्तरेतील सत्ता संपवण्याचा प्रयत्न केला.[६४] एकूणच प्रतापसिंग याच्या कारकोर्दीतील राजकारण हे पूर्णतः खालच्या स्तरावर गेले होते.[६५]

मल्हारराव होळकर यांचा २० मे १७६६ रोजी मृत्यू झाला व उत्तरेकडील राजकारणाची सुत्रे महादजी शिंदे यांच्या हातामध्ये आली होती. २१ डिसेबंर १७६७ रोजी जयपूरचा राजा माधवसिंह हा मरण पावला त्याच्या काळात मराठे रजपूत संबध काहीसे सलोख्याचे होते. मात्र महादजी शिंदे यांच्याकडे उत्तरेतील राजकारणाची सुत्रे आल्यानंतर मराठा रजपूत संबधामध्ये बिघाड निर्माण झाल्याचे दिसून येते.[६६] सन १७८४ च्या उन्हाळयात महादजी गोहाद प्रकरणांतून मोकळा झाला. गोहाद प्रकरणातून मोकळे झाल्यानंतर महादजीने दिल्लीचे प्रकरण हाती घेतले. पण हाती पैसा

[६२] शि.रा., खंड.०१, पृ.१२६, म.इ.सा., खंड.०१, पृ.१५

[६३] म.रि.म.वि.,भाग – ३, पृ.५०

[६४] परिहार जी.आर. (डॉ)., *मारवार ॲन्ड मराठाज,* पृ.२८०

[६५] फॉ.ऑ.दमु.ए., खड.०३,पृ.२३१

[६६] म.इ., खंड, ०३, पृ.१२३

नसल्यामुळे त्यांनी रजपूताच्या प्रकरणात हात घातला व तोच पुढे जाचक झाल्याचे दिसून येते.[६७] पैसा मिळवण्यासाठी महादजीने आपले लक्ष रजपूत राजांकडे वळविले.[६८] रजपूतांवर मराठयांचा दुहेरी हक्क होता. एकतर पूर्वी पेशव्यांच्यावतीने शिंदे होळकरांनी उदेपूर, जोधपूर व जयपूर वेगैरे संस्थानावर पूर्वीच स्वाऱ्या करून चौथाईचा हक्क स्थापन केला होता आणि दुसरा बादशहाचे वजीर पद हाती आल्यामुळे जी खंडणी बादशहास मिळावयाची होती ती ही महादजीने मागण्यास सुरूवात केली.[६९] अशाप्रकारे दोघांच्यावतीने महादजीने रजपूताकडे खंडणी मागितली व ती जास्त असल्याने रजपूतांनी विरोध दर्शविल्याचे दिसून येत.

माचेडीचा (अलवार) प्रतापसिंग व महादजी :–

जोधपूरच्या विजयसिंगाने त्याचे जयपूर बराबर असणारे संबध वाढविले होते. विजयसिंगाने यावेळी १७७४ मध्ये पृथ्वीसिंगास माचेडीच्या प्रतापसिंगाच्या (अलवार) विरोधात मदत केली होती ही मदत करण्याचे कारण म्हणजे पृथ्वीसिंग यांने मराठयांच्या विरोधात विजयसिंगास सहाय्य करण्याचे मान्य केले होते.[७०] मात्र १६ एप्रिल १७७८ रोजी पृथ्वीसिंग मरण पावला.[७१] पृथ्वीसिंगाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र लहान सहा महिन्याचा असल्याने त्याचा भाऊ प्रतापसिंग जयपूरचा कारभार पाहू लागला. मात्र तो उधळया स्वभावाचा होता.[७२] जयपूरमध्ये माचेडीचा (अलवार) प्रतापसिंगास आपले वर्चस्व वाढवावयाचे होते. माचेडीच्या प्रतापसिंहाचे व महादजीचे मैत्रीचे संबध होते.

[६७] गु.द., भाग.०३, पृ. १४२, १४४, १५८, (अप्रकाशित पत्रे, श्रीनटनागर शोध संस्थान, सीतामऊ), म.रि.उ.वि., भाग.०२, पृ. ६६.

[६८] म.इ.,, पृ. १२३

[६९] अ.म.मा.शि.च.का., पृ. १९९

[७०] कॅ ऑ.प.क., खंड. ०४, पृ. १२७७

[७१] म.शि.का., नं. ३८१, पृ. ४११

[७२] म.शि.का., नं. ४७०, पृ. ६४८, म.इ., पृ.६१

परिणामी त्याने जयप्रच्या राज्यात आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे म्हणून महादजीस जयपूरमध्ये लक्ष घालण्याबाबत सांगितले. खुशालीराम बोहरा यास याबाबतीत महादजी बरोबर बोलणे करण्यास पाठविण्यात आले.(जुलै १७८४)[७३] पुढे मे १७८५ मध्ये माचेडीचा राजा महादजीस मिळाला व त्याने महादजीस सांगितले की, जयपूरचा प्रतापसिंग राज्यकारभार करण्यास लायक नाही व तो राज्यकारभार योग्य प्रकारे करत नाही. तसेच राज्यकारभारामध्ये त्यास विशेष अधिकारही नाहीत तेंव्हा पृथ्वीसिंगाच्या मलास जयपूरच्या राज्यावर बसवावे.[७४] यावेळी महादजी शिंदे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब होती त्यामुळे महादजीने आर्थिक दृष्टिकोनातून जयपूरच्या विरोधात आपले धोरण राबविले.[७५]

जयपूरकर व महादजी संघर्ष :–

जोधपूर व जयपूरकर हे संघटीतरित्या महादजीस विरोध करण्याच्या दृष्टिने वाटचाल करत होते. १७८५ मध्ये जोधपूर व जयपूर यांचे संबध आणखीनच दृढ झाले याचे कारण म्हणजे विजयसिंगाने जयपूरच्या प्रतापसिंगास आपली मुलगी देवून (ऑगस्ट १७८५) वैवाहिक संबध पस्थापित केले.[७६]

---

[७३] म.रि.उ.वि., भाग–२, पृ.६६

[७४] मे १७८५ मध्ये माचेडीचा रावराजा महादजीस मिळाला व त्याने महादजीस सांगितले की, जयपूरास प्रतापसिंग राज्य करितो त्याचा राज्यावर बिलकुल हक्क नाही. तो वर्तनीने शुध्द नसून जातीने स्त्री वेष घेवून .... आहे. खरा हक्कदार पृथ्वीसिंगाचा मुलगा मानसिंग हा असून तो कृष्णगडी राहतो. त्यास आणून राज्यावर बसवावे आपणास याबद्दल मी पन्नास लाख रूपये देववितो. म.शि.का., नं.३८१,पृ.५३७, नं.४११,पृ.५८१, नं.४३२, पृ.६१०, नं.४३९,पृ.६१७, नं.४७०,पृ.६४८, नं.४७६,पृ.६५२)

[७५] म.शि.का., नं.४३२, पृ.६१०

[७६] म.शि.का., पृ. ४११, पृ.५८१.

दरम्यानच्या कालावधीमध्ये महादजीने दिल्लीच्या उत्तरेकडील प्रदेशाचा बंदोबस्त करण्यासाठो मोहिम हाती घेतली होती, याकरिता त्याने शिखांचा सरदार मोहरसिंग मार्फत दिल्लीच्या उत्तरेकडील प्रातांचा बंदोबस्त करण्यास सुरूवात केली. शीख, रजपूत, रोहिले वगैरे सर्वांचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टिने महादजीने हालचाल चालू केली. व जयपूरचे प्रकरण केवळ द्रव्यलालसेने हाती घेतले आणि तेच अंतीमतः महादजीच्या अंगावर आलेले दिसून येते.[७७] महादजीने प्रतापसिंगाकडून मोठया प्रमाणात खंडणीची मागणी केली सहाजिकच महादजीने जयपूरकरांची नाराजी ओढावून घेतली. जयपुरने बादशहाचे माडलिकत्व स्विकारले होते. तसेच जयसिंगाच्या काळापासून मराठेही जयपूराकडून चौथाई गोळा करत होते. महादजीने जयपूरच्या राजास आपले आर्थिक संकट सावरण्यासाठी खंडणीसाठी तगादा लावला.

महादजीचे जयपूरवर आक्रमण व तहः–

महादजीने यावेळी जयपूरकराकडे खंडणी गोळा करण्यासाठी रायाजी पाटील यास पाठवून दिले. रायाजी पाटील याने जयपूरच्या प्रतापसिंगाकडे खंडणी मागितली व खंडणी न दिल्यास प्रतापसिंहास पदच्युत करण्याची धमकी दिलो. मात्र यावेळी प्रतापसिहांने महादजीबरोबर युध्द करण्याची तयारी दर्शवली व रायाजी पाटील याचा पराभव केला.[७८] रायाजी पाटील याचा पराभव झाला आहे असे कळताच महादजी १७८६ ला बादशहाच्या सैन्यासह जयपुरात दाखल झाला.[७९] सन. १७८६ मध्ये महादजीने जयपूरवर आपली मोहिम चालू केली व जयपूरच्या राजास २१ लाख रूपये खंडणी देण्याबाबत

---

[७७] म.रि.उ.वि., भाग–२, पृ.६६

[७८] अ.शि.घ.इ., पृ. २३

[७९] न्यू.हि.ऑ.म., खंड.०३, पृ.१५०.

सांगितले. मात्र खंडणी देण्यास प्रतापसिंहाने नकार दिला.[८०] त्यावेळी महादजीने जयपूरवर आक्रमण केले.

महादजी व बादशहाचे सैन्य तसेच महादजीचा आक्रमक पवित्रा पाहून प्रतापसिंहाने ६३ लाख रूपये देण्याचे कबूल केले. मात्र कबूल केलेली रक्कम महादजीस देण्यास प्रतापसिंह विलंब लावू लागला व महादजीचा प्रतिकार करण्याकरिता जोधपूरच्या विजयसिंहाची त्याने मदत घेतली. तसेच इंग्रजांचीही मदत मिळवण्याचा प्रयत्न चालविला. मात्र कॉर्नव्हालिसने उत्तरेतील अंतर्गत बाबीत हस्तक्षेप करण्याचे टाळले. जयपूर व जोधपूर हे दोन सत्ताधिस मराठयांच्या विरोधात जरी एकत्र आले असले तरी त्यांची महादजीचा प्रतिकार करण्याइतपत सैन्याची व्यवस्था अथवा तयारी झाली नव्हती. प्रतापसिंह खंडणी देत नाही हे ओळखून महादजीने जयपूरवर आक्रमण केले. महादजीच्या सैन्यपुढे आपला टिकाव लागणार नाही ओळखून प्रतापसिंगाने माचेडीच्या राजाच्या तर्फेने युध्द थांबविण्याबाबत व तहाबाबत बोलणी चालवली व उभयंतामध्ये एप्रिल १७८६ मध्ये पुढीलप्रमाणे तह झाला –

१) महादजीस जयपूरकर ६३ लाख रूपये खंडणी देणे होते तो त्यांनी देण्याचे कबूल केले.

२) ६३ लाख रूपये खंडणी पैकी पहिला हप्ता रूपये ११ लाख रूपये त्यांनी शिंदयाना रोख दयावा.

३) १० लाख रूपये सहा महिन्यात दयावेत.

४) महादजीने २२ लाख रूपये जयपूरमधील ठाकूरांच्या कडून वसूल करावेत.[८१] खंडणी वसूल करून शिंदे ४ जून १७८६ रोजी जयपूरमधून बाहेर

---

[८०] म.शि.का., पृ. ४०६, दि.य.म.रा., खंड. ०१, पृ. १३३.

पडले.[८२] यावेळी महादजीने जोधपूरकरावर जयाप्पा शिंदे यांचा खून केला होता म्हणून त्यांच्यावर वार्षीक ३ लाख रूपये इतकी खंडणी (कर) बसविला.[८३] महादजी शिंदे यांनी युध्दामध्ये जरी विजय मिळवला असला तरी जोधपूरकर व जयपूरकर यांनी महादजीच्या विरोधात कारवाया व कारस्थाने करणे थांबविले नव्हते.

लालसोटची लढाई :– जुलै १७८९

महादजी शिंदे जयपूरमधून पुढिल मोहिमेवर गेल्या बरोबर जोधपूरच्या विजयसिंगाने महादजीच्या विरोधात इतर सत्ताधिशांना एकत्र करण्यास सुरूवात केली व एक संघ निर्माण केला. त्यामध्ये जयपूरकरांनाही त्यांने सामील होण्यास सांगितले.[८४] रजपूतांनी महादजी विरोधात संघ निर्माण केला या संघाचे नेतृत्व विजयसिंगाकडे होते. मे १७८७ मध्ये जयपूरकर संघामध्ये येवून मिळाले.[८५] विजयसिंगानेही जयपूरच्या सैन्यास मिळण्यासाठी जोधपूर सोडले.[८६] जालीमसिंग १५ हजार घोडदळ घेवून येवून मिळाला.[८७]

विजयसिंगाने युध्दाची तयारी चालविल्यानंतर महादजी शिंदे यांनी आबुंजी इंगळे व खंडेराव या सरदारांना बोलावून घेतले.[८८] याच बरोबर महादजी शिंदे यांनी मराठा मंडळातील इतर सरदारांनाही एकत्र बोलावण्यास

---

[८१] म.शि.का., नं. ४७६, प.६५२, शि.रा., खंड.०२, नं.२५४, पृ.१८३
[८२] फॉ.ऑ.मु.ए., खंड.०३, पृ. २४५, म.द.बा., खंड. पृ. ११४
[८३] या करास 'मुंडकटी कर' असेही संबोधले जाते. म.शि.का., नं. ३५१, पृ. ४७१
[८४] पु.रे.क., भाग.१ पृ.५१, ७१, ८२, ११९
[८५] कित्ता, पृ. १०३,१०४
[८६] कित्ता, पृ. ११४
[८७] म.द.बा., खंड.०२, पृ. १४९
[८८] पु.रे.क., भाग. १ पृ. १२२, १२४

सुरूवात केली.[८९] खंडेराव २६ जानेवारी[९०] रोजी व आंबोजी इंगळे जुलै मध्ये महादजी शिंदेस येवून मिळाले.[९१]

महादजी शिंदे यांच्या १७८७ मधील या मोहिमेमध्ये बादशहाच्या लष्करातील सेनापती महंमद बेग आबदानी व इस्त्रायल बेग हे दोन सरदार तसेच इतर फौजही मराठयांच्या बरोबर होती. मात्र युध्दाच्यावेळी महादजी बरोबर असलेले महंमद बेग आबदानी व इस्त्रायल बेग हे दोन सरदार रजपूतांना जावून मिळाले. हे दोघे रजपूतांना जावून मिळाल्यामुळे मोठया प्रमाणात राजकीय बदल होणार असे संकेत महादजीस जाणवू लागले.[९२] विजयसिंगाने महादजीबरोबर असणा–या मुगल सैन्यातील मुहम्मद बेग हमदानी याच्या बरोबर संधान साधले होत. प्रत्यक्षात लढाईच्यावेळी महम्मद बग तटस्थ राहिला व तो रजपूतांना जावून मिळाला[९३] २५ मे रोजी हमदानी व भीमसिंग हे जयपूरकरास जावून मिळाले.[९४] भीमसिंग आपल्याबरोबर असलेले अनेक अधिकारी व मोठे सैन्य घेवून विजयसिंगास मिळाला.[९५] एकूण विजयसिंगाने ४० हजार सैन्य जमा केले.[९६]

अशा संकटाच्या प्रसंगी महादजीने जाठ लोकास दीग व इतर काही महाल देवून स्नेह निमाण केला धेर्याने या प्रसंगास तोंड दिले.[९७] यावेळी झबेताखान रोहिलाचा मुलगा गुलाम कादर हा इस्त्रायल बेग यास सहाय्य

---

[८९] कित्ता, पृ. ११८,११९

[९०] कित्ता, पृ. १२४

[९१] कित्ता, पृ. १२७

[९२] गु.द., नं. ०७, पृ. ८६ (अप्रकाशित पत्र, श्रीनटनागर शोध संस्थान, सीतामाऊ, माळवा)

[९३] गु.द. नं. ०७, पृ. ८७ (––––––––––||––––––––––)
पु.रे.क., १ पृ. ११४

[९४] पु.रे.क., १ पृ. ११५, कॅ.ऑ.प.क., खंड, ०७, पृ. १४४२

[९५] दि.ये.म.रा., खंड.०१, पृ. २२०,२२१

[९६] म.शि.का., पृ. ५००

[९७] अ.शि.घ.इ., पृ.२४

करण्यासाठी येत आहे हे कळताच महादजी तात्काळ ग्वाल्हेरास गेला. याप्रसंगात महादजीस ही भिती होती की जर मोगल, इंग्रज व रजपूत एकत्र झाले तर मराठयांच्या उत्तरेतील सत्तेस मोठा धोका आहे. याकरीता त्यांनी पेशव्यांची मदत व कुमक मिळावी म्हणून पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते.[९८]

जुलै मध्ये राठोड, कच्छवास व हमदानी यांनी आपणास महादजी शिंदे कडून काय मिळवावयाचे आहे याबाबत विचार विनिमय केला व त्यानुसार आपले धोरण ठरवले.[९९] राजस्थानमध्ये एकूण पाच महाल होते पैकी उज्जैन येथे महादजी शिंदे यांनी आपले प्रमुख ठाणे वसविले होते.[१००] विजयसिगांने यावेळी हे पाचही महाल महादजी शिंदयाच्या वर्चस्वातून मुक्त करण्याबाबत घोषणा केली. याचवेळी कर्नल हार्पर याने जयपूरच्या राजास १० जुलै रोजी अशी विनंती केली की, त्यांनी गव्हर्नर कौन्सिलला विनंती करावी म्हणजे राजा हिमंत बहाद्दर मराठयांच्यावर यमुनाकडील बाजूकडून आक्रमण करेल[१०१]

---

[९८] ''आपणास कळावे की मी अगदी निराश होऊन हात टेकीत आलो आहे असे नाही, ... माझ्या मनात काही मत्सर नाही. आपल्या मनात काही किंतू असल्यास सोडून द्यावा. होळकर, हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या विचाराबाहेर मी कधीही वागत नसून, माझे यत्न मराठी राज्याचा उत्कर्ष होण्यासाठी नेहमी असतात, ... आपला धनी एक त्याचे हित करण्यासाठी सर्वानी झटावे. आपले मनात मजविषयी काही संशय असल्यास आपण आपले मनात असा विचार करावा की, मोरोबा फडणीस व सखाराम बापू यांशी जेंव्हा तुमचे वैर होते, तेंव्हा तुमचा बचाव कोणी केला. तोतया सदाशिव भाऊ त्यांचा दंगा कोणी मोडिला, व इंग्लिशांस तळेगाव मुक्कामी कोणी ठोकले, व त्यांच्या कडून तह कोणी करून घेतला. त्या सर्व गोष्टिचा विचार करून मनांत काही शंका न धरता, आपले धन्याचें राज्य सरंक्षणास मदत करावी.'' अ.शि.घ.इ., पृ.२५, २६.

[९९] पु.रे.क., १ पृ. १२५

[१००] म.शि.का., पृ. ५०२

[१०१] पु.रे.क., खंड.०७, पृ. १४४२, १५५६

प्रत्यक्ष लढाई व महादजीची माघार :–

महादजी व रजपूत यांच्यामध्ये प्रत्यक्ष लढाईला सुरूवात तुंगा येथे २८ जुलै १७८७ रोजी झाली.[१०२] लढाईची व्याप्ती खूपच वाढली, मोठी लढाई झाली या लढाईमध्ये राणेखानभाई तसेच इतर महादजीच्या सरदारांचे मोठया प्रमाणात सैन्य मारले गेले. मोठया प्रमाणात मराठयांचे नुकसान झाल.[१०३] संध्याकाळी आठ वाजेपर्यंत युध्द चालू होते. या दिवसभरामध्ये झालेल्या युध्दामध्ये रजपूतांनी शौर्य गाजवले व महादजीच्या फौजेस मागे सारण्यात ते यशस्वी झाले.[१०४] यावेळी राठोडानी अजमेर, जालोर व नागोर इ. किल्ले हस्तगत करण्याकरीता आक्रमण केले. मात्र महादजी शिंदे यांची अत्यंत नाजूक परिस्थिती झाल्यामुळे ते त्या किल्ल्याच्या रक्षणासाठी जावू शकले नाहीत[१०५] परिणामी राठोडांनी सदरचे किल्ले आपल्या ताब्यात घेतले.

उत्तरेकडील या लालसोटच्या लढाईत महादजीस माघार घ्यावी लागली परिणामी या लढाईने महादजीच्या प्रतिष्ठेस फार मोठा तडा गेला आणि काही काळ त्यांना वनवास भोगावा लागला. माचेडीच्या रावराजाने यावेळी महादजीस अलवार येथे तीन महिने निवारा दिला.[१०६] महादजीचे लष्करी सामर्थ्य कमी झाल्याने महादजीचे शत्रू मराठयांचे वर्चस्व झुगारून देवून स्वतंत्र होवू लागले होते. याचवेळी महादजीस उत्तरेतून पुर्णतः घालवून देण्याच्या दृष्टिने विजयसिंग प्रयत्न करू लागला. होळकरांना महादजीच्या विरोधात उभे करण्याचा प्रयत्नही यावेळी विजयसिंगाने केला मात्र होळकरांनी

---

[१०२] पु.रे.क., १ पृ. १३५–१३७, म.शि.का., पृ. ५०३
[१०३] म.शि.का., पृ. ५००
[१०४] पु.रे.क., १ पृ.१३७, १५५,
[१०५] कित्ता, १ पृ. १७५
[१०६] म.इ., पृ. ६४

पशव्यांच्या आदेशाविरोधामध्ये न जाता विजयसिंगास सहाय्य करण्यास नकार दिल्याचे दिसून येते.[१०७]

रजपूतांनी लढाईमध्ये विजय मिळविल्यानंतर महादजी फारच अडचणीमध्ये आला होता. बादशहाची ०९ महिण्याची बाकी यावयाची तटली होती, सावकाराची देणी तटली होती. उत्तरेमध्ये बादशहा व महादजी तसेच पेशवा व महादजी यांचे संबध ठिक नाहीत असा समज निर्माण झाला होता. परिणामी महादजीचे वर्चस्व कमी झाले होते. सदरचा गैरसमज निघूण जाण्यासाठी तसेच मराठयांचे परत उत्तरेमध्ये वर्चस्व निर्माण करण्यासाठी महादजी शिंदे यांनी तात्काळ मदत पाठविण्याबाबत नानास अनेक पत्रे पाठविल्याचे दिसून येते.[१०८]

गुलामकादीरने महादजीस हुसकावून लावण्यासाठी काबूलच्या तैमुरशहासही निमंत्रण पाठविले होते. तैमुरशहा हा अहमदशहा अब्दालीचा पुत्र होय. १७८७ मध्ये तो पेशावर येथे आला आणि अटक पार करून तो पंजाबात उतरण्यासाठी सिध्द होता. मारवाडच्या विजयसिंहानेही आपला दूत त्याच्याकडे पाठविला होता मात्र त्याच्या स्वगृहीच अनेक संकटे उद्‌भवल्यामळे तो दिल्लीस न येता माघारी फिरला.[१०९]

दिल्ली गुलामकादीरकडे :–

लालसोट येथे महादजीच्या सैन्याची मोठया प्रमाणात हानी झाल्यामुळे दरबारामध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला. इस्माईल बेग, झबेताखान, गुलामकादर व रजपूत राजे यांनी एकाच वेळी महादजीच्या विरोधात आघाडी

---

[१०७] म.शि.का., पृ ५४३–५४६, म.द.बा., खंड.०२, पृ. १७१

[१०८] म.प.इ., ले. १९१, पृ. १८६, १८७, म.शि.का., नं. ५०१, दि.१८ ऑगस्ट, १७८७

[१०९] म.इ., पृ.६४

उघडली व त्यांनी मराठयांची सत्ता हिदुंस्थानातून नामशेष करण्याचा निर्धार केला. मात्र रजपूतांचा जोर मात्र कायम राहिला नाही. झबेताखानाचा मत्यू झाला व त्याचा मुलगा गुलामकादीर याने युध्द चालू ठेवले. गुलाम कादीर दिल्लीवर चालून गेला यावेळी बादशहाने आपले सैन्य व नजीबकुलीखान याचे सैन्य एकत्र करून प्रतीकार करण्याचा प्रयत्न केला. सदरची लढाई १७ नोव्हेबंर १७८७ रोजी घडून आली. या लढाईमध्ये बादशहाचा पराभव झाला व गुलामकादीरने दिल्ली काबीज केली. यावेळी बादशहाने गुलामकादीर यास 'अमीर उल–उमार' हा किताब दिला. यामुळे गुलामकादीर मराठयांची सत्ता संपवून टाकू अशी वल्गला करू लागला.[११०]

दिल्ली शहराची नाकेबंदी इस्माईलबेगच्या हाती होती त्यास गुलामकादीरने ५ लाख रूपये देवून दिल्लीतील धनाढय व्यापारी व श्रीमंताना लुटले. गुलामकादीर आणि इस्माईल बेग यांनी बादशहा शहाआलमकडून पैसा उकळण्यास प्रारंभ केला. ३१ जुलै १७८८ रोजी त्यांनी बादशहास पदच्युत करून बिदरबख्तला गादीवर बसविले. १० ऑगस्ट रोजो बादशहाचे डोळे काढले व राजघराण्यातील व्यक्तींचा अतोनात छळ करण्यात आला.[१११] शहाआलमच्या खजिन्यामध्ये अथवा राजवाडयामध्ये गुप्तधन मिळेल या आशेवर त्याने आपल्या पठाणी सैन्यकडून दिल्लीतील जनतेवर अत्याचार करण्यास सुरूवात केली. राजवाडयातील गुप्त धनाच्या किल्या अंध बादशहाजवळ आहेत या अफवेने त्यांने बादशहाचा छळ करण्यास सुरूवात केली. नाझीरच्या प्रयत्नातून बादशहाची छळातून थोडीफार सुटका झाली

---

[११०] न.म.शि., पृ. ३०–३१

[१११] म.इ., पृ.६६

यावेळी बादशहा व त्याचे कुटूंब तीन दिवस उपाशी होते.[११२] छळ असाहय झाल्यावर बादशहाने महादजीस मदतीसाठी पत्र पाठविले.[११३]

जून १७८७ पर्यंत महादजी परत पूर्वपदावर आला.[११४] मराठी सैन्यामध्ये शिंदे, होळकर व अलीबहाद्दर यांच्या परस्पर आपसातील वैरामुळे गुलामकादीरचा पुढे एक वर्षे पुर्णतः बंदोबस्त करता आला नाही. याचा परिणाम म्हणजे गुलामकादीरने मोगलांची जी सत्ता शिल्लक राहीली होती ती नामशेष करण्याच्या उदयोग चालू केला.[११५]

पेशव्यांची महादजीस व महादजीची बादशहास मदतः–

इ.स. १७८७ मध्ये नाना फडणविसांनी पाठविलेली मदत महादजीस मिळाली.[११६] यावेळी महादजीने आग्–याचा बचाव करण्यासाठी धोलपूर येथे चंबळा नदी पार करून गुलामकादीर व इस्माईलबेगवर आक्रमण केले. २७ जून १७८८ रोजी महादजीने इस्माईलबेगकडून आग्रा काबीज केले.[११७] यानंतर ऑगस्ट १४ ला मराठी सैन्य दिल्ली जवळ दिसू लागले. ७ सप्टेबंर रोजी गुलामकादीरने मराठयांच्या विरोधात इस्माईलबेगची मदत मिळवण्याचा प्रयत्न केला ती त्यास मिळाली नाही. अशा परिस्थितीमध्ये ११ ऑक्टोबर १७८८ रोजी दिल्लीतील दारूकोठाराला आग लावून गुलामकादीर लुट घेवून यमुना नदी पार करून दिल्लीतून बाहेर पडला. राणाखानने दिल्लीचा किल्ला ताब्यात घेवून आग विजवली व शहाआलम व इतर मंडळीना मुक्त केल.[११८]

---

[११२] रू.ऑ.इं.मा.प., पृ. १३५
[११३] न.म.शि., पृ. ३४
[११४] म.इ., पृ. ६५
[११५] रू.ऑ.इं.मा.प., पृ. १३५
[११६] दि.य.म.रा., खंड.०१, पृ.२८१
[११७] म.इ., पृ. ६४
[११८] न.म.शि., पृ. ३४

१६ ऑक्टोबर १७८८ रोजी अंध बादशहा शहाआलम यास महादजीने परत गादीवर बसवले.[११९] अशाप्रकारे महादजीने पुन्हा उत्तरेतील परस्थिती नियत्रंणात आणली. याचवेळी बादशहाने फरमान काढून मोगल सत्तमध्ये गोवध बंदी जाहीर केली तसेच मथुरा व वृंदावन ही दोन पवित्र धार्मिक स्थळे मराठयांना दिली.[१२०]

मराठा सैन्यापासून आपला बचाव करण्यासाठी गुलामकादीरने मथुरेस पळ काढला त्यावेळी मराठा सैन्य त्याचा पाठलाग करत गेले. मथुरेच्या किल्ल्यात थांबून त्यांने शिंदयास तोंड देण्याचा विचार केला मात्र किल्ला मजबूत नव्हता, दाणा पाण्याची गैरसोय होईल व मराठयांचा वेढाही कडक होता या सर्व बाबींचा विचार करून त्यांने मराठयांच्या बरोबर तहाचे बोलणे चालू केले. महादजीने मात्र तहाच्या बोलण्याकड दुर्लक्ष करून तोफांचा मारा चालच ठेवला. शेवटी निवडक लोकाना बरोबर घेवून गुलामकादीर मौल्यवान लूट घेवून रातोरात बाहेर पडला. मात्र शेतक–यांना तो सापडला व त्यांनी राणाखानाकडे त्यास आणले. गुलामकादीरास मोठया बंदोबस्तात महादजी शिंदेकडे न्यावयाचे चालले होते मात्र त्यांने सैन्याबरोबर दंगामस्ती केली परिणामी सैन्याने त्याचे हालहाल करून डोळे काढले व ०३ मार्च १७८९ रोजी फासी दिले. महादजीने परत एकदा अंध बादशहास आणून गादीवर बसवले व दिल्ली दरबाराची सुत्रे त्याच्या हातात दिली हे सर्व महादजीमुळे घडून आले.[१२१]

जुलै १७८९ मध्ये होळकरांच्या मदतीने विजयसिंगाने महादजीबरोबर बोलणी करण्याचा प्रयत्न केला परंतु महादजी बोलणी अथवा तह करण्याच्या

---

[११९] म.शि.का., नं. ५३३, पृ. ७४२, म.इ., पृ.६६.
[१२०] द म., पृ.१२७
[१२१] न.म.शि., पृ. ३५

मनस्थितीमध्ये अजिबात नव्हता.[१२२] विजयसिंगाने अफगाणिस्तानच्या तैमुरशहास बोलावणे पाठविले आहे ही गोष्ट शीखांनाही पटली नाही त्यांनीही विजयसिंगाच्या विरोधात आपले धोरण राबविण्यास सुरूवात केली.[१२३] ब्रिटिश यावेळी टिपू बरोबरच्या युध्दामध्ये व्यस्त होते त्यांनीही विजयसिंगास मदत करण्याबाबत असमर्थता दर्शविली.[१२४]

अलीबहाद्दर कर्नाटक मोहिमेवरून आल्यानंतर उत्तरेमध्ये १७८९ रोजी जाण्यास निघाले तेंव्हा त्यांनी प्रत्यक्षात महादजीच्या जवळ जाण्यास वेळ लावला मात्र नानांने व हरीपंत फडके यांनी याबाबत अलिबहाद्दर यास समज दिल्यानंतर अलीबहाद्दरने उत्तरेकडे प्रयाण केले व ब–हाणपूरपर्यंत पोहचले.[१२५] होळकरांना मिळवून घेवून अलीबहाद्दरने महादजीच्या मदतीस जावे व तद्नंतर त्यांनी रजपूतांचा बंदोबस्त करावा व तो झाल्यानंतर त्यांनी आग्रा येथे यावे असे नानांनी सांगितले होते. मात्र आपण तात्काळ महादजीकडे गेल्यास आपणास महादजीच्या हाताखाली काम करावे लागेल असे वाटून अलीबहाद्दरने रजपुत्यानातच राहून वेळ घालवू लागला. महादजीच्या मदतीस अलीबहाद्दरने हाळकरांना घेवून जावे. माळव्यातील दंग्याचा बिमोड झाला असल्याने इतक्या मोठया सैन्यानिशी अलीबहाद्दरने तेथे थांबणे इष्ट होणार नाही असे नानास वाटत होते. मात्र अलिबहाद्दर यास होळकरांस दुखावणे शक्य नव्हते त्यामुळे ते होळकराकडे गेले व तेथेच ते ४।५ महिने अडकून पडले.[१२६]

---

[१२२] हो.इ.सा., खंड.०१, पृ.२३६
[१२३] कॅ.ऑ.फ.क., खंड. ०८, पृ. १५४८
[१२४] कित्ता, खंड. ०९, पृ.२०७
[१२५] भा.इ.स.मं., अंक १ ते ४, वर्ष १९२३–२४, पृ. २२
[१२६] भा.इ.सं.म., वर्ष. १९२३–२४, पृ. २३–२४

नाना व अलीबहाद्‌दर यांचा बराचसा पत्रव्यवहार झाला यावेळी नाना रागास गेल्याचे पाहून शेवटी अलीबहाद्‌दर उदयपुराहून मथुरेस शिंदयाच्या लष्करास जावून मिळाले. या कामी मदत करण्यास शिदंयाचा सरदार आंबोजी इंगळे उदयपुरास आला होता. यामुळे तुकोजी होळकराचे न ऐकता अलिबहाद्‌दरास आपले सैन्य घेवून मथूरेस जाण्याचे धैर्य झाले. अलिबहाद्‌दरास जो उशीर झाला याबाबत महादजीने नानावर त्याचे खापर फोडलेले दिसून येते. नानांनी याचे निरसन करण्याचा पयत्नही केलेला दिसून येतो.[१२७]

नानान महादजीच्या मदतीसाठी अलिबहाद्‌दर व तुकोजी होळकर यांना पाठविले यापैकी अलिबहाद्‌दर ६ नोव्हेंबर १७८८ रोजी मथुरेस आला तर एप्रिल १७८९ रोजी तुकोजी होळकर महादजीस येवून मिळाला. महादजीस या सरदारांची मदत मिळण्याऐवजी त्रासच झाल्याचे दिसून येते[१२८] महादजो शिंदे यांनी आपली परिस्थिती सावरण्यास सुरूवात केली याकामी त्यांना राणेखानभाई व फ्रेंच अधिकारी डि–बॉय यांनी महत्वाचे सहकार्य केल्याचे दिसून येते.[१२९]

पाटणची लढाईः–

मे १७९० मध्ये महादजी शिंदे यांनी निर्णय घेतला की, मारवार व अजमेर हे विजयसिंगाकडून जिंकून घेवून तेथे परत आपले वर्चस्व प्रस्थापित करावयाचे.[१३०] याचवेळी १७९० मध्ये इस्माईलबेग याने महादजीच्या विरोधामध्ये

---

[१२७] भा.इ.सं.म., वर्ष. १९२३–२४,, पृ. २५

[१२८] म.इ., पृ. ६४

[१२९] पु.रे.क., १ पृ.२५७, म.शि.का., ५६७

[१३०] पु.अ., खंड.०३, पृ. १२२–१२३, चं.द., खंड.०२, पृ. ७६

पुन्हा बंड उभारले होते.[१३१] महादजी शिंदे यांचे या मोहिमेच्यावेळी जीवाजी बल्लाळ, डि–बॉय यांच्या नेतृत्वाखाली सैन्य रवारी पाटण येथे होते. विरोधात राठोड, मोगल सैन्य गंगाराम भंडारी व इस्माईल बेग यांच्या नेतृत्वाखाली होते. २० जुन १७९० रोजी लढाई झाली राठोडांनी पराक्रमाची शर्थ केली मात्र डि–बॉयच्या कवायती सैन्यापुढे त्यांचे काही चालले नाही ३ हजार राठोड या युध्दामध्ये मारले गेले.[१३२] युध्दामध्ये मराठयांचे वर्चस्व पुर्णतः सिध्द झाले असे असले तरी या युध्दामध्ये राठोड पळून जाण्यामध्ये यशस्वी झाले. या युध्दामध्ये मराठयांना १०० तोफा, बंदका, चौदा–पंधरा हत्ती व इतर अनेक साहित्य मिळाले.[१३३]

मेडत्याची लढाई :–

पाटणच्या संग्रामामध्ये यश प्राप्त झाल्यानंतर महादजीने अजमेर किल्ला ताब्यात घेण्याच्या दृष्टिने हालचाल चालू केल्याचे दिसून येते. जीवाजी बल्लाळ, गोपाळभाऊ, डि–बॉय यांच्या नेतृत्वाखाली मराठयांचे सैन्य सांभार, परबतसर, रूपनगर घेत अजमेर येथे पोहचल.[१३४] यावेळी तुकोजी होळकर व अलीबहाद्दर हे महादजीस एकत्र विजयसिंगाचा पाडाव करू मात्र मिळणा–या प्रदेशातील आपणास समान वाटा हवा असे म्हणू लागले.[१३५]

मेडता येथे राठोड इस्माईल बेग व जयपूरचे सैन्य येईल या आशेने थांबले होते. गोपाळभाऊ व डि–बॉय यांनी अजमेर किल्ला सर केला. ४ सप्टेबंर रोजी गोपाळभाऊ हे अजमेर येथे होते तर ७ सप्टेबंर रोजी ते मेडत्यापासून ४ कि.मी.वर असणा–या नतारिया येथे पोहचले. यावेळी

---

[१३१] दि.ये.म.रा., खंड.०२, पृ.०२

[१३२] पु.रे.क., १ पृ. २६०, पु.अ., खंड.०३, पृ.१३२, हि.पे.रि.म.शि., नं. ५७०–५७५ पृ.८१३–८१९.

[१३३] म.शि.का., नं.५७४, पृ.८१५.

[१३४] पु.रे.क., १ पृ. २६४, हि.पे.रि.म., पृ.५७५, ५७९

[१३५] चं.द., खंड.०२, पृ. ७८, ८०, हि.पे.रि.म.शि., पृ.५७४,

डी–बॉय पीसगाव, गोविंदगर, अलीनिवास हा प्रदेश काबीज करत गोपालभाऊस ९ सप्टेबंर रोजी येवून मिळाले. यावेळी गोपालभाऊ लगेच राठोडावर आक्रमण करण्याबाबत विचार करत होते मात्र डि–बॉय ने त्यास विरोध केला कारण त्याचे सैन्य बरेच दिवस सलग युध्द करत होते त्यामुळे ते थकले होते त्यानां विश्रांतीची गरज होती. यावेळी राठोड मराठयांच्या सैन्यापासून ३ कि.मी.वर डंगावस येथे होते.[१३६]

मराठे नतारीया या ठिकाणावर व राठोड डंगावस येथे परस्परासमोर उभे ठाकले होते. दोघामध्ये ३ कि.मी.चे अंतर होते. राठोडानी सैन्याची व्यवस्था अर्धवर्तुळाकार केलो होती तर शिंदयांनी आपल्या सैन्याची व्यवस्था दोन रांगेमध्ये केली होती व तोफाखाना पुढे लावला होता.[१३७] यावेळी राठोड इस्माईल बेग व इतर आपल्या जातभाईची मदत मिळते का याचा प्रयत्न करत होते मात्र दि. ११ सप्टेबर १७९० रोजी मराठयांनी रजपूतावर आक्रमण केले व विजय संपादन केला.[१३८] या मेडता येथोल लढाईमध्ये मराठयांनी विजय संपादन केल्यानंतर उभय पक्षामध्ये सांभारचा तह घडून आला.

सांभारचा तहः–

१) ६० लाख रूपये शिंदयांना युध्द खर्च व इतर खर्चाकरीता दयावेत. यापैकी १५ लाख रूपये रोख दयावेत. ८ लाख रूपये ४ फेबवारी १७९१ पर्यंत दयावेत. बाकीचे ४ एप्रिल १७९१ पर्यंत दयावेत.

२) गोपालराव यास १५ लाख रूपये सैन्य खर्चासाठी दयावेत.

३) नावा, मरोत, परबतसर या प्रदेशाची चार वर्षाची २० लाख रूपये खंडणी दयावी. यातील १६ जुन १७९१ पर्यंत पहिला हप्ता २ लाख रूपये दयावा.

---

[१३६] हि.पे.रि.म.शि., पृ.५७९, चं.द., खंड.०२,पृ. ७९

[१३७] चं.द., खंड.०२, पृ. ७९, ८१, म.द.बा., खंड.०२, पृ.२०९

[१३८] म.शिं.का., पृ.५८६, ५९७, चं.द., खंड.०२, पृ. ८२, परिहार जी.आर., उपरोक्त, पृ. १२९

४) युध्द खर्च व खंडणी ठरल्याप्रमाणे जर वेळेवर दिली तर २ लाख रूपयाची सुट देण्याची तरतूद करण्यात आली होती.

५) मारवार व गोडवाड या प्रदेशाची १ लाख ५० हजार रूपये खंडणी देण्यात यावी व येथून पुढे दरवर्षी ३० हजार रूपये खंडणी या प्रदेशातून देण्यात यावी.

६) अजमेर सर्व मालमत्तेसह शिंदयाच्या ताब्यात देण्यात यावे.

७) सांबार, लेक, खैरवा, मसुदा इ. २९ शहरे (गावे) भीनाई कडून शिंदयाच्याकडे देण्यात यावीत.

८) कर गोळा करत असताना विजयसिंगाने कोणताही प्रकारचा हस्तक्षेप करू नये.

९) मारवारची मोहीम राबवत असताना शेतीचे जे नुकसान झाले ते शिंदयानी शेतक-यांना दयावे.

१०) महादजी शिंदे यांच्या प्रतिनिधीने जर जादा कर गोळा केला तर त्याची माहिती दयावी.

११) कर गोळा करत असताना विजयसिंगाचा पुत्र झालिमसिंग याने कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये.

या तहास विजयसिंग व महादजीने मान्यता दिली.[१३९] तहाच्या अटी तात्काळ पुर्ण करण्याच्यादृष्टिने हालचाल झाली. एक महिन्यात ४ लाख रूपये महादजीस देण्यात आले.[१४०] धनराज याने मार्च १७९१ मध्ये महादजीच्या हवाली अजमेर किल्ला दिला.[१४१] शिदंयाचा लष्करी तळ आग्रा येथे हलवण्यात आला. साबार व इतर ठरलेली ठिकाणे महादजीकडे

---

१३९ हि.पे.रि.म.शि., पृ.५८७, दि.ये.म.रा. ०४

१४० हि.पे.रि.म.शि., पृ.५९२

१४१ प. अ., खंड. ०३, पृ.१४२

हस्तातंरीत करण्यात आली. इस्माईल बेगने आपण मारवार वरील हक्क सोडल्याचे सांगितले.[१४२]

एकूणच महादजीने जून १७९१ पर्यंत उत्तरेतील सर्वच संकटाचा बंदोबस्त केला. या संकटाच्या काळात महादजीने पुण्यास मदत पाठवावी म्हणून अनेक पत्र पाठविली. नानाही महादजीस लवकरच मदत पाठवित आहे अशा आशयाची पत्रे पाठवित असे त्यामुळे महादजीस हायसे वाटत अस. नानानी महादजीस सागितले की, अलिबहाद्दरास मदतीसाठी पाठवित आहे. सदर बाबीचे त्यांना हायसे वाटले कारण त्यामुळे मोगल सरदार व इतर मस्लिम सरदारावर वचक ठेवणे शक्य होणार होते. यावेळी महादजीने कोणी मदतीस आले नाही मात्र नानाचा भाऊपणा कामी आला असे म्हटले होते.[१४३] मात्र ख–या अर्थाने महादजीस मदत मिळाली नाही हे सत्य नाकारता येत नाही.

महादजी मेवाडमध्ये :–

रजपूत व राठोड यांच्या बरोबर तह निश्चित होऊन महादजीस आर्थिक फायदा झाला असला तरी महादजीच्या आर्थिक अडचणी त्यामुळे पुर्णतः सुटल्या नव्हत्या. याचवेळी मेवाड येथे राणोजी व रावत भिमसिंग यांचा संघर्ष चालू झाला होता.[१४४] हा संघर्ष सोडवण्यासाठी महादजी शिंदे यांनी आबाजी इंगळे यास पाठविले. पुढे जुन १७९१ मध्ये महादजी शिंदे मेवाड येथे गेले. महादजी शिंदे यांनी मेवाड मधील देवगड जवळच आपली छावणी टाकली. यावेळी देवगडच्या शासकाने महादजीस खंडणी देण्याचे मान्य केले. तसेच सागरगडकडून महादजीस १५ लाख रूपये देण्यात आले. आंबोजी

---

[१४२] हि.पे.रि.म.शि., पृ. ६००
[१४३] ना.फ.श., पृ. १४९, १५०., ७ सप्टे १७८७, आप्पाजीराम दाभोळकरचे नानास पत्र, म.शि.का. , ले. ५१०
[१४४], गु.द., नं.१७२, पृ.१८९ (अप्रकाशित, सीतामऊ–माळवा)

इंगळे व जालीमसिंग हे महादजीस यावेळी भेटले व त्यांनी गोळा केलेली १७ लाख रूपये खंडणीची रक्कम महादजीकडे सुपूर्त केली[१४५]

समारोप :–

नाना फडणविस व महादजी शिंदे हे दोन मराठा साम्राज्याचे शक्तीशाली व्यक्ती होते. महादजी शिंदे १७७२ मध्ये दिल्लीच्या बादशहास मदत करण्यासाठी गेले होते. मात्र प्रथम मराठा – इंग्रज युध्दामुळे त्यांना परत दक्षिणेमध्ये यावे लागले. युध्दानंतर महादजी शिंदे यांनी उत्तरेतील राजकारण पहावे व दक्षिणेतील पुण्याचा कारभार नानानी पहावा असे ठरले गेले. दिल्लीतील मिर्झा नजिबखान हा एप्रिल १७८२ मध्ये मरण पावला व महादजीस दिल्ली दरबारामध्ये प्रवेश करण्याची व सत्ता हस्तगत करण्याची संधी प्राप्त झाली. या संधीचा फायदा घेवून महादजीने १७८४ पर्यंत बुदेलखंड, गोहाद, ग्वाल्हेर इत्यादी ठिकाणे आपल्या ताब्यात घेतली त्याचबरोबर त्यानी आपली सैन्य व्यवस्थाही पाश्चात्य पध्दतीने तयार करण्यास सुरूवात केली. डी–बॉय या फ्रेंच अधिका–यास महादजीने लष्करास पाश्चात्य पध्दतीचे शिक्षण देण्यासाठी नेमले. १७८४ ते १७९५ या कालावधीमध्ये उत्तरेमध्ये महादजीचे वर्चस्व वाढविण्यामध्ये तसेच महादजीचा दबदबा निर्माण करण्यामध्ये या फ्रेंच अधिका–यांने महत्वाची भूमिका निभावल्याचे दिसून येते.

१७८४ मध्ये महादजीने वकिल–ए–मुतालिक व इतर अनेक मानाच्या पदव्या धारण केल्या. महादजीने या जबाबदा–या स्विकारल्यानंतर १७९१ पर्यंत आग–याचा प्रमुख हमदानी, नजीबखानाचा पुत्र झबेताखान, झबेताखानचा पुत्र गुलामकादीर, रजपूत, इ. आनेक शत्रूंना तोंड दयावे लागले. महादजीने आपली सैन्य व्यवस्था राणाखान भाई, अंबोजी इंगळे, रायाजी पाटील,

---

[१४५], गु.द., नं.७१४–७१६, पृ.२४१ (अप्रकाशित, सीतामऊ–माळवा)

जिवबादादा बक्षी, लाडोजी देशमुख, डि–बॉय यांच्या नेतृत्वाखाली भक्कम बनवली होती व त्याच्या सहाय्याने त्यांनी आनेक संकटावर मात केली.

शिंदे व होळकर हे उत्तरहिंदुस्थानातील मराठयांचे अधारस्तंभ होते. या सरदारांनी मराठी सत्तेचा विस्तार करण्याचे काम केले. मात्र मराठेशाहीच्या दुर्देवाने या सरदारामध्ये परस्पराविषयी मत्सर, फितुरी व द्वेष या दुर्गुणाचा प्रारंभ झाल्याचे दिसून येते. महादजी शिंदे यांचे उत्तर हिंदुस्थानामधील वर्चस्व तुकोजी होळकर, अलिबहाद्दर यास मानवत नव्हते. महादजीस परकिय सत्ताबरोबर या स्वकीयांचाही प्रतिकार करावा लागल्याचे दिसून येते. या सर्वच आघाडयावर यश संपादन केल्यानंतर महादजी शिंदे यांनी दक्षिणेत जाण्याचा निर्णय घेतला व फेब्रुवारी १७९२ मध्ये महादजीने दक्षिणेकडे प्रयाण केले.

........))))((((.......

प्रकरण सातवे

महादजी शिंदे : अखेरचे पर्व (१७९२ ते १७९४)

प्रस्तावना :–

महादजी शिंदे यांनी राज्यकारभाराची व्यवस्था लावली :

महादजी शिंदे पुण्यास येण्याची विविध कारणे व घडून आलेले वाद :–

महादजी यांचा पुण्यास येण्याबाबतचा खरा उद्‌देश :–

नागपूरकर भोसल्यांची महादजीस विनंती :–

अहिल्याबाई होळकर व महादजी संबधात बिघाडः–

महादजी शिंदे यांचे प्रयाण व राणेखानभाई यांचा मृत्यू :–

गुरू मन्शूरशहाचे दर्शन :–

तुळजापूर येथे महादजीचा विवाह :–

महादजीचे पुण्यात आगमन :–

महादजीचे पुण्यात येणे व नाना फडणीसांची प्रतिक्रिया :–

नाची सरदारांना मदतीसाठी पत्रे :–

नानांचा इंग्रजांची मदत मिळविण्याचा प्रयत्न :–

नानांची तुकोजी होळकराची मदत मिळविण्याचा प्रयत्नः–

बादशहाने दिलेल्या पदव्या स्विकारण्याबाबत नाना–महादजी वाद :–

पेशवा सवाई माधवराव व महादजी शिंद :–

लाखेरीचे युध्द (शिंदे – होळकर):–

महादजीची पेशव्यावार छाप :–

सातारच्या छत्रपतींना मोकळीक दिली :–

भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर काढली :–

हिशोबासंबधीचा वाद :–

पेशव्यांची मध्यस्ती व नाना महादजी समजोता :–

महादजी शिंदे यांचा शेवट :–

प्रस्तावना :–

महादजी शिंदे यांनी उत्तरेमध्ये १२ वर्षे राज्यकारभार केला या कालावधीमध्ये ते उत्तरेमध्ये सर्वेसर्वा होते. स्वपराक्रमावर त्यांनी आपले वर्चस्व उत्तरेमध्ये निर्माण केले. प्रचंड मोठी फौज जमविली, कवायती कंपू निर्माण केले. स्वकीया बरोबर परकीय सरदार व शत्रूना महादजीच्या गुण व शौर्याबद्दल आदर होता व लष्करी सामर्थ्याची भिती होती. मराठा सरदार प्रत्येक स्वारीनंतर दक्षिणेमध्ये येत असत व आपली फौज उभारत असत. मात्र महादजी शिंदे यांनी आपली फौज उत्तरेमध्येच निर्माण करण्याचे धोरण अवलंबल्यामुळे त्यांना दक्षिणेमध्ये येण्याची गरज भासली नाही. उत्तरेमध्ये गेल्यानंतर महादजी शिदे यांना एकामागून एक अशी अनेक कामे निघाली परिणामी त्यांना दक्षिणेमध्ये येण्यास वेळच मिळाला नाही.

संपूर्ण हिदुंस्थानमध्ये बादशाही सत्ता ही सार्वभौम सत्ता मानली जात असताना महादजी शिंदे यांनी स्वपराक्रमावर बादशाही संपादन केली व उत्तरेतील अनेक बंडाचा बिमोड केला. राजपुत्यान्यावरही वर्चस्व प्रस्थापित केले. उत्तरेतील जवळ जवळ सर्व अडचणीचां निकाल लावल्यानंतर महादजी शिंदे दक्षिणेकडे जाण्याचा विचार करू लागले.[१] दक्षिणेतून उत्तरहिदुंस्थानमध्ये जावून महादजी शिंदे यांना बरेच दिवस झाले होते. आपण दक्षिणेमध्ये जाणार आहोत हे महादजीने आपल्या सरदारांना सांगितले व उजैन येथे जावून त्यानी आपल्या फौजेची व राज्याची सर्व व्यवस्था सुरळीत लावली.

महादजी शिंदे यांनी राज्यकारभाराची व्यवस्था लावली :–रजपूतांबरोबर समजोत्याचे बोलणे (सांभारचा तह) चालू होते त्यावेळी महादजी शिंदे यांनी

[१] अ.म.मा.शि.च.का पृ. २४०

अलिबहाद्दरकडे दिल्लीचा कारभार देण्यात यावा याबाबत नानाबरोबर बोलणी चालू केली होती. मात्र अलिबहाद्दरने यावेळी आपणास दिल्लोचा कारभार झेपणार नाही असे सांगून दिल्लीचा कारभार हाती घेण्यास नकार दर्शविला.[२]

अलीबहाद्दरचा दिल्लीचा कारभाराबाबत पर्याय संपल्यानंतर महादजी शिंदे यांनी दक्षिणेमध्ये येत असताना आपल्या सैन्य व राज्यकारभारची व्यवस्था स्वःताच उत्तमरितीने लावली. या करीता उत्तमोत्तम अधिका–यांची त्यांनी निवड केली. महादजी शिंदे यांनी आपल्या सर्व सत्तेचे अधिकार जिवबादादा बक्षी यांच्याकडे दिले होते. राज्यकारभाराचे सर्व अधिकार गोपालराव रघुनाथराव व अबाजी रघुनाथ या दोघाकडे दिले होते. आबजी इंगळे यांच्याकडे ग्वाल्हेरच्या कारभाराची सुत्रे दिली. खंडेराव हरी यांच्याकडे दिल्लीच्या राज्यकारभाराची सूत्रे दिली. लखबादादा यांच्याकडे आग्रा येथील राज्यकारभाराची सूत्रे दिली. आशाप्रकारे सर्व राज्यकारभाराची व्यवस्था महादजी शिंदे यांनी केली.[3]

महादजो शिंदे पुण्यास येण्याची विविध कारणे व घडून आलेले वाद :–

१२ वर्षाच्या प्रदोर्घ कालावधीनंतर महादजी शिंदे दक्षिणेत यावयास निघाले त्यावेळी दक्षिणेमध्ये अनेक मतप्रवाह निर्माण झाले ते पुढील प्रमाणे

- इ.स.१७९१ पर्यत उत्तरेतील जवळ जवळ सर्वच आघाडयावर महादजीने यश मिळवून सर्व सत्ता सुरळीतपणे लावली होती व आता

---

[२] दत्तोपंत आपटे लेख संग्रह, अ.वि.गृ.प्रकाशन, पुणे, १९४५, पृ.१५९, १६०.

[3] मरिउवि, ख०२, पृ. ३८९

त्यास मोकळीक मिळाली होती. त्यामुळे त्यांनी दक्षिणेकडे जाण्याचा निर्णय घेतला.[४]

- दक्षिणेमध्ये इंग्रजांनी मराठयांच्या सत्तेला अवाहन दिले होत.[५] दक्षिणेमधील तसेच उत्तरेमधील जवळ जवळ सर्वच सत्ता शक्तीहीन झाल्या होत्या. मोगल, नागपूरकर भोसले, निजाम अली, हैदर या सत्तामध्ये इंग्रजांना टक्कर देण्याची ताकत राहीली नव्हती. त्यामुळे महादजीने दक्षिणेमध्ये जाण्याचा निर्णय घेतला.[६]
- तुकोजी होळकर व नाना फडणविस यांचे पेशवा दरबारातील वर्चस्व वाढले होते. ते दोघेही महादजी शिंदे यांचे विरोधक होते. तेंव्हा आपले वर्चस्व पुनः निर्माण करावे याकरीता महादजी पुण्यास येण्यास निघाला.[७]
- मराठा साम्राज्यातील काही मुत्सद्दी इंग्रजांना टिपू सुलतान विरोधात सहकार्य करत होती. मराठा साम्राज्याच्या दृष्टिने ह घातक होते कारण टिपू सारखा इंग्रजांचा शत्रू जर नामशेष झाला तर पुढे मागे ते मराठा साम्राज्यास त्रासदायक होईल याची जाणीव महादजी शिंदे यास होती. महादजी शिंदे यानी उत्तरेमध्ये इंग्रजी सत्तेचा मुकाबला केल्यामुळे इंग्रजांच्या राजनितीचा अनुभव होता. इंग्रजाच्या नितीचा मराठा दरबारातील इतर मंडळीना कोणताही अंदाज नव्हता तेंव्हा मराठा दरबारातील मंडळीना सहाय्य करावे या उद्देशाने महादजी शिंदे यांनी दक्षिणेमध्ये येण्याचे ठरविले.[८]

---

[४] म.प.इ., पृ. १८८.
[५] फा.फ्रें.स्ट्र.इ., पृ. ६२.
[६] न्यु.हि.ऑ.म., खंड.०३, पृ.२२७
[७] रू.ऑ.इ.मा.सिं., पृ. १७७–१८०
[८] चं.द., नं.९८, पृं.१०३, नं.१०२, १०७, नं.११०,१५, नं.१२३,१३., हि.ऑ.दम.पि.,खंड.३,पृ. १६३,

- पेशवा दरबारात तुकोजी होळकर, अलीबहाद्दर व नानाफडणीस यांच्यामुळ गोंधळ निर्माण झाला होता तो निर्माण झालेला गोंधळ मिटवणे आवश्यक होते.[९]
- उत्तरेतील १२ वर्षाच्या कालावधीत मराठा सरदारांनी मिळवलेले यश व उत्तरेतील मराठा राज्यकारभाराची इंत्यभूंत माहिती पेशव्यांना देणे गरजेचे होते.[१०]
- बादशहा शहाआलमकडून मिळालेली वकिल–ए–मुतालिक ही पदवी मीरबक्षीगिरी व इतर मान सन्मान मिळाले होते. ते मान सन्मान व पदव्या मोठा समारंभ भरवून पेशव्यांना सन्मानपूर्वक अर्पण करणे आवश्यक होते.[११]
- पेशवा रघुनाथराव यांच्या मृत्यूनंतर मराठा सत्तेमध्ये राज्यकारभार चालवण्याच्या दष्टिने कोणीही अनुभवी व्यक्ती नव्हता. नाना फडणविस राज्यकारभार चालवत होते मात्र त्याचा आदेश अंतीम नव्हता. तसेच मराठा साम्राज्यातील इतर मराठा सरदार नाना फडणविस यांचे ऐकत नसत तेंव्हा राज्यकारभारात केंद्रीय सत्तेचे कमी झालेले वर्चस्व पुनः निर्माण करून राज्यव्यवस्था सुरळीत करण्याची गरज महादजीस वाटू लागली..
- नाना फडणविस यांनी पेशवा सवाई माधवराव यास आपल्या नियत्रंणाखाली ठेवले होते व साम्राज्याचा सर्व कारभार आपल्या हाती घेतला होता. पेशवा सवाईमाधवराव यांच्यावर दिवसे दिवस नाना फडणविस यांची पकड वाढतच गेली हे इतर सरदारांना मानवणारे

---

[९] ना.फ.च. पृ. १७२

[१०] भा.इ.सं.मं., भानू सी.जी., *महादजी शिंदे यांची शेवटची दोन वर्षे*, पृ. ८५

[११] ग्रॅन्ड डफ, खंड ३, पृ. ७६.

नव्हते. तेंव्हा पेशवा सवाई माधवराव यांना त्यांच्या हक्काची व राज्यकारभाराची जाणीव करून देणे आवश्यक होते.[१२]

- महादजी शिंदे यांचे गुरू मन्शूरशहा हे बीड येथील होते. बीडची सनद महादजीने बादशहाकडून आणली होती, ती मराठा साम्राज्यात विलीन करून आपल्या नावे महादजीस करून घ्यावयाची होती.[१३]
- महादजी शिंदे यांचे कुलस्वामी देवाचे दर्शन, कुंटूबातील इतर व्यक्ती, इतर मित्र मंडळी यांचे भेटी घेऊन बरेच दिवस झाले होते. त्या सर्वांच्या भेटी घ्याव्यात देवांचे दर्शन घ्यावे याकरीता त्यांनी दक्षिणेमध्ये येण्याचे नियोजन केले.
- अविरतपणे सतत बारा वर्षे युध्द व इतर गोष्टीमध्ये व्यस्त राहिल्यामुळे महादजीना आरामाची गरज होती यासर्व बाबीमुळे महादजी शिंदे दक्षिणेत यावयास निघाले.[१४]

मराठा –टिपू युध्दामध्ये आपणही यशाचे वाटेकरी व्हावे अशी महादजीची इच्छा होती म्हणून तो दक्षिणेत यायला निघाला हाता असा एक समज होता किंवा महादजीला मराठा दरबारात आपले वर्चस्व निर्माण करावयाचे होते, पेशव्यांचा मुख्य सल्लागार बनावयाचे होते[१५] म्हणून तो दक्षिणेत येऊ लागला असेही मत मांडले जाते. मात्र यामध्ये सत्याचा अंश कमीच दिसून येतो कारण पुढे महादजीचे पुण्यात आगमन झाल्यानंतर महादजीने नाना बरोबरच्या प्रत्येक वादाच्यावेळी नमते धोरण स्विकारल्याचे दिसते. नाना बरोबरच्या पहिल्या भेटीत तर त्यांनी नानाच्या समार बसावयाचे

---

[१२] मरिउवि, भाग–०२, पृ. ३७४–३७५
[१३] न्यू.हि.ऑ.म., खंड.०३, पृ.२३२
[१४] भानू सी.जी., उपरोक्त, पृ.८६–८७
[१५] हि.ऑ.म.पि., खंड. ३, पृ.१६३–१६५. ना.फ.च., १३६–१३७

धाडस केले नव्हते. तसेच पेशव्यांच्या पुढे उभा राहताना आपला हुज–याचा धर्म त्यांनी सोडला नव्हता विनम्रपणे ते उभे राहत असत.

महादजीने उत्तरेमध्ये मोठया प्रमाणात संपत्ती कमावली आहे व त्याच्या सहायाने तो आता दक्षिणेमध्ये आपली सत्ता प्रस्थापित करण्यास येत आहे. दक्षिणेमध्येही आपले वर्चस्व त्याला सिध्द करावयाचे आहे. असाही एक समज लोकांमध्ये पसरला होता. महादजी जर पुण्यात आला व त्यांने आपले वर्चस्व सिद्द करावयास चालू केले तर त्याच्यामधून आपला बचाव कसा करता येईल याबाबतची खलबते मराठा दरबारात चालू झाली.[१६] मात्र या टोकेचा सुगावा महादजीस लागल्यानंतर महादजीने आपल्याबरोबरचे बरेच सैन्य परत पाठविले. तेंव्हा ही टिकाही खरी नसल्याचे सिध्द होते.

नानाच्या मते महादजी दक्षिणेमध्ये येणे मुत्सद्दी पणाचे राजकारण राहणार नाही म्हणून त्यांनो महादजीने उत्तरेमध्ये राहणे कसे योग्य आहे याबाबत पत्र पाठविले की, 'आपण दक्षिणेमध्ये आल्यास अनेक प्रकारची बंडे उत्तरेत पाठिमागे उभा राहतील. फौजा ठेवून बंदोबस्त करावा असे म्हटल्यास ते शक्य नाही. आपण बरीच स्थळे, प्रदेश काबीज केलात सर्व हिंदुस्थानाची आपणास माहिती आहे कोणाचाही विश्वास नाही. दक्षिणेत सर्व व्यवस्था ठिक आहे.' मात्र महादजीने 'स्वामी दर्शनास बरेच दिवस झाले आलो नाही. देवाचे दर्शन घ्यावयाचे आहे सर्व व्यवस्था हिदुंस्थानात ठिक आहे. घरचाच फितुर झाल्यास काही कळत नाही.' अशा प्रकारचे उत्तर केल्याची पत्रे आढळून येतात.[१७]

---

[१६] ना.भो.ब., पृ. १४१, अ.म.मा.शि.च.का., पृ. २४२
[१७] म.प.इ., ले. १९३, पृ.१८८., म.शि.का., नं. ६०२

महादजी यांचा पुण्यास येण्याबाबतचा खरा उद्देश :–

अनेक इतिहासकारांनी महादजी शिंदे पुण्यास का येत होते याबाबत आपआपली मते सांगितली आहेत. मात्र महादजी शिंदे यांचा पुण्यास येण्याचा खरा हेतू काय हाता याबाबत सरदेसाई म्हणतात की, १) उत्तरेतील मराठा स्वा–यांच्या खर्चाचा व इतर मुलूखगिरीचा हिशोब देणे. २) अलिबहाद्दर व तुकोजी होळकर यांना परत उत्तरेत बोलावणे. ३) १७९१ पर्यंत महादजी शिंदे यांनी उत्तरेतील सर्व शत्रूंचा जवळ जवळ पूर्णतः बंदोबस्त केला होता. बादशहा शहाआलम देखील मराठयांच्या अधिपत्याखाली होता. एकूणच उत्तरेमध्ये मराठा साम्राज्य उत्तम स्थितीमध्ये होते. मात्र इंग्रज मराठा साम्राज्यास आव्हान देत होते. इंग्रज मराठा साम्राज्यामध्ये शिरकाव करू लागले होते व भावी काळाच्यादृष्टिने ते योग्य नव्हते तेंव्हा भारताच्या प्रत्येक भागातून त्यांना हाकलून लावणे.[१८] या दृष्टिने त्यांनी दक्षिणेकडे जाण्याचा बेत आखला.

जदुनाथ सरकार यांच्या मते महादजी शिंदे यांनी उत्तरेमध्ये अनेक मोहिमा आखल्या होत्या या मोहिमांचा बराच खर्च झाला होता आणि त्याचे पेशव्याकडून जवळ जवळ सात करोड रूपये महादजीस येणे होते. ते वसूल करावे तुकोजी होळकर याचे दरबारात वाडणारे वर्चस्व कमी करून त्यास पुन्हा उत्तरेमध्ये पाठवावे, पैसे वसूल झाले सर्व व्यवस्थित झाले की परत उत्तरेमध्ये यावे असा महादजीचा हेतू होता.[१९]

नागपूरकर भोसल्यांची महादजीस विनंती :–महादजी शिंदे पुण्यास येत असताना त्यांना नागपूरकर भोसले यांना भेटावयाचे होते. मात्र महादजी शिंदे

[१८] न्यू.हि.ऑ.म., खंड. ०३, पृ. २२९

[१९] फॉ.ऑ.मु.ए., खंड. ०४, पृ. १२९–१३०., इ.सं.ऐ.टि., खंड. ०३, नं०२, पृ. ६३., जोशी एस्. पी., भा.इ.सं.मं. स्वीय ग्रंथमाला, नं. ४८, पृ. १४.

यांची स्वारी आपल्या प्रदेशातून जावू नये असे नागपूरकर भोसले यांना वाटत होते. कारण महादजी मोठया लवाजाम्यासह दक्षिणेमध्ये चालले होते त्यांच्या सैन्य व इतर अवजड सामानामुळे आपल्या प्रदेशाची नासधूस होईल याची भिती नागपूरकर भोसले यांना होती. परिणामी त्यांनी याबाबत आपल्या वकिलास महादजी शिंदे यांच्याकडे पाठविले वकिलांने महादजीस सांगितले की, भोसले आपल्या शब्दाबाहेर नाहीत तेंव्हा आपण परस्पर पेशव्यांना जावून भेटावे. अशाप्रकारे महोदजीचा नागपूरचा बेत भोसल्यानी रद्द केला व होणारे नुकसान रोखल्याचे दिसून येते.[२०]

अहिल्याबाई होळकर व महादजी सबधात बिघाडः–महादजी शिंदे दक्षिणेमध्ये येत असतांना अहिल्याबाई होळकर यांचा प्रदेश लागत होता. अहिल्याबाई होळकर यांनी नेमाडातील सत्वास महालांत एक ठाणे वसवले होते. महादजी शिंदे यांनी ते ठाणे हाकून देवून तेथे आपला अंमल बसविला. अहिल्याबाई होळकर व महादजी यांचे संबंध या घटनेमुळे बिघडल्याचे दिसून यावेळी अहिल्याबाई यांना महादजी विषयी खूप राग आल्याचे दिसून येते त्यांनी महादजी हा परत उत्तरेमध्ये येणार नाही अशा प्रकारची शाप वाणी उच्चारलेली होती.[२१] पुढे हा शाप खरा ठरल्याचे दिसून येते कारण महादजी शिंदे यांचा दक्षिणेतून उत्तरेमध्ये येण्या अगोदरच मृत्यू झाला.

महादजी शिंदे यांचे प्रयाण व राणेखानभाई यांचा मृत्यू :–

उजैन हे महादजीच्या सत्तेचे केंद्र होते तर पुणे हे मराठा साम्राज्याचे प्रमुख केंद्र होते तेथूनच मराठा साम्राज्याचा कारभार चालत असे. महादजी शिंदे यांनी उज्जैन येथून आपल्या सर्व राज्याची व्यवस्था लावल्यानंतर

---

[२०] ''पाटीलबावानी परस्पर जावून प्रथम पेशव्यांचे दर्शन घ्यावे, सेनासाहेब काही आपल्या बाहेर नाहीत.'' ना.भो.ब., पृ. १४२., अ.म.मा.शि.च.का., २४५

[२१] ''हा मेला, पुनः हिंदुस्थान पहाणार नाही.'' हो.कै., पृ. ५९

दक्षिणेकडे जाण्याच्यादृष्टिने तयारी चालवली. मराठा साम्राज्यामध्ये ब–याच दिवसांनी महादजी चालले होते. तेंव्हा लोकांच्यावर आपली छाप पडावी यादृष्टिने त्यांनी तयारी केलो व मोठा डामडौल बरोबर घेतला.

महादजी शिंदे उजैन येथे असताना त्यांचा विश्वासू सरदार राणेखान यांचा मृत्यू झाला.[22] महादजी शिंदे यांचा राणेखानवर खूप जीव होता. त्याच्या मृत्यूनंतर त्यांना फार दु:ख झाले. पानिपतच्या रणसंग्रामावर मराठा सैन्याची वाताहात झाल्यानंतर महादजी शिंदे यांनी आपला मोर्चा माघारी वळवला. एक पठाण त्यावेळी त्यांच्या पाठीमागे लागला, पळत असताना एके ठिकाणी घोडीचा पाय खड्डयात अडकला असता घोडी व ते खाली पडले व त्यावेळी त्यांना मुर्च्छा आली. महादजी शिंदे यांना तेथेच मृत्यू यावयाचा मात्र राणेखानने त्यांचा जीव वाचविला. राणेखानने त्यांना बैलावरच्या पखालीमध्ये घातले व मराठा सैन्यामध्ये आणले. पुढे महादजी शिंदे प्रसिध्दीस आल्यानंतर व मोठया दौलतीचा मालक झाल्यानंतर महादजीने राणेखानास आपला सरदार बनवले. आनेक युध्दामध्ये राणेखान महादजीच्या बरोबर असे. महादजीच्या सैन्यामध्ये व राज्यकारभारामध्ये राणेखान यास मोठा मान होता. त्याच्या मृत्यूनंतर बरेच दिवस महादजी भाई भाई म्हणून हाका मारत असे.[23]

महादजी शिंदे मुळताच धार्मिकवृत्तीचे होते. दक्षिणेत येत असताना त्यांनी अनेक ठिकाणी दानधर्म केले. २५ फेब्रुवारी १७९२ रोजी महादजी शिंदे देवास येथे पोहचले. देवास येथे असताना त्यांनी तेथील नर्मदा नदीवर अनेक

---

[22] इ.ले.स., खं. ०१, नं. ३१८ ते ३२०, पृ. १६४, १६५., चं.द.– नं. ९३ पृ. ९९.

[23] गोखले पु.पा., *महादजी शिंदे,* इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, १९७५, पृ.२८–२९

घाट बांधले. २० मार्च १७९२ रोजी ते बु–हाणपुर येथे पोहचले.[२४] बु–हाणपूराहून महादजी बीड येथे मन्शुरशहा याच्या दर्शनाकरीता गेले.[२५]

गुरू मन्शूरशहाचे दर्शन :–मन्शुरशहा हे महादजीचे आध्यात्मिक गुरू होते. महादजीस पानिपत युध्दानंतर रघुनाथराव पेशवे यांच्या विरोधामुळे सरदारकी मिळाली नव्हती त्यावेळी ते बीड येथे गेले होते. काही दिवस त्यांनी मन्शुरशहा यांची सेवा केली. त्यांच्याच आशिर्वादाने आपणास सरदारकी मिळाली असे ते मानत होते. त्यामुळे महादजी शिंदे यांच्या दौलतीस फकीरी दौलत असेही संबोधले जाते. बीड येथे महादजी शिंदे एक आठवडापर्यंत होते. बीड हे आपल्या गुरूचे गाव आहे व ते आपणास इनाम मिळावे म्हणून त्यांनी बादशहास विनंती केली होती. बादशहाने त्यास त्याची सनद दिली होती.[२६] मात्र नानाने पेशव्याकडून त्यांची रितसर परवानगी मिळावयास बरेच दिवस लावलेले दिसून येते.

तुळजापूर येथे महादजीचा विवाह :–बीडवरून महादजी शिंदे तुळजापूर येथे गेले. तुळजापुर येथे देवाचे दर्शन घेतत्यानंतर महादजी शिंदे यांच्या नजरेस भोपे कदम या पुजा–याची कन्या पडली. पुजा–याची कन्या दिसायला सुंदर होती. महादजी शिंदे यांनी त्या पुजा–यास १० हजाराची जहागिरी देवून त्या मुलीबरोबर विवाह केला. महादजी शिंदे यांना पुत्र नव्हता तो व्हावा या इच्छेने त्यांनी आपल्या वयाचा विचार न करता लग्न केलेले दिसून येते.[२७]

---

[२४] इ.ले.सं., खं. ९, नं. ३४१९, पृ. ४५७०., शिंदे ब–हाणपुरास आले. चैत्रमासी पुण्यात येतील''

[२५] कित्ता, नं.३४१५, ८–४५६७, हि.द., खंड, ०३, नं.१९, पृ.७३

[२६] न्यू.हि.ऑ.म., खंड.०३, पृ.२३२

[२७] म.रि.उ.वि, खं. ०२, पृ. ४११., ऐ.ले.सं. खं. ९, नं.३४२३, पृ. ४५७२, नं. ३४२५, पृ. ४५७३, नं. ३४३५, पृ. ४५८०., राजश्री महादजी शिंदे बिडास जाऊन आठ रोज राहून साबानी कूच करून तुळजापूरास गेले. ऐ.ले.स. भाग.०२, लेख ३४२४, पृ. ४५७२.

महादजी शिंदे यांनी दक्षिणेकडे प्रयाण करत असतानाच आपला पुतण्या दौलतराव शिंदे याचे लग्न केले या लग्नास ब–याच मराठा सरदारांनी व मान्यवर मंडळीनी हजेरी लावलेली दिसून येते. यावेळी महादजीने आपल्या ऐश्वर्याचे दर्शन मराठा सरदारांना घडविले.[२८]

महादजीचे पुण्यात आगमन :–तुळजापूरहून महादजी जाम येथे गेले व जामहून त्यांनी कूच करून पुण्यामध्ये १२ जून १७९२ ला पोहचले.[२९] पुण्यामध्ये आल्यानंतर महादजोने आपला मुक्काम वानवडी येथे टाकला. १३ जून १७९२ रोजी नाना फडणीस, पेशवा सवाई माधवराव, हरिपंत फडके इत्यादी मंडळी महादजी शिंदे यांच्या स्वागताकरीता गणेशखिंड येथे गेली. सवाई माधवराव पेशवे व महादजी शिंदे यांची ती पहिली भेट होती.[३०] पेशवा सवाई माधवराव यांच्याबरोबर नानाफडणीस, हरिपंत फडके इ. मातब्बर सरदार होते.[३१]

पेशवे स्वागताकरीता आले तेंव्हा महादजी शिंदे यांनी आपला रूबाब व दौलतीचे प्रदर्शन पेशव्यांच्या समोर केले. महादजी पेशव्यांना १२ वर्षानंतर भेटत होते तेंव्हा पेशवा सवाई माधवराव यांना प्रथमच पाहून त्यांना फार आनंद झाला. महादजीने आपल्या फौजेची सलामी पेशव्यांना दिली. यावेळी महादजीचे सैन्य, तोफा, हत्ती, घोडे इ. डामडौल पाहून पेशवे आश्चर्यचकित झाल्याचे दिसून येते.[३२]

[२८] ग्रॅन्ड डफ, खंड. ०२, पृ.२१९–२२०., म.प.इ., नं. १९३.

[२९] ना.फ.च., पृ. १३५., ग्रॅन्ड डफ, खंड. ०२, पृ.२१९–२२०., म.प.इ., नं. १९३.

[३०] इ.ले.सं., खंड.०९, नं. ३४८१,पृ.४६२२., फॉ.ऑ.मु.ए., खंड.०४, पृ. १२०.

[३१] अ.म.मा.शि.च.का, पृ. २४६

[३२] *''त्या समयी महादजी शिंदे यांनी आपली फौज दुरस्ता फ–यांने सरकारचे मुज–यासाठी उभी केली. .... दोन कोस पर्यंत सरकारची स्वारी मुजरे घेत आली. शेवट झाला तेथे उभी राहिली आणि तोफा सोडण्याची व कवायत करण्याची आज्ञा सरकारची झाली. त्यावेळेस*

महादजीचे पुण्यात येणे व नाना फडणीसांची प्रतिक्रिया :-

नाना फडणविस व महादजी शिंदे हे दोन महापुरूष पानिपतच्या रणसंग्रामावरून परत आले म्हणूनच मराठा साम्राज्य पुन्हा आकारास आले. पानिपत युध्दात मराठयांची झालेली हानी भरून काढण्याचे काम या दोन महापुरूषांनी केले. नाना फडणीस यांनी दक्षिणेमध्ये उत्तमरितीने राज्यकारभाराची घडी बसवली तर उत्तर हिंदुस्थानामध्ये मराठयांचे गेलेले वैभव तलवारीच्या जोरावर महादजीने पुन्हा मिळवले. अशा या दोन्हीही महापुरूषाचे कार्य अतुलनिय असे आहे. मात्र या दोन महापुरूषाचे सुरूवातीस जमलेले सुत शेवटपर्यंत तसेच राहिले नाही काही कारणामुळे वाद निर्माण झाले व पुढे ते वाढतच राहिले. या दोन महापुरूषांच्या परस्पर विरोधी डावपेचामुळे मराठा साम्राज्याचे थोडयाफार प्रमाणात नुकसानही झाले. असे असले तरी मराठा साम्राज्याचा उत्कर्ष व्हावा हा एकच हेतू नाना व महादजी यांचा अखेरपर्यंत होता असे दिसून येते. महादजी शिंदे यांनी उत्तरहिंदुस्थानामध्ये यश संपादन केले होते याचा सर्व मराठा सरदारांना अभिमान वाटत असे. मात्र महादजीस मिळालेली प्रसिध्दी नानास रूचत नसे. महादजी शिंदे उत्तरेतील सर्व व्यवस्था ठिक लावून परत दक्षिणेत येणार आहेत हे कळल्यावर नानाने महादजीच्या विरोधात आपले धोरण रावबविण्यास सुरूवात केली.

महादजी शिंदे पुण्यास आल्यास आपले महत्व कमी होईल अशी नानास भिती वाटत होती. याचा परिणाम म्हणजे नानानी सवाई माधवरावास

---

*कंपूची कवायत व तोफेचे आवाज एकदम होऊ लागले तेंव्हा तोफांच्या धुराची दाटी झाली. माणसाला माणूस दिसेनासे झाले. बाराशे तोफाचा आवाज सुटला. त्या समयी श्रीमंताची मर्जी संपन्न होऊन स्वारी वाडयात जावयास फिरली. शिंदे आपली फौज घेऊन आपल्या तळावर जावयास निघाले. याप्रमाणे होऊन शिंदे वानवाडीचे तळावर जाऊन उतरले.'' **(पेशवा बखर, पृ. १५९-१६०)***

सांगून महादजीने दक्षिणेत यवू नये उत्तर हिंदुस्थानचाच कारभार त्यांनी उत्तम रितीने करावा अशा आशयाची पत्रे पाठविली. मात्र महादजीने उलट या पत्रास उत्तर देवून आपली दक्षिणेमध्ये येण्याची इच्छा व कारणे पेशव्यांना कळविली[३३].यामुळे नानाची ही युक्ती पूर्णत्वास गेलेली दिसून येत नाही.

नानाची सरदारांना मदतीसाठी पत्रे :–नाना फडणविस हे लष्करीदृष्टया पूर्णतः महादजीवर अवलंबून होते. लष्करीदृष्टया सक्षम असल्याने इतर मराठा सरदारही महादजीस लगेच जावून मिळतील याची भिती नानास होती. महादजीने पुण्यात आल्यानंतर जर आपल्याविरोधात धोरण राबविले तर आपला पाडाव होण्यास वेळ लागणार नाही हे ओळखून नानाने आपल्या बाजूच्या सर्व सरदारांना पत्रे पाठवून ताबडतोब पुण्यात सर्व सैन्यासह येण्यास सांगितले. याच बरोबर इंग्रजांचीजी मदत व फलटणे मिळवण्याचा नानाने प्रयत्न चालविला.[३४] हरिपंत फडके व परशुरामभाऊ पटवर्धन हे सरदार त्यावेळी टिपू बरोबरच्या श्रीरंगपट्‌टणच्या युध्दामध्ये गुंतले होते. नानाने गडबडीने टिपू सुलतानबरोबर चालू असलेले युध्द बंद केले व हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन यास पुण्यास बोलावून घेतले.[३५]

नानांचा इंग्रजांची मदत मिळविण्याचा प्रयत्न :–

टिपू बरोबर चालू असलेल्या युध्दामध्ये इंग्रज व मराठे सैन्य बरोबरच लढत होते. टिपू बरोबरचे युध्द आटोपते घेतल्यानंतर नाना फडणविस यांनी इंग्रजांची फौज आपल्या मदतीस घेऊन यावीत असे हरिपंत फडके यास सांगितले. नानानी सांगितल्याप्रमाणे हरिपंत फडकेनी कॉर्नव्हालीस याच्याबरोबर मदतीबाबत चर्चा केली. मात्र कॉर्नव्हालिस महादजीची लष्करी

[३३] ना.फ.ब., पृ. २८.

[३४] ना.फ.च., पृ. १४३., मरिउवि, भाग. ०२, पृ. ३६८

[३५] भा.इ.सं.मं.त्रै., चतुर्थ संमेलन, पृ. ८७

ताकद ओळखून होते म्हणून त्यांने इतर कारणे सांगून नानास मदतीस नकार दिल्याचे दिसून येते.[३६]

नाना बरोबर इंग्रजांनाही महादजी पुण्यास येणार या गोष्टीबाबत भय हाते कारण महादजी हा लष्करीदृष्टया प्रबळ होता. महादजी दक्षिणेमध्ये येण्यास निघाल्यापासून सर्व घडामोडीचा अहवाल इंग्रज रेसिडेन्ट आपल्या वरिष्ठांना पाठवत होते. मॅलेट यास पूर्णतः माहित होते की, नाना व महादजी यांच्यामध्ये वैर आहे त्यामुळे तो नानास महादजीच्या विरोधात कारस्थाने करण्यास चितावत होता व महादजीच्या नजरेस न येता अप्रत्यक्षरित्या सहाय्य करत होता.

नानांची तुकोजी होळकराची मदत मिळविण्याचा प्रयत्नः–

नाना फडणविस यांनी तुकोजी होळकर यास टिपुबरोबरच्या युध्दाकरीता दक्षिणेत बोलावले हाते. टिपूबरोबरचे युध्द बंद झाल्यानंतर त्यास पुण्यास येण्याबाबत नानांनी पत्र पाठविले मात्र नाना व तुकोजी होळकर यांचेही फारसे पटत नव्हते. तुकोजी होळकर व महादजी शिंदे यांचे संबध फारसे चांगले नव्हते मात्र पुढे महादजी शिंदे यांनी तुकोजी होळकराची समजूत काढली असता त्यांचे सबंध मैत्रीमध्ये रूपातंरीत झालेले दिसून येते. तुकोजी होळकर यास महादजीने दक्षिणेमध्ये न येण्याबाबत सुचविल्यानंतर तुकोजी होळकरांने नानास दक्षिणेमध्ये येण्यास नकार दिला व तो उत्तरेमध्ये निघून गेला.[३७]

बादशहाने दिलेल्या पदव्या स्विकारण्याबाबत नाना–महादजी वाद :–उत्तर हिंदुस्थानात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती, मोगल बादशहा कमजोर

---

[३६] मरिउवि, खंड. ०२, पृ. ३६९, गन्ड डफ, खंड. ०२, पृ. २१९
[३७] भानू सी. जी., चतुर्थ संमेलन भा.इ.सं.मं,पुणे., १९३८, पृ. ८७

बनला होता, अनेक सरदार बंडाच्या पावित्र्यात होते अशा वेळेस बादशहास कोणाची तरी मदत घेणे आवश्यक वाटू लागले. बादशहापुढे त्यावेळी दोन बलाढय सत्ता उभ्या होत्या त्या म्हणजे एक इंग्रज व दुसरे म्हणजे मराठे होय. बादशहाने मराठयांचा शक्तीशाली सरदार महादजी शिंदे यांची मदत घेण्याचे ठरविले व आपला वकिल महादजी शिंदे यांच्याकडे पाठविला. महादजी व बादशहा शहाआलम यांच्यामध्ये याबाबत बरीच चर्चा झाली. महादजीही उत्तरेमध्ये आपली सत्ता बलशाली करण्याची ही एक संधी आहे म्हणून याकडे पहात होता.

महादजी शिंदे व बादशहा शहाआलम यांची बैठक दिनांक १७ नोव्हेबर १७८४ रोजी बसली त्यावेळी बादशहा शहाआलम यांने महादजीस विनंती केली की, तुम्ही बादशाही कारभार हाती घ्यावा. त्यावेळी महादजीने बादशहास आपणास पद व अधिकार दिल्यास आपण सर्व बंडाचा व अडचणींचा बंदोबस्त करतो असे सांगितले असता १ डिसेबंर १७८४ रोजी बादशहाने वकील–इ–मुतलिक, मीरबक्षी, नायबगिरी इत्यादी पदे महादजीस बहाल केली.[३८] बादशहाने महादजीस सर्व पदे व मानमरातब प्रथम पेशव्यास देवून पेशव्याच्या तर्फेने आपण ती महादजीस देत आहोत असा स्पष्ट फारसी हुकूम लिहीला.[३९] सदर पदे स्वोकारावी की नको याबाबत नाना व महादजी यांच्यामध्ये बराच वाद व पत्रव्यवहार झाल्याचे दिसून येते. सदर पदे व मानमरातब दक्षिणेमध्य घेवून जाण्याबाबत वकिल सदाशिव दिनकर यास

---

[३८] सि.अ‍ॅ.पा.डि.डा., नं. ३१, पत्र क्रं. ४४, पृ. १०४६ (अप्रकाशित,मुंबई पुराभिलेख)

[३९] सोमनाथ रोडे (संपा.) अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद शोध निबंध संग्रह, राठोड एन. जी. (डॉ), *महादजी सिंदीयाज लॉयलटी टू द पेशवाज़,* श्रीगोंदा, १८ डिसेबंर, २००९, पृ. २४३,२४४)

महादजीने सांगितले होते मात्र सदाशिव दिनकर यांने सरकारचे काम करण्यास माझ्याशिवाय कोणी नाही असे कारण सांगून नकार दिला. [४०]

महादजीने येताना या पदव्या आणल्या होत्या व त्या समारंभपूर्वक पेशव्यांना दयावयाच्या होत्या. महादजी शिंदे पेशवा सवाई माधवराव यांच्याकडे गेले व त्यांनी ''मीरबक्षीगिरीचा बहुमान पादशहानी दिला आहे तो घ्यावा.''[४१] अशी विनंती केली. मात्र नानांनी यास पुन्हा विरोध केल्याचे दिसून येते. नानांच्या मते पेशवे हे छत्रपतींचे नोकर आहेत व त्यांना हया पदव्या घेता येत नाहीत, त्यांना हया पदव्या घ्यावयाच्या असतील तर छत्रपतींची परवानगी घेणे आवश्यक आहे.[४२] अशाप्रकारे बादशहानी दिलेल्या पदव्या स्वोकाराव्या की नको याबाबत पेशवा दरबारामध्ये बरेच विचारमंथन झालेले दिसून येते. शेवटी छत्रपतींची परवानगी घेण्यात आली व २२ जून १७९२ हा दिवस कार्यक्रमाकरीता निश्चित करण्यात आला. सदर दिवशी मोठया दिमाखदारपणे कार्यक्रमाचे नियोजन महादजी शिंदे यांनी केले होते.[४३] या पदव्यांचे दरबारामध्ये वाचन करण्यात आले त्यामध्ये नमूद करण्यात आले होते की, गुलामकादीरने बेदबी (बंड) केले होते त्याचे पारिपत्य बादशहाचे अनेक नोकर होते पण त्यापैकी कोणीही केले नाही. मात्र श्रीमंताचे सरदार महादजी शिंदे यांनी त्याचा बंदोबस्त केला याकरीता हया पदव्या त्यास अर्पण करण्यात आल्या आहेत.[४४] या कार्यक्रमानंतर नानांनी आपले राजनितीचे धोरण अत्यंत सावधगिरीने आखल्याचे दिसून येते.

---

[४०] मरिउवि भाग–२, पृ. ९७,९८.
[४१] इ.ले.सं., खंड. ०९, पृ. ४५८३., पे.ब., पृ.१४७., ना.फ.ब., पृ. ८३.
[४२] मरिउवि भाग–२, पृ. ९७.
[४३] इ.ले.स., खं.०९, पृ. ५८३–८४., सावरकर वि.दा., *हिंदुपदपादशाही*, पृ. १९८., ग्रॅन्ड डफ, खंड. ०३, पृ. ७८.
[४४] म.इ.सा.प., पृ. ३९७–९८.

पेशवा सवाई माधवराव व महादजी शिंदे :–सवाई माधवराव यांनी पदव्या स्वोकारल्यानंतर पेशवा व महादजी यांच्या भेटी वेळोवळी होत असत. जुलै व ऑगस्ट १७९२ मध्ये महादजी व पेशव्यांच्या अनेक बैठका झाल्याचे दिसून येते.[४५] पेशव्यांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन महादजीने केलेले दिसून येते. १३ मार्च १७९२ रोजी रंगपंचमीचे आयोजन दिमाखदार रितीने महादजीने केले.[४६] सदर दिवशी झालेली रंगपंचमी ही अविस्मरणीय अशी होती.

विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्यानंतर महादजी ब–याचवेळा दरबारामध्ये जात असे दरबारामध्ये जाण्याचे कारण म्हणजे – पेशव्यांना मोकळीक मिळवून देणे, पेशव्यांना त्यांच्या हक्काची व जबाबदारीची जाणोव निर्माण करून देणे, पेशव्यांच्या मनामध्ये स्वतःविषयी आपुलकी निर्माण करणे व स्वतःचे महत्व वाढवणे हे होते.[४७] पहिल्या दोन महिन्यामध्ये नाना व महादजी यांच्या अनेक बैठकी झाल्या. या बैठकीमध्ये वेगवेगळया विषयावर चर्चा होत असे.[४८]

लाखेरीचे युध्द (शिंदे – होळकर):– पेशवा बाळाजी विश्वनाथ, पेशवा पहिला बाजीराव यांच्या काळात शिंदे व होळकर यांच्यासारखे सरदार निर्माण झाले. या नवीन सरदारांना पेशव्यांनी उत्तरेकडील प्रदेशात मराठा साम्राज्याची वृध्दी व संवर्धन करण्याचे काम सोपवले. मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे हे समकालीन व राजकीय पटलावरील त्या त्या घराण्याचे संस्थापक होय. होळकरांनी उत्तरेमध्ये प्रथम माहेश्वरी व नंतर इंदैर हे आपले मुख्य ठाणे केले. शिंदयानी प्रथम उज्जैन व नंतर ग्वाल्हेर हे आपले मुख्य

[४५] न्यू.हि.ऑ.म., खंड. ०३, पृ. २३७.
[४६] म.द., खंड. ०२ पृ. ११९.
[४७] न्यु.हि.ऑ.म., खंड०३, पृ. २३७.
[४८] ग्रॅन्ड डफ, खंड. ०२, पृ. २२१–२२२.

ठाणे केले. या दोन्हीही सरदार घराण्यांची प्रगती एकाचवेळी चालू झाली. परिणामी या दोन घराण्यामध्ये परस्पर आकस निर्माण होण्यासही सुरूवात झाली. पुढे तर दोन्ही सरदारांच्या धोरणामध्येही फरक पडू लागला व ते प्रत्येक लढाईच्यावेळी एकत्र लढत होते त्याऐवजी वेगवेगळया मोहिमा काढू लागले. जयाप्पा शिंदे याच्या काळापासून ख–या अर्थाने शिंदे व होळकर यांच्यामध्ये वितुष्ट निर्माण झाले व ते पुढे जनकोजी शिंदे, दत्ताजी शिंदे यांच्या काळात वाढतच गेले.

जयाप्पा शिंदे यांचा मारवाड – जोधपूरच्या स्वारीमध्ये असताना खून झाला या खुनास होळकरांनी सहाय्य केले होते असा शिंदयाचा समज होता. याबाबत मल्हारराव होळकर यांनी जनकोजी शिंदे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नाही. खंडेराव होळकराचा गोळी लागून मृत्यू झाल्यानंतर मल्हारराव होळकरांनो जाटांचा पूर्ण निःपात करण्याची शपथ घेतली होती परंतु दत्ताजी शिंदे यांनी जाटांना पगडीभाई मानल्यामुळे त्यास माघार घ्यावी लागली.शुक्रतालच्या लढाईच्यावेळी मल्हारराव होळकरांने दत्त्ताजीच्या मदतीस जाण्यास विलंब लावला त्यामुळे दत्ताजीचा प्राण गेला. अशा विविध कारणामुळे होळकर व शिंदे यांचे वैमनस्य वाढतच गेले.

महादजी शिंदे यांनी पेशवा दरबारातील तसेच उत्तरेतील आपले महत्व स्वकतत्वावर खूपच वाढविले होते. इंग्रज मराठा युध्दामध्ये (सालबाईचा तह – १७८२) त्यांनी महत्वाची भूमिका बजावली होती. महादजीच्या या यशामुळे तुकाजी होळकर यास आपण शिंदयाच्या बरोबरचे सरदार असून देखील आपणास महत्व नाही आपले महत्व कमी झाले असे वाटे. महादजी शिंदे यांनी रजपूताबरोबरच्या युध्दामध्ये यश मिळवले, बादशहाच्या दरबारामध्ये शिरकाव तर केलाच तसेच पुढे त्याने वकिल–इ–मुतालिक या

पदव्या सारखेच अनेक मान मरातब मिळवले. हे सर्व करत असताना महादजीने अहिल्याबाई होळकर यांची मदत व्हावी म्हणून पत्रे पाठविली होती. मात्र अहिल्याबाई होळकर यांनी महादजीचे दिवसे दिवस वाढणारे महत्व लक्षात घेऊन महादजीस अपेक्षित मदत केली नाही.[४९] रजपूताबरोबरच्या लालसोटच्या लढाईच्यावेळीही तुकोजी होळकरास नानाने पत्र पाठवून महादजीस मदत करण्याबाबत सांगितले होते.[५०] महादजी शिंदे यांनीही तुकोजी होळकरास पत्र पाठवून तात्काळ मदतीसाठी येण्याबाबत लिहले होते. मात्र तुकोजी होळकरांने त्या पत्राकडे लक्षच दिले नाही. तुकोजी होळकर हे महेश्वर येथे गेले व तेथे दोन महिनेपर्यंत त्यांनी आपल्या सैन्यांचा तळ ठोकला होता.[५१] तुकोजी हाळकरांने महादजीच्या पत्राकडे पूर्णतः दुर्लक्ष केले होते. तुकोजी होळकरांचे महादजीच्या मदतीस न जाणे यामुळे या दोन सरदारांच्या मनांमध्ये द्वेष वाढतच गेला.[५२] तुकोजी होळकर व अलीबहाद्दर या दोघांचे संबध त्यावेळी एकदम जवळचे निर्माण झाले होते. या दोघांनीही महादजीस मदत न करण्याचेच धोरण राबविले होते.[५३]

तुकोजो होळकर हे शिदे – होळकर दोन बरोबरचे सरदार असून मिळालेल्या प्रदेशाची दोघांनाही समान वाटणी होणे आवश्यक आहे अशी मागणी करत असत.[५४] मात्र महादजीने होळकरांच्या या मागणीकडे पूर्णता दुर्लक्ष केले होते. तुकाजी होळकर व महादजी शिंदे यांचे रजपताबरोबरच्या लढाईमध्ये काही काळाकरीता सख्य जमले होते. मात्र रजपूताबरोबरील लढाई नंतर तुकोजी होळकर यांनी काशीराव होळकर यांच्या नेतृत्वाखाली

---

[४९] म.रि.उ.वि. भाग–२, पृ. २५३.
[५०] हो.इ., खंड. ०१, पृ. ३२४.
[५१] फॉ.ऑ.मु.ए., खं. ०४, पृ.०९
[५२] हा.इ.सा., खं.०१, नं. ०७, पृ. २३., हा. इ., पृ. खंड०१, पृ. ३२९
[५३] म.रि.उ.वि., पृ. १५
[५४] भा.इ.आ.सं.त्रै, वर्ष, १९९४, पृ. ४३,४४

गेलेल्या सैन्यास परत बोलावले. म्हणजेच हे सख्य काही कालावधीकरताच टिकून राहिले होते.[५५] महादजी शिंदे यांच्या हातूनही काही चुका झाल्या होत्या. तुकोजी होळकरांनी चितोडचा किल्ला सर केला होता व तेथे आपला अंमल बसविला होता. उदयपूरची राणीने महादजीस याबाबत सहाय्य मागितले तेंव्हा महादजीने आपले सैन्य राणीच्या सहाय्याकरीता पाठवून दिले. त्यावेळी महादजीने होळकरांचा प्रदेशामध्ये हस्तक्षेप करणे होळकरांना मान्य झाले नाही.[५६] महादजी शिंदे दक्षिणेमध्ये गेल्यावर तुकोजी होळकर महादजीच्या अंमलाखालील प्रदेश ताब्यात घेण्याचा प्रयत्न करू लागला. याकरिता त्याने महादजीच्या विराधकांची मदत घेण्याचा प्रयत्न केला. संधी साधून शिंदयाच्या फौजेचा समाचार घ्यावा असे तुकोजी होळकर व त्यांचा मुलगा मल्हारराव होळकर व यशवंत होळकर यानां मनोमन वाटत होते.[५७]

तुकोजी होळकरांने जयपूरच्या राजाबरोबर आपले संबध वाढविले होते त्यांने त्यांच्या बरोबर एक गुप्त करारही केला होता. जयपूरच्या मदतीने तुकोजी होळकर हा शिंदयाच्या सैन्यावर आक्रमण करण्याची तयारी करत होता. शेवटी दोन्ही सत्तामधील वितुष्ट विकोपाला जावून ८ ऑक्टोबंर १७९२ रोजी गोपाळराव भाऊ, जिवबादादा बक्षी व डी–बॉय या अधिका–यांनी तुकोजी होळकरवर अक्रमण केले.[५८] तुकोजी होळकरावर आक्रमण केले असता तुकोजीने लाखेरी येथे पळ काढला. त्यावेळी नारो गणेश व बापू होळकर यांनी तुकोजी होळकरास शिंदयाच्या बरोबर युध्द न करण्याबाबत व समझोता करण्याबाबत सुचविले मात्र तुकोजी होळकर यांनी ते ऐकले नाही.

---

[५५] हा. इ., ख.०१, न.२६७

[५६] म.रि.उ.वि. भाग, ०२, पृ. २५४

[५७] म.रि.उ.वि., पृ. ३८९

[५८] चं.द., नं.१२१, पृ. १३१., हो. इ., खं०१, पृ. ३४७.

या संपूर्ण प्रकरणामध्ये नाना फडणीसांनी मात्र महादजीच्या विरोधात भूमिका घेतली व तुकोजो होळकरास अंतर्गत सहाय्य केले.[५९] कारण दक्षिणेमध्ये जर महादजीच्या विरोधात काही गरज पडली तर तुकोजी होळकरास दक्षिणेमध्ये बोलविता येईल असा नानाचा त्या मदतीमागे हेतू होता.[६०] शिंदे व होळकर हे दोघेही युध्द करण्याच्या स्थितीमध्ये होते व शेवटी १ जून १७९३ रोजी लाखेरी येथे शिंदे व होळकर यांच्यामध्ये युध्दास सुरूवात झाली. शिंदयाचा सरदार डि–बॉय याने होळकरांच्या सैन्यावर आक्रमण केले. जिवबादादा व इतर सरदारही या युध्दामध्ये सहभागी झाले होते. या युध्दामध्ये दोन्हीही सैन्याची वाताहात झाली अनेक अधिकारी मारले गेले व होळकरांचा पराभव झाला. शिंदयाचा विजय झाल्यानंतर आबा चिटणीस यांनी आनंदाने महादजीस तोफा सोडण्याची परवानगी मागितली मात्र महादजीने त्यास नकार दिल्याचे दिसून येते. इतकेच नाही तर त्यांनी गोपाळभाऊस नोकरीवरून दुर करून भेलसामध्ये कैदेत ठेवले, जीवबादादास आपल्याजवळ बोलावले व उत्तरेतील कारभार गंगोबातात्याकडे सोपविला.[६१]

महादजी शिंदे यांना लाखेरीचे युध्द अपेक्षित नव्हते ते अनपेक्षितरित्या घडून आलेले युध्द होते.[६२] शिंदे व होळकर यांच्यामध्ये झालेले लाखेरीचे युध्द हे मराठा साम्राज्याच्या ध्येय धोरणाविरोधातच होते. कारण पेशवा बाजीराव यांनी मराठा सरदारांची फळी निर्माण केली होती ती मराठयांच्या शत्रूबरोबर प्रतिकार करण्यासाठी. या सरदारांच्या पराक्रमाने मराठा साम्राज्याची वृध्दी व्हावी मराठा साम्राज्य उत्तरेमध्ये वाढावे त्याचा प्रसार व्हावा अशी त्यांची इच्छा होती. मात्र पुढे या सरदारांच्याकडे सैन्य शक्ती वाढली, शत्रूंचा पूर्ण

[५९] म.रि.उ.वि., ख०२, पृ. ७१.
[६०] ना.फ.च., पृ. १४३
[६१] भा.इ.आ.सं.,त्रै., वर्ष.१९९४, पृ. ४४
[६२] अ.म.मा.शि.च.का., पृ. २५८, २५९., हो.कै., पृ० ११८

बंदोबस्त झाला त्यावेळी हे मराठा सरदार मूळ उद्देश बाजूला ठेवून आपआपसात संघर्ष करू लागले. इतर सरदारापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत हे दाखविण्याच्या नादात एकमेकाबरोबर हे सरदार लढाया करतांना दिसू लागले व हे मराठा सम्राज्याच्यादृष्टोने हानीकारक होत हे पुढील काळात लवकरच सिध्द झाले.

शिंदे व होळकर या मराठयांच्या दोन मातब्बर सत्तामध्ये सरदारामध्ये पानिपत युध्दापूर्वीपासून अंतर्गत संघर्ष[६३] होता परस्पराविषयी असणारी इर्षा व द्वेष याचा उद्रेक लाखेरीच्या युध्दाने झाल्याचे दिसून येत[६४] उत्तर भारतामध्ये मराठा साम्राज्याची वाढ करण्यासाठी जी स्पर्धा चालू होती त्याचाच परिणाम म्हणजे हे लाखेरीचे युध्द होय.[६५]

महादजीची पेशव्यावार छाप :– महादजीने मोठया थाटामाटात बादशाही मान–मरातब पुण्यात आणून खास सवाई माधवराव पेशव्यास अर्पण केले. पुण्यातील आपल्या वास्तव्यात महादजीने आपल्या भारदस्त व्यक्तिमत्वाने आणि प्रेमळ स्वभावाने पेशव्यावर विलक्षण छाप टाकली. नानाच्या कडक शिस्तीला कंटाळलेल्या तरूण पेशव्याना महादजीचा दिलदार स्वभाव आवडून तो दिवसे दिवस शिंद्याकडे आकृष्ट होत गेला. ही गोष्ट नाना फडणिसांच्या शंकेखोर स्वभावाला अस्वस्थ करणारी असली तरी या गोष्टी थांबविणे नानांस अशक्य होते. महादजी पेशव्यावर केवळ छाप टाकूनच थांबला नाही तर तरूण पेशव्यांना हाताशी घेऊन कारभारविषयक निर्णय घेण्यासही त्यांनी सुरूवात केली. महादजीची ही कारभारातील लुडबूड नाना फडणिसांस कदापि सहन होणारी नव्हती.

---

[६३] न्यू.हि.ऑ.म., ख०३, पृ. २४९

[६४] ग्रॅन्ड डफ, ख. ०२, पृ. १८०.

[६५] फॉ.ऑ.मु.ए., खं०४, पृ. ९५

सातारच्या छत्रपतींना मोकळीक दिली :– सातारकर छत्रपतींबद्दल इतर मराठे सरदारांप्रमाणे महादजीसही आदर होता. इतक्या जवळ आल्यावर एकवार राजदर्शन घडावे अशी त्याची स्वाभाविक इच्छा हाती. पण वरील पार्श्वभूमीवर नानांनी ही परवानगी नाकारली. छत्रपतींच्या असहाय्य अवस्थेबाबत महादजीला अनुकंपा वाटू लागल्यामुळेच त्याने आपली प्रतिष्ठा वापरून सातारकर छत्रपतींना सातारा शहरातच नव्हे तर माहुलीपर्यंत फेरफटका करण्यास थेट पेशव्यांकडून परवानगी मिळवून दिली.

भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर काढली :– भोरच्या सचिवांचा दिवाण आणि नानांचा हस्तक बाजी मोरेश्वर याच्या भ्रष्टाचाराची, अत्याचाराची अनेक प्रकरणे बाहेर काढून महादजीने पेशव्याकरवी त्याला शासन करविले. हया सा–या प्रकरणांमुळे नाना फडणिसांस महादजीच्या हेतूबाबत शंका येऊन भीती वाटू लागली.[६६]

हिशोबासंबधीचा वाद :–मराठा दरबारामध्ये वादाचे एक मोठे प्रकरण म्हणजे उत्तरेमध्ये महादजीने केलेल्या मोहिमांचा हिशोब होय. महादजीने उत्तर हिंदुस्थानमध्ये दैदिप्यमान यश मिळवलेले होते त्यामुळे त्यांच्याकडे अमाप संप्पती असणार आहे असा नाना फडणविस व इतर मराठा सरदारांचा समज होता. मात्र महादजी शिंदे यांनीच पेशव्यांना उत्तरेतील मोहिमांचा खर्च म्हणून सात करोड रूपयाची मागणी केली.[६७] त्याचवेळी नानानी महादजीस शेवटच्या १० वर्षातील सहा करोड रूपयाचा हिशोब देण्यास सांगितले.[६८] हा हिशोबाचा वाद वाढत जावून शेवटी हे प्रकरण फारच विकोपाला गेले. पेशव्यांनी मध्यस्थो करून त्यावर पडदा पाडला.

---

[६६] ना.फ.च., पृ. १४७

[६७] इ.ले.सं., खंड.०२, नं. ३४९२, पृ. ४७३२,३३.

[६८] म.रि.उ.वि., भाग.०२, पृ. ३८८

महादजी शिंदे व नाना फडणविस या दोन मातब्बर सरदारांच्या या भांडणाबाबत इतर मराठा सरदारांना भिती वाटत होती. कारण या दोन्ही सरदारांच्या भांडणात तिस-याचा लाभ होण्याची जास्त शक्यता होती.[६९] पुढे लाखेरीच्या युध्दानंतर महादजी शिंदे यांनी हे हिशोबाचे प्रकरण जास्त ताणून न धरता पेशवा दरबारामध्ये खुलेपणाने यावर चर्चा करण्यात आली. त्यावेळी असे ठरविण्यात आले की,

१) महादजी शिंदे यांना पेशव्यांनी ५ करोड रूपये दयावेत.

२) पेशवे महादजीस ५ करोड रूपये लगेच देवू शकत नव्हते तेंव्हा त्यांनी सदरचे पैसे पेशव्याकडून मिळेपर्यंत उत्तरेमध्ये हस्तगत केलेल्या प्रदेशातील पेशव्यांचा हिस्साचा प्रदेश स्वताकडे ठेवून घ्यावा व पेशव्यांनी पैसे भागविल्यावर तो त्यांना परत करावा.

३) महादजीने पेशव्याना सैन्याची मदत करावी व पेशव्यांनी सैन्याचा खर्च भागवावा. या सर्व कलमांना पेशवा दरबार व महादजी शिंदे यांनी मंजूरी दिली व हे प्रकरण येथे संपविण्यात आले.[७०]

पेशव्यांची मध्यस्ती व नाना महादजी समजोता :– लाखेरीच्या युध्दाबाबत महादजी दु:खी होता त्यास मराठा सरदारांनी आपआपसात लढून शक्ती वाया घालवणे हे पटत नव्हते.[७१] पुणे दरबारामध्ये हिशोबाबातच्या वाटाघाटी मिटल्यानंतर महादजी शिंदे यांनी आपले धोरण सौम्य ठेवल्याचे दिसून येते. पडत्याकाळात नाना फडणीस यांनी मराठा साम्राज्यात राज्यकारभारामधे घडी बसविण्यात महत्वाची भूमिका बजावली हे महादजीस माहित होते तर महादजीस दक्षिणेत राज्यकारभारात रस नसून उत्तरेमध्ये आहे त्यांनी

[६९] इ.ले.सं., खं०९, नं.३५१४, पृ.४६५०, नं.३५१६, पृ.४६५५
[७०] न्यू.हि.ऑ.म., भाग– ०३, पृ. २५२., म.रि.उ.वि., ०२ पृ. ३८८.
[७१] ग्रॅड डफ, खंड–३, पृ. २४३–२४४

उत्तरेमध्ये मराठा साम्राज्य पानिपतच्या रणसंग्रामानंतर पुनः आकारास आणले हे नानास माहित होते. परिणामी दोन्हीही महापुरूषांनी समझोत्याचे धोरण घेतल्याचे दिसते. पेशव्यांनी महादजी शिंदे, नाना फडणविस व हरिपंत फडके यांना एक दिवस बोलावून घेवून मराठा साम्राज्याच्या हितासाठी आपआपसातील हेवे दावे बाजूला ठेवावेत असे सांगितले. त्यानंतर नाना व महादजी यांच्यातील संघर्ष कमी होत गेल्याचे दिसते.[७२] पेशवा सवाई माधवराव व हरिपंत फडके यांनी या दोन नेत्यांच्या मनातील एकमेकाविषयी असणारी द्वेषाची भावना घालवण्यात महत्वाची कामगिरी बजावली.[७३] नाना महादजी या दोन मातब्बर नेत्यामध्ये दिलजमाई झाल्याने गोविंदराव काळे व इतर अधिका–यांना आनंद झाल्याचे दिसून येते[७४]

महादजी शिंदे यांचा शेवट :– नाना बरोबर समजोता झाल्यावर पुढे जास्त काळपर्यंत महादजी शिंदे मराठा साम्राज्यास योगदान देवू शकले नाहीत. महादजी शिंदे यांची तब्येत मे १७९३ पासून बिघडली त्यांना सारखा ताप येत होता. अनेक वैदयांनी त्यांच्यावर उपचार केले मात्र त्याचा त्यांच्यावर काहीही परिणाम झाला नाही. ११ फेब्रुवारी रोजी त्यांची तब्येत खूपच बिघडली. १२ फेब्रुवारी १७९४ रोजी त्यांची तब्येतीची विचारपस करण्यासाठी पेशवा सवाई माधवराव व नाना फडणीस हे गेले होते त्यावेळी महादजी शिंदे हे बोलण्याच्याही मनस्थितीमध्ये नव्हते. पेशवा सवाई माधवराव व नाना

---

[७२] कित्ता, पृ. २४१ ते २५१

[७३] इ.ले.सं., खं. ०९, पृ. ४७६२., म.इ.सा., (खडर्याचा पत्रव्यवहार) पृ. ७०., सावरकर वि.दा., उपरोक्त,, पृ. २०३–२०५.

[७४] गोविंदराव काळे हा सवाई माधवरावाच्या पेशवाईत निजामाच्या दरबारामध्ये पेशवाइ वकिल होता. – म.प.इ., ले.१९९, पृ.१९६, १९७.

फडणविस हे दोघे भेटून गेल्यानंतर काही कालावधीनंतर महादजी शिंदे यांचा मृत्यू झाला.[७५]

मराठा साम्राज्याची वाताहात (पानिपत १७६१) होत असताना महादजी शिंदे यांनी ती वाताहात थांबवून परत मराठा साम्राज्याची बळकट मोट बांधली. मराठा साम्राज्याची यशोगाथा शिखरावर नेऊन पोहचवली. दिल्लीचे तख्त ही मराठयांच्या इशा–यांने चालू लागले हे सर्व केवळ महादजी शिंदे यांच्या रणनिती व मुत्सदगिरीमुळेच शक्य झाले होते. महादजी शिंदे यांचा मृत्यू मराठा साम्राज्याच्या दृष्टिने खूपच हानीकारक असल्याचे थोडयाच काळात सिध्द झाले. मराठा साम्राज्याच्या हितासाठी महादजी शिंदे हे आणखी काही वर्षे जगू शकले असते तर इंग्रजांचा त्याचवेळी निःपात झाला असता कारण इंग्रज या परकीय सत्तेबाबत महादजी शिंदे यास पहिल्यापासूनच आपुलकी नव्हती. त्यास भारतातून प्रत्येक भागातून हाकलून दयावे या हेतूनेच ते दक्षिणेमध्ये आले होते. मात्र दुदवाने त्यांना पेशवा दरबारामध्येच वाटाघाटी व भांडणामध्ये गुंतून पडावे लागले व त्यातच त्यांचा शरीरअस्वास्थ्याने मृत्यू झाला.

....

[७५] सि.अ.पॉ.डि.डा., नं ४७, पत्र नं. १६, १७, पृ. १५४ – १५६., (अप्रकाशित पत्र, मुंबई पुराभिलेखागार) इ.ले.सं., खं.०९, नं. ३५२६, ४६५८, पे.द.– खं. ४०, पृ.२७६, चं.द.,नं. १३०–१३२ पृ.१४०–१४१., शिं.इ.सा., खंड.०२, नं.१८, पृ. १६, गु.द., न. ०७, पृ.०८ – .....माघ शु।। त्रयोदशीस बुधवारी (फेब्रुवारी १२, १७९४) पाचा घटका रात्री वैकुंटवासी झाले...) राजश्री राज जालमसिंगजी गोसावी यास दौलतराव शिंदे यांचे पत्र, (अप्रकाशित पत्र, श्री नटनागर शोध संस्थान, सीतामऊ, माळवा)

प्रकरण आठवे

मुल्यमापन

छत्रपती शिवाजी महाराज यांनी १७ व्या शतकामध्ये मराठी सत्ता निर्माण केली. १८ व्या शतकामध्ये मराठी सत्ता ही एक प्रबळ सत्ता म्हणून ओळखली जावू लागली. सर्व हिंदुस्थानामध्ये मराठी सत्तेचा बोलबाला होता. उत्तरेतील राजकारणामध्ये मराठयांचा दबदबा निर्माण झाला होता मात्र तिस–या पानिपत युध्दामध्ये (१४ जानेवारी १७६१) मराठयांचा पराभव झाला व मराठी सत्तेला मोठा हादरा बसला. उत्तरेमध्ये झालेल्या या युध्दामध्ये अनेक कर्तबगार लोकांना आपले प्राण गमवावे लागले. त्याने मराठी सत्तेत नेतत्वाची पोकळी निर्माण झाली. ही पोकळी भरून काढण्याचे काम व उत्तरेत मराठयांचे वर्चस्व पुनः निर्माण करण्याचे काम माधवराव पेशवे यांनी केले. माधवराव पेशवे यांनी नवीन कर्तबगार लोकांची फळी निर्माण केली व त्यांना स्वराज्याच्या कामास लावून पानिपत युध्दात मराठी सत्तेची गेलेली प्रतिष्ठा परत मिळविली. या कर्तबगार लोकांच्या फळीमध्ये शिंदे व होळकर हे प्रमुख असल्याचे दिसून येते. यातील शिंदे घराण्याचे योगदान पानिपतपूर्व व पानिपतनंतर महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

शिंदे हे शुद्र असून त्यांच्या अंगी इतका पराक्रम करण्याची शक्ती कोठून आली असा विवाद दिसून येतो. मात्र शिंदे हे शुद्र नसून ते 'सेंद्रक' या लढवय्या जमातीतील क्षत्रीय होते, मराठयांच्या ९६ कुळातील एक कूळ होते व छत्रपती घराण्याशी वैवाहिक संबध जोडण्याइतपत त्यांची प्रतिष्ठा होती असे दिसून येते.

मराठयांच्या इतिहासामध्ये ज्यांनी आपली छाप उटविली ते शिंदे घराणे मूळचे कोणते याबद्दल वेगवेगळी मते मांडली जातात. मात्र 'शिंदेखेड' हे शिंदयाचे मूळ गाव नसून 'कण्हेरखेड' हेच त्यांचे मूळ गाव असल्याचे दिसून येते. शिंदे घराण्याचा म्ळ पुरूष जनकोजी शिंदे हे होय. मात्र राजकीय पटलावर जनकोजी पुत्र राणोजीने आपली कर्तबगारी सिध्द केल्याचे दिसून येते. राणोजी शिंदे हे बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या पदरी प्रथम हुज–या म्हणून नोकरीस लागले व तद्नंतर ते प्रामाणिकपणा आणि स्वामिनिष्ठा या गुणाच्या जोरावर उत्तोरोत्तर वरच्या पदावर पोहचले. कन्हेरखेडची पाटीलकी शिंदयाच्याकडे असताना इतक्या हलक्या दर्जाची नोकरी त्यांनी का पत्करली या बाबत सभ्रंम निर्माण होतो. पेशव्यांच्या जवळ राहिल्यास आपणास पुढे उर्जितावस्था येईल हा एकच उद्देश राणोजी शिंदे यांचा असावा असे दिसून येते.

पेशव्यांशी एकनिष्ठ राहिल्याने व स्वपराक्रमाने राणोजी शिंदे यांचा पावलोक, बारगीर, करोल, शिलेदार, सरदार व सुभेदार असा उत्कर्ष झाल्याचे दिसून येते. शिंदेना जहागिरी ही वंशपरंपरेने न मिळता तो त्यांनी आपल्या पराक्रमावर मिळविली व वाढविलीही हे मान्य करावे लागते.

शौर्य, कर्तबगारी, स्पष्टवक्तेपणा ह गुण राणोजी शिंदे यांच्या अंगी असलेले दिसून येतात. सेनापतीच्या अंगी असणारे जवळ जवळ सर्व गुण राणोजी शिंदे यांच्या अंगी होते. मात्र सेनापती म्हणून फार थोडया प्रमाणात स्वतंत्र मोहीमा काढण्याची संधी राणोजीस मिळाली. अल्पशिक्षण, रागीट स्वभाव व कोणत्याही कामात अतीघाई हे दुर्गूण सोडता राणोजी शिंदे हा स्वामीनिष्ठ, कर्तव्यनिष्ठ, शूर, पराक्रमी सरदार होता असे दिसते.

इतिहासामध्ये गादीच्या वारसाविषयी संघर्ष झाल्याचे अनेक उदाहरणे दिसून येतात. मात्र शिंदे घराण्याच्या बाबतीत हे समीकरण लागू होताना दिसत नाही. कारण राणोजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पुत्रामध्ये असा संघर्ष झाल्याचे दिसून येत नाही. राणोजी शिंदेच्या मृत्यूनंतर त्यांचा वडील मुलगा जयाजी शिंदे हा सरदारकीचे काम पाहू लागला.

जयाजी शिंदे यांनी रोहिलाखंडाचा, माळवा, मारवाड, जोधपूर वगैरे बरोबरच्या युध्दामध्ये होळकरांच्या बरोबर आपले योगदान दिलेले दिसून येते. मात्र मारवाड स्वारीच्यावेळी जयाजी शिदे यांचा खून झाला. जयाजी शिंदे यांच्या खूनाबाबत मल्हारराव होळकरांच्या भोवती संशयाचे जाळे निर्माण झाल्याचे दिसून येते मात्र त्याबाबत सबळ पुरावा दिसून येत नाही.

जयाजी शिंदे यांचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा पुत्र जनकोजी शिंदे यास सरदारकी प्राप्त झाली. जनकोजी शिंदे यानी मेडत्याची लढाई, हरिगड येथील गुजालसिंग गिराशा, जयनगर, मारवाडची लढाई इत्यादी ठिकाणी नेत्रदिपक कामगिरी केल्याचे दिसून येते.

जनकोजी शिंदे यांनी मल्हारराव होळकर यांच्याशी उत्तरेमध्ये आपली मोहिम चालू केल्यापासून कोणताही संपर्क ठेवला नव्हता. याचे कारण म्हणजे जनकोजीच्या मतानुसार मल्हाराव होळकर जयाजी शिंदेच्या खूनास जबाबदार होते. यावेळी गंगाबातात्याने शिंदे व होळकरामध्ये अयशस्वी मध्यस्ती केलेली दिसते. मात्र मल्हारराव होळकरांनी मानापमानाचा विचार न करता जनकोजीची भेट घेवून जनकोजीच्या मनातील किल्मिष काढून टाकल्याचे दिसून येते. येथे दोन्ही सरदारांचा स्वहितापेक्षा राज्यहिताचा विचार दिसून येतो. पानिपतच्या लढाईत जनकोजी शिंदे हे अब्दालीच्या सरदारास

सापडले व पैशाकरीता त्याने जनकोजोचा वध केला. राज्याच्या हितासाठी त्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली.

युध्दामध्ये ज्यास पराभव माहित नव्हता असे दत्ताजी शिंदे इतिहासामध्ये प्रसिध्द आहे. पानिपतसारखे अरिष्ठ मराठा साम्राज्यावर येवू नये यासाठी दत्ताजी प्रयत्नशील होते. यासाठी अब्दालीच्या सैन्यास शुक्रताल बरारीघाट येथे अडवून धरले. मात्र तेथे त्याच्यापुढे अनेक संकटे उभी राहिली तरीही मागे न हटता त्यांनी शत्रूचा सामना केला. लढता लढता त्यांचा मृत्यू घडून आला. पानिपतच्या प्रचंड संहाराने दत्ताजीचे अचाट कृत्य लोपून गेले. धन्याची कामगिरी पार पाडण्याकरिताच त्याने आपल्या प्राणाची आहुती दिली. 'बचेंगे तो और भी लढेंगे' हे त्याचे वाक्य आजही इतिहासात अजरामर आहे. मृत्यूला न घाबरणारा, रणागंणातून माघार न घेणारा, शत्रूला पाठ न दाखवणारा, धाडसी योध्दा असे अनेक गुण दत्ताजी शिंद यांच्यामध्ये दिसून येतात.

जोतिबा शिंदे हा राणोजी शिंदेचा तीन नंबरचा पुत्र होय. आपल्या पराक्रमी भावांच्याबरोबर तो अनेक युध्दामध्ये भाग घेत असे. मात्र आपल्या इतर बंधुच्या पराक्रमाने जोतिबा शिंदे हे फारसे प्रकाशात आले नाहीत. वोडसे येथील खंडणी गोळा करण्यासाठी गेले असताना त्यांचा खून झाला. स्वराज्याच्या हितार्थ त्यांचा मृत्यू झाल्याचे दिसून येते.

तुकोजी शिंदे हा आपल्या भावांच्या बरोबर प्रत्येक युध्दात भाग घेत असे. तुकोजीचा मृत्यू कुंभेर येथे झाला की, पानिपतच्या रणसंग्रामात झाला असे दोन प्रवाह आहेत. मात्र तुकोजीचा मृत्यू हा या दोन्हीही ठिकाणी झाला नाही कारण राघोबादादाने तुकोजीस पानिपतनंतर सरदारकी देवू केली होती. यावरून तो पानिपतयुध्दातून बचावून परत आल्याचे दिसून येते.

स्वतः एका पायाने अधू असूनही संपूर्ण उत्तरहिदूंस्थानावर ज्याने आपली सत्ता प्रस्थापित केली ते महादजी शिंदे यांच्या जन्माबाबत वाद असला तरी सर्वमान्य १७२७ ही तारीख असल्याचे दिसते. महादजी शिंदे हे लहान वयापासूनच युध्द मोहिमावर आपल्या भावाच्या बरोबर जात होते. त्यामुळे त्यास युध्दनीती, मुत्सद्देगिरी, राजनीती, धैर्य याचे शिक्षण बालवयातच मिळत गेलेले दिसते. महादजी शिंदेनी पानिपतच्या रणसंग्रामातही भाग घेतला होता. तेथून ते जखमी होवून राणेखान याच्या मदतीने परत आले. पुढे राणेखानला महादजीने भाईचा दर्जा दिला व तो महादजीच्या सैन्यातील प्रमुख सरदार बनल्याचे दिसून येते. येथे राणेखानचे उपकार महादजी शिंदे कधीही विसरला नाही. आपल्या भावाचा दर्जा आणि मान, प्रतिष्ठा महादजीने त्यास दिली. महादजीचा अत्यंत विश्वासू सल्लागार, जेष्ठ मुत्सद्‌दी, मध्यस्थ वकील, पराक्रमी सेनापती अशा अनेक भूमिका हया राणेखानभाईनी नंतरच्या काळात पार पाडल्याचे दिसून येते. महादजीने राणेखानचे गुण ओळखून त्यास संधी प्राप्त करून दिली तर राणेखाननेही महादजीचा विश्वास सार्थ ठरविल्याचे दिसून येते

पानिपतच्या युध्दानंतर शिदंयाच्या दौलतीचा कारभार राघोबादादाने तुकोजी शिंदे यास देण्याचा प्रयत्न केला मात्र तुकोजीने महादजी हाच कारभार करण्यास योग्य असल्याचे सांगितले. पुढे राघोबादादाने मानाजी फाकडेस शिंदे दौलतीचा मालक केल असता महादजी सर्व सोडून मन्शूरशहा या आपल्या गुरूकड गेल्याचे दिसून येते. पुढे माधवराव पेशव्यांनी पुन्हा महादजीकडे कारभार दिला. शिंदे दौलतीचा कारभार महादजीकडे आल्यानंतर १७६९ ते १७९२ या कालखंडात महादजीनी मिळालेल्या संधीचे सोने केले. उत्तर हिदुंस्थानात मोहिमा आखून मराठी राजसत्तेचा अगदी

सतलजपर्यंत विस्तार तर केलाच पण शिंदयाचे असे स्वतंत्र अस्तित्वही निर्माण केले.

पेशव्यांचा उत्तरेकडील मोहिमा आखण्याचा मुख्य उद्‌देश दक्षिणेकडे द्रव्यनिधीचा ओघ वळविणे हा होता. पण द्रव्य संपादन केल्यानंतर ब–याच लहान – थोर सरदारांना वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याचा लोभ सुटत असे. मात्र सर्वस्व पणाला लावून मोहिमा फत्ते करून दक्षिणेकडे द्रव्यनिधी वळविण्याचे भान महादजीनी कधी सुटू दिले नाही.

नारायणराव पेशव्यांच्या खूनानंतर पेशवा दरबारामध्ये घडून आलेल्या विविध घडामोडीमध्ये महादजी शिंद यांनी आपले धोरण तटस्थ ठेवल्याचे दिसून येते. नारायणरावाचा खून झाल्यानंतर पेशवा दरबारामध्ये बारभाईचे कारस्थान घडून आले. या बारभाई कारस्थानास महादजीने पाठिंबा दयावा असे कारभारी मंडळीनी सांगितले मात्र महादजीने आपला पाठिंबा लगेच जाहीर कला नाही त्यामुळे महादजीवर टिका झालेली दिसून येते. तसेच बारभाई कारस्थानाचा महादजीने आपले वर्चस्व वाढविण्यासाठी उपयोग करून घेतला, स्वतःस महत्व प्राप्त करून घेतले असे म्हटले जाते. या टिकेमध्ये काही सत्यांश असला तरी आपणास सरदारकी मिळविण्यात झालेला त्रास लक्षात घेवून जो पक्ष विजेता होईल (पेशवा व राघोबा) त्या पक्षाच्या बाजूने आपणास जाता यावे म्हणून महादजीने तटस्थ धारण स्विकारले असावे.

भाऊसाहेबांच्या तोतयाचा बंदोबस्त, मोरोबा फडणविस याच्या बंडाचा बिमोड व कोल्हापूरचा बंदोबस्त महादजीने केला. कोल्हापूरचा बंदोबस्त करण्या अगोदर महादजीने अशीरगड किल्ला व काही मागण्या पेशव्याकडून

मान्य करून घेतल्या. त्यामुळे महादजीने कोल्हापूरच्या मोहिमेच्यावेळी स्वार्थ साधला अशी टीका महादजीवर केली जाते.

१७७९ पासून महादजीचा प्रत्यक्ष पेशव्यांच्या बरोबर संबध न येता पेशव्यांचा कारभारी नाना फडणविस यांच्या बरोबर जास्त सबंध येवू लागला. त्यामुळे येथून पुढे नाना व महादजी यांचा कधी संघर्ष तर कधी मिलाफ याचाच इतिहास होता असे म्हणता येईल.

महादजी दिवसे दिवस मोठया प्रमाणात यश मिळवू लागल्यानंतर नाना फडणविस महादजीचा तिरस्कार करू लागला. कारण नानास वाटे की, जशी पेशव्यानी सातारा राजकुलाची अवस्था केली, तशी पेशव्यांची अवस्था महादजी करील ती न व्हावी म्हणून तो इग्रजांशी मोठया स्नेहाने वागू लागला. काही दिवस इंग्रजाबरोबर बोलणे महादजीमार्फत चालत असे ते बंद करून इंग्रजांचा एक वकिल पुणे दरबारात ठेवला. नागपूर भोसल्यास पुण्यास आणून त्याचा इंग्रजाबरोबर स्नेह जोडून महादजीस लौकिकात हलका बनविले. महादजीने संपादन केलेल्या दौलतीत पेशव्यांचा हिस्सा असावा व त्याने पेशव्याच वर्चस्व मानावे म्हणून अलिबहाद्दर व तुकोजी होळकर या दोघाना फौज देवून दिल्लीस रवाना केले. नानाच्या या धोरणाचा महादजीवर काही फरक पडला नाही मात्र मराठा साम्राज्यामध्ये सरदारमध्ये परस्परामध्ये दुही निर्माण झाल्याचे व इंग्रजाचा मराठा राज्यकारभारामध्ये प्रवेश झाल्याचे दिसून येते.

महादजी शिंदे यांचे परकिय सत्त बरोबर संबध आले. मात्र परकिय सत्तावर महादजी शिंद यांनी आपला वचक बसविल्याचे दिसते. महादजी शिंदे यांनी इंग्रजाबरोबरच्या वडगावचा तह, सालबाईचा तह यामध्ये आपले वर्चस्व सिध्द केलेचे दिसून येते. उत्तरेमध्य जोपर्यंत महादजी होता तोपर्यंत

इंग्रजांनी उत्तरभारताच्या राजकारणामध्ये कोणतीही हालचाल केलेली दिसून येत नाही.

सामाज्य विस्ताराच्या दृष्टिने लष्करास महत्व असल्याचे महादजी ओळखून होता म्हणून त्याने आपल्या लष्करामध्ये सुधारणा केल्याचे दिसते. मराठयांची पूर्वीची गनिमी काव्याची युध्द पध्दत श्रेष्ठ होती परिणामी इंग्रजांना त्यांचा सामना करणे कठिण जात होते. या गनिमी पध्दतीमुळेच मराठयांचा पहिल्या मराठा – इंग्रज युध्दामध्ये विजय मिळाला असावा. मात्र त्यामध्ये काही त्रुटीही होत्या आणि नेमक्या त्याच त्रुटी दूर करण्याकरीता महादजी शिंदे यांनी फ्रेंच अधिका–यांना आपल्या पदरी ठेवून कवायती फौज उभारण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. महादजीने डि–बॉयच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या परकिय कवायती फौजेचा स्वकीय सत्तेविरोधामध्ये खूपच फायदा झाल्याचे दिसून येते. मात्र या फौजेचा इंग्रजाबरोबर लढत असताना मात्र फायदा झाला नाही असे दिसून येते. याचे कारण म्हणजे परकिय युध्दतंत्र पुर्णतः महादजीच्या अधिका–यांनी आत्मसात केले नव्हते. तसेच महादजीकडे ही युध्द पध्दती अंमलात आणण्यासाठी पुरेसे अधिकारीही नव्हते.

उत्तरेतील छोटया छोटया संस्थानातील बंडे मोडून काढणे, चौथाई अथवा खंडणी गोळा करणे, दिल्ली दरबारामध्ये आपले वर्चस्व निर्माण करणे इ. गोष्टी महादजी फ्रेंचाच्या मदतीनेच करू शकला हे सत्य मात्र नाकारता येत नाही.

उत्तरेतील राज्यकारभारामध्ये शिंदे व होळकर या दोन सरदारांना पानिपत युध्दाअगोदर व नंतरही महत्वाचे स्थान असलेले दिसून येते. उत्तरेतील अनेक अडचणी व संकटाचे निवारण हे दोन सरदारच करत असत. मात्र या दोन सरदारांनी उत्तरेतील अंतर्गत राजकारणात भाग

घेतल्याने त्यांना तेथील सत्तांचा कडवा विरोध झाल्याचे दिसून येते. शिंदयानी उत्तरेतील स्थानिक सत्ताधिशाबरोबर युध्दे केली व त्यामध्ये यश देखील प्राप्त केले.

महादजी शिंदे यांचे उत्तरेकडील धोरण हे दोन टप्प्यामध्ये प्रामुख्याने विभागलेले दिसून येते. यामध्ये पहिला टप्पा हा महादजी शिंदे यांना स्वतःचे अस्तित्व सिध्द करणारा व खडतर असा पहिल्या मराठा इंग्रज युध्दापर्यंतचा (१७८२) होता. दुसरा टप्पा हा महादजीने बादशहाही संपादन करून उत्तरेत आपला दरारा निर्माण केला व परत दक्षिणेत यावयास निघाला (१७९२) तिथपर्यंतचा होय.

पहिल्या टप्प्यामध्ये महादजी शिंदे यांनी आपले बंधू केदारजी बरोबर व नंतर रामचंद्र गणेश कानडे यांच्या बरोबर उत्तरेत स्वारी केली. महादजी शिंदे यांनी उत्तरेमध्ये गेल्यानंतर मराठा अंमलाखाली असलेल्या उदयपूर, जोधपूर वगैरे प्रदेशातून खंडणी गोळा करण्याचे काम यशस्वीरित्या पार पाडले. झबेताखानाचा बंदोबस्त केला, दोआबात मराठयांचे वर्चस्व निर्माण केले. जाट, रोहिला या मराठयांच्या शत्रुना आपल्या वर्चस्वाखाली आणले. मोगल बादशहा शहाआलम याला मदत करून त्यास पुन्हा गादीवर बसविले. या टप्प्यामध्ये महादजी शिंदे यांनी पानिपतमध्ये मराठयांची गेलेली प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त केली व बादशहास असे जाणवून दिले की मराठयांच्या मदतीशिवाय पर्यायाने शिंदयाच्या मदतीशिवाय त्यास कोणताही तरणोपाय नाही.

दुस–या टप्प्याच ठोकळ मानाने दोन कालखंड पडतात. लष्कराच्या जोरावर अनेक सरदारांचा पाडाव करून महादजीने पादशाही सत्ता हाती घेतली यामुळे मुसलमानी व रजपूत सरदार यांनी एकदम उठाव करून

लालसोटच्या लढाईत महादजीस शह देण्याचा प्रयत्न केला आणि गुलामकादरने दिल्ली हस्तगत केली येथपर्यंत पहिला कालखंड पडतो. लालसोटच्या लढाईतील अपयशानंतर महादजीने परत सैन्याची जमवा जमव केली व उत्तरेतील राठोड, रजपूत बंडखोर मोगल सरदार यांचा बंदोबस्त करून पुनश्चः दिल्लीत मराठयांची सत्ता प्रस्थापित केली तो दुसरा कालखंड होय.

उत्तरेत महादजीने ग्वाल्हेर व गोहाद ही दोन महत्वाची स्थळे हस्तगत केल्यानंतर असहाय्य बादशहाचीसुध्दा खात्री झाली की, आता महादजीचा आश्रय घेतल्याशिवाय गत्यंतर नाही.[१] बादशहाने महादजीस पत्रे पाठवून मदत करण्याबाबत विणविले यावेळी महादजीने बादशहाकडून अनेक पदव्या व अधिकार पेशव्याकरीता व स्वतःकरीता मिळविले. पुढे बादशहाचा कारभार करत असताना महादजीस अनेक आर्थिक संकटाना तोंड दयावे लागल्याचे दिसून येते.

१७८४ मध्ये महादजीने वकिल–ए–मुतालिक व इतर अनेक मानाच्या पदव्या धारण केल्या. महादजीने या जबाबदा–या स्विकारल्यानंतर १७९१ पर्यंत आग–याचा प्रमुख हमदानी, नजीबखानाचा पुत्र झबेताखान, झबेताखानचा

---

[१] महादजीचे वर्चस्व दर्शवणार बादशहा व बेगमा यांच्यातील एक संभाषण : – पाटीलबुवांनी संक्रातीनिमित्त तिळगुळ पाठविला, जनानखान्यात जावून बादशहानी स्वतः तो खाल्ला आणि आपल्या बेगमांनाही दिला. एका बेगमेने म्हटले ''अपराधाची क्षमा असावी, हिंदुस्थानात रूढी आहे की, गुलाम किंवा एखादा घोडा कोणी विकत घेतला तर त्यांना तिळ–गुळ खाऊ घालतात. हेतु हा की, त्यांनी मालकाशी निष्ठापूर्वक वागावे आज जहापन्हानी पाटील बावांचा तिळ–गुळ खाल्ला म्हणजे याचा अर्थ असा की पाटील बुवांशी निष्ठेने वागणे आवश्यक झाले. यावर बादशहा म्हणाले ''खाल्ला आम्ही तिळगुळ खाल्ला आता निष्ठेविषयी म्हणाल तर हदीस (पैंगबराच्या आठवणी आणि आख्यायिका) मध्ये म्हटले आहे की, दास आणि गुलाम यांच्याकडून निष्ठेची अपेक्षा बाळगू नये म्हणून निष्ठेचा उल्लेख या ठिकाणी करणे व्यर्थ आहे' – पगडी सेतू माधवराव, *महाराष्ट्र आणि मराठे,* पृ.२२५–२२६

पुत्र गुलामकादीर, रजपूत, इ. अनेक शत्रूंना तोंड दयावे लागले. महादजीने आपली सैन्य व्यवस्था राणेखानभाई, अंबोजी इंगळे, रायाजी पाटील, जिवबादादा बक्षो, लाडोजी देशमुख, डि–बॉय यांच्या नेतृत्वाखाली भक्कम बनवली होती व त्याच्या सहाय्याने त्यांनी अनेक संकटावर मात केलली दिसून येते.

महादजी शिंदे यांनी उत्तरेत वर्चस्व निर्माण करून दिल्लीचा राज्यकारभार आपल्या हाती घेईपर्यंत पहिली चार वर्षे त्यांना पुण्याहून मदतही झाली नाही व विरोधही झाला नसल्याचे दिसून येते. उत्तरेतील राज्यकारभार हा त्यांचा एकतंत्री राज्यकारभार होता. उत्तरेतील राजकारणातील यश अपयशाची सर्वस्वी जबाबदारी महादजीने स्विकारली होती. लालसोटच्या लढाईत महादजीचा पराभव झाल्यानंतर त्यांनी उत्तरेतच सैन्य उभारले तसेच पुण्यासही सैन्य मदत मागितली त्यावेळी पेशवा दरबारने महादजीच्या मदतीकरीता तुकोजी होळकर व अलिबहाद्दर यांना पाठविल्याचे दिसून येते. मात्र तुकोजी होळकर व अलिबहाद्दर यांनी महादजीस मदत करण्याऐवजी त्रासच दिल्याचे दिसून येते.

शिंदे व होळकर या उत्तरहिदुंस्थानातील सरदाराकडे उत्तरेत विस्तार करण्याचे काम होते. मात्र मराठेशाहीच्या दुर्देवाने या सरदारामध्ये परस्पराविषयी मत्सर, फितुरी व द्वेष या दुर्गुणाचा प्रारंभ झाल्याचे दिसून येते. महादजी शिंदे यांचे उत्तर हिंदुस्थानामधील वर्चस्व तुकोजी होळकर, अलिबहाद्दर यास मानवत नसलेले दिसून येते. मात्र महादजीने या स्वकीय शत्रूवरही मात केल्याचे दिसून येते.

महादजी शिंदे उत्तरेकडील राज्यकारभाराची सर्व व्यवस्था लावल्यानंतर दक्षिणेमध्ये येण्यास निघालेत्यावेळी पशवे दरबारामध्ये मोठया

प्रमाणात विचारमंथन झाल्याचे दिसून येते. यामध्ये नाना फडणविस यांना महादजी शिंदे दक्षिणेत येत आहेत याची जास्त भिती वाटत असल्याचे दिसते. कारण महादजी शिंदे हे लष्कर व संप्पती या दृष्टिने खूपच बलशाली झाले आहेत व ते दक्षिणेत आल्यानंतर दक्षिणेचा कारभार आपल्या हातामध्ये घेतील व आपणास राज्यकारभारमध्ये स्थान राहणार नाही याची भिती नानास वाटत होती. याकरीता नानांनी तुकोजी होळकर व इतर सरदारांना पत्रे पाठविल्याच दिसून येते. त्याचबरोबर त्यांनी इंग्रजांची मदत मिळविण्याचाही प्रयत्न केलेला दिसून येतो. मात्र प्रत्यक्षात दक्षिणेत आल्यानंतर महादजी शिंदे यांनी आपला हुज–याचा धर्म सोडला नसल्याचे, पेशवा व नानाबरोबर नम्रतापूर्वक वर्तन केल्याचे दिसून येते.

दक्षिणेमध्ये आल्यानंतर नाना व महादजी यांच्यातील परस्पर वादास बादशहाने दिलेल्या पदव्या स्विकारण्यावरून सुरूवात झाल्याचे दिसते. तद्नंतर महादजीने पेशवे सवाई माधवराव यांच्याकरीता अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले व त्याच्यांबरोबर जवळीक निर्माण केली हे नानास पसंत येत नव्हते. पुढे छत्रपतीनांही महादजीने मोकळीक मिळवून दिली. हिशोबावरून झालेल्या वादामध्येही महादजीने बाजी मारली एकूणच सर्व बाबतीत महादजीने नानावर मात केल्यानंतर नाना राज्यकारभार सोडण्याची भाषा करू लागले. तेंव्हा पेशवा सवाई माधवराव यांनी मध्यस्ती केल्याने ते प्रकरण मिटल्याचे दिसून येते. येथे महादजीने आपण तलवारीबरोबरच राजनितीमध्येही सरस असल्याचे दाखवून दिल्याचे दिसते.

महादजी शिंदे दक्षिणेमध्ये असताना उत्तरेत होळकर व महादजीच्या सरदारामध्ये लाखेरीचे युध्द झाले या युध्दामध्ये होळकरांचा पराभव झाला. महादजीने या घटनेबद्दल नाराजी व्यक्त केल्याचे दिसून येते. कारण

महादजी शिंदे यांना लाखेरीचे युध्द अपेक्षित नव्हते ते अनपेक्षितरित्या घडून आलेले युध्द होते. शिंदे व होळकर यांच्यामध्ये झालेले लाखेरीचे युध्द हे मराठा साम्राज्याच्या ध्येय धोरणाविरोधात आहे असे महादजीने मत प्रकट करून दु:ख व्यक्त केल्याचे दिसून येते.

नाना बरोबर महादजीचा समजोता झाल्यावर पुढे जास्त काळपर्यंत महादजी मराठा साम्राज्यास योगदान देवू शकले नाहीत. कारण लवकरच महादजी शिंदे यांची तब्येत बिघडली. अनेक वैदयानी त्यांच्यावर उपचार केले मात्र त्यामध्ये सुधारणा घडून आली नाही. १२ फेब्रुवारी रोजी पेशवा सवाई माधवराव व नाना फडणीस महादजीस तब्येतीची चौकशी करून परत गेले व काही कालावधीतच महादजीचा मृत्यू झाला. यावेळी नाना फडणविसाने महादजीवर विषप्रयोग केला त्यामुळे महादजीचा मृत्यू घडून आला अशी बातमी बाहेर पडली मात्र त्यास सबळ पुरावा आढळून येत नाही.

मराठा साम्राज्याची वाताहात (पानिपत १७६१) होत असताना महादजी शिंदे यांनी ती वाताहात थांबवून परत मराठा साम्राज्याची बळकट मोट बांधली. मराठा साम्राज्याची यशोगाथा शिखरावर नेऊन पाहचवली. दिल्लीचे तख्त ही मराठयांच्या इशा–यांने चालू लागले हे सर्व केवळ महादजी शिंदे यांच्या रणनिती व मुत्सदेगिरीमुळेच शक्य झाले होते. महादजी शिंदे यांचा मृत्यू मराठा साम्राज्याच्या दृष्टिने खूपच हानीकारक असल्याचे थोडयाच काळात सिध्द झाले. मराठा साम्राज्याच्या हितासाठी महादजी शिंदे हे आणखी काही वर्षे जगू शकले असते तर इंग्रजांचा त्याचवेळी नि:पात झाला असता कारण इंग्रज या परकीय सत्तेबाबत महादजी शिंदे यास पहिल्यापासूनच आपुलकी नव्हती. त्यास भारतातून प्रत्येक भागातून हाकलून दयावे या हेतूनेच ते दक्षिणेमध्ये आले होते. मात्र दुर्दैवाने त्यांना पेशवा दरबारामध्येच वाटाघाटी

व भांडणामध्ये गुंतून पडावे लागले व त्यातच त्यांचा शरीरअस्वास्थ्याने मृत्यू झाला.

महादजीची गुणवत्ता, त्याच्या सवयी, भाषा ज्ञान, प्रशासन, इतर ज्ञाना बाबत कीन म्हणतात –

